दिनांक : ५ नोव्हेंबर २०२१

मासिकांक ९

"ती" चं पान

तिच्याकडून सगळ्यांसाठी

" दिवाळी विशेषांक "

संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

अंतरंग

टीप: लेखाच्या नावावर क्लिक/टॅप करून आपण आपल्याला हव्या असलेल्या लेखावर जाऊ शकता

(Works best with Adobe Acrobat Reader)

कविता

माऊली	अंजली उपाध्ये	१३
पंख जाणिवांचे	नीता खोत	१४
त्या दोघी	गीता गरुड	१५
विश्वास	गायत्री पंडित	१६

लेख

सहजीवन - काही गोड काही कटु अनुभव	माधुरी साकुळकर	१८
एका वेलांटीचा प्रवास	मृणालिनी केळकर	२१
जगाला प्रेम अर्पावे	आसावरी ऐनापुरे	२२
आधुनिक सुगरणीचा खजिना	भावना भालेराव	२४
चरैवेती चरैवेती	आरोही वंडलकर	२७

कथा

वारी	जयश्री दाणी	३०
नवनिर्मिती	डॉ. सुरुची डबीर	३७
बुचाचं झाड	सोनाली ताम्हणे	४३

अंतरंग

जगावेगळी	जयश्री नायडू	४५

ललित

सफरनामा	स्वर्णिमा कमलवार	४८
मन करा रे प्रसन्न	संगीता वाईकर	५१
मौनाची रूपं हजार	मंदार मोरोणे	५३
आणि काय हवं?	भार्गवी बाबरेकर	५६
मी घरात आले	मंजुषा शिनखेडे	५८
संवाद	तृष्णा आंबेकर	६०

संगीत आणि संगीत रंगभूमी

संगीत शाकुंतल - १४० वर्षांची सुरेल परंपरा	अर्चना साने	६२
भावफुलांची ओंजळ	अपूर्वा भालेराव	६३
सुरसंगिनी	मृण्मयी सारंग	६४
भातुकलीच्या खेळा मधले	निर्मिती ढेवलसी	६५

अंतरंग

आध्यात्मिक

अष्टलक्ष्मी स्तोत्रम्	सर्वेश फडणवीस	७४
नामयाची दासी	संजीवनी मराठे	७९

व्यक्तिचित्रण

सुरमयी यज्ञ	गौतमी करमरकर	८१
सोई परमपद पावेगा	सायली देशपांडे	८७

प्रवास

बाईसाहेबांचा प्रवास	अनुराग वैद्य	९१
एक तरल प्रवासानुभव	डॉ. समिधा चव्हाण	९५
अशी ही भटकंती	दिशा टिकेकर	९९
मेहिको मेहिको	रेणुका देशपांडे	१०२

अंतरंग

सामाजिक

तीचं स्वातंत्र्य , समाज आणि आम्ही	स्नेहा जोशी	१०६
भयग्रस्त मानसिक आरोग्य	प्राजक्ता बर्वे	१०८
विशेष मुलांकडे पाहण्याची समाजाची मानसिकता बदलण्याची गरज	वर्षा कुलकर्णी	११०

आरोग्य

आरोग्यदायिनी—अरोमा थेरपी	अमिता कानडे	११४
तिच्यासाठी " होमियोपॅथी"	डॉ. गौरी दामले	११७

मुलाखत

संवाद - अनुवाद	रेखा चवरे जैन	१२०

श्रेय नामावली

प्रबंध संचालिका	सायली अक्षय देशपांडे
संपादक	सायली अक्षय देशपांडे
अतिथी संपादक व मार्गदर्शिका	सौ. शुभा साठे
मुखपृष्ठ मांडणी व सजावट	अक्षय देशपांडे
सहाय्यक (टीम “ती” चं पान)	
	तृष्णा आंबेकर
	अपूर्वा भालेराव
	रेणुका देशपांडे
	दिशा टिकेकर
	मृण्मयी सारंग
	भार्गवी बाबरेकर
	निर्मिती देवलसी
	संजीवनी मराठे
	स्वर्णिमा प्रकाश
	प्राजक्ता बर्वे
	प्रांजली बाविस्कर

संपादकीय

“देखणे ते हात ज्यांना निर्मितींचे डोहळे|

मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे ||”

कविवर्य बा.भ. बोरकर यांच्या या सर्वश्रुत असलेल्या कवितेच्या ओळी “ती” चं पान या मासिकांकाच्या दिवाळी अंकासाठी मला यथार्थ वाटतात. वाचन आणि लेखन या दोन्ही परस्परपूरक क्रिया आहेत. चांगलं लिहिण्यासाठी ज्याप्रमाणे चांगलं वाचावं लागतं त्याचप्रमाणे चांगलं वाचता यावं यासाठी चांगलं लिहावं लागतं. या न्याय आजतागायत तसाच आणि तितकाच महत्वपूर्ण आहे.

मार्च २०२१ पासून “ती” चं पान या मासिकांकाचा प्रवास सुरु झाला., आज नववा मासिकांक आपल्यासारख्या रसिक वाचकांपुढे ठेवताना अत्यंत आनंद होतो आहे. खरंतर नवोदित लेखिकांचं हक्काचं व्यासपीठ म्हणा किंवा ती चं असं स्वतः चं पान असावं, तिने व्यक्त व्हावं, तिने लिहितं व्हावं या एकमात्र उद्देशाने या उपक्रमाचा जन्म झाला. आणि हा उद्देश हळूहळू का होईना पूर्णत्वाकडे जातो आहे याचा विशेष आनंद आहे. दिवाळी म्हंटली की, वाचक रसिक हे आवर्जून वाट बघतात ते दिवाळी अंकाची. मग तो दिवाळी अंक शब्दांच्या रंगावलीने नटून आपल्यासमोर एक एक नवीन छटा रेखाटतो आणि त्यातून एक सुंदर शब्दचित्र आपल्यापुढे उभं ठाकतं. असाच काहीसा प्रत्यय हा दिवाळी अंक वाचतांना आपल्या सगळ्यांना येईल असा विश्वास वाटतो. या दिवाळी अंकाचं मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ जितकं सुंदर आहे तितकंच अंतरंग सुद्धा वेगवेगळ्या विषयांनी सजलेलं आहे. “माउली” या कवितेने पांडुरंगाला स्तवून या अंकाची सुरुवात केली आहे. वेगवेगळ्या कथा,ललित, व्यक्तिचित्रण, आध्यात्मिक, प्रवासवर्णन, सामाजिक ,आणि ज्ञानेश्वर माऊलींच्या रचनेत त्यांनी म्हंटल्याप्रमाणे “ शब्देविण संवादु दुजेवीण अनुवादु” या ओवीतल्या “ संवादु अनुवादु या शीर्षकाने असलेल्या एका सुंदर मुलाखतीने या अंकाचा बोलका असा शेवट केला आहे.

या अंकाच्या पहिल्या प्रकाशनापासून ते आजच्या प्रकाशनापर्यंत ज्यांच्या शुभहस्ते याचे आभासी पद्धतीने प्रकाशन झाले त्या सगळ्या जणींना मन:पूर्वक धन्यवाद. या अंकाच्या अतिथी संपादक म्हणून कार्यरत असणाऱ्या लेखिका आणि उत्तम समीक्षक, संस्कृतानुरागी अशा सौ. शुभाताई साठे यांचे विशेष आभार. “ती” चं पानचे वैशिष्ट्य म्हणजे अंकातील दोन शब्द हा मथळा **“त्याच्यासाठी”** राखुन ठेवलेला असतो. या ही अंकात पुणे येथील ज्येष्ठ सावरकर साहित्य अभ्यासक श्री. चंद्रशेखर साने यांनी आपल्या ओघवत्या लेखन शैलीने या अंकाला शुभेच्छा दिल्या आहेत, ही

सुद्धा आमच्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. तिच्या प्रत्येक पानाला सर्वांगसुंदर करणारे आणि या संपादकीयची सुरुवात ज्या ओळींनी केली आहे ,अर्थातच “देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे” या ओळीला सार्थ ठरवणारे श्री. अक्षय देशपांडे यांच्या ऋणातच मी राहू इच्छिते. अंततः या उपक्रमात सातत्याने लिहित्या असणाऱ्या सगळ्या लेखिकांचे मनापासून कौतुक आणि धन्यवाद.

यात जे जे म्हणून चांगलं आहे ते या सर्वांच्या प्रयत्नांचे फलित आहे, आणि उणिवा अर्थातच त्या आमच्या आहेत. या अर्थाने उत्तमतेचे स्वागत कराल या अपेक्षेत...

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.. शुभ दीपावली !!

- सायली अक्षय देशपांडे

दोन शब्द

ई-वाचनसंस्कृती

मराठी वाचक आणि नवीन पिढीत वाचनसंस्कृती कमी होत आहे असा एक सूर आढळतो. मात्र अलिकडे बऱ्याच लहानमोठया समूहांचा पुन्हा एकदा वाचनाकडे कल होऊ लागला आहे. पुस्तक वाचनाने जे समाधान मिळते, ज्ञान व मनोरंजन होते ते चित्रपट मालिका वा अन्य कोणत्या माध्यमातून मिळत नाही किंवा मिळाले तरी त्याला मर्यादा असतात असे मला वाटते.

जसे लेखक घडावा लागतो तसा वाचकही घडावा लागतो. वाचनानंदासाठी पुस्तके संग्रहासाठी कपाटे, जागा यांचा अभाव असणे, किंमती, हाताळणी मध्ये खराब होणे यावरचा दुसरा पर्याय आला आहे तो म्हणजे इ-पुस्तके, इ-मासिके! आता जवळपास प्रत्येकाकडे स्मार्ट फोन असल्याने आपल्याबरोबर ई स्वरुपातील पुस्तके, अंक, मासिके बरोबर सहजी बाळगणे आणि फुरसतीचा वेळी केव्हाही वाचता येणे शक्य झाले आहे.

याचाच एक भाग म्हणून सौ. सायली पेशवे-देशपांडे यांचा "ती"चं पान हा इ- दिवाळी अंक! मासिक हा सर्व मराठी जनांचा आवडता विषय. दिवाळी अंक म्हणजे तर दिवाळीच्या आनंदात भर टाकणारी मेजवानी. यात वेगळेपण यावे, म्हणून सायली आता वाचकांनाच विशेषत: स्त्री वाचकांना लिहिते करते आहे. अनेक वाचक वाचन करता करता स्वत:तला लेखक घडवत असतात. अशा लेखकांना आणि विशेषत: लेखिकांना सायली सारख्या धडपड्या मुलींमुळे प्रोत्साहन मिळत आहे. वाचन करता करता आपल्यातला लेखक कसा घडवावा हे सांगायला मी अजून अधिकारी व्यक्ती नाही. पण मी स्वत: फेसबुक सारख्या आणि ब्लॉगसारख्या माध्यमातून लिहीत असतो आणि माझी लेखनशैली आवडते असे सांगणारे बरेच जण मला भेटतात. त्यामुळे माझा वाचनप्रवास कसा झाला हे मी नक्कीच सांगु शकतो.

माझ्या सामाजिक आणि कौटुंबिक वाचनगंगेचा प्रवास म्हणजे "रथचक्र ते चक्र" असं मी म्हणेन सांगेन. "रथचक्र" ही श्री.ना.पेंडसे यांची कोकणच्या पार्श्वभूमिवर घडणारी एका आईची आणि तिच्या मुलांची कहाणी. जयवंत दळवींची "चक्र" म्हणजे माहीमच्या झोपडपट्टीत घडणारी एका मुलाची आणि त्याच्या आईला जे काही भोगावे लागते त्याची कहाणी. ह्या एक प्रकारे दोन वेगळ्या वातावरणात दोन वेगळ्या वर्गांना कराव्या लागलेल्या संघर्षाची सुद्धा कहाण्या आहेत. समस्यांचे आणि संघर्षाचे स्वरुप वेगळे असले तरी ते दोन्ही अनुभव अगदी वास्तवदर्शी आहेत.

एकेकाळी, म्हणजे महाविद्यालयात असतानाच मला वाचनाची खूपच आवड निर्माण झाली. मुंबईच्या माहीम सार्वजनिक वाचनालयात जाऊन रोज पुस्तके आणायची आणि शक्यतो त्याच दिवशी वाचून काढायची. एक एक लेखक निवडून त्यांच्या पुस्तकांचा फडशा पाडायचा. एका लेखकाच्या

शैलीशी संपूर्ण परिचित झाले की दुसरा लेखक! सुहास शिरवळकर, गुरुनाथ नाईक, व.पु. काळे, पु. ल. देशपांडे, ग. वा. बेहरे, द. मा. मिरासदार अशी सर्व मंडळी एका मागोमाग एक घ्यायची. जी. ए. कुलकर्णी यांचे बहुतेक सगळे साहित्य वाचून काढले. त्यांच्या काही वेळा असलेल्या अभद्र नियतीवादी लेखनामुळे मनावर एक प्रकारचा ताण यायचा. पण काही झाले तरी पकडलेला लेखक सोडायचा नाही. सगळे वाचून काढायचे आणि मगच

दुसऱ्याकडे वळायचे असा निश्‍चय असायचा.

याच काळात सावरकर साहित्य जवळपास पूर्ण वाचले आणि त्यांच्या विचारांनी प्रभावीत झालो. सावरकरांविषयी बदनामीकारक लिहिणाऱ्या (नंतर सावरकरांचे चाहते बनलेल्या) आणि आपल्या अफाट लेखनशैली आणि निडर स्वभावामुळे लेखक आणि पत्रकार म्हणून दहशत असलेल्या, कै. श्री. प्र. के. अत्रे यांना आपल्या "आदेश" या नियतकालिकातून, अत्रे यांना जशास तसे या न्यायाने, झोडपुन काढले होते अशी माहिती मिळाल्यामुळे पु. भा. भावे यांच्याकडे वळलो. कै. पु. भा. भावे म्हणजे उत्कृष्ट कथाकार. त्यांचा 'रात्र' हा कथासंग्रह अजूनही पूर्णपणे लक्षात आहे. त्यांच्या 'प्रथमपुरुषी एकवचनी' या आत्मचरित्राचे तिन्ही भाग वाचून काढले. अत्र्यांच्या 'कऱ्हेचे पाणी' हे आत्मवृत्ताचे बहुतेक सगळे भाग वाचून काढले. गंगाधर गाडगीळ हे कथाकार या नात्याने अजून एक अत्यंत आवडते लेखक. त्यांची लोकमान्य टिळकांवर ची "दुर्दम्य" कादंबरी खूपच छान. अशा विशेष पुस्तकांची जमल्यास दोन किंवा तीन पारायणे करायची. जयवंत दळवी आणि श्री. ना. पेंडसे दोघेही अप्रतिम. पण मी प्राज्ञ मराठी बोलण्याच्या भानगडीत पडलो नाही. दातांऐवजी छापखान्यातले खिळे बसवून घेतले नाहीत आणि वाचण्यास लागलेला वेळ वगैरे पद्धतीचे रसग्रहण करणारे तपशील वहीत लिहिले नाहीत. त्यामुळे माझा "सखाराम गटणे" झाला नाही. पुलंच्या लिखाणातील आगळे वेगळे गंभीर व्यक्ती रेखाटन म्हणजे "नंदा प्रधान" ते मला खूप भावते. संपूर्ण पु.लं वाचले आणि सुनीताबाईंचे "आहे मनोहर तरी" सुद्धा वाचले. रणजित देसाई वाचले. अरुण साधू, नारायण धारप, अच्युत बर्वे,भारत सासणे त्याशिवाय कुमुदिनी रांगणेकर, कुसुम अभ्यंकर, वैजयंती काळे, अशा सातत्यपूर्ण लिहिणाऱ्या स्त्री लेखिकांची पुस्तके सुद्धा वाचली. सर्वांची नावे येथे शब्दमर्यादेत लिहिणे अवघड, इतके मराठी साहित्य समृद्ध आहे.

महाविद्यालयीन काळात ललित करमणूकप्रधान लेखन-वाचन असलो तरी सावरकर साहित्याशी परिचय होताच। तरीपण शेषराव मोरे यांच्या मुळे कॉलेज पूर्ण होताहोता वैचारिक वाचनाचा छंद लागला. हिंदुत्ववादी असलेल्यांचे आणि नसलेल्यांचे दोन्ही प्रकारचे लेखन वाचले. स.ह. देशपांडे, य. दि. फडके, रावसाहेब कसबे (झोत आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद दोन्ही वाचले) काही प्रमाणात नरहर कुरुंदकर हे सर्व वैचारीक आपपरभाव व वैचारीक अस्पृश्यता न ठेवता वाचले.

"ती" चं पान च्या वाचक-लेखकांनी सुद्धा वाचता वाचता लेखक व्हावे अशा शुभेच्छा देतो.

दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छांसहीत हे वर्ष आपणासर्वांना सुखाचे आणि आनंदाचे जावे अशी प्रार्थना करतो.

- चंद्रशेखर साने

कविता

माऊली

सौ.अंजली उपाध्ये
geetagarud27436@gmail.com

स्नान ,संध्या नेम चंद्रभागे जळी
प्रेमाचा अबिर मिरवूनी भाळी |
कीर्तनी,भजनी दंग होई वनमाळी
आषाढी,कार्तिकी,वारकऱ्याची दिवाळी ||

तुळशी ,हार तया माळूनिया गळा
चरणद्वयीशी वाहू ,भक्ती भाव भोळा|
विठ्ठलाचे नाम आवडी गाऊ गळा
चित्ती साठवू माझा विठू सावळा ||

होऊ दे पंढरीनाथा तव साक्षात्कार
सूक्ष्म अशा विषाणूने केला हाहाकार|
विश्व अवघे दीनवाणे अन होई बेजार
अशा आपात समयी तूच की रे आधार ||

मन आर्ततेने घाली माऊलीसी साद
झाला रे अबोल टाळ-मृदुंगाचा नाद|
राऊळासी उभा स्थिर, रुक्मिणी रमण
मनवारी पुन्हा चालू ,आठवू समचरण ||

पंख जाणिवांचे...!

प्रा. नीता खोत
neetakhot6@gmail.com

फुटू दे बोजड संवेदनांना पंख जाणिवांचे नवे |
मारु दे बोथट भावनांना डंख सृजनाचे नवे ||

उफाळू दे रक्ताळलेल्या कुशीत झरे मायेचे नवे |
जागवू दे भेगाळलेल्या शब्दांत पाझर प्रेमाचे नवे ||

ओळखू दे मानवाला नाते भाऊबंदकीचे नवे |
जाणवू दे स्वत:ला संग सोयऱ्याचे नवे ||

सांगू दे परंपरेला बांध संस्कृतीचे नवे |
मागू दे सद्भावनेला सत्य प्रार्थनेचे नवे ||

देऊ दे आवाज ज्यांचे काव्य प्रतिभेचे नवे |
येऊ दे उधाण ज्यांचे शब्द सुरांचे नवे ||

आशिष दे मजला विधात्या मागणे माझे नवे |
तृप्तता दे मजला विधात्या जतन जे केले नवे ||

त्या दोघी

सौ. गीता गरुड
geetagarud27436@gmail.com

ती सासरी गेल्यापासनं
सासूचा धाक वाटे तिला
पहिलंवहिलं गुळमुळीत बोलणं
वरवरचं हसणं
नव्याच्या नऊसारखं बदललं
दोघींचा वावर
दोघींचे भिन्न स्वभाव
सुरु झाल्या कुरबुरी
आमच्यात असंच असतं
आमच्यात असं नसतच
ही अशीच नि ती तशीच
आपसूक दोघींत अंतर वाढलं
पीळ सुटता येण्यासारखे
तरी हेतुत: पिळले गेले
हिचा अहं तिचा अहं
त्यात भरीस भर
हिची माणसं तिची माणसं
पेल्यातली वादळं
धुमसतच राहिली
वर्षं गेली, वयं वाढली
सासू म्हातारी झाली
तिची चाल संथ झाली
हळूहळू जेवण कमी झालं
आता मात्र सून
मागे वळून पाहू लागली
सासू तशी बरीच बरी होती
तिला वाटू लागलं
आपलं चुकलच
जरा नमतं घ्यायला हवं होतं
सासू विचार करत होती
आपण गेलो तर
ही सुटेल का?
का हिला हुरहूर वाटेल?
छे! आपलं चुकलच
जरा तिच्या कलान
हवं होतं घ्यायला
मनं वाचता येत होती
दोघींना एकमेकींची
कबुलीची गरजच नव्हती.

विश्वास

गायत्री पंडित
gayatrigpandit@gmail.com

विश्वासाची पुंजी बाळगल्याविना माणसाचं काही निभावत नाही,
तो कमवायला सारं आयुष्य लागतं, गमावायला एक क्षणही लागत नाही

विश्वासाचं नातं जडायला, सारं आयुष्य वेचाव लागतं ,
अविश्वासाच्या चिरेबंधीत नात्यांच काहीच भान रहात नसतं

विश्वासाच्या पुंजीवर सारं जग जिंकता येतं,
पैसा, अडका, गरिबी श्रीमंती त्याच्यापुढे पार फिकं पडतं

माणसातलं माणुसपण जपते ही विश्वासाची पुंजी,
तसुभर वाढवूनच जाते माणसातली माणुसकी

विश्वास कमवायला फार काही कसरत नसते,
दिलेला शब्द पाळावा एवढीच माफक अपेक्षा असते

लेख

सहजीवन : काही गोड, काही कडू अनुभव

माधुरी साकुळकर
sakulkarmadhuri@gmail.com

दोन वेगवेगळ्या वातावरणात वाढलेल्या, वेगळे अनुवंश असणाऱ्या व्यक्ती जेव्हा लग्न बंधनातून (?) किंवा लग्नाच्या नात्याने एकत्र येतात तेव्हातर त्यांच्यात विसंवाद होणारच किंबहुना तो असतोच. एकाच आईवडिलांच्या पोटी जन्माला आलेल्या आणि सारख्याच वातावरणात वाढलेल्या दोन भावांचे स्वभाव सारखे नसतात तर नवराबायकोचे स्वभाव सारखे कसे असतील?

मग वेगवेगळ्या प्रकारच्या **सहधर्मचारिणी** तयार होतात. काही **लोपामुद्रा** या गटातल्या--स्वतःचे अस्तित्व विसरणा-या. तर काही वाल्या कोळ्याच्या बायकोच्या गटातल्या. त्याच्या पैशावर सुख उपभोगणाऱ्या पण तो पैसा कुठून आला, कसा आला,कोणत्या मार्गाने आला, हे कधीही न विचारणाऱ्या आणि त्याच्या पापात सहभागी न होणाऱ्या. तर काही **झांटीपी** , (साक्रेटीसची बायको), आऊलीच्या (तुकारामाच्या बायकोच्या) सदरात मोडणाऱ्या. असे शिक्के मारण्यापूर्वी, त्यांच्या परिस्थितीचा विचार न करता,आपण त्यांच्यावर अन्याय करतो.

तुकारामांसारखा घरसंसाराकडे दुर्लक्ष करून विठ्ठलाच्या मागे लागणारा नवरा असेल तर ती आऊलीच होणार. त्याने संसाराकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या ध्येयासाठी वाहून घेतले तर तिची जबाबदारी दुप्पट होणारच. ती भांडणं नवरा -बायकोतली म्हणण्यापेक्षा -आदर्श- विरुद्ध व्यवहार, घराबाहेरचे मोठे जग विरुद्ध घरातले छोटे जग, लष्कराच्या भाकऱ्या भाजणे विरुद्ध घरच्या जबाबदाऱ्या असे असते. व्यक्ती जितकी मोठी (लेखक, कलावंत, गायक, नट, कार्यकर्ता इ.) तितकी भांडणंही जास्त.

सोफिया (टॉलस्टॉयची बायको) हिने टॉलस्टॉयला मोठं व्हायला मदत केली. लग्नानंतर तो सहा वर्षे 'वॉर अँड पीस' ही कादंबरी लिहीत होता. तो अभ्यासिकेत लिहीत असताना, तिकडे कोणीही जायचं नाही असा नियमच तिनं केला होता. कोणी भेटायला आलं तर ती त्याला परस्पर कटवी किंवा टॉलस्टॉयचे लिखाण होईपर्यंत बसवून ठेवी.

दिवसभराचे लिखाण तो तिला रात्री देई. त्याची स्वच्छ सुवाच्च मुद्रणप्रत सोफिया स्वत:च्या हस्ताक्षरात तयार करून देई. तिने लिहिलेले तो पुन्हा दुरुस्त करी. ती २००० पृष्ठांची कादंबरी तिने सात वेळा लिहून काढली. चार दशकं संसार करूनही आणि १३ मुलं होऊनही, वयाच्या ८२ व्या वर्षी त्याने गृहत्याग केला आणि भणंग अवस्थेत त्याला मृत्यू आला. त्याच्या गृहत्यागाचा आणि मृत्यूचा ठपका सोफियावर ठेवण्यात आला.

मार्क्स पती-पत्नी कार्ल आणि जेनी लहानपणापासून एकमेकांना ओळखत, एकमेकांचे ते मित्र होते. जेनी त्याच्यापेक्षा चार वर्षांनी मोठी होती. अत्यंत दारिद्र्यात त्यांनी संसार केला. पार्टीचं काम, कामगार चळवळी

आणि लेखन ही सर्व अनार्थिक कामं कार्लने केली.दारिद्र्य इतकं कमालीचं की दोन मुलं औषधोपचाराच्या अभावी आणि पोटभर खायला न मिळाल्यामुळे दगावली. त्यांची मुलगी फ्रांझीका हिच्या शवपेटीसाठी सुद्धा पैसे नव्हते.

'A Short Sketch of an Eventful Life' या वीस पानी आत्मचरित्रात जेनी म्हणते ,"ती या जगात आली तेव्हा तिच्यासाठी आम्हाला पाळणा बांधता आला नाही आणि ती गेली तेव्हा बराच काळपर्यंत तिला अखेरचा विसावा देणारी शवपेटी काही मिळू शकली नाही. तिची शवपेटी स्मशानात गेली तेव्हा मला विलक्षण यातना झाल्या".

१८५६ ते १८६० या काळात मार्क्सने खूप लेखन केले आणि जेनीचे काम वाढले. त्याच्या लिखाणाची ती पहिली श्रोता असायची आणि मुद्रणप्रत तयार करण्याचे कामही तिचंच होतं. मार्क्स पत्र डिक्टेट करी आणि ती लिहीत असे. तो इतके प्रचंड काम करू शकला, एक युग गाजवू शकला याचे कारण जेनीची समर्थ साथ.

सगळ्यात वाईट सहजीवन होतं लिंकन पती-पत्नीचं. मेरी खूप खर्च करी. तिला क्लेप्टोमॅनिया होता. ती वस्तू चोरी. लिंकनला घालूनपाडून बोलत असे. सर्व लोकांसमोर त्याचा पाणउतारा करीत असे. त्यांच्या दिसण्यावरून त्याला टोमणे मारीत असे. अब्राहम सर्व शांतपणे सहन करी. लोकांसमोर तमाशा नको म्हणून काही बोलत नसे. दोघांच्या कौटुंबिक आणि आर्थिक परिस्थितीमध्ये खूप फरक असल्यामुळे अब्राहमने हे लग्न मोडण्याचा दोनदा प्रयत्न केला होता. एकदा तर लग्नाची सर्व तयारी झाली असतानाही हा लग्नाला गेलाच नाही. त्याने मेरीला लग्नाच्या वेळी दिलेल्या अंगठीवर लिहिलं होतं "प्रेम अमर आहे."

स्त्रीवादाचं बायबल लिहिणाऱ्या सिमॉन द बुवा आणि प्रसिद्ध तत्त्ववेत्ता सार्त्र यांचे सहजीवन आगळंवेगळं होतं. जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वी ते लिव्ह-इन-रिलेशनशिपमध्ये राहत. घर, लग्न, मुलंबाळं या सगळ्यांना फाटा देऊन ते हॉटेलच्या एका खोलीत लिहीत बसत. दोघे प्रखर बुद्धिवादी, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र, एकमेकांकडून फारश्या काही अपेक्षा नाही. केवळ **बौद्धिक साहचर्य** यासाठी स्वीकारलेलं ते सहजीवन होतं.

भारतातही अशी आगळंवेगळं सहजीवन असलेली अनेक जोडपी होऊन गेलीत. गोपाळराव जोशी आणि भारतातल्या पहिल्या डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचं जीवन म्हणजे सतीचं वाणच. गोपाळरावांनी आनंदीला शिकवून, उच्चशिक्षणासाठी अमेरिकेला पाठवलं. त्याचवेळी वेडीवाकडी पत्र पाठवून संशय व्यक्त करून अमेरिकेत त्यांचं मनस्वास्थ्य बिघडवलं. गोपाळराव विक्षिप्त होते, ते केव्हा काय बोलतील याचा नेम नसे. आनंदीबाईंना अवघं २२ वर्षांचं आयुष्य लाभलं. या अल्पायुष्यात विविध विक्रम आनंदीच्या नावावर आहेत.परदेशात जाणारी पहिली स्त्री, (पंडिता रमाबाई आनंदीच्या दीक्षांत समारंभाच्या वेळी हजर होत्या पण त्यांच्या साडेतीन वर्षे आधीच आनंदी अमेरिकेला गेली होती) इंग्रजीत भाषण देणारी पहिली स्त्री, इंग्रजीत पत्र लिहणारी पहिली भारतीय स्त्री, पायात बूट घालणारी पहिली ब्राह्मण स्त्री, नवऱ्याबरोबर समुद्रावर फिरायला जाणारी

पहिली स्त्री,हे सगळं शक्य झालं कारण गोपाळरावांची समर्थ साथ.

महाराष्ट्रात पहिल्यांदा सहजीवन हा शब्द ज्यांच्यासाठी सार्थ होईल अशी दोन जोडपी होऊन गेलीत. रमाबाई रानडे आणि महादेव गोविंद रानडे हे एक. ज्ञानकोषकार श्रीधर व्यंकटेश केतकर आणि त्यांची पत्नी शीलवतीबाई हे दुसरे. केतकरांची पत्नी कोहेन या जर्मन होत्या. लग्नानंतर धर्म बदलून त्या शीलवती झाल्या. त्यांचं सहजीवन म्हणजे अखंड ज्ञानसाधना आणि ज्ञानकोष घरोघरी विकण्यासाठी पायी उन्हातानात फिरून त्यांनी उदरनिर्वाह केला.

शीलवतीबाईंनी भाषांतरकार म्हणून काम केलं. जर्मन वांङ्मय इंग्रजीमध्ये भाषांतर करून त्या अर्थार्जन करीत असत. 'मीच हे सांगितलं पाहिजे' हे शीलवती केतकरांचं आत्मचरित्र वाचताना डोळ्यात पाणी येतं.

इंदिरा गांधी आणि फिरोज गांधींचं सहजीवन खूपच वादळी होतं. फिरोज गांधी, कमला नेहरू यांचा फॅन म्हणून पहिल्यांदा त्यांच्या घरी आला. फिरोजची प्रेमप्रकरणं खूपच झाली. एका मुस्लिम मुलीच्या मागे लागून तो इंदिरेला सोडायला निघाला होता. इंदिरा सतत वडिलांच्या सोबत राहते तिचा सहवास कमी लाभतो म्हणून तो बाहेर गुणं उधळीत होता, तर हा बाहेर गुण उधळतो म्हणून त्या जास्त वेळ वडिलांच्या कामात देत असत.

इंदिरा आणि फिरोजनी मनापासून संसार करण्याचा प्रामाणिक प्रयत्नही केला पण निष्फळ झाला. पंतप्रधानांच्या घरी येणाऱ्या पाहुण्यांची सरबराई करण्यासाठी आणि वडिलांची वैयक्तिक सचिव म्हणून त्या वडिलांच्या मागे राहत असत.

प्रत्येक जोडप्यात असा काहीतरी एक चिवट सहृय धागा असतो. त्यामुळे ते संकटात एकमेकांना साथ देतात, बऱ्यावाईट परिस्थितीतून तरून जातात. या संदर्भात कवी अनिल यांची एक समर्पक कविता आहे.

अशा काही रात्री गेल्या, ज्यात काळवंडलो असतो.

अशा काही वेळा आल्या,होतो तसे उरलो नसतो.

वादळ असे भरात आले,तारू धडकणार होते

लाटा अशा घेरत होत्या काही सावरणार नव्हते,

हरवपून जावे भलतीकडेच, इतके उरले नव्हते भान,

करपून गेलो असतो, इतके पेटून उठले होते रान,

डाव असे पडत होते, की खेळ उधळून द्यावा.

विरस असे होत होते, सारा जीव विटून जावा,

कसे निभावून गेलो कळत नाही, कळले नव्हते

तसे काही जवळ नव्हते,नुसते हाती हात होते.

एका वेलांटीचा प्रवास

सौ. मृणालिनी केळकर
meenamadhavk@gmail.com

मुलगी ते बाई हा कालावधी एका वेलांटीत सामावलेला असतो.या कालावधीत मुली जे जीवन जगतात ते त्यांना आयुष्यभर पुरते.या प्रवासात सतत तडजोड करावी लागते ती फक्त बाईला.पुरुष तडजोड करतो ते क्वचितच! आईवडिलांच्या घरी पित्याचे वर्चस्व तर लग्न झाल्यावर पतीचे पित्यातली 'पि' ऱ्हस्व तर पती 'ती' दीर्घ ही जी ऱ्हस्व,दीर्घ वेलांटी आहे त्या इकाराचा सारा खेळ. जमला तर जिंकली नाहीतर हारली.

बहुतांशी पित्यातल्या ऱ्हस्व वेलांटीत सारे ऱ्हस्वच असते. त्याची मानसिकता च तशी असते. मुलगी जन्माला आली की, केव्हा एकदा तिचे लग्न करून देऊ असे होते. कायद्याने बांधलेले आहेत म्हणून,नाहीतर सुशिक्षितांनीही मुलींना लवकर बोहल्यावर चढवले असते. फार कमी घरात मुलींना सर्व तऱ्हेचे स्वातंत्र्य असते. त्या मनासारखे शिकू शकतात, मनाप्रमाणे जोडीदार निवडू शकतात, क्वचित लग्न करायचे की नाही हेही ठरवण्याची मोकळिक असते.

कायद्याला धाब्यावर बसवून आजही बालविवाह होताहेत,ते केवळ पित्यामुळे. (यासाठी आपल्या देशातल्या जुनाट चालिरिती आहेतच) लग्न झालं की पित्यातली पिची ऱ्हस्व वेलांटी पतीतल्या 'त ' वर जाऊन बसते ती दीर्घ होऊन .मग तर सतत तडजोड. मन मारून जगणे.एखादीला च पूर्ण स्वातंत्र्य मिळते. इकडे घोषणा असतात मुलगी शिकली प्रगती झाली. पण आपल्या देशाची लोकसंख्या बघितली तर लक्षात येते, एक टक्का हे खरे नाही. मुली सैन्य, वायुदल शिवाय जी जी म्हणून पुरुषांची क्षेत्रे समजली जातात तिथे असणाऱ्या महिलां ची संख्या तशी नगण्यच! माझ्या मते वरवर दिसणारे स्वातंत्र्य हे खरे नाही ही सूज आहे. किंवा वरवरचा मुलामा आहे.जिला स्वातंत्र्य आहे अशा बायकाही न दिसणाऱ्या बंधनात असतात. अशा स्त्रियांची तुलना मी गर्भार गाईशी करेन. गर्भार गाईला एका बंदीस्त पण मोकळ्या जागेत ठेवले जाते.तिचे गळ्यातले दावे लांबलचक असते. ती सुखनैव पुढे पुढे जात असते ,तिला छान वाटते,आणखी पुढे गेल्यावर तिच्या दाव्याला हिसका बसतो ,तेव्हा तिला कळते हा स्वातंत्र्याचा भ्रम आहे.

दीर्घ वेलांटी च्या प्रवासात मुलांच्या रुपाने 'उ' कारही आयुष्यात प्रवेश करतात.तेव्हा तर तिचे जे हाल होतात त्याला कधीकधी सीमा नसते. सर्व साधारण मध्यमवर्गीय लोकांच्या घरात बाईची सतत कसरत चालू असते. आई मधली दीर्घ 'ई' तिला उसंत मिळू देत नाही. मोठी झाल्यावर चांगली निघाली की श्रेय बापाचे.वाईट निघाली की त्याचे खापर आईच्या डोक्यावर. त्यात ती यशस्वी, किर्तीवंत स्त्री असेल तर" स्वतः तच मग्न असेल ,मुलांकडे लक्ष नाही" अशी शेलकी विशेषणे बहाल करुन तिची संभावना केली जाते.

हा वेलांटी चा प्रवास इतका क्लिष्ट, जीवघेणा आहे की, कितिही लिहिले तरी कमीच. अगदी निबंधाचा प्रबंध होईल एवढा मोठा. तरीही एक सत्य दशांगुळे उरतेच ते म्हणजे स्त्री अजूनही या ऱ्हस्व दीर्घ वेलांटीच्या प्रवासात भरडली जातेय...!!

जगाला प्रेम अर्पावे

सौ. आसावरी ऐनापुरे
aasavari.ainapure79@gmail.com

माणसाच्या मनातला द्वेष काढून टाकता आला असता तर? किती बरं झालं असतं. म्हणजे कुणाबद्दल कुठल्याही गोष्टीत 'असूया' बाळगायची नाही. 'द्वेष' ही भावनाच येता कामा नये मनात. माणसं का करत असतील 'द्वेष' एकमेकांबद्दल? दुसऱ्या सारखी प्रगती जर स्वतःला करता येत नसेल तर तो दोष दुसऱ्याचा कसा? आणि मग त्याचा द्वेष करून त्याला या ना त्या प्रकारे त्रास देण्यात काय प्राप्त होत असते? माणसाचे मन मोठे अजब आहे. प्रसंग, काळ, माणसं याप्रमाणे त्याच्या मनात भावना येत असतात. त्या बदलत असतात. षड् रिपू प्रत्येकात असतातच. पण त्यातला 'मत्सर' सगळ्यात वाईट. कारण एकदा का तो वरचढ झाला की माणूस किती खालच्या पातळीला जाऊन कृत्य करतो हे त्याचे त्यालाच कळत नाही.

जे आपल्यात नाही पण दुसऱ्यात आहे हे कळल्यावर आपल्यात 'ते' आणण्याचा प्रयत्न करण्याऐवजी दुसऱ्यांचा 'द्वेष' करून त्याला खाली खेचू पाहतो. माणसाची वृत्ती दुसरं काय? माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत 'संगतीचा' खूप मोठा प्रभाव असतो. म्हणूनच रामदास स्वामी म्हणतात:- **"सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो कलंक मतीचा झडो विषय सर्वथा नावडो"** मला निरंतर सत्संग लाभो, सज्जनाचेच भाषण माझ्या कानावर येवो, मनाचा पापदोष झडून जावो, ऐहिक सुखोपभोगाचा सर्वस्वी वीट येवो.

मनाच्या पापदोषांमध्ये 'द्वेष' दडलेला आहे. एक साधा सरळ प्रश्न. दुसऱ्याचे कौतुक पाहून माणसाला आनंद होण्याऐवजी असूया का वाटते? माणसाचं मन कदाचित लहान आणि हलकं असावं. मोठ्या मनाची माणसं दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद शोधतात. तो सापडतो त्यांना. कारण 'चांगलं' घेण्यासाठी आणि 'चांगलं' देण्यासाठी मनाचे दरवाजे उघडे असतात त्यांच्या. माणसाला गमावू शकतो. कारण 'द्वेष' करणारी माणसं ही वैचारिक पातळी कायम राखण्यात अपयशी ठरतात. द्वेषाला कशाने जिंकू शकतो आपण? तर उत्तर आहे प्रेमाने. इतकं प्रेम द्यावं की द्वेष करणाऱ्या माणसाला स्वतःची लाज वाटायला हवी.

आपण नेहमी म्हणतो की जगात वावरताना माणसाने डोळे उघडे ठेवून वागावं. पण मला वाटतं की त्याही पेक्षा मनाची कवाडं उघडावीत. पण प्रत्येक वेळेला असं होतच असं नाही आणि त्यामुळे कदाचित आपण एखाद्या सुंदर नात्याला मुकत असतो. माणसाने स्वतःच्या नजरेतून कधी उतरता कामा नये कारण व. पु. म्हणतात त्याप्रमाणे "जाणीवा जळाल्या की माणूस माणूस रहत नाही. रहतो तो फक्त निर्जीव देह." या निर्जीव देहाची लक्तरं अंगावर बाळगून काय होणार? आणि त्या जगण्याला 'अर्थ' तो काय राहिला? म्हणून 'द्वेष' काढून टाकून मन मोकळं ठेवावं. प्रेम द्यावं,

प्रेम घ्यावं.

'द्वेषा'ने समोरच्या माणसाला जिंकता येत नाही. प्रेम मात्र जिंकून घेतं दुसऱ्याला. म्हणूनच साने गुरुजी म्हणतात,**"खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे"** आणि तरीदेखील माणूस 'द्वेष' करणे सोडत नसेल तर त्या व्यक्तीपासून दूर राहिलेलं चांगलं. कारण व्यक्ती बदलत नाही. त्यामुळे परिस्थितीही बदलत नाही.

व. पु. म्हणतात त्याप्रमाणे:- "कुणालाही बदलण्याचा खटाटोप माणसाने करू नये. असह्य झालं तर अलिप्त व्हावं. उपदेशक होउ नये." त्यामुळे 'द्वेष' करणाऱ्या व्यक्तींची संगत न धरता 'चांगुलपणाला' सोबती बनवावं. आयुष्याचं हित यातच दडलेलं असतं. नाही का?
"भरावा मोद विश्वात असावे सौख्य जगतात सदा हे ध्येय पूजावे, जगाला प्रेम अर्पावे."

आधुनिक सुगरणीचा खजिना

सौ. भावना भालेराव
mrsbhavanabhalerao@gmail.com

असं म्हणतात की गरज ही शोधाची जननी आहे. काळाच्या ओघात गरजाही बदलत असतात.काही बदल अपरिहार्य असतात तर काही काळासोबत आपण सहजरीत्या स्वीकारतो.पुर्वी ऐसपैस वाडे असायचे, उठायला बसायला भरपूर जागा असायची. वाड्यांमध्ये असलेले प्रशस्त स्वयंपाकघर ही तर कौतुकाची बाब होती. पुर्वी घरातल्या स्त्रीचा बराचसा वेळ स्वयंपाकघरात जात असल्याने तिला लागणारया गोष्टी जसे की गहू दळायला जातं,उखळ, शिंकाळे यांचा पसारा ठेवायला स्वयंपाक पण तसेच हवे असायचे.पण आता स्त्रिया नोकरीनिमित्त बराच काळ घराबाहेर असतात.त्यामुळे गरजा बदलत गेल्या .अनेक आघाड्यांवर काम करीत पुढे जाणारया नोकरदार स्त्रिया आता स्मार्ट वर्क करायला शिकत आहेत.नोकरी करत असली तरी पारंपारिक पद्धतीने सणवार साजरे करण्यासाठी प्रत्येक स्त्री उत्सुक असतेच.तिच्यातले सुगरणपण तिला कधीच स्वस्थ बसू देत नाही. पण मग नोकरी करता करता हा वेळ, श्रम आणि स्वताची उर्जा यांचा ताळमेळ कसा साधावा हे पण एक नवीन आव्हान असते. अशा वेळी या आधुनिक सुगरणीला अत्याधुनिक उपकरणांचा खजिना सापडला तर .....

हाच खजिना आपण आज उलगडून बघुया.

पारंपारिक पद्धतीने जात्यावरचे ओवी म्हणत म्हणत गहू ,बाजरी दळायची पध्दत बंद झाली आणि ऐकीकडे कारवा वर गाणी ऐकत घराघरात घरघंटीचे आगमन झाले .हया घरघंटींमुळे स्त्रीचा भरपुर वेळ वाचतो.घरातल्या घरात पटकन हवे तेव्हा हवे तितके आणि आपणच केले असल्याने हायजेनिक ठरणारे हे घरघंटीचे दळण सणावाराला फार मोलाची मदत करणारे असते. म्हणूनच मग अवजड, दगडी जात्यांची जागा आता इलेक्ट्रॉनिक बॉक्स सारख्या दिसणाऱ्या आटाचक्की ने घेतली.

कमी जागेत मावणारे,आटोपशीर असे उपकरण आता घराघरात दिसते.कितीही मोठया पदावर काम करणारी 'ती ' असली तरी तिला बरयाचदा आपल्या घरातल्या जिव्हाळ्याच्या माणसांना आपल्या हातचे पदार्थ खाऊ घालायचे असतात.हल्ली कॉफीमेकर मुळे थकलेल्या नोकरदार स्त्रिया पटकन कॉफी पिऊन कामाला लागतात त्यामुळे कॉफीमेकर एक प्रकारचा तिसरा हात आहे. फुड प्रोसेसर घरात असेल तर किती गोष्टी हातोहात सहज होतात.पुर्वी उकडीच्या मोदकांसाठी नारळ खोवणे म्हणजे एक सोहळाच असायचा.पण आता मात्र नारळ फोडायला सुध्दा मशीन मिळते. फुड प्रोसेसर मध्ये नारळ खोवायला ,गाजर, काकडी, भोपळा किसायला, बटाट्याच्या एकसारख्या चकत्या करायला ,बटाटयाचा, बिटाचा कीस पटकन होण्यासाठी खुप काही चकत्या उपलब्ध करुन दिलेल्या असतात. एकदा का आपल्याला त्या कशा हाताळायच्या याचा अंदाज आला की आपल्याला अल्लाउद्दीनचा जादुचा दिवा सापडल्याची जाणीव होते. फूड प्रोसेसर वर एकीकडे पीठ मळत असतांना कॉन्फरन्स वर आपल्या सहकारयांना मिटींगमध्ये नेमक्या

कुठल्या मुद्दयांवर आपल्याला बोलायचे आहे हे सांगणारी माझी मैत्रीण नेहमी फुड प्रोसेसरच्या अचाट कामगिरीवर कायम खुश असते .कारण तिचा खुप वेळ सत्कारणी लावायला हे आधुनिक काळातील उपकरण तिचा कामातला पण आत्मविश्वास पण वाढवतो.

आपल्याला जेव्हा मायक्रोवेव्ह मध्ये पहिल्यांदा केक किंवा बिस्किटे, नानखटाई करायला जमते तेव्हा तो आनंद काही वेगळाच. त्यातही अगदी बाहेरच्या सारखा ब्लेंडरने फेटून घरीच तयार केलेल्या लोण्याचा स्पंजी केक खाण्याची मजा काही औरच. सकाळी सकाळी धावपळ करत जॉगिंग ट्रॅकवर जाऊन सासुबाईंची शुगर कंट्रोल करण्यासाठी कारल्याचा रस आणायला जाणारी माझी एक मैत्रीण ज्युसर घेतल्यापासून भारी खुश दिसते. मुलांना रोज डब्यात वेगवेगळे खाऊ देण्यासाठी पॉपकार्न मेकर, सॅंडविच मेकर, पास्तामेकर खुप उपयोगी पडतात.इलेक्ट्रॉनिक कुकर जिच्या घरात असेल ती कुठेही असली तरी घरच्यांना गरमागरम जेवण देऊ शकते हा अनुभव आहे.

हॉस्टेलवर राहणाऱ्या मुली, घरापासून लांब राहणारे पुरुष सुध्दा या कुकरचे गुणगान करतात.इंडक्शन तर घरापासून लांब असलो तरी आपले स्वयंपाकाचे निम्मे काम पार पाडतोच.होब, चिमणी, कॉफीमेकर सोबतच ज्यांना घरात भांडी घासायला वेळ नाही, किंवा घरात कोणीच नसते म्हणून भांडीवाली बाई पण लावता येत नाही अशा स्त्रियांना डिश वॉशर पण खुप मदत करते .कामावरुन थकूनभागुन घरी पोहचणाऱ्या स्त्रियांना स्लोकुकर खुप फायदेशीर ठरतोय.घरात मुलांच्या वाढदिवसाचीएक पार्टी असेल तर आईसक्रीम मेकर मुलांना भरपुर आइस्क्रीम खाऊ घालायला मदत करते.नवनवीन प्रकारचे पीलर, कटर हे तर तिसरा हात समजावे.हल्ली कांदा, टमाटा पटकन कापायला जागोजागी कटर दिसतात, लसूण सोलायला रबरी सोलाणे पटकन काम करते .माझ्या ओळखीच्या एका घरात कायमसाठी चपातीमेकरवर पोळया केल्या जातात.कारण त्यांना तिळं झालय. त्यामुळे कितीही केले तरी त्यांचे काम संपतच नाही.

आजकाल सिझन संपल्यावर हव्या त्या वस्तू पटकन मिळायल्या हव्या यासाठी बऱ्याचजणी आवळयाचा, लिंबाचा रस ज्युसर वर काढून फ्रीजमध्ये ठेवतात.कटरमध्ये भरपुर कांदा चिरुन तो वाळवून ठेवला तरी वेळप्रसंगी पटकन वापरायला मदत होते. इलेक्ट्रॉनिक कुकर मध्ये गाजरहलवा,बिर्याणी पटकन होत असेल तर घरी कितीही पाहुणे आले तरी गोंडधोंड होतेच.फुड स्टीमर असेल तर पटकन ढोकळा, उकडीचे मोदक, अळुवडी, कोथिंबीर वडी पटकन येता जाता तोंडात टाकता येते. गरम पाण्याची किटली तर कोरोना काळात पटकन गरम पाणी पिण्यासाठी फार उपयोगात आली हा स्वानुभव आहे. हा सुगरणीचा खजिना खर तर न संपणारा आहे. पण आधुनिक काळात पारंपारिक गोष्टी जपत, स्वताला सिद्ध करणाऱ्या स्त्रियांसाठी ही सगळी उपकरणे तिचा आत्मविश्वास पण

वाढवतात.आपल्याला हे सगळे छान जमते, ही नवीन यंत्र हाताळता येतात हा चेहऱ्यावरचा आत्मविश्वास तिला सकारात्मक आणि महत्वाकांक्षी होण्यासाठी मदत करतो.यासोबतच तिचे शारिरिक श्रमही कमी होतात .अनेकविध प्रकारचे पदार्थ ती कमी वेळात बनवुन खाऊ घालू शकते. घड्याळ्याच्या काटयावर चालणाऱ्या कित्येक कुटुंबियांना हया उपकरणांचा जादुसारखा उपयोग होतो.

गृहिणी असो की नोकरदार स्त्री, तिचे काम कधीही संपत नसतेच. सुगरण असण्याची इच्छा आहे, स्वताला पण वेळ दयायचा आहे, आनंदी राहायचे आहे ,इतरांना खाऊ घालायची इच्छा आहे, सणावाराला पारंपारिक पद्धतीचे पक्वान्न तयार करुन स्वतःला पण सजवायचे आहे अशा सगळ्या स्त्रियांना हा आधुनिक स्वयंपाकघरातील इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा खजिना त्यांचा वेळ वाचविणारा,श्रम कमी करणारा आणि आत्मविश्वास वाढविणारा ठरतोय.जुन्या नव्याचा ताळमेळ साधत आपली गरज लक्षात ठेवून बनिवण्यात येणारी ही उपकरणे नजीकच्या काळात तंत्रज्ञानाच्या पावलावर पाऊल ठेवून चालणारया पुढील पिढीला स्वयंपाकघरातील कामे आनंदाने करण्यासाठी एक वरदान आहेत.

चरैवेती चरैवेती

आरोही वंडलकर
aarohee.wandalkar2511@gmail.com



चर + इव + इती = चरैवेती |

अर्थात सतत चालत राहणे ! घेतलेले काम , आपले ध्येय प्राप्त होई पर्यंत , कितीही संकट आलीत तरी हरून न जाता , ते काम करत राहणे .

स्वामी विवेकानंदानी पण सांगितलंय :

" उत्तिष्ठत , जाग्रत, प्राप्यवरान्नी बोधत | "

अर्थात उठा , जागे व्हा , आणि आपल्या ध्येयप्राप्तीसाठी पुढे चला .

शास्त्रज्ञही म्हणतात कि सतत काम करत राहिल्याने आपण अधिक कार्यक्षम होतो, अनुभवातून शिकत जातो, त्यातून सकारात्मकता मिळत जाते आणि ही सकारात्मकता म्हणजे पुढील वाटचालीसाठी संजीवनीच !

सोलोमन बेटावर आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. ते आदिवासी लोक प्रथेनुसार झाडे तोडणं अपशकुनी समजतात . एखादे झाड तोडायचे असल्यास ते एकत्र येऊन त्या झाडाभोवती वर्तुळाकार तास न तास बसून त्या झाडाला नकारात्मक लहरींनी घायाळ करतात . आश्चर्याचा भाग म्हणजे काही आठवड्यातच ते झाड शुष्क होऊन उन्मळून पडत. म्हणजे नकारात्मकता एखाद्याचे आयुष्य उध्वस्त करू शकते. त्यामुळे जीवनात सकारात्मकता खूप महत्वाची आहे , जी आपल्याला सतत आपल्या कामातून मिळते !

सकारात्मकता असली तरी जर निश्चयाचा अभाव असेल तर ध्येय प्राप्तीची वात अनिश्चित होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची बांधणी याच जिद्दीच्या ,निश्चयाच्या जोरावर केली. आपण त्यांच्यांच प्रमाणे ' निश्चयाचा महामेरू ' होऊन प्रयत्न केल्यास यश नक्कीच मिळेल.

प्रयाग मध्ये एक अक्षय झाड होते . अक्षय म्हणजे जे कधीही नष्ट होत नाही असे ! याच झाडाच्या सानिध्यात गौतम बुद्ध आणि महावीरांनी तपश्चर्या केली होती. जहांगीर ज्यावे भारतात आला त्यावेळी त्याने हे झाड नष्ट करीचे ठरवले . त्यांनी ते झाड कापले आणि नंतर ठरवले कि या झाडाला समूळ नष्ट करीचे. त्यासाठी त्याने ज्या द्रवापासून आरसा बनवला जातो ते उकळते द्रव त्या झाडाच्या मुळापाशी टाकले जेणेकरून त्या झाडाची मूळ बधीर होतील आणि ते झाड समूळ नष्ट होईल. पण त्या परिस्थितही त्या झाडाला पालवी फुटली . त्या झाडाप्रमाणेच आपला आयुष्य आहे. आपणही आपल्या आयुष्यात कितीही संकट आलीत , आभाळ जरी कोसळलं , तरी त्यावर पाय ठेऊन उभे राहा आणि त्या संकटांचा सामना करा , त्या संकटांवर मात करा आणि आपल्या ध्येयाकडे अविरत चालत रहा . जसा सूर्य आपला रथ बाराही महिने हाकतो तसा आपणही आपल्या आयुष्याचा रथ , आपली कामे

सतत सुरू ठेवायचीत.

भगवान श्रीकृष्णानेही भगवद गीतेत सांगितलं आहे :

" कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन | "

अर्थात कर्म केल्याशिवाय फळाची अपेक्षा करू नका . निस्वार्थ भावनेने , ध्येयनिष्ठ राहून काम केल्यास, कितीही संकट आलीत तरी न डगमगता आपल्या वाटेवर चालत राहिल्यास ध्येयप्राप्ती निश्चितच होईल !

चरैवेती चरैवेती यही तो मंत्र हे अपना

नही रुकना नही रुकना

सतत चलना सतत चलना

यही तो मंत्र हे अपना शुभंकर मंत्र हे अपना

कथा

वारी

जयश्री दाणी
jayshripoem22@gmail.com

जय हरी विठ्ठल जय जय विठ्ठलचा अखंड नामघोष सुरू होता. ती झपझप पावले टाकत होती. झिमझीम पाऊस येत होता. तास, दोन तासात पाऊस चांगले उग्र रूप घेणार असल्याचे चिन्ह दिसत होते. आकाश मेघांच्या दाटीने काळेशार झाले होते. तरीही सावळ्याला भेटायची उर्मी वारकऱ्यांमध्ये तसूभरही कमी होत नव्हती.

तिने आजूबाजू पाहिले. कपाळी केशरी टिळा, हातात टाळ-चिपळ्या किंवा भगव्या पताका, डोईवर मंजिरी-तुळस, डोळ्यात निरागस श्रद्धा घेऊन मोजताही न येईल इतके अगणित वारकरी तल्लीन होऊन चालत होते. जणू पांढऱ्या शुभ्र वस्त्रातील महासागरच. समुद्रात जशा लाटा उठाव्या अन् अवघ्या आसमंताला चैतन्य बहाल व्हावे तसे घाटाघाटातील अवर्णनीय सोहळ्यादरम्यान वाटत होते.

छोट्या छोट्या परकरी मुलींसह वयस्क बायाबापडेही लाजत मुरकत फुगडी खेळत होते. रामकृष्ण हरीच्या गजरावर टाळ्यांचा नाद उमटत होता. रिमझिम थेंबही ताल धरत होते. अश्वाचे रिंगण, त्या अश्वाला केलेला नमस्कार माऊलीला मिळतोच या अपार भावनेने अश्वाला पूजणारे गावोगावचे रहिवासी, भक्तिरसात फुललेली पालखी ...सगळे कसे अनुपम आनंददायी दृश्य होते.

फुलपाखरासारखे भिरभिरणारे तिचे चित्तही त्या सहजसुंदर अनुभूतीत रमून गेले. आपण वारीत विशिष्ट उद्देशाने आलोय, गेल्या पाच वर्षांपासून त्यासाठीच येतोय याचा तिला अबलख विसर पडून गेला. मोबाईलच्या रिंगने ती किंचित भानावर आली. पावसाने अंग बऱ्यापैकी ओले झाले होते. धर्मशाळा पाच मिनिटात येणारच होती. तिथे पोहचून फोन करावा असा विचार करत तिने फोन तसाच वाजू दिला.

फोन आईचाच असणार याची तिला खात्री होती. दरवर्षी बरोबर दिवेघाट पार केला की तिचा फोन येतो. अगदी नेमाने. 'त्यांची' अन् आईची इथेच तर चुकामुक झाली होती ना? 'त्यांच्या' आठवणीने तिच्या छातीत धडधडले. अनंत विचारांच्या आवर्तनात मन गरगरू लागले. असे कसे विपरीत घडून गेले आपल्या हातून? काय करून बसलो आपण पौगंडावस्थेत? देवतासमान पित्याला देशोधडीला लावले. भरल्या संसारातून खेचून दूर निघून जायला भाग पाडले. एव्हढे मोठे पाप कसे घडले आपल्याकडून?

भिजलेले कपडे बदलताना जुन्या स्मृतींचा पट तिच्या डोळ्यासमोर झरझर नाचून गेला. त्या स्मृतिचित्रातील इतर सारी पात्रे तर आपापल्या लयीनुसार व्यवस्थित मांडल घेत होती. त्यांच्या शांत हालचालींना जबर दणका

देणारा थयथयाट तिचाच सुरू होता. कशी विसरणार होती तीही तो दिवस नि तिच्या अबोध मनाने केलेली गंभीर आगळीक?

तेरा वर्षांची होती ती जेव्हा आईचा पुनर्विवाह करण्याचे आजोबांनी योजले. आई राजीच नव्हती पण आईला हरेक प्रकारे समजवण्यात आले.

आईसोबत तिनेही 'त्यांना' पाहिले. मिस्टर दीक्षित. आईपेक्षा पाचसात वर्षांनी मोठे, जरासे स्थूल, पुष्कळ हसरे. निर्मळ. भरभराटीला आलेला छोटासा व्यवसाय होता त्यांचा. सुखवस्तू होते. गावी भरपूर शेती, जमीनजुमला. लहान बहीण भावंडांचे करताना त्यांचे लग्नाचे वय उलटून गेले. आता त्यांनाही कुणीतरी आग्रह धरला नि ही सोयरीक जुळून आली.

तिला नाही पसंत पडले ते. त्यांना भेटून भर पावसात घरी येतांना तिच्या डोळ्यांतले अश्रू इतरांना दिसले नाहीतरी आईला अचूक जाणवले होते. रिक्षात बसल्या बसल्या अनेकदा आई तिचे डोळे पुसत होती. कसे म्हणणार ती त्यांना बाबा? तिचा बाबा केव्हढा स्मार्ट, हँडसम होता. तिला कडे उचलायचा, पापी घ्यायचा. तिचे आवडते सिल्क चॉकलेट द्यायचा. आई बाबा सोबत कसे सुंदर सुंदर दिसायचे. देवाला मात्र हे सुख पाहवले नाही. क्षुल्लकशा आजाराचे निमित्त झाले अन् तिचा बाबा देवाघरी गेला. तेव्हापासून घरात ती आणि आई, दोघीच. तुफानी पावसात उडालेल्या छतानंतर राहिलेल्या ओलसर भिंतीसारख्या एकाकी. मुक्या.

तिची भावना ओळखून आई गप्पच होती सगळ्यांच्या चर्चेत. समस्त कुटुंबियांसमोर आई किती अगतिक आहे हे तिला चांगल्यानेच कळत होते पण तरीही आईने ठामपणे नकार द्यावा हीच तिची एकमेव अपेक्षा होती. तसे झाले नाही. घरात वाजंत्री वाजली. तिची आई मनोरमा पांडे ची मनोरमा वामन दीक्षित झाली. आपल्या फ्लॅटचे एक एक दार बंद करून मिस्टर दीक्षितांच्या घरात जातांना तिच्या मनाला अनंत इंगळ्या डसत होत्या. कसे घर होते त्यांचे विचित्र. मागून पुढून उघडे. इकडून कुणी शिरेल तर, तिकडून कुणी शिरेल तर? तिला भीती वाटायची.

तिच्या बाबाने किती छान रंगवून दिली होती तिची रूम. मस्त बेबी पिंक कलर, त्यात छोटे छोटे पीओपीचे हार्ट, दारावर तिच्या लाडुल्या स्नो व्हाईटचे पोस्टर. आत बंक बेड. वर तिच्या बाहुल्या निजायच्या खाली ती. या लग्नाने अचानकच तिची ती उबदार जागा हिरावल्या गेली. तिचे मन खूप दुखले. इथल्या सपाट पांढऱ्या भिंतीच्या खोलीत तिचे मन रमेना. त्यात आई रात्री 'त्यांच्या' खोलीत शिरतांना दिसली की तिच्या अंगाचा तीळपापडच उडे. रात्र रात्र जागी राहून ती खिडकीतून दिसणाऱ्या चांदण्या पहात राही.

इथे काहीच आपलं वाटेना तिला. मग वरच्या काळ्या आकाशात विविध आकार शोधत राही. नभाच्या पुंजक्यात आपला बाबा दिसतो का म्हणून निरखून पाही. कोऱ्या करकरीत काळोख्या

अवकाशाशिवाय आसपास, वरखाली काहीच नसे. ती रडकुंडीला येई. हळूच 'त्यांच्या' खोलीला कान लावी. तिची अवस्था माहिती असल्यासारखे शंभर वेळा आई खोलीच्या बाहेर येई. काळजीने तिच्या पाठीवर हात फिरवी. तिला नको वाटे तो स्पर्श आताशा. आईच्या त्या स्पर्शाला मिस्टर दीक्षितांच्या शरीरासारखा वास येई.

कपाळावर अष्टगंध लावलेल्या मिस्टर दीक्षितांच्या सदऱ्याच्या खिशात नेहमी कापराची एक छोटी वडी असे. ते जवळून गेले की नाकाजवळ तो वास हुळहुळे. त्यांची देवपूजा, आरती-स्तोत्र म्हणतानाचा स्निग्ध चेहरा नकोच वाटे तिला बघायला. ज्या बाप्पाने तिच्या बाबाला नेले त्या देवाचा तर ती काळासारखा राग राग करी. मिस्टर दिक्षितांनी तिच्या हातावर प्रसादाची खडीसाखर ठेवली तर लगेच ती फेकून देई.

तिच्या रागावर, संतापावर ते काहीच बोलत नसे. खालमानेने निघून जात. एकदा तिरमिरीत तिने आईला सांगितलेच, मी नाही रहात या घाणेरड्या घरात, मी आपल्या फ्लॅटमध्ये चालली रहायला. चौदा वर्षाच्या तिच्या कोरड्या अविर्भावापुढे आई गारच पडली. बाबापुता करू लागली. तिला ठाऊक होते आई तिच्याशिवाय कदापिही राहणार नाही. ती हेकेखोरी करू लागली. निघून जायच्या धमक्या देऊ लागली. शेवटी आईने तिच्या पायावर लोटांगणच घातले तेव्हा मात्र तिचा जीव कळवळला.

"का नाही सोडत तू त्या माणसाला?" जोरात खेकसून ती आत चालली गेली. आईने कितीही लपविले तरी तिची भयंकर नाराजी 'त्यांच्या' नजरेतून सुटली नव्हती. ते खूप प्रयत्न करायचे तिच्याशी नाते जुळवायचा, सामोपचाराचा. पण ती अतिशय कटूपणे पुढयातून उठून जायची. त्यांना एकही शब्द बोलू द्यायची नाही. संवादाचा हा पूल कसा सांधावा हेच त्यांना कळेना. त्यांची हतबलता बघून तिला समाधान वाटायचे. माझ्या बाबाची जागा घेतो नाही का मग भोग शिक्षा ती मनोमन पुटपुटायची.

दीड दोन वर्ष असेच गेले. घरातले दिनमान खराब झाले. मोकळेचाकळे हसणे बोलणे हरवून गेले. सतत मळभ आल्यासारखे तिघेही कानकोंडले राहू लागले. जुलै महिन्यात जेव्हा पावसाच्या अखंड धारा कोसळू लागल्या नि ते वारीला जायला निघाले तेव्हा आपणही जाऊयात का वारीला असे आईने तिला विचारले. आईला आषाढवारीला जायची खूप इच्छा असते हे ती जाणत होती. कारण दरवर्षी जेव्हा आषाढीचे वेध लागत तेव्हा आई टीव्हीवर दाखवणाऱ्या वारकऱ्यांना, विठ्ठलाच्या मंदिराला आसुसून पहात असे. मनोभावे वारी करायचे आईच्या प्रचंड मनात होते. बाबा असताना आईचे हे सर्व मनसुबे तिला खूप आवडत. तिने आणि बाबाने ठरवलेही होते ती जरा मोठी झाली की वारीला जायचे. त्या गंधभारल्या कल्पनेने ती आषाढाच्या पावसात मनसोक्त

थिरकायची. पण बाबा गेला सारी सारी स्वप्न मिटली. त्या तिघांनी पाहिलेली स्वप्न या या मिस्टर दिक्षितांसोबत पूर्ण करायची? छट, कोण हे आपले?

"तू जा नं, मी राहीन आजीकडे" आपल्या उत्तराच्या प्रतीक्षेत थबकलेल्या आईला ती म्हणाली.

"तूही चल, वेगळा सुंदर अनुभव मिळेल", आईने तिला आग्रह केला. आईला दुजोरा द्यायला म्हणून मिस्टर दिक्षितही आईमागे येऊन उभे राहिले. त्यांना पाहिल्यावर तिच्या मस्तकाची आगच झाली.

"मी काय करू तुमच्या एकांतामध्ये येऊन?" ती उध्द्टपणे उद्गारली. आईने तर हातच उगारला तिच्यावर पण मिस्टर दिक्षितांच्याही चेहऱ्यावर अतीव वेदनेची ठळक रेषा चमकली.

आई खूप दुखावल्या गेली तिच्या बोलण्याने. कधी नव्हे ते तिला आजीजवळ सोडून मिस्टर दिक्षितांसोबत वारीला चालली गेली. तिला बरेच वाटले. त्या रात्री मिस्टर दीक्षितांच्या खोलीत जाऊन त्यांच्या सामानाची नासधूस करायचेच ठरवले तिने. त्यांची जपमाळ तर कधीचीच तोडायची होती तिला. त्या उद्देशाने गेलीही ती खोलीत पण आत दरवळत असणाऱ्या सौम्य कर्पूर गंधाने आपसूकच तिचे मन निवळायला लागले. पलंगावरची पांढरी शुभ्र चादर, फुलदाणीत खोचलेली काही फुले, भिंतीवरची विठ्ठल रुखमाईची तसबीर, त्यातून येणारा चंदनाचा सुवास तिला शांतवत गेला. चिरफाडलेल्या मनासह ती कितीतरी वेळ तिथे निमूट बसून राहिली.

जाग आली तेव्हा तिच्या डोक्यावर मायेचा हळुवार हात फिरल्यासारखे वाटले. रोजच या हाताच्या मायाळू स्पर्शाचे तिला झोपेत प्रकट भास व्हायचे. आपला बाबा येऊन गेला असेल असे ती स्वतःची समजूत काढायची. ते आज चर्रकन तिला जाणवले की तो हात मिस्टर दिक्षितांचा असायचा. याचा अर्थ तिला गाढ झोप लागली की ते तिच्याजवळ येऊन बसत. तिला प्रेमळपणे थोपटत. कारण जागेपणी तर ती त्यांच्या वाऱ्यालाही उभी रहात नसे.

ती जसजशी खोल्याखोल्यांतून फिरायला लागली तसतशी तिला त्या दोघांची खूप आठवण यायला लागली. खरं सांगायचे तर मिस्टर दिक्षितांचीच जास्त. आपण त्यांच्यासोबत, त्यांच्यामुळे आईसोबत किती वाईट वागलो ही भावना तिला कुरतडायला लागली. नाही म्हंटले तरी मिस्टर दीक्षित त्यांच्या साध्या सरळ वागणुकीने आपल्या मनाचा नव्हे निर्विवादपणे आपल्या आयुष्याचा भाग झालेय हे तिचे तिलाच उमजले. त्यांना त्रास द्यायचा नाही, त्यांच्यावरून आईला उलटेसुलटे बोलायचे नाही, त्यांचे नाते समजून घेऊन आपणही त्या

उत्तम संबंधाचा एक बहरलेला भाग व्हायचे तिने निश्चित केले. ती नकळतपणे त्या दोघांची वाट बघू लागली.

आषाढी एकादशीनंतर जेव्हा आजी म्हणाली, आज येईल गं ते, तेव्हा तिने त्यांची खोली स्वतः साफ केली. ते खोवत तसे फुलदाणीत फुले रचली. पलंगावरची चादर नीट लावली. दारात छानशी रांगोळी काढली. आजीसोबत दोघांच्या येण्याची आतुरतेने वाट बघत बसली.

एखादे ताठ झाड धप्पकन कोसळावे व सारा पालापाचोळा अवतीभवती पसरावा तशी आई एकदम घरात शिरताच ती घाबरूनच गेली. अस्ताव्यस्त पिंजारलेले केस, मळकट साडी अन् भान हरपलेला आईचा चेहरा पाहून आजूबाजूचे शेजारीही गोळा झाले. "काय झाले हो, काय झाले हो? यजमान कुठे आहेत?" जो तो विचारू लागला. काय माहिती काय माहिती या अर्थाचे आई नुसते हातवारे करत होती. तिच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता.

"दिवेघाटात भाऊंची आणि वहिनीची चुकामुक झाली, खूप शोधले त्यांना. पोलीस, वारकरी, पंढरपुरातील रहिवासी, दुकानदार, पुजारी सगळ्यांना विचारले, मंदिराचा चप्पाचप्पा छानला पण दीक्षित भाऊ काही मिळाले नाही. चंद्रभागेत बुडालेल्यांचीही यादी पाहिली, घाटात जीव गेला ते देहही तपासले पण भाऊंचा कुठेच पत्ता लागला नाही. कुठे गडप झाले कुणास ठाऊक?" सोबतीचा वारकरी सांगत होता. तिच्या तर हृदयावर मोठा दगड पडल्यासारखेच झाले. आईच्या नजरेला नजरही देववेना. त्यांच्या परत न येण्याला कुठेतरी आपणच जबाबदार आहोत का ही शंका तिला टोचू लागली. तीही त्या गर्दीत मुकाट होऊन बसली.

"सत्पुरुष होता कुठे लुप्त झाला कोण जाणे?" आपापल्या घरी जाता जाता सारे हळहळले. बाबा गेल्यानंतर तिला हा दुसरा जोराचा मानसिक धक्का बसला. ती सकाळी उठली तेव्हा आई चहाचे आधण ठेवत होती. तिने थोडी चुळबुळ चुळबुळ केली पण आईचे तिच्याकडे लक्षच नव्हते. ती थोडी खाकरली. विचारावे तर लागेल ना कसे हरवले ते? इथेही पोलिस ठाण्यात कम्प्लेन्ट देऊन त्यांना शोधायला सांगावे लागेल.

"आई.."

"काय गं? उठलीस, कॉफी देऊ? बैस" तिच्याकडे न पाहताच आई म्हणाली. तिच्या काळजात खूप तटतटले. काही क्षण ती स्तब्ध उभी राहिली. पण तिला विचारल्याशिवाय रहावेना.

"आई, कसे हरवलेत गं बाबा?"

तिचा प्रश्नही पुरा झाला नव्हता तोच आई विजेसारखी कडाडली, "बाबा नाही मिस्टर दीक्षित".

ती गर्भगळीतच झाली. मागे सरकली. त्वेषाने आई तिच्या अंगावर धावून आली, "असाच, असाच उल्लेख करायचीस ना त्यांचा, तो मिस्टर दीक्षित, तो मिस्टर दीक्षित, अरे कितीवेळा सांगितले ते ऐकतात बरं,

त्यांना वाईट वाटेल पण ऐकायचे नाव नाही, शिंग फुटले होते ना वयाला. गेले ते सर्व कटकटींना कंटाळून निघून. नाही यायचेत परत. त्यांना वाटायचे त्यांच्यामुळे आपल्यात दुरावा निर्माण होतोय. मायलेकी एकमेकींपासून तुटत आहे. हळव्या हृदयाचा, माणुसकी, नातेसंबंध जपणारा पुरुष होता तो. चालले गेले आपल्यापासून दूर न सांगता." एका दमात आई बोलून गेली.

त्यानंतर दोघीही अंतर्मुख झाल्यात. आईने पुन्हा कधी तुझ्यामुळे ते निघून गेलेत असा चुकूनही आरोप केला नाही. त्यांच्या नातलगांनी, आईच्या लोकांनी खूप शोध घेतला त्यांचा. वारंवार पंढरीला जाऊन पाहिले पण प्रत्येकवेळी हाती शून्यच आले. जेव्हा त्यांच्या सर्व इस्टेटीचे तिच्या नि आईच्या नावे असलेले कागदपत्र त्यांच्या हाती पडले तेव्हा ते मनाशी पक्के ठरवूनच घरापासन दूर झाल्याचे दोघींच्या लक्षात आले. ओळखीची मंडळी विचारपूस करायला यायची.

संसारी माणसाला आईवडील अथवा पत्नीची परवानगी न घेता असा गृहस्थाश्रम त्यागता येत नाही म्हणायची, कारणमीमांसा करायची किंवा एखादा अकस्मातच ते पंढरपुरात दिसल्याचे सांगायचा तेव्हा त्यांच्या आशा पल्लवित व्हायच्या. नव्या जोमाने ते धुंडाळायला जायचे पण पदरी निराशाच पडायची. तरी प्रत्येक वारी दरम्यान ते गर्दीत दिसले, विठ्ठल मंदिरात दिसले, महाप्रसादात दिसले, नामदेव पायरीजवळ झळकले, चंद्रभागेकाठी उभे होते अशी काही ना काही वार्ता यायची आणि अवकाळी पाऊस यावा तसे आईचे डोळे झरायचे. तिने मात्र अपराध्यापोटी मनातला दुःखभार कधीच डोळ्यांतून धो धो वाहू दिला नाही.

दिवस वाऱ्याच्या वेगाने पळत होते. पाहता, पाहता ती इंजिनिअर झाली. बंगलोरच्या नामांकित कंपनीत नोकरीला लागली. चांगला घसघशीत पाच आकडी पगार मिळू लागला. यथावकाश लग्न झाले. नवराही बड्या पोस्टवर. मूल झाले, पाच वर्ष उलटले. जीवनात ती बरीच स्थिर झाली. पण आतल्या आत तिचे मन तिला सदैव खात रहायचे. 'त्यांच्या' संसारातून निघून जाण्याला ती स्वतःला कारणीभूत ठरवायची. एक दिवस तिने या साऱ्या गोष्टी जोडीदाराला सांगितल्या. तोही खूप हेलावला.

"मी दरवर्षी वारीला जात जाईल तुषार, त्यांचा कसून शोध घेईल, मला त्यांना परत आणायचेच आहे", तिने आपला निश्चय जाहीर केला. नवऱ्यानेही पाठींबा दिला. तेव्हापासून ती दरवर्षी न चुकता वारी करते. रात्रंदिवस डोळे उघडे ठेवून त्यांना शोधते.

तसा आईचा फोन सतत येतच असतो तिला पण वारीत विशेष आशेने येतो. ज्या घाटात ते आईचा डोळा चुकवून गायब झालेत तिथे ती पोहोचली की चारचारदा येतो. त्यावेळी आई खूप अवांतर बोलत राहते. शब्दानेही विचारत नाही ते दिसले का? त्यांच्याबद्दल काही कळले का? तिला माहिती असतं आईला निदान त्यांची

खुशाली तरी कळावी एवढीच माफक इच्छा आहे. पण ते दिसतच नसल्याने ती तरी काय सांगणार आईला त्यांच्याबद्दल?

आताही आईशी जुजबी बोलून तिने फोन ठेवला. दुःखातिरेकाने तिचे मन भरून आले होते. विखरू पाहणाऱ्या आशा जमा करत ती पुन्हा वारीत चालू लागली. ऊन वारा पाऊस सोसत भोळ्या वारकऱ्यांची दिंडी पंढरपुरात येऊन धडकली. दुरूनच कळस दिसताच तिचाही पूर्ण शिणवटा गेला. पंढरीराया, सावळ्या देवा या खेपेला तरी त्यांची भेट घडू दे रे. मला त्या भल्या माणसाच्या पाया पडून मनापासून माफी मागायची आहे. त्यांना बाबा म्हणून हाक मारायची आहे. आईसाठी घरी चलायचा आग्रह करायचा आहे. असंख्य विचार तिच्या डोक्यात येत होते जात होते. पायरीशी तळ ठोकून ती वेड्यासारखे प्रत्येक भाविकाला आपादमस्तक निरखत होती. सालस भाबडा चेहरा दिसला की मिस्टर दीक्षित म्हणत उचंबळून उठत होती. विठ्ठलाचेही दर्शन घेतांना तिचे डोळे त्यांचाच शोध घेत होते. कुठे लपवले रे त्यांना ती चिडून विठ्ठलाला विचारी.

यावेळीही दर्शन, मुखदर्शन, महाप्रसादाची बारी, दिंडी-पालख्या, परिसरातील रंगीत दुकाने, आसपासच्या सर्व धर्मशाळा, पोलिसचौकी, घरं असे सगळीकडे शोधले तिने त्यांना. पण व्यर्थ. त्यांच्याबद्दल कुठेच काहीच कळले नाही. शेवटी मलूलपणे रेती तुडवत ती चंद्रभागेजवळ आली. तू तरी सांग त्यांचा पत्ता तिच्या मनाने आर्जव केले.

निळ्या जांभळ्या गर्द घनदाट ढगांखाली झडीचा पाऊस झेलत चंद्रभागा मात्र कसलीही खळखळ न करता निमूट वहात होती.

नवनिर्मिती

डॉ. सौ. सुरुची डबीर
dabirsuruchi@gmail.com

आज उषाला फारच अस्वस्थ वाटत होतं. श्यामकांत आपल्या लिखाणात मशगुल होते. उषाकडे लिखाणामुळे लक्ष द्यायला त्याला सवडच नव्हती. नुकताच उत्कृष्ट लेखनाचा "राष्ट्रीय पुरस्कार" त्याला मिळाला होता. या पुरस्कारानं एक नवं चैतन्य निर्माण झालं होते. लिखाणाला आता तर आणखीनच उधाण आलं होतं. उषा एखाद्या समीक्षकाच्या नजरेनं त्याच्याकडे बघत म्हणाली:-

"श्यामकांत दिवे लागण्याची वेळ झाली अंधार पडतोय आणि दिवा न लावताच अंधारातच तुम्ही लिहताय."

श्यामकांत अत्यंत उत्साहात म्हणाला:-

"अग, हे शब्द जे मला आत्ता सुचताहेत जर मी त्यांना या कागदावर बंदिस्त केले नाही तर उडून जातील. मग मी वेड्यासारखा त्यांना शोधेन पण ते लपंडाव खेळत माझ्या हाती कधीच सापडणार नाही. दिवा लावायला उठलो तर ते लबाड नक्कीच दूर पळतील. अग, हे जे पात्र तयार होतंय ते फारच अफलातून आहे. म्हणजे मीच त्याच्या प्रेमात पडलो बघ. तुलाही ते आवडेल."

उषाच्या चेहऱ्यावरचे निर्विकार भाव बघून श्यामकांतला फार आश्चर्य वाटलं. तिच्या उदासीचे कारण काय? त्याचं कवीमन याचा शोध घेऊ लागलं कमरेच्या खाली रुळणाऱ्या काळ्याशार केसांनी आता रुपेरी कडा धारण केली होती. चंद्राच्या प्रकाशात समुद्राकाठची वाळू जशी चांदीच्या तेजाने चमकते तसे तिचे रुपेरी होऊ घातलेले केस चमकत होते. तिचे मोठे डोळे त्याला नेहमीच शांत संथ समुद्राची आठवण करुन देत असत. ते आज अशांत वाटले. हृदयात न सामावणाऱ्या दुःखाला अश्रु रुपात मार्ग मोकळा करत होते. तिच्या दुःखातच कारण न सांगताच त्याला कळलं होतं. तिचे हे एकटेपण न बोलताच त्याला समजायचं होतं. शब्दानी व्यक्त केल्याने दुःख प्रत्यक्ष समोर घेऊन उभं राहीलं तेव्हा हा शांत समुद्र मर्यादा ओलांडून जाईल. त्याच्या वाहणाऱ्या खाऱ्या पाण्यात तो बुडून जाईल या भीतीनं तो विषय न काढलेलाच बरा. असा विचार करत तो म्हणाला -

"उषा, मी जे लिहलय ते तुला वाचून दाखवू?", तिनं आश्चर्यानं त्याच्याकडे बघितलं -

"म्हणजे अपूर्ण लिखाण तुम्ही मला दाखवणार? असं आजवर तुम्ही कधी केलं नाही. तुमची कविता असो, कथा असो पुर्ण झाल्याशिवाय तुम्ही मला कधी दाखविली नाही. मी कितीही गयावया केली तरी तुम्ही ते दाखवत नव्हते आणि आज स्वतःहून मला दाखवताय? तुम्ही विषय बदलविण्याचा प्रयत्न करत आहात, हो ना!? अहो, जे दुःख जन्माचच लागलं त्याला लपवून काय न लपवून काय ते राहणारच!

श्यामकांतला तिच्या मनात काय चाललंय हे

माहित होतं. तिलाही कळलं होतं. श्यामकांत मुद्दाम विषय बदलतोय. एकमेकांच्या मनाला दोघांनाही वाचता येत होतं. मग ही एकमेकांशी चाललेली फसवाफसवी तरी कशाला? उषानेच विषयाला वाचा फोडली, "श्यामकांत, मातृत्व हा स्त्रीचा खरा दागिना, तेच ईश्वरानं तिला दिलेलं वरदान. मग माझ्याच नशिबी आई होण्याचं भाग्य नव्हतं का हो?

उषाच्या डोळयातून अश्रू वाहू लागले. श्यामकांतला जी भीती होती तसेच झाले. त्याच्या छातीवर डोके ठेवून एखादया लहान मुलासारखी ती रडू लागली. आई होण्याचं भाग्य उषाच्या नशिबी नव्हतं. हळूहळू आशेवर काही दिवस गेले पण आता ती फार थकली होती. श्यामकांतला तिला धीर देण्यास काहीच शब्द सुचत नव्हते. एका प्रतिभावंत लेखकालाही नि:शब्द करणारी वेळ येतेच. तो तिला दिलासा तरी काय देणार? इतके दिवस मूल होईल या आशेवर ती खंबीरपणे उभी होती. पण आता ती फारच खचली होती.

तिला खुर्चीत बसवून तो चहा करायला आत गेला. तिला वाटलं आपण दुःखी झाल्यानं श्यामकांतही दुःखी झाला. त्याचं विश्व वेगळ आहे. लिखाणात त्याचा वेळ जातो किती खुश असतो तो! उगाच त्यालाही माझ्या मनाच्या वाळवंटी एकाकीपणाचं दर्शन घडवलं. आता त्याला लिहायला पण सुचणार नाही. खरतर ती किती नशीबवान आहे! श्यामकांतसारखा जोडीदार मिळणं म्हणजे भाग्याचच नाही का? तिच्या ओठावर हास्य फुलवण्यासाठी किती धडपडत असतो. संध्याकाळी न चुकता ते दोघे या बाल्कनीतच चहा घेत. तेथे कुंड्यांमध्ये गुलाब, मोगरा सगळी फुल झाडं लावली होती. बालकनीतून वर चढणारा केशरी फुलांचा वेल चांगलाच बहरला होता. हा वेल फक्त पावसाळयातच बहरतो. शेवंती फक्त हिवाळयात आणि मोगरा उन्हाळाच्या तापत्या दुपारीही वातावरणात शीतलता आणतो. कोणत्याही ऋतुतून बालकनीत फुलं असतातच ही छोटीशी आधुनिक काळातली कमी जागेत असलेली बागच होती, हया बागेला नेहमी बहर आलेला असायचा पण उषाच्या आयुष्यात असा बहर कधी आलाच नव्हता. मुद्दाम सगळी फुलझाडच जवळ ठेवली होती. कुंडीतल्या गुलाबाची कळी हातात घेत ती नेहमी विचार करायची किती सहज असतं नाही? झाडाला कळी येणं? झाडाला निसर्ग कळी देतो ते त्याला कळतही नाही, त्या कळीच त्याला ओझं होत नाही उलट त्याच्या सौंदर्यात भर पडते. स्त्री जेव्हा आई होणार असते तेव्हाही किती सहज नाजुक कळी तिच्या पोटात विसावते हळू हळू वाढ होते, ती बेढब होतेय काय? तिचे पोट नगारा दिसतेय का? आईचे त्याकडे लक्षच नसते, पोटावरुन हात फिरवत ती आत निष्चिंत निजलेल्या कळीला गोंजारते -

झोप तू बाळा

बघ स्वप्न उद्याची

सोसीन हात कळा

हाक 'आई' ऐकण्यासाठी

पण हा केशरी झाडाचा वेल त्याला सहा वर्ष फुलं

आलीच नव्हती. तिला वाटलं उगीच ही वेल लावली . एकदा चुपचाप त्या वेलीजवळ जाऊन ती पुटपुटली होती.

“हे बघ, तुला जाई, मोगरा, शेवंती हसताहेत, हया वेलीला फुलेच नाही म्हणून, आणि आता तुला शेवटचं सांगते, जर तुला फुलं आली नाहीत तर खाली कंपाऊंड जवळ लावून देईल कळलं?”

ती असे वेलीला धमकावून स्वतःशीच हसली होती, आणि काय आश्चर्य, त्या वेलीला चार-पाच दिवसातच इवल्याश्या कळया आल्या होत्या, ती वेल तिच्या धमकीला नक्कीच घाबरली असणार आणि शापही दिला असणार की मला धमकावत होतीस ना! जा तुझ्याच वेलीवर फुल येणार नाहीत, कधीच नाही कितीदा तरी तिने त्या वेलीला स्वतःच्या चुकीची माफी मागीतली होती पण मनावर झालेले घाव असे क्षमा मागुन पुसता येत नाही.

तिच्या दारापुढे नेहमी एक भिकारी यायची घारे डोळे आणि काळा रंग असणारी, ती बया तिच्या सारखे घारे डोळे असणाऱ्या बाळाला कडेवर घेऊन असायची. अंगात कपडे नाही, पोटात अन्न नाही पण बाळ मात्र गुटगुटीत होतं, आणखीन तिघं मुलं तिच्या मागं असायची. हया बाईला देवानं किती मुलं द्यावीत? नको असतांना देव किती देतो आणि ज्याला हवं त्याला तडफडत रहावं लागतं. तिने हिच्यापुढे “देवो माय” असं म्हणत पदर पसरला होता. तिच्या त्या जिर्ण पदरात देवान तर ही फुल दिली होती. तिला असं वाटलं होतं आपणही तिच्यापुढं पदर पसरावा आणि त्या बाळाची भिक मागावी. त्याला न्हाऊ माखु घालावं त्याच रुप बदलून टाकावं. हिम्मत करुन तिनं त्या बाईला मुल मागितलं होतं त्या बरोबर तिनं त्या बाळाला हृदयाशी कवटाळलं आणि म्हणाली “बाई, मले नको भीक तुमची. माह लेकरु म्या न्हायी देणार कुनाले बी!” ती जे गेली ते पुन्हा कधीच आली नाही, श्यामकांत चहा घेऊन आला, उषाला विचारमग्न बघुन म्हणाला “अगं चहा घे आधी, आणि हे बघ एकाच एका गोष्टीचा विचार करु नकोस. अगं,जे आपल्या हाती आहे आहे ते आपले जे नाही ते परक्याचे, काय हे?”

श्यामकांतच्या या बोलण्यानं ती अधिक दुःखावली “हे बघा श्यामकांत, स्त्री मनाचं तुम्हाला कळणार नाही. आई होणं काय असतं हे अनुभवावच लागतं, कळलं?”.

श्यामकांत हसत म्हणाला - “अगं, मग काय? मी तर आई होणं अनुभवलय” “हे बघा तुम्ही माझी चेष्टा करु नका हं” “छे गं, चेष्टा नाही खरच म्हणतो मी! तुला सांगू आई होणं हा सुंदर अनुभव आहे तो मी अनुभवला. तू हसशील, पण बघ मी तुला समजावतो अगं कुणीही आई होणं अनुभवू शकतो. पुरुष सुध्दा आई होणं म्हणजे नवनिर्मीती करणं आपल्या सारख दुसरं रूप तयार करणं, हे सगळ आपोआपच घडणार तसचं मी जो लेख लिहतो किंवा कथा, कविता करतो ती तर नवनिर्मीतीच असते. प्रत्येक लिखाणाच्या पुर्णत्वानंतरचा जो आनंद तो आई होण्याच्या आनंदाहून वेगळा कसा? आईला बाळाला जन्म देतांना यातना होतात.

पण जेव्हा ती आपल्या बछड्याचं रूप बघते तेव्हा सगळया यातना विसरते. तिला होणाऱ्या वेदनांचा तिला विसर पडतो आपल्या मुलावर आईचं आंधळ प्रेम असतं. त्याच्या चुका ती सतत डोळझाक करत असते. प्रत्येक पात्र तयार करतांना मला असाच त्रास होतो. त्या पात्राशी एकरूप व्हाव लागतं माझ्या व्यक्तिमत्वाहून भिन्न व्यक्तिमत्त्व मी रेखाटतो. थोडे माझे विचार, थोडे पात्राचे विचार असं वेगळचं व्यक्तिमत्व घडत जातं, ते पात्र मी निर्माण केलं असलं तरी ते माझ्या सारख नसतं ते वेगळच असतं, आई सारखं मुल दिसत असलं तरी त्याचे विचारही तिच्या सारखेच असतील असे नाही. तसेच मी आणि माझं नवनिर्मित पात्र यात आई मुलाचं नात असतं, जेव्हा मी माझी कलाकृती कुणाला दाखवितो तेव्हा वाटतं कुणी त्याच्या चुका काढू नये.

फक्त चांगलं तेवढं सांगावं, मी इतका उत्साहात असतो की कुणी माझ्या कलाकृतिला नांव ठेवलेलं सहनच करू शकत नाही. हे आईचं आपल्या अपत्यावर असलेलं आंधळ प्रेमच नाही कां? कसंही मूल असो ते कुरूप असो, मंदबुध्दिच असो, अपंग असो, आईला त्यात कधीच उणीव भासत नाही. ती सतत त्याला उराशी धरून असते. माझी कलाकृतीपण मला अशीच प्रिय असते. कुणाला आवडो न आवडो ते माझं आहे. माझ्या एकटयाचं आहे, असा आईसारखा मी पझेसीव होतो. हा आनंद कोणतीही व्यक्ति जी नवनिर्मिती करते अनुभव घेतच असते. तो चित्रकार असो, शिल्पकार, घर बांधणारा साधा मजूर असो, कुणीही हा आनंद घेऊ शकतो.

" उषा त्याचे विचार अगदी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होती. एका अद्भुत आनंदाचे तेज तिच्या डोळयात दिसत होते. पण दुसऱ्याच क्षणी तो आनंद मावळला पुन्हा दुःखी चेहऱ्यानं ती श्यामकांतला म्हणाली -

"श्यामकांत, तुम्ही तर इतक्या सुंदर तऱ्हेने आई होण्याचं भाग्य अनुभवले. तुम्ही भाग्यवान आहात. पण माझं काय? मला तर काहीच नवनिर्मिती करता येत नाही. तुम्ही सतत लिखाणात वाचनात मग्न असता मी किती एकटी असते. ठाऊक आहे तुम्हाला? तुम्ही सतत त्या भव्य खिडकी पुढे बसून निसर्गाशी नाते जोडून असतात. पहाट, सकाळ, दुपार, सायंकाळ आणि रात्र हयातला बदल तुम्हाला अनुभवायचा असतो. ती पानं, ती झाडं कशी दिसतात? हया विचारात तुम्ही असता म्हणून तुम्ही ती खिडकी सतत उघडी ठेवता.

त्या खिडकीतून एक एक पात्र तुमच्या डोळयापुढं येत, तुम्ही त्याचे दुःख जाणता त्याच्याशी बोलता त्याला घडवता, पण हे करतांना मी कुठे असते? दिसते कां मी तुम्हांला? चहाचा कप बशी, नाष्टा तुमच्या जवळ येतो. चवीकडे लक्षही न देता तुम्ही तो संपवता. आपल्या अपत्याच्या संगोपनातच तुम्ही गढून जाता, पण माझं काय? याचा विचार केला कधी? सांगा माझं स्थान काय? मी कुणाच्या आशेवर जगु?" श्यामकांतने तिचे पाणावलेले डोळे पुसले.

तिचा हात हातात धरत तो म्हणाला -

"उषा, तुझं स्थान विचारतेस? अगं तू आज जर माझ्या आयुष्यात

आली नसतीस तर मी आज या पुरस्कारास पात्र ठरलो नसतो. माझी कुठलीही कथा, लेख सर्वप्रथम तुलाच तर मी दाखवितो, किती कठोर समीक्षक आहेस गं तू? माझ्या चुकाच सांगते. चांगलं थोडक्यात संपतं. अगं एखाद्या वडिलांची भूमिका तू निभावतेस, आपल्या अपत्याच्या पित्याची भूमिका तू करतेय. वडिलांचे आपल्या अपत्यावर आंधळं प्रेम नसतं. अगं , ते सतत रागवत असतात, चुका सांगत असतात, तशीच तू पण माझ्या कलाकृतीत चुका शोधतेस. जेंव्हा मी तुला माझं लिखाण दाखवितो तेंव्हा हृदयाचे ठोके वाढतात. धडधडायला लागतं. एखाद्या मास्तरपुढे उभे असल्यासारखं वाटतं. तो मास्तर माझा पेपर तपासतो पण कुठे लाल रेषा ओढतो हे मात्र मला दिसत नाही. मग मी नुसतं चेहऱ्यावरच्या हावभावांनी ओळखण्याचा प्रयत्न करतो. पित्याची भूमिका अशी मस्त करतेस तू किती कठोर होऊ शकतेस तू, हयाचा अनुभव मी घेतलाय. जी चूक झाली ती दुरुस्त केल्याशिवाय मला पटवून दिल्याशिवाय तुला चैन पडत नाही. तुझ्या कठोर समीक्षणातून उत्तीर्ण झाल्याशिवाय माझं अपत्य पुढे जाऊच शकत नाही पण जेव्हा तासून निघालेलं हे लिखाण रसिकांपुढे जातं ते दोषरहित जातं वाचकाला निर्दोष साहित्याचे रसप्राशन करण्याचा आनंद मिळतो. तो तुझ्यामुळेच. वडिल कितीही कठोर दिसत असले तरी आपल्या मुलांवर अपार प्रेम असतं. ते त्यांना व्यक्त करता येत नाही. तसच तुझंही माझ्या लिखाणावर प्रेम आहे. आपल्या अपत्यावर प्रेम आहे. जास्त कौतुक झाल्यानं अहंकाराचा दर्प माझ्यात शिरेल या भीतीनं तू मला जमीनीवरच रोवून ठेवतेस. अग, आपल्या भूमिका बदलल्या आहेत. मी पुरुष असून आईची आणि आणि तू स्त्री असून बापाची भूमिका निभावतेस. मुलाचा उत्कर्ष झाला तर कौतुकही आईचंच होतं आईचं वळण चांगलं आहे, तिनं लक्ष दिलं म्हणून मुलगा चांगला निघाला, असं पारितोषिक आईलाचं मिळतं, वडिलांना नाही. त्यांचे कर्तृत्व आईपुढे झाकाळल्या जातं. तसेच माझ्या लिखाणाला पुरस्कार मिळाल्यावर माझं कौतुक होतं. तुझा सहभाग कुणीच बघू शकत नाही. पण तुला त्यानं काहीच फरक पडत नाही. हे पित्याचं निःस्वार्थ प्रेम मी बघू शकतो. तू आपल्या अपत्याचा उत्कर्ष बघून किती आनंदून जातेस?

अगं, माझ्या एखाद्या मित्रानं जर माझे दोष दाखवले असते ना, तर मला वाटलं असतं हा माझ्या उत्कर्षाला जळतो. माझा विश्वास त्याच्यावर बसला नसता. त्यानं कितीही खरं प्रांजळ मत दिलं असतं तरी मला ते बनावटीच वाटलं असतं. पण तुझ्या बाबतीत तसं नाही. तू तर माझंच दुसरं रुप आहेस, नव्हे, तू आणि मी एकच आहोत. तू माझी फसवणूक करशील अशा विचारांचा स्पर्शही मला झाला नाही. मुलं असूनही निपुत्रिकांसारखे असणारे लोकं पाहिलेत की वाटतं आपलं हे अपत्य आपल्याला कधीच अंतर देणार नाही. सदानंदला पाहिलस ना! वृध्दाश्रमात असतो. हाडाची काडं करुन मुलालां शिकवलं आता रिटायर्ड झाल्यावर वृध्दाश्रमात

असतो, नोकरी करतो, तेव्हा वाटतं असंच काही आपल्या वाट्याला आलं असतं तर? म्हणून तुला म्हणतो जे आपल्याजवळ आहे. त्यातचं समाधानी रहा. अगं जे जवळ नाही ते बघण्यातच आपण आयुष्य घालवलं तर जे आहे त्याचा आनंद कधी घेणार? आनंद देणाऱ्या कितीतरी गोष्टी आपल्याजवळ आहेत. तू लावलेली ती फुलंझाडं, तुझ्या सखी सारखीच आहेत ना, शिवाय तुला मुलांची आवड आहे. जवळच्या अनाथआश्रमात कितीतरी मुलं आईच्या प्रेमाला पारखी झाली आहेत. जगाची रीतच निराळी आहे जिथे प्रेम असते, प्रेम देणारे असतात, तिथं प्रेमाचा स्विकार करणारे नसतात आणि जिथे प्रेमासाठी आसुरलेली मनं असतात तिथं प्रेम देणारी व्यक्ती नसते.

उषाला वाटलं, इतके दिवस ती ज्या ओझ्याखाली होती. ते हलकं झालय. आता काहीच काळजी नाही. काहीच खंत नाही, कोणताच शल्य मनात नाही. नवीन उत्साह ननवचैतन्यानं भरलेलं मन, आता ती पण नवनिर्मितीसाठी खर्ची करणार, आता ती पण आई होण्याचा आनंद लुटणार, मनात दाटलेल्या प्रेमाची

उधळण करणार, कुठल्याही परतफेडीच्या आशेनं नाही. या अनाथ मुलांना दिलेल्या प्रेमानं ती बहरतील, फुलतील, ही अनाथ मुलं नीट वाढ न झालेल्या झाडासारखी खुंटित असतात. त्याला प्रेमाचं खतपाणी मिळालं तर डौलदार वृक्षात रुपांतरित होतील. स्वतःच्या छायेत इतरांना सुखावतील अन्यथा काटेरी वृक्षाप्रमाणे समाजाला घातक बनतील. उषा नवीन उत्साहात म्हणाली -

"श्यामकांत मी किती वेळ वाया घालवला हो, उगाच रडत बसले. ती केशरी फुलांची वेल मला सतत खुणवत होती , पण मलाच ते कळलं नाही. मला तिनं शाप दिला असं मी समजत होते पण ती निष्पाप काय शाप देणार? ती तर प्रत्येक फुलातून हसून मला सांगत होती जरा बाहेर बघ, ततुझ्या प्रेमानं भरलेल्या मनाची या समाजाला किती गरज आहे.

कुठल्याही परतफेडीची आशा न धरता ती या मुलांना प्रेम देणार होती उसनी दिलेली साखर तेवढीच त्याच प्रमाणात परत हवी असते. ही जगाची रीत आहे. प्रत्येक व्यक्ती वाटीभर प्रेम देतो आणि आयुष्यात त्यांच्या परतफेडीची अपेक्षा करतो आणि इथंच दुःख पदरी पडतं. वाटीभर नाही तर निदान चमचा भर तरी परत मिळावं ही अपेक्षा असतेच. त्यापेक्षा त्या वाटीभर प्रेमाचं दान स्वखुशीने केलं तर, परतफेडीची अपेक्षा न करता, फारच कठीण असतं, हे अपेक्षारहित प्रेमाचं दान, पण साध्य होऊ शकतं. उलट असाही अनुभव येतो, ते दान त्या प्रमाणापेक्षा जास्त परत मिळतं अगदी आपण दिलं त्याच निरपेक्ष भावनेनं परत मिळतं. पण दान दिलंयं ते परत कसं घ्यायचं? असा विचार न करता त्याचा स्विकार करायला हवा. प्रेमाचा स्विकार हा करायलाच हवा. मग तो दान देणारा असो अथवा घेणारा.

बुचाचं झाड

सौ. सोनाली ताम्हणे
sonalitamhane08@gmail.com



एकदा काय झालं, एक गंधर्व गाण्याचा सराव करत होता. दुपारची वेळ होती. सगळेजण आपापल्या दालनामध्ये विश्रांती घेत होते. गंधर्वाला जरा मध्यान्ह रागांची उजळणी करायची होती . त्याला दालनात काही करमेना. म्हणून तो आला बागेत. सुरू केली त्याने आपली रागदारी.

थोडयाच वेळात त्याला एक सुगंध येऊ लागला. त्याने गाण्याकडे मन वळवायचा प्रयत्न केला , पण तो वास काही त्याला स्वस्थ बसू देईना. आता त्या सुगंधाने गंधर्वाच्या मेंदूचा पुरता ताबा घेतला. शेवटी तो उठला. आणि वासाचा शोध घेऊ लागला. कुठून बरं येतोय ? अवतीभवती थोडंस फिरल्यावर त्याला झाडांच्या दाटीत लपलेलं पेरूचं झाड दिसलं. अरेच्या ! पेरूचं झाड आहे इथे? आपल्याला कसं दिसलं नाही इतके दिवस? त्याला नवल वाटलं. आता मात्र त्याला मोह आवरेना! हात पुढे करून त्याने पेरू तोडलाच. आणि खाऊ लागला.

अहाहा मस्त पिकलेला लाल पेरू! आता त्याला राहवेना. त्याने आणखी पेरू खाल्ले. भरपूर खाल्ले. मनसोक्त पेरू खाऊन झाल्यावर त्याच्या लक्षात आलं, आपण चूक केलीय. नव्हे, फार मोठा गुन्हा केला. आपण असं मोहाला बळी पडायला नको होतं. परवानगी शिवाय पेरू तोडायला नको होते. आता काय करावं.. चूक तर झाली होती. शेवटी त्यानं देवबाप्पाला सगळं सांगून सॉरी म्हणायचं ठरवलं. पण देवबाप्पा ला तर सगळं दिसतं. सगळं कळतं. मग मी हे चोरून....नाही , नाही, चोरले नाही , पण न विचारता खाल्लेले पेरू ..हो ती ही चोरीच ना. देवबाप्पाला कळली तर असेलच.

एवढयात बघतो, ते काय , देवबाप्पाच समोरून येत होता. गंधर्वाने धावत जाऊन देवबाप्पाचे पायच धरले . देवबाप्पाने त्याला उठवलं. प्रेमळ पण गंभीर नजरेने त्याच्या कडे पाहिलं. "तुझी चूक तुला कळलीय, हो ना? " गंधर्वाने होकारार्थी मान हलवली. "मग तुला हे ही माहीत असेल की शिक्षाही भोगावी लागते." गंधर्वाचे डोळे डबडबले. भरल्या गळ्याने म्हणाला, "देवबाप्पा, तू देशील ती शिक्षा मी घेईन. "

" पण आधी शिक्षा कशासाठी आहे, हे तर ऐकशील की नाही? "

" मला ठाऊक आहे, मी न विचारता पेरू खाल्लेत म्हणून ही शिक्षा मला मिळतेय."

"नाही, तू जे काही खाल्लेस ते वाटून न खाता, मोहाला बळी पडून एकट्याने खाल्लेस. सर्वांनी मिळून खायचं हा नियम आहे आपला. जो तू मोडलास."

"चुकलोय मी देवबाप्पा. मी पृथ्वीवर जायला तयार आहे" . गंधर्व कान पकडून म्हणाला.

"मग आता ऐक. तू पृथ्वीवर बुचाचे झाड होऊन जा.

तुला तुझी चूक कळलीय म्हणून मी एक कन्सेशन देतो.. तू बुचाचं झाड झालास, की फुलांनी अगदी बहरून जाशील."

गंधर्व पृथ्वीवर आला, ते बुचाचं झाड होऊनच. बुचाचं झाड मोठं झालं. त्याला खूप खूप फुलं आली.भोवती सडा पडला नुसता फुलांचा. त्या सुगंधाने मोहून लहान मुलं, मोठी माणसे, छोटे कीटक, गुणगुणणारे पक्षी, असा मेळा जमला नुसता. बुचाच्या झाडाला खूप आनंद झाला. आपला आनंद तो गंधर्व फुलांच्या रूपाने आजही भरभरून लुटतोय.

आता इथंच इतका रमलाय , इतका रमलाय की शिक्षा कधीच संपली तरी परत जायचं नावच काढत नाहीये.

जगावेगळी

जयश्री नायडू
sakshid1584@gmail.com

तिची आणि माझी ओळख शाळेच्या पहिल्या दिवशी झाली चौथीचा वर्ग शोधत असताना झाली. मी वर्गासमोर थांबले छोट्या शाळेतून एवढ्या मोठ्या शाळेत आल्यावर मी भांबावून गेले. वर्गात पाऊल ठेवताच दुसऱ्या ओळीतच दुसऱ्याच्या बाकावरच्या मुलीने माझ्याकडे हसून पाहीलं मी तिच्याच शेजारी जाऊन बसले तिचं मृणालिनी मधुसूदन रेगे (पमली).

तेव्हा झालेली मैत्री ती वयाच्या पंचाहत्तरीतही कायम होती. चार महिन्यापूर्वी ती मला सोडून गेली कायमची कधीही परत न येण्यासाठी.

शाळेत असताना मी तिच्या घरी अभ्यासाला जात असे. तिनं कधी आपल्या आई विषयी मला काही सांगितलं नाही. मी प्रथमच तिच्या घरी गेले तेव्हा तिची आई काठीने वर तारेवर कपडे वाळत घालत होती. मी जिना चढून वर गेली तशीच ती हातातली काठी घेऊन माझ्या मागे धावली. मला कळेना तेवढ्यात तिला पमलीने पकडून तिला घरात नेलं. माझ्यासाठी हा अनपेक्षित प्रसंग होता. पमलीने मला घराचा आत येण्यासाठी नजरेनेच खुण केली.

ती माझ्याजवळ येऊन बसली. तिचा चेहरा अगतिक होता. मी तिचा हात माझ्या हातात घेतला. तिला हुंदका फुटला. मला काहीच सुचेना, तसेही आम्ही लहानच होतो. पण, ती अवेळी मोठी झाली होती. परिस्थितीने तिला मोठी केले होते.

तिने सांगितलं ते इतकं भयानक होता की अजूनही आठवलं की मनाचा थरकाप होतो. तिच्या आईला कोणी ज्योतिष्याने सांगितलं की तुला लागोपाठ तीन मुलं होतील.पहिला मुलगा झाला, दुसरी मुलगी झाली तिच्या आईला इतका राग आला की दवाखान्यात असताना या बाळाला तिसऱ्या मजल्यावरून खाली फेकायला निघाली. नर्सच्या वेळीच लक्षात आलं आणि या बाळाचा जीव वाचला. तीच ही नकोशी पमली. तेव्हापासून तिची आई भ्रमिष्ट झाली. एक्सरे स्पेशालिस्ट डॉक्टरची बायको आपली मुलं नवरा संसार सारं काही विसरली. हातात एखादी इंग्रजी कादंबरी घेऊन तिच्या खोलीत कोपरा पकडुन बसायची. पमली सांगत होती. पण ते ऐकताना माझे मन आणि डोळे रडत होते.

तिचे वडील सारं करत होते, जोडीला पमली मदत करत होती, तिच्या नंतर दोन बहिणी होत्या. बाई ठेवली कामाला शेवंता सारं आपुलकीनं करायची. पमली वयानं लहान असून सारं काही जबाबदारीने करायची. बघता बघता आम्ही मॅट्रिक झालो. आई वडील आजोबा साऱ्यांची साथ संपली, जबाबदारी वाढली. तिनं आपली प्रतिज्ञा बोलून दाखवली. ती तिघींची लग्न झाल्याशिवाय लग्न करणार नव्हती.तिला एका शेतकी कॉलेजमध्ये नोकरी मिळाली. तिथेच नोकरी करणाऱ्या एका समंजस मुलाने तिला मागणी घातली. पण तिनं त्याच्यासमोर आपली प्रतिज्ञा ठेवली. आश्‍चर्य म्हणजे त्यांनीही ती मान्य केली. कालांतरानं साऱ्यांची लग्न होऊन ते आपापल्या संसारात रमले.

माझं लग्न होऊन मी सुद्धा नागपूरला आले. मी नागपुरात आले होते पण माझं मन पमलीत अडकलं होतं.

आता मीच त्यांच्या लग्नाची घाई केली. दोघंही ब्राह्मणच. तो देशस्थ आणि ती सारस्वत. त्याच्या घरच्यांना लग्न मान्य नव्हतं. शेवटी कोर्ट मॅरेज करायचा निर्णय घ्यावा लागला. त्यावेळी फोनचं फार प्रस्थ नव्हते. पत्राने जे काही कळायचे तेवढंच.

त्यांनं ओळखीनं दोन खोल्या एका आऊट हाऊस मध्ये मिळाल्या. त्यांचा संसार सुरु झाला. मी जेव्हा केव्हा पुण्यात जात होते तेव्हा अगदी आवर्जुन पमलीच्या घरी भेट देत असे. मी गेले म्हणजे दोघांनाही आनंद व्हायचा. पमलीचे यजमान म्हणजेच अरविंदराव म्हणायचे, चल अंडाकरी बनवू या! मग जेवणं व्हायची.

पमली अत्यंत स्वाभिमानी होती. तिच्या आजोबांनी दिलेल्या एका लहान गोदरेजच्या कपाटाशिवाय काहीही न घेता तिने आपल्या संसाराला सुरवात केली. नेहमी समाधानी, संकटातही सुखाचे क्षण शोधणारी पमली म्हणजे एक अजब रसायन होतं. शाळेत असताना ट्रिप जाणार असली तर न कळत पैसे भरून मोकळी व्हायची, मग मी नकार द्यायचा काही प्रश्नच नाही. ऑफ तासाला अंताक्षरी खेळायचो. त्यात आम्ही दोघी एका बाजूला आणि बाकीच्या दोन रांगा एका बाजूला. ते सोनेरी दिवस होते. आज माझा वाढदिवस तिची खुप आठवण येत आहे. ती जाण्याआधीच मी तिला फोन केला होता, सांगत होती...

“मी विरंगुळा क्लब मध्ये जाते, आतापर्यंत नवरा मुलं यांच्या दिमतीला आयुष्य गेलं. आता आपण आपल्यासाठी थोडेफार जगावं. तुही तुझं लिखाण चालू ठेव. तीच आपली खरी ओळख आहे.”

मला माझ्या तब्येती विषयी सूचना देणारी पमली आता माझ्याशी कधीच बोलू शकणार नाही.

ललित

सफरनामा

स्वर्णिमा प्रकाश
swarnimakamalwar36@gmail.com

एका विशिष्ट क्षणी प्रवास सुरू होतो आणि गंतव्यस्थान आले की संपतो.

आपल्या आयुष्याच्या प्रवासाचंही असंच काहीसं आहे ना! जन्मापासून सुरू होणारा हा प्रवास मृत्यूच्या चिरविश्रांतीत संपतो. आयुष्याच्या या प्रवासात आपण वेगवेगळ्या भूमिकेतून एकाच वेळी प्रवास करत असतो...कधी आप्तस्वकीयां सह तर कधी एकटेच...

किती गंमत आहे ना या प्रवासात!

या जीवनप्रवासाची सुरुवात आपल्या हातात नाही आणि शेवटही आपल्या हातात नाही.

ज्येष्ठ गझलकार भाऊसाहेब पाटणकर त्यांच्या एका गझलमध्ये म्हणतात,

"जीवनाची रेलगाडी ना कळे नेते कुठे

तिकिटावर स्टेशनाचे नाव ही नाही कुठे।"

त्यामुळे आपण फक्त फिरायचं!

या प्रवासात कुठल्या कुठल्या चांगल्या वाईट घटनारूपी स्थळांना भेट द्यायची हे ही ठरवणारे आपण नसतोच! या प्रवासाचा पथदर्शक कुणीतरी वेगळाच... पण तरीही हा प्रवास आपल्याला बरंच काही देऊन जातो..बरंच काही शिकवून जातो. हा फक्त काय घ्यायचं काय सोडून द्यायचं हे निवडण्याचं काम मात्र आपलं असतं.

आपण लहान असताना मोठं कधी होणार याची वाट बघत असतो! कारण तेव्हा आपल्याला शाळेतला अभ्यास हा सगळ्यात कठीण आणि बोअरिंग वाटत असतो. मोठी माणसं किती सुखी आहेत ना..त्यांना काही अभ्यास नाही की काही गृहपाठ नाही, असं आपल्याला वाटतं.

पण मोठ्यांच्या जबाबदाऱ्या आणि त्यांची कर्तव्ये वेगळीच असतात आणि त्याचा अभ्यासही वेगळाच असतो हे आपल्याला तेव्हा कळतच नाही! पण आपण जसं जसं मोठं होत जातो तसं तसं या सगळ्या गोष्टी आपल्याला कळत जातात, समजत जातात..आणि तेव्हा असं वाटतं की यापेक्षा आपण लहान होतो हे फारच बरं होतं! या आयुष्याच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांपेक्षा शाळेतली अभ्यासक्रम फार सोप्पा होता हे पटायला लागतं! आणि मग डॉरेमॉन ची टाईम मशीन घेऊन परत बालपणात जाण्याचा आपण विचार करतो. पण वास्तविक पाहता ते काही शक्य नसतं.

या प्रवासात आपण बरेचदा अडखळतो, धडपडतो, कधी कधी ठेचही लागते, आणि कधी कधी तर जोरदार झटकाही लागतो! आणि झोपेतून खडबडून जागं व्हावं तसं आपण एका क्षणी जागं होतो!

त्या- त्या वेळेला मिळालेले हे काही झटके आपल्याला (कदाचित) आतून पूर्णपणे हलवून टाकतात, पण त्याच वेळेला ते आपल्याला सहन करण्याचं बळंही देतात. पुढे येणाऱ्या असंख्य झटक्यांना सामोरं जाण्याची पूर्व तयारीच जणू करवून घेतात, आणि मग कधीतरी वाटतं की नाही..त्यावेळी जे झालं ते योग्यच झालं.आपल्या मराठी साहित्यातला 'कार्य -कारण भाव' या

आयुष्याच्या प्रवासात आपल्याला पदोपदी जाणवतो...

कारण कुठल्याही कारणाशिवाय कुठलीही गोष्ट इथे घडत नसते. मग ती या प्रवासाची सुरुवात असो, शेवट असो किंवा मग या प्रवासात वेग वेगळ्या रूपाने भेटलेले आपले सहप्रवासी असो! इथे प्रत्येकाची वेळ ठरलेली! तो त्यावेळेला येणार, त्याचं काम करणार आणि परतीच्या प्रवासाला लागणार!

असं म्हणतात की आपल्या आयुष्यात येणाऱ्या व्यक्ति या काही उगाच येत नाही! आपले त्यांच्याशी आणि त्यांचे आपल्याशी काही जुने ऋणानुबंध असतात म्हणे, म्हणून आपली डेस्टिनी त्यांना आपल्या आयुष्यात आणते.

पण त्यातही काही ओळखीचे चेहरे अनोळखी वाटायला लागतात, तर काही अनोळखी चेहरे खूप आपलेसे वाटायला लागतात..आणि पुढे ते आपल्या आयुष्याचा एक अविभाज्य भागही होतात! प्रत्येक वेळेला आपल्या जोडीला सहप्रवासी म्हणून आपल्याच सारखी कुणीतरी व्यक्ति असेल असं नाही बरं! कधीतरी एखादं छानसं पुस्तक आपल्याला वेळप्रसंगी साथ देतं, तर कधी एखादी कविता, एखादा चित्रपट, एखादी मुलाखत आपल्या साथ देते.

आता आपण खूप थकलोय! पुढे चालणंच होत नाही आहे असं ज्या वेळेस वाटतं त्यावेळेस नकळत पुन्हा उठून उभं राहण्याचं बळ हे आपल्याला देत असतं!

इथे प्रत्येकच जण त्याच्या -त्याच्यापरीने जमेल तसं या प्रवासाचं आकलन करत तो समजून घेण्याचा प्रयत्न करत असतो. त्यात येणाऱ्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरे त्याला मिळतात..तर बरीच प्रश्न कायमस्वरूपी अनुत्तरीतच राहतात!

(इथे) कुणी जगण्यात कविता शोधत तर कुणी कवितेत जगणं. आणि एकदा का ज्याला- त्याला, ज्याच्या- त्याच्या आयुष्यरुपी कवितेचा किंवा कवितारुपी आयुष्याचा सूर गवसला की या प्रवासाचं एक सुंदर गाणं होतं यात काही शंकाच नाही!

ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर त्यांच्या एका कवितेत असं म्हणतात,

"येतांना काही आणायचं नसतं

जातांना काही न्यायचं नसतं

मग हे आयुष्य तरी कोणासाठी जगायचं असतं?

याच प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी जन्माला

यायचं असतं।"

या चार ओळींमध्ये किती चपखल वर्णन केलंय ना त्यांनी! येतांना काही आणायचं नसलं हे जरी खरं असलं तरी जातांना नेण्यासारख्या बऱ्याच गोष्टी असतात असं मला वाटतं.

आपल्याला आलेले वेगवेगळे अनुभव, त्यातला तो भाव, आपण साजरे केलेले अनेक चांगले- वाईट क्षण, मनाच्या कप्प्यात खोल आत जपून ठेवलेली गुपितं, निरनिराळ्या आठवणी, या आणि अशा बऱ्याच गोष्टी या प्रवासाच्या शेवटी आपल्या सोबत असतात...

कदाचित त्या त्यानंतरही कायमस्वरूपी सोबत

राहतात. पण त्यासाठी प्रत्येक क्षण हा जगता आला पाहिजे! जिवंत तर इथे सगळेच आहेत..पण त्यातले किती खरंच जगतायत हा प्रश्न आहे! तेव्हा हा प्रवास जगता आला पाहिजे!

आपण रिफ्रेशमेंट म्हणून कधीतरी ट्रिपला जातो. तिथला कुठलातरी स्पॉट आपल्याला खूप आवडतो..अगदी आपला फेवरेट स्पॉट वगैरे होतो..आणि मग पुढे कधीतरी आपण परत त्या स्पॉट वर जातो.

पण या आयुष्याच्या प्रवासात प्रत्येक स्पॉटवर फक्त एकदाच जाता येतं. तेच पाहिलं आणि तेच शेवटचं! एकदा मागे गेलेलं ठिकाण यात परत येत नाही!

त्यामुळे आहोत त्या स्पॉटचा पुरेपूर उपभोग घ्या, प्रत्येक क्षण 'जगून ' घ्या...

कारण परतीचं तिकीट हातात आलं की मग काही जमायचं नाही...!

बाकी काय...

आयुष्य सुंदर आहेच!

मन करा रे प्रसन्न

- सौ. संगीता वाईकर
sangeetaswaikar@gmail.com

आपलं मन हे एक न सुटणारं कोडं आहे.मन म्हणजे काय हे सांगणं म्हणूनच अत्यंत अवघड आहे .मन म्हणजे नक्की काय ?....मन म्हणजे विचारांचं स्वरूप की मन म्हणजे आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांवर निर्माण होणाऱ्या प्रतिक्रिया ....पण असं असलं तरी प्रत्येक व्यक्ती जवळ मन हे आहेच.अगदी एकरूप झालेलं असं हे मन आणि त्याच्या अवस्था देखील निरनिराळ्या ...

जाणीव आणि बुध्दी यांच्यामुळे घडणाऱ्या ज्ञान ,विचार, मत,स्मरणशक्ती,भावना,कल्पनाशक्ती, तर्क शक्ती ,चेतना या गोष्टी ज्या ठिकाणी होतात त्या ठिकाणाला ' मन ' असे म्हणतात.या सर्व गोष्टी या मेंदू द्वारे होणाऱ्या प्रक्रिया आहेत. प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये व तत्वज्ञानामध्ये मनाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. मन हे राजासारखे असावे. पण मनावर नियंत्रण हवे.मनातले सर्व काही बोलण्यासाठी समोर माणूस असून उपयोगाचे नाही तर त्या माणसाला ही जागृत मन असावे लागते.मानवी मन ही जगात सर्वात अनाकलनीय अशी गोष्ट आहे...

आपलं मन आपल्याला कधी उत्तम साथ देतं तर कधी आपल्यालाच आपल्यापासून दूर नेतं... आपलं मन जेव्हा आपल्याला साथ देतं तेव्हा आनंद निर्माण होतो आणि जीवनात सकारात्मकता येते.ही सकारात्मकताच आपल्या कार्यात यशस्वी होण्यासाठी मदत करत असते पण जर मनाने साथ दिली नाही तर मात्र नैराश्य निर्माण होतं आणि जगण्याचं गणितच बिघडून जातं....यातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे लवकरात लवकर यातून बाहेर पडायला हवं...मनाला धीर द्यायला हवा.एखादा छंद,वाचन ,लेखन ,संगीत या सारख्या माध्यमातून मनाला दुसऱ्या दिशेला वळवता येतं....ही कला साध्य झाली की जगणं सोपं होत जातं....

मनाची घालमेल व्यक्त व्हायला हवी.त्यासाठी संवाद गरजेचा आहे.आपलं ऐकून घेणारं ,आपल्याला समजून घेणारं कोणी तरी आहे हे जेव्हा जाणवतं तेव्हा ही घालमेल म्हणा किंवा अस्वस्थता म्हणा हळूहळू कमी व्हायला लागते.मन चलबिचल होण्याचा क्षण एकदा निघून गेला की मग पुढची वाटचाल सहजसाध्य होते....

आपण जीवन जगताना अपेक्षांच्या ओझ्याखाली जगत असतो.बरेचदा आपण इतरांकडून अपेक्षा करत असतो किंवा इतर आपल्या कडून आणि यात अधिकतर आपल्या आजूबाजूचेच असतात.त्यात मित्र, मैत्रिणी, नातेवाईक ,आप्त वर्गच निगडित असतो.म्हणजे ज्यांच्या सहवासात खरं तर अधिक मोकळं व्हावं असं वाटतं,त्यातून हवं ते मानसिक समाधान मिळालं नाही की आपला जीवन भरकटत जातं ...ही अवस्था अल्पकाळ असेल तर काही अवघड नाही पण हा कालावधी वाढला तर मात्र नैराश्य आपल्यावर आरूढ होतं आणि मग या दुष्ट चक्रात वारंवार अडकत जातो....

आपलं मन आपणच सावरायला हवं आणि त्यासाठी थोडे फार प्रयत्न केले गेले तर ते सावरता देखील येतं. खरं तर मनाला थोडं समजावलं तर ते आपल्या आटोक्यात राहतं...उगाच नको ते विचार करण्यापेक्षा आपण आपल्या आवडीचे काम करत राहणे हा त्यावर एक रामबाण उपाय आहे . व्यग्रताच नैराश्यातून बाहेर काढते.त्यातून ऊर्जा मिळते आणि आनंद देखील मिळतो .सकारात्मक विचार हीच यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे.ही किल्ली एकदा जर आपल्या हातात आली तर कोणतेही अवघड कुलूप सहज उघडता येतं...

जीवन म्हणजे संघर्ष हा आलाच .याच संघर्षातून खूप काही शिकता येतं आणि तावून सुलाखून निघता येतं.. सोनं हे मातीतूनच निघतं,कमळ हे चिखलातूनच उगवतं, एवढंच काय गुलाबाला देखील काटे असतातच ...मग हे दोन्हीही एकत्र असतात तेव्हा आपलंही जीवन अशा प्रकारे एकत्र राहूनच आनंदमय करायला हवं...

मनाची एक शक्ती असते तीच आपल्याला कळत नकळतपणे साद घालत असते त्याकडे थोडे वळून बघितले तरच जीवनाचा पुढचा मार्ग सुकर होतो.आज जे आपल्या जवळ आहे त्याचा विचार न करता आपण जे आपल्या जवळ नाही त्याचाच अधिक विचार करतो पण त्यामुळे जे हाती आहे त्याचा आनंद ,समाधान मात्र नाहीसे होते आणि जे नाही त्यामुळे मन व्यथित होते ....हेच कारण आहे आपल्या अस्वस्थ मनाचे अधिकाचा हव्यासच आपल्याला रसातळाला नेतो. आणि मग नैराश्य, त्यातून

निर्माण होणारे असंख्य प्रश्न फेर धरून नाचू लागतात.त्यासाठी ' चित्ती असू द्यावे समाधान ' ही संतांची उक्ती बरंच काही सांगून जाते.

सतत चांगले आचरण केल्याने मन शुद्ध होते असे निर्मळ व विशुद्ध मन म्हणजे परमेश्वराचे मंदिरच आहे.मन हे चंचल आहे,लोभी आहे.एखाद्या लहान बालकाप्रमाणे क्षणात इथे तर दुसऱ्या क्षणात दुसरीकडे विहरत असते. त्याला सतत एकाग्र करावे लागते नाही तर ते इतस्ततः भरकटत राहते.हे कठीण आहे पण अशक्य मात्र नाही .

मन एकाग्र करायचे तर डोळे,कान, व मेंदू म्हणजेच जे बघतो ,ऐकतो आणि विचार करतो ते सर्व मार्ग बंद करून एकाच ठिकाणी लक्ष केंद्रित करायला हवे.एखादी कला सादर करताना हे सर्व एकत्रीकरण केले जाते तेव्हाच यश, कीर्ती प्राप्त होते.त्यासाठी मन एकाग्र करणे आणि जे आवडते त्या ठिकाणी रममाण करणे आवश्यक आहे.मनाची उकल म्हंटले तर अवघड आहे पण प्रयत्नांती परमेश्वर म्हणतात तसं तेवढं कठीण नाही.पण या साठी सराव मात्र गरजेचा आहे.'मन मनास उमगत नाही ' हे मात्र अगदी खरं आहे.या मनाला प्रसन्न ठेवायला हवं तरच आपलं जीवन समृध्द ,समाधानी आणि आनंदी होईल.

मौनाची रूपं हजार

मंदार मोरोणे
mandarmoroney81@gmail.com

डिसेंबर महिन्याची संध्याकाळ... किंवा रात्र म्हणा.. मेळघाटातील गारेगार वातावरणात आम्ही तीन मित्र निघालोय गाडीतून. आजूबाजूच्या जंगलात मिट्ट काळोख भरलेला आणि रस्ता सुनसान. सहज म्हणून एका ठिकाणी गाडी थांबविली आणि तिघेही बाहेर आलो. वर मोकळं चांदण्यांनी भरलेलं आकाश आणि वातावरणातला सॉलिड गारवा. अशा वेळी गझलगायक मित्र आल्हाद काशीकरच्या अंगात जगजित सिंगांचं वारं घुसलं नसतं तरच नवल. तो 'जिंदगी धूप तुम घना साया' गुणगुणू लागला आणि गंधर्वाच्या घरचं जेवण जेवलेल्या विकास केमदेवांनी सुमोच्या बॉनेटवर ताल धरला. पुढचा अर्धा तास जगजितसिंहांनी आम्हाला भारून टाकलं होतं. आल्हादचा सूर थांबला तसा केमदेवांच्या ठेक्याने विराम घेतला आणि जाणवलं, आता अंतर्बाह्य व्यापून टाकण्याची जबाबदारी मेळघाटी शांततेने घेतली आहे. पुढची काही मिनिटं ते मौन अंगात पाझरत होतं, अचानक आपलं सगळं अस्तित्व मौनात विरघळत चाललंय अशी जाणीव दाटून राहिली आणि अंधारभारलं मौन नखशिखांत व्यापून उरलं.

मौन कायमच भावत आलंय मला. पाऊस जसा प्यारा, तितकंच आकर्षण मौनाचंही. आणि त्याच्या भिन्न भिन्न आविष्कारांचंही. अहिंसेच्या प्रॉडक्टला गांधीजींनी ब्रँड बनवला तसा मौनाला विनोबांनी ग्लॅमर मिळवून दिलं. पण, कुठलंच मूल्य एका व्यक्तीचा कॉपीराइट कसा असेल? मूल्य तर प्रत्येकाने स्वतंत्रपणे अनुभवायचं असतं. मूल्याची अंतर्भूत ताकदच जगणं व्यापून टाकण्याची असते आणि मौनाची तर निश्चितच असते. मौनाची अशी कवेत घेणारी रूपं आपल्यापैकी सगळ्यांनाच तर येऊन भिडत असतात जागोजागी, क्षणोक्षणी!

कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या इतिहास विभागात बसलो होतो. सोबतीला विज्ञान आणि पावसाचे कॉपीराइट ओनर मयुरेश प्रभुणे होतेच. विद्यापीठात शिरतानाच कमालीचा उकाडा जाणवत होता आणि अवघ्या अर्ध्या तासात काळोख दाटून आला. विद्यापीठाच्या लाल विटांच्या भिंतीच्या बॅकड्रॉपवर पाऊस काळोख दाटून आला. पाऊस सरसरा कोसळू लागला. तिथल्याच एका पॅसेजमध्ये उभा राहून पाऊस बघत होतो आणि समोरच्या बसक्या इमारतीवर मोर येऊन बसला. गपगुमान पिसारा गुंडाळून पाऊसधारांमध्ये भिजत उभा होता. पाच मिनिटं, दहा मिनिटं करीत तब्बल अर्धा तास पावसाचा नाद निनादत होता, तो मोर भिजत होता आणि मी अवाक्षरही न बोलता तो पूर्ण वेळ हा अनुपम सोहळा बघत शांत होत होतो.

कुरुक्षेत्रात असंख्य धार्मिक स्थळं आहेत. लोक दर्शनाला येत राहतात, आपण लोकांचं दर्शन घेत राहावं, असा काहीसा खेळ चालला होता. समोर काही अंतरावर उंचापुरा, एकच एक भगवी कफनी घातलेला माणूस उभा होता. का कुणास ठाऊक पण त्याच्यावर नजर खिळली होती.

आणि एकाएकी त्या माणसाने उभ्या उभ्याच भर गर्दीत आपला शरीरधर्म पार पाडला. उगाच आडपड्याने का बोला, त्याने तेथेच विष्ठा केली. अंगावर सरसरून काटा आला. जिताजागता माणूस समोर आहे, पण त्याचं अस्तित्व आहे काय अन् नाही काय? असून काही उपयोग नाही.. नसून कुणाला दुःख नाही. जिताजागता माणूस. मानवी अस्तित्व अर्थहीन असल्याची भावना एकाएकी भीतीसारखी अंगभर पसरली. अर्थहीनतेचा हा अनुभव यायलाही महाभारताच्या कुरुक्षेत्रातच यावे लागले, हा योगायोगच समजावा का? त्या एका अनुभवाने सुन्नच झालो. सुन्नपणा हे ही मौनाचेच रूप म्हणावे का? की सुन्नपणाची परिणीती मौन? जंगलातून जाताना, पर्वताच्या कड्यावरून दूरवर नजर फेकताना, कच्छच्या लांबच लांब रस्त्यावर बसकण मारली असताना, मौन भेटत राहिलं, मौन व्यापत राहिलं. मौन भारत राहिलं. पानिपतापासून काही अंतरावर 'काला आम' नावाची जागा आहे. पानिपतच्या तीनही युद्धांची आठवण म्हणून तेथे स्मारक उभे राहिले आहे. स्थानिकांसाठी तो जॉगर्स पार्क आहे. आपल्या मराठी मनासाठी तो तसा कसा असू शकेल? मयुरेश आणि मी ते सगळं बघून झाल्यावर एकही अक्षर न बोलता केवळ मावळतीचा सूर्य अंगावर घेत बसून राहिलो.

जंगलातून जाताना, पर्वताच्या कड्यावरून दूरवर नजर फेकताना, कच्छच्या लांबच लांब रस्त्यावर बसकण मारली असताना, मौन भेटत राहिलं, मौन व्यापत राहिलं. मौन भारत राहिलं. पानिपतापासून काही अंतरावर 'काला आम' नावाची जागा आहे. पानिपतच्या तीनही युद्धांची आठवण म्हणून तेथे स्मारक उभे राहिले आहे. स्थानिकांसाठी तो जॉगर्स पार्क आहे. आपल्या मराठी मनासाठी तो तसा कसा असू शकेल? मयुरेश आणि मी ते सगळं बघून झाल्यावर एकही अक्षर न बोलता केवळ मावळतीचा सूर्य अंगावर घेत बसून राहिलो.

लाख मराठ्यांचा गहिवर आला होता का दाटून, माहीत नाही. कुरुक्षेत्र आणि पानिपत ही नरसंहाराची दोन प्रतिकं आजूबाजूला असणे हा योगायोग अंगावर येत होता का, माहीत नाही. आमच्या अवतीभवती कोण होतं, माहीत नाही. त्या सायंकाळी मौन तेवढा मनात रेंगाळत बसलं होत, इतकंच काय ते आठवतं.

इतक्या ठिकाणी, इतक्या जागी फिरलो. दर वेळेला या मौनाचं आकर्षण वाढत गेलंय. अनेकविध रूपात ते भेटत आलंय, मौनाचं गारूड कायम राहिलंय. मध्यंतरी काही ओळी वाचल्या होत्या....

क्षितिज उभे डोळ्यात सांजते,

चंद्र उन्हाची नसांत शिंपण

गोकुळात वाळूत चालते

रात्ररात्र शब्दांची गुंफण!

राधा-कृष्णाच्या प्रेमाचे वर्णन करणारे हे शब्द सुंदरच आहेत. पण, मनात विचार आला.राधा-कृष्णाला शब्दांची गरजच भासली नसेल. एकरूप होते म्हणतात ना ते!

रात्र रात्र भर, वाळूत बसून, त्यांची शब्दांची नव्हे, तर मौनाचीच गुंफण चालत असावी. त्यांचे मौनच इतके बोलके असावे की शब्दांचा अनावश्यक भार नकोसाच वाटत असणार. कुणास ठाऊक? रेंगाळत असेल का तेथेही आजही असे मौन. जाऊन बघावे का एकदा कालिंदीच्या काठावर? मौनाचं ते दिव्य रूप बघायला.... आणि मग मौनात विरून जायला....!

आणि काय हवं?

भार्गवी बाबरेकर
bhbabrekar@gmail.com

संध्याकाळची वेळ...मंद वाहणारी वाऱ्याची झुळूक , त्या सोबत अलगद अंगावर स्पर्श करून जाणारे पावसाचे तुषार.. आणि हळूवार कानावर पडणारे कुमारजी आणि वाणी जयराम यांचे सुमधुर ' ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी....' असे बोल... कदाचित 'सुख ' यालाच म्हणता येईल...! हातात मस्त स्ट्राँग कॉफीचा कप आणि रिलॅक्स होऊन झुलण्यासाठी हक्काचा छानसा झोपाळा...! एखाद्याला आयुष्यात आणि काय हवं असतं?

दिवसभर आजूबाजूला होत असणारा गोंधळ , गाड्यांचे कर्णकर्कश आवाज आणि नको नको ते टेन्शनस् ; जीव अगदी नकोसा करतात! पण अश्याच वेळी अशी एखादी घटना घडते की जी सगळा थकवा नाहीसा करून सोडते... कधी - कधी शांत पणे डोळे मिटून घेतले आणि घडून गेलेल्या सुंदर क्षणांची एकदा उजळणी केली की क्षणार्धात आपण वेगळ्याच विश्वात रममाण होतो...बालपणीचे दिवस, शाळेतल्या आठवणी आणि बरंच काही...'कित्ती छान होतं ते सगळं...!' असं सहजच बोलून जातो आपण. पण बऱ्याचदा आहेत ते क्षणच जगायचे विसरतो...छोट्या - छोट्या गोष्टींमध्ये आनंदी असणं हे कित्ती छान असतं हे आपल्या पैकी कित्येकांना माहीतच नाहीये...!

बऱ्याचदा व्हॉट्सअँप वर ग्रुप बनवून तासंतास बोलत असतो आपण सगळे...पण कधी तरी एखादा जिवलग मित्र अगदी पाच मिनिटांसाठी येऊन अनपेक्षित भेट देऊन जातो तो आनंद काही औरच असतो..तेव्हा आणि काय हवं असतं..! खूप दिवस बाजारात शोध घेऊनही न मिळालेलं एखादं पुस्तक अचानक एखाद्या दुकानात नजरेस पडतं तेव्हा ' मन में लड्डू फुटणं' काय असतं हे जाणवतं! कविता लिहिताना एका ओळी वर येऊन डोकं अगदी थांबून जातं , तेव्हा एखादी निर्जीव वस्तू सुद्धा डोक्यात थांबलेल्या विचारांना चटकन् दिशा देऊन जाते... अश्या आणि या सारख्या अनेक गोष्टी आपलं आयुष्य अधिकच लज्जतदार करत असतात.

आपलं आयुष्य हे खूप अनपेक्षित असतं! स्थिरता ही कधीच कुणाला लाभलेली नाही. अटल बिहारी वाजपेयी यांनी लिहिलेल्या एका कवितेत तर आयुष्य काय आहे आणि कसं असतं हे त्यांनी अगदी चपखल मांडलं आहे.. अटल जी म्हणतात ,"आज यहा कल कहा कूच है, कौन जानता किधर सवेरा?"

खूप छोट्या आणि सहज असणाऱ्या प्रसंगांना आपल्याला उगाच कठीण करण्याची सवय लागली आहे! सोप्या पद्धतीने घडणारी गोष्ट आपण उगाच कठीण करतो..प्रत्येकाच्या आयुष्यात काही ना काही अडथळे येतात. आपण ते अडथळे येणं तर थांबवू शकत नाही पण त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन नक्कीच बदलू शकतो..! याचा प्रत्यय आपल्याला गेल्या दीड - दोन वर्षात आला आहेच! खूप कठीण असलेली परिस्थिती आपण अगदी सोप्या पद्धतीने हाताळली. पण ती हताळण्या आधी त्या परिस्थिती ला समजून घ्यायला थोडा वेळ आपल्याला द्यावा लागला. आयुष्य हे असंच असतं प्रसंग कठीण असला तरी त्याचा थोडा अभ्यास करून आणि सारासार विचार करून जर

आपण पावलं उचलली तर कठीण वेळही सोपी होऊन आपली साथ देते! गरज असते ती फक्त दृष्टीकोन बदलण्याची....!

मी घरात आले

रसग्रहण

सौ. मंजुषा शिनखेडे

पद्माताई गोळे यांच्या 'श्रावणमेघ' या कविता संग्रहातील 'मी घरात आले' ही स्त्री जीवनातील स्थित्यंतरे दर्शविणारी संवेदनशील कविता! स्त्री मनाचे अनेक पैलू या कवितेतून प्रकट झालेले दिसतात. पद्माताईंच्या कविता अत्यंत प्रगल्भ आहेत. इंदिरा संत, संजीवनी मराठे यांच्या समकालिन असणा-या पद्माताईंनी पूर्वीच्या काळात विवाहोत्तर स्त्रीच्या भूमिकेत होणारे बदल अचूकपणे टिपलेले आहेत. विवाह म्हणजे स्त्री जीवनातील महत्त्वपूर्ण वळण! विवाह स्त्रीच्या जीवनात मूलगामी बदल घडविणारा संस्कार आहे. पद्माताईंची उपरोक्त कविता आधुनिक काळातही स्त्रीच्या वैवाहिक जीवनानंतर होणा-या परिवर्तनाचे प्रतिनिधीत्व करणारी आहे. पद्माताई नववधूच्या संवेदना अत्यंत तरलतेने आपल्या शब्दातून व्यक्त करताना म्हणतात-

उंब-यावरचं माप सांडून

मी आत, घरात आले

दोन डोळ्यातली ज्योत झाले

माझे डोळे खाली वळले.

गृहप्रवेश होताच लगीनघरात तिचे झालेले स्वागत तिला आश्वस्त करुन गेले.

भुई म्हणाली, 'तू माझी!

काढ केर. स्वच्छ कर.'

मी म्हटलं 'खरंच गं आई'

केरसुणी झाले, रांगोळी झाले.

उंबरठ्यावरील माप ओलांडून स्त्री जेव्हा नवीन घरात येते तेव्हा तिला तिच्या हक्काचे घर प्राप्त होते. आणि घरातील सर्व सजीव निर्जिव वस्तूंशी तिचे भावनिक अनुबंध जुळतात.

चूल म्हणाली, 'तू माझी'

मी तिची लाकडं झाले

जातं म्हणालं 'तू माझी'

गहू झाले, ज्वारी झाले

उखळीतलं भात झाले,

ताकातली रवी होऊन

मथणीत नाचत राहिले.

गृहस्थाश्रमात प्रवेश करताच गृहिणी या नात्याने वावरतांना घरातील वस्तू सजीव होऊन तिच्याशी संवाद साधतात आणि ती आपुलकीच्या भावनेने त्याला प्रतिसादही देते त्यांच्याशी एकरुप होते.

भिंत होऊन, छप्पर होऊन

गुपितं राखले, छिद्र झाकली

पणती, वात, तेल होऊन

काने कोपरे उजळून टाकले.

घर म्हटले की अधिक उणे असणारच. घराचा गौरव सांभाळतांना ती भिंत होऊन, छप्पर होऊन, सा-यांभोवती मायेचे वात्सल्याचे संरक्षक तट उभारते. घरात दुःखाचा काळोख पसरताच पणती, तेल, वात होऊन स्वतः जळत, घराला प्रकाशमान करते.

सून झाले, बायको झाले,

आई झाले, सासू झाले,

माझी मला हरवून बसले.

उपरोक्त काव्यपंक्तीतून गृहिणीपदाच्या पाय-या चढता चढता स्वतः त्या त्या भूमिकेत स्त्री विरघळून जाते. प्रत्येक नात्याशी समरस होते. आता तिला स्वतःसाठी फक्त स्वतःसाठी काहीतरी करावेसे वाटते.

मग ती म्हणते,

आता सोंगं पूरे झाले,

सारी ओझी जड झाली.

उतरून ठेवून आता तरी

माझी मला शोधू दे

तुकडे तुकडे जमवू दे

विशाल काही पुजू दे

मोकळा श्वास घेऊ दे

श्वास दिला, त्याचा ध्यास

घेत घेत जाऊ दे!

सर्व सोंगे पूरी झाली, म्हणजे सर्व भूमिका पार पाडल्या. आता मात्र संसारात पूर्णपणे भान हरविलेल्या गृहिणीला आत्मभानाचा साक्षात्कार झाला आणि तिला स्वत्वाची जाणीव होऊन भगवंताच्या कृपेकरिता त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून आपल्या जन्माचे सार्थक व्हावे असा भाव ती व्यक्त करतांना आढळते.

नववधूपासून परिपक्व आणि परिपूर्ण गृहिणीपर्यंत स्त्रीचा वेध घेणारा हा प्रदीर्घ प्रवास पद्माताईंनी या कवितेत विविध प्रतिमांच्याद्वारा अगदी साध्या पण हृदयस्पर्शी शब्दांत वर्णन केला आहे. ही कविता म्हणजे शांत, संयत, अंतर्मुख दृष्टीने केलेले आत्मचिंतन होय. गृहिणीला परंपरेने दिलेल्या सर्व भूमिकांच्या आनंदाने स्वीकार करणारी अशा गृहिणींचे मनोगत पद्माताईंनी प्रभावीपणे प्रकट केलेले आहे. कवितेचा शेवट मात्र स्त्रीच्या आत्मचिंतनाचा प्रत्यय देणारा आहे. माझ्यातली मी मला गवसावी आणि ज्याने जीवन दिले त्याच्या ध्यासानेच जीवनाची पूर्तता व्हावी अशी आशा बाळगणारी गृहिणी पद्माताईंनी स्वसंवेदनेने, शब्दरूपाने रेखाटली आहे. पण त्यांचे हे काव्य वर्षानुवर्षे परंपरेने चालत आलेल्या समस्त गृहिणींचे मनोगतच आहे.

संवाद

सौ. तृष्णा आंबेकर
trushnak39@gmail.com

नाही कळलेकधी.......

ओळखु लागलो तू मला, मी तुला......

 या ओळी वाचताना डोळ्यासमोर प्रियकर - प्रेयसी, प्रेमी जोडपं येणं अगदीच साहजिक आहे,पण असं असलं तरी रक्ताच्या नसलेल्या इतर कुठल्याही नात्यांच्या बाबतीत हे होऊ शकतं.. आपण हळूहळू वाढत्या सहवासानंतर, बोलता बोलता एकमेकांच्या इतके जवळ येतो की आपल्यालाही कळत नाही.. फक्त त्या करता दोन व्यक्तींना जवळ येण्यासाठी 'संवादाचा पुल बांधत एकमेकांतलं अंतर कमी करावं लागतं..मग ,या सेतूची बांधणी भक्कम व्हावी म्हणून शब्द-भाव-रस रंगांनी सजवत आकर्षक संवाद सेतूसांधावा लागतो...

 खरंतर पहिल्याच भेटीत शब्दांचे मनोरे रचत एकमेकांच्या मनात घर करु पाहाणं सगळ्यांना साधत नाही...

काही लोकांना एकदा निर्माण केलेलं स्थान कायम टिकवून ठेवण्यासाठी पुन्हा किमान शब्दाचा आधारही पुरेसा असतो ,पण काही लोकांची अवस्था ही "बोलाचाच भात आणण बोलाचीच कढी" अशी असते..

काही लोकांचे शब्द हे नेहमीच इतरांसाठी किमयागार ठरतात..

कुणाचं बोलणं आश्वासक, कुणाचं बोलणं धीर देणारं असतं..

व्यक्ती तितक्या प्रकृती त्याप्रमाणे व्यक्तिपरत्वे संवाद शैली सुध्दा नक्कीच वेगळ्या असू शकतात..पण तरीही संवाद म्हणजे नेमकं काय तर, संवाद साधणाऱ्या दोन्ही व्यक्तींनी आपआपली बाजू मांडून समोरच्याचीही बाजू ऐकून घेत त्यावर मोकळेपणाने चर्चा, विचार विनिमय करून दोघांनाही सहज निर्णयाप्रत पोहोचता यावं..

खरंतर,आत्मसंवाद सुध्दा स्वत:बरोबर, स्वत:च्याच मनाचा विचारही विचारात घेतल्याखेरीज आपण आपला निर्णय पूर्णत्वास नेऊ शकत नाही..

संवाद साधताना शब्दांची निवड, शब्दांची योग्य मांडणी आणिशब्दफेक यावर योग्य विचार केला गेला तर तो सुसंवाद ठरु शकतो.. आणि ज्यावेळी दोन व्यक्ती असे अनेक सुसंवादांचे पुल पार करून जातात त्यावेळी संवाद न साधताही केवळ डोळ्यातील भाव आणि देहबोली यावरून एकमेकांच्या मनातलं नकळतच ओळखू लागतात.. तेव्हा

शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलिकडले...

संगीत आणि संगीतरंगभूमी

संगीत शाकुंतल

एकशे चाळीस वर्षांची सुरेल परंपरा!

सौ. अर्चना साने
archanasane72@gmail.com

पंचतुंड नररुंडमाल धर, पार्वतीश आधी नमितो।
विघ्नवर्ग नग भग्न कराया, विघ्नेश्वर गणपती मग तो॥

संगीत, नृत्य, नाट्य यांच्या अपूर्व संगमातून निर्माण झालेली संस्कृती म्हणजे रंगभूमी! याच रंगभूमीचं तेजस्वी स्वरूप म्हणजे आपली मराठी संगीत नाट्य परंपरा. रंगमंदिरातील नि:शब्ध शांतता, भारावून टाकणारं वातावरण, मंद होत जाणारे दिवे, मखमली पडद्या आडून येणारा धुपाचा गंध आणि ऑर्गनच्या साथीने येणारे नांदीचे सूर, सगळंच भव्यदिव्य!

३१ ऑक्टोबर १८८० या दिवशी बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी संगीत. शाकुंतल या नाटकाद्वारे ही देदीप्यमान परंपरा सुरू केली.

तसं पाहिलं तर ५ नोव्हेंबर १८४३ या दिवशी 'सीता स्वयंवर' या संगीत नाटकाद्वारे विष्णूदास भावे यांनी मराठी रंगभूमीची जणू प्राणप्रतिष्ठाच केली. परंतु भावे प्रणित संगीत नाटके आख्यानाच्या स्वरूपात सादर होत असत. संगीताची पूर्ण बाजू एकटा सूत्रधारच सांभाळत असे. हा सूत्रधार पूर्णवेळ रंगमंचावरच असे आणि वेगवेगळ्या प्रसंगातली गाणी तोच सादर करत असे. रंगमंचावरची पात्रं त्या गाण्याला अनुसरून फक्त हावभाव करत असत. अण्णासाहेबांनी या सूत्रधारी पध्दतीत आमूलाग्र बदल करत आखीव रेखीव गद्यपद्यात्मक संगीत नाटकांची रचना केली आणि 'संगीत शाकुंतल'च्या रुपात पहिलं परीपूर्ण संगीत नाटक रचलं.

पार्शी गद्यपद्यात्मक 'इंद्रसभा' हे नाटक पाहून अण्णासाहेबांना ही कल्पना स्फुरली असे म्हटले जाते. पण त्याच्या ही आधी साधारण १८७५ च्या सुमारास अण्णासाहेब पणजी इथे सरकारी नोकरीत असताना डोंगरी भागातल्या कृष्णाभट बांदकर यांनी रामनवमी उत्सवात सादर केलेल्या संगीत नाटकाने ते जास्त प्रभावित झाले. शाकुंतलची संहिता लिहिण्यापूर्वी त्यांनी नाटयव्यवसायाचा डोळसपणे अभ्यास केला. जवळपास १९-२० आख्याने पदरचनेसहीत विविध नाटक मंडळींना लिहून दिली. कोणाला फक्त कथानक तर कोणाला पदरचना करून देताना त्यांनी या क्षेत्राचा सर्वांगीण अभ्यास केला, व्यवसायाचं गणित पक्कं करून मगच रंगभूमीचा शास्त्रशुद्ध पाया रचला. या सर्व पार्श्वभूमीवर अण्णासाहेबांनी महाकवी कालिदास यांच्या 'अभिज्ञान शाकुंतलम्' चं मराठीत भाषांतर करून 'सं. शाकुंतल' हे पहिलं संगीत नाटक महाराष्ट्राच्या रंगभूमीवर आणलं !

३१ ऑक्टोबर १८८० या दिवशी धनत्रयोदशीच्या मुहुर्तावर या नाटकाच्या पहिल्या चार अंकांचं सादरीकरण पुण्याच्या आनंदोद्भव थिएटरमधे (भांग्या मारुतीसमोर) झालं. या पहिल्या प्रयोगात मोरोबा वाघोलीकर दुष्यंत, बाळकोबा नाटेकर कण्वऋषी तर शंकरराव मुजुमदार शकुंतलेच्या भूमिकेत होते.

शाकुंतल नाटकाच्या अनेक वैशिष्ट्यांपकी एक महत्वाचं वैशिष्ट्य म्हणजे सूत्रधार नटीचा प्रवेश झाला की सूत्रधार रंगपटात जाई आणि पुन: रंगमंचावर येत नसे. अशा प्रकारे अण्णासाहेबांनी सूत्रधाराकडून संगीताचा मक्ता काढून घेतला आणि सर्व पात्रे आपापली पदं गाऊ लागली. असं असलं तरी आणि शाकुंतल मध्ये तब्बल दोनशे पदं असली तरी त्यातली शकुंतला मात्र सुरुवातीला (जवळपास दोन वर्षे) गात नव्हती. कारण शकुंतलेची भूमिका करणारे शंकरराव मुजुमदार गायक नव्हते. पण मोहक रुप आणि उत्कृष्ट अभिनय या गुणांमुळे त्यांनी सादर केलेली शकुंतला त्या काळी प्रेक्षाकांना आवडली. मोरोबांच्या सुरेल गायनाला शंकरराव अभिनयातून जो उत्तम प्रतिसाद देत त्यामुळे शकुंतला गात नाही याबद्दल रसिकांची तक्रार नसे. पुढे हे चार अंकी नाटक सात अंकी करुन 'साद्यसंगीत शाकुंतल' या स्वरुपात रंगमंचावर आलं. ते इतकं मोठं झालं की कधी कधी दोन भागांमध्ये दोन रात्रीतून सादर होत आणि प्रेक्षकही तेवढयाच उत्साहाने दोन्ही रात्री प्रयोगाला गर्दी करीत.

पुढे दोन वर्षांनी भाऊराव कोल्हटकर या अलौकीक गायक नटाचं किर्लोस्कर नाटक मंडळीत आगमन झालं आणि शकुंतला गाती झाली! पूर्ण रचलेल्या नाटकात नव्याने पदं घालणे हे खरं तर खूप अवघड काम, पण अण्णासाहेबांनी आपले पट्टशिष्य गोविंद बल्लळ देवल

यांच्यावर शकुंतलेसाठीची पदं लिहिण्याची जबाबदारी सोपवली आणि देवलांनी सुद्धा अर्थपूर्ण, नाजूक भाव दर्शवणारी पदे, ती अण्णासाहेबांचीच वाटावीत इतक्या कुशलतेने लिहिली. देवलांच्या रुपात अण्णासाहेबांनी जणुकाही आपला वारसदारच नेमला. कथाभाग पुढे सरकण्यापुरतीच पदरचना आणि गायन व्हावं आणि ते रसिकांना मंत्रमुग्ध करणारं असावं याबाबत त्यांनी दक्षता घेतली. पदरचना करताना त्यांनी साक्या-दिंड्या वापरल्या पण नाटकाला कीर्तनाचे स्वरुप येऊन दिले नाही, लावणी ढंग घेतला पण तमाशाचे रुप आणले नाही. रागदारी संगीतामुळे त्याचा जलसा केला नाही किंवा पारशी नाटकातील संगीताचा भडकपणा आणला नाही. उच्च अभिरुचीचं दर्शन त्यांनी शाकुंतल द्वारे घडवले.

एक प्रसंग अभिमानाने सांगावा असाच आहे. शाकुंतलच्या रंगीत तालमीला उपस्थित असलेले ब्रिटीश अधिकारी जनरल हेवेट ते नाटक पाहून अत्यंत सुखावले आणि त्यांनी अण्णासाहेबांकडे पत्राद्वारे आपला आनंद व्यक्त केला. एवढेच नव्हे तर पुन: एखादी रंगीत तालीम असेल तर मला यायला नक्की आवडेल असंही ते म्हणाले. थोडक्यात, युरोपिअन रसिकांना सुद्धा शाकुंतलने भारावून टाकलं. अण्णासाहेब किर्लोस्करांनी आपल्या उच्च प्रतिभेने शाकुंतलला संगीत नाटकांच्या मिहिरपीत बसवून रंगमंचीय अंबारीतून मिरवलं, त्याला आता १४० वर्षांहून अधिक वर्ष झाली.

पुढे अण्णासाहेबांनी सं. सौभद्र या नाटकाद्वारे आणखी एक अजरामर कलाकृती सादर केली. हे नाटक म्हणजे त्यांचा स्वतंत्र कलाविष्कार होता आणि त्याचं सौंदर्य कालातीत आहे. त्याच प्रमाणे अतिशय वेगळ्या शैलीतलं सं. रामराज्य वियोग (अपूर्ण) या नाटकाचे तीनअंक लिहून सादर केले. या तिन्ही नाटकांनी संगीत रंगभूमीवर विलक्षण क्रांती घडवली.

अण्णासाहेब म्हणत, "आमचे मराठी नाटक म्हणजे केशराचे शेत आणि आमची मराठी रंगभूमी म्हणजे केशराचा मळा". या केशराचा गंध शाकुंतल पासून सुरु झाला त्याचा दरवळ आजही मराठी रसिकांना मोहवतो आहे.

भावफुलांची ओंजळ

सौ. अपूर्वा भालेराव
mrunmayeekatarni@gmail.com

सरत्या अश्विन महिन्याच्या गोड गुलाबी थंडीत, जरासा वेळ स्वतःसाठी काढत रात्री गरम कॉफी चा घोट घेत Youtube बघत बसले... 'me time' घालवत असताना एक recommendation आलं आणि डोळ्यांसमोर उभं ठाकलं ते माझं बालपण.

माझ्या लहानपणी सर्वात आधी कलर टीव्ही हा आमच्या वेटाळात आमच्याच घरात आला आणि त्यात तेव्हा ते 'केबल' सोबतीला असणं म्हणजे 'सोने पे सुहागाच'.

अनेक वाहिन्या मनपसंत झाल्या होत्या. त्यातीलच एक पूर्वाश्रमीचे 'अल्फा मराठी' जे आज झी मराठी झालं आहे, त्यावरील मालिका या घरच्यांच्या समवेत बघणं म्हणजे आनंदच...!

त्यात मराठी मालिकांची शीर्षक गीतं म्हणजे जणू कानांना पर्वणीच!

मन मानसी मानसी...

जडतो तो जीव लागते ती आस या सुंदर ओळींनी सुरू होणारं आभाळमाया...

एक वादळाची वाट, वादळवाट...

अवघाची हा संसार...

अधुरी एक कहाणी...

गुंतता हृदय हे...

ह्या मालिकांची शीर्षक गीतं ऐकणं एक परमोच्च आनंद असायचा माझ्यासाठी.

हातातलं काम टाकून निव्वळ अल्फा मराठी वाहिनी वरील ह्या मालिकांची शीर्षक गीतं ऐकण्यासाठी मी धडपडत टीव्ही समोर हजर व्हायचे.

परमेश्वराची आराधना करण्याच्या अनेक मार्गांपैकी, स्वरांची पूजा करण्याच्या मार्गावर, अत्यंत सुरेल गायकी व ती प्रत्येक वेळी तितक्याच ताकदीने सिद्ध करत, एका गायिकेच्या गोड आवाजाच्या प्रेमात मी कधी आकंठ बुडाले, हे कळलेच नाही.

"देवकी पंडीत...!"

आपल्या सुमधूर आवाजानं नव्वदाव्या शतकात घराघरात पोचलेलं एक विदुषी व्यक्तिमत्व! या विदुषीचा वयाच्या नवव्या वर्षापासुन गायनाचा प्रवास सुरू झाला. आजोळहून संगीताचा वारसा मिळाला आणि पं. वसंतराव कुळकर्णी, किशोरीताई आमोणकर, पं. अभिषेकी आणि हळदणकर यांसारख्या दिग्गजांकडून या विदुषीला संगीतकला अवगत करण्याची संधी प्राप्त झाली.

अनेक मराठी हिंदी चित्रपट, मालिका, दूरदर्शन यासोबत अल्बम्स या माध्यमातून या विदुषीचा गायनाचा प्रवास आजतागायत सुरू आहे.

मोठमोठ्या संगीतकारांकडे म्हणजे अगदी झाकीर हुसेन, नौशाद, श्रीनिवास खळे, पं. हृदयनाथ मंगेशकर आणि अशोक पत्की या आणि यांच्यासारख्या बऱ्याच संगीतकारांकडे

गायनकला सादर करत, त्यांनी अनेकांना मंत्रमुग्ध केलंय, यात कुठलीच शंका नाही. मालिकांच्या शीर्षक गीतांमुळे ही विदुषी अनेकांच्या मनात पोहोचली आणि याच गोड आवाजाचा प्रभाव माझ्यावर पडला.

या विदुषीचा जन्म संगीतमय वातावरणात झाला आणि पूर्ण लहानपण अतिशय समृद्ध असं संगीताच्या कुशीत गेलं. संगीताचे संस्कार, आणि एकंदर कलेकडे बघण्याचा दृष्टीकोन हा तेजस्वी रित्या या विदुषीच्या अंगी रोवल्या गेला. अशा या समृद्ध गायिकेच्या प्रेमात पडून माझंही बालपण कृतकृत्य झालं. गाण्याविषयीची भावना, त्यावरील श्रद्धा इथूनच माझ्या मनात रुजू झाली आणि मी सुद्धा गायनाकडे वळले.

गाणं म्हणजे काय? स्वर साधना म्हणजे काय? ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मला शब्दातून न मिळता या विदुषीच्या गायन कृतीमुळे उलगडत गेली आणि माझ्यासाठी संगीत साधना म्हणजे देवकी पंडीत!

मला समजायला लागल्यानंतर गाण्याविषयीची धडपड, त्यावरील श्रद्धा, वेडेपण, साधना या सगळ्या गोष्टी अगदी हातात हात घालून माझ्यासोबत लयबद्ध गतीत व्हायला लागल्या. आजही माझी सगळ्यात 'जास्त आवडती गायिका' हा प्रश्न समोर ठाकल्यानंतर मी 'देवकी पंडीत' हे एकच नाव घेते.

लाईव्ह कॉन्सर्ट्स, नवीन अल्बम, सीडीज, सभा ह्या नागपुरात जिथे कुठे असतील तिथे तिथे मी थेट पहिल्या सीट वर वेळेच्या आधीच जाऊन हजर होत असे. नाही गेली तर नवलच! असाच एक प्रसंग आठवला आणि अंगावर रोमांच उभा राहिला.

एकदा महालातील कप्तान यांच्या वाड्यात गणेश चतुर्थी निमित्त देवकी पंडीत यांची गायन सभा असल्याचं कळलं आणि या विदुषीला अगदी जवळून बघण्याचा/ऐकण्याचा 'याची देही याची डोळा' हा योग जुळून आला. आपल्या अत्यंत आवडत्या व्यक्तीला भेटण्याचा आनंद कसा असतो, हे खरच शब्दात मांडण्याचा प्रयत्न सुद्धा करता येत नाहिये.

कार्यक्रम सात वाजता सुरू होणार होता आणि मी नेहमीप्रमाणे वेळेच्या आधीच जाऊन बसले.सभा सुरू झाली आणि ती आनंद मूर्ती मी कायम माझ्या डोळ्यात साठवून ठेवली. गणेश स्तुती गायल्या नंतर जी काही रंगत त्या सभेला चढली, ती अवर्णनीय!

सभा संपल्यावर प्रत्यक्ष भेटून जी अनुभूती मला आली, ती अनुभूती आजही मनाच्या कुपीत घट्ट आहे. सभा संपली असं जाहीर करण्यात आल्यावर मी भानावर येऊन या विदुषीला नमस्कार करायला पुढे सरसावले. देवाजवळ मागणे मागताना खूप वेळ हात जोडून असतात आपले कारण इच्छाच मागता मागता संपत नाही आणि हाच प्रकार त्या विदुषीच्या पायी नतमस्तक झाले असताना मी अनुभवला. कितीतरी वेळ मी चरणस्पर्श करूनच वाकले होते आणि डोळ्यात होत्या सुखद अश्रूधारा.

भानावर येऊन त्यांचं खूप कौतुक करत त्यांची विचारपूस केली आणि गोड संवाद सुरू असताना त्यांनी माझ्या पाठीवर हात ठेऊन जे आशिर्वाद रुपी शब्द माझ्या ओंजळीत टाकले,

त्या ओंजळीचा गंध आजही अबाधित आहे.

आयुष्यात इतकंच मागणं की परमेश्वरानं या विदुषीला उदंड आयुष्य देवो!!!

सुरसांगिनी

सौ. मृण्मयी सारंग
mrunmayeekatarni@gmail.com



Hi, hello, नमस्कार कसे आहात सगळे. मी कोण? मी हार्मोनियम . कोणी मला पेटी म्हणत, कोणी संवादिनी, कोणी हार्मोनियम, कोणी बाजा . ज्याला माझं जे नाव आवडत तो मला त्या नावाने हाक मारतो. आज मी तुमच्याशी थोडं बोलणार आहे. माझ्या बद्दल तुम्हाला थोडं सांगणार आहे. शास्त्रीय, उप शास्त्रीय, गजल, कव्वाली, भजन, कीर्तन , लोकसंगीत असो वा अगदी आताच बॉलिवूड संगीत असो असा एकही सांगितलं प्रकार नाही जिथे मी नाही. तर चला माझ्या बद्दल अजून थोडं जाणून घेऊ या.

तर सुरुवात करूया माझ्या जन्मापासून. अनेकांना माहिती नसेल म्हणून सांगते ह ! मी मूळ भारतीय नाही. युरोपच्या पॅरिस मध्ये ९ ऑगस्ट १८४० रोजी अलेक्झांडर, प्रान्सिस देब्रे याने मला जन्म दिला. चर्च मध्ये प्रार्थनेच्या वेळी रोज वाजवल्या जाणाऱ्या ऑर्गन ह्या वाद्या मध्ये थोडे फार बदल करून रीड ऑर्गन / पायपेटीचा (माझा) शोध लागला. ब्रिटिशांच्या राजवटीत माझा भारतात प्रवेश झाला आणि अल्पावधीतच मी इथल्या संगीताचा अविभाज्य घटक बनले.

किर्लोस्करांच्या 'शाकुंतल' (१८८०) ह्या नाटकाने भारतात संगीतनाटकांची मुहूर्तमेढ रोवली . ' संगीत सौभद्र' या नाटकातून माझे स्वर नाट्यसंगीत क्षेत्रात घुमू लागले. त्याकाळात एखाद वाद्य विकत घेणे इतकं सोपं नव्हत बरं का ! अस असतांनाही पुण्यातील उद्योजक त्रंबकराव नाशिककर ह्यांनी मला विकत घेतलं. दादासाहेब मोडक ह्यांनी मला संगीत नाटकात वाजवण्यास सुरुवात केली. कालांतराने हरिभाऊ विश्वनाथ कंपनी , युसूफ मिरजकर्स म्युजिकल्स अशा देशी उत्पादकांनी कालानुरूप बदल करून माझा प्रचार व प्रसार सुरू केला आणि सर्वसामान्यांना मी सहज उपलब्ध होईल अशी सोय करून दिली. डॉ. विद्याधर ओक ह्यांनी श्रीराम हळदणकर ह्यांच्या मदतीने संशोधन व अभ्यासपूर्ण असे बदल करत 22 श्रुतीस्थानं शोधून काढून, त्या स्वरांवर अलगद स्थिरावणारी "मी", निर्माण केली.

गणपती जयाजीराव शिंदे (१८७२-१९२०) ह्यांनी बंदे अली खां, बहादूर हुसेन , हुसेन खां ह्यांसारख्या उस्ताद मंडळींकडे अभिजात संगीताचे शिक्षण घेत स्वतः हार्मोनियम शिकले आणि रागसंगीताचा आविष्कार करणारे भारतातील पहिले हार्मोनियम वादक म्हणून मान्यता मिळवली. पण १९४०-१९७१ हा काळ मात्र माझ्यासाठी खूप कठीण गेला. कारण ह्या काळात ऑल इंडिया रेडिओवर माझ्यावर बंदी होती. अनेक तज्ञ मंडळींच्या मते माझ्यात अनेक त्रुटी होत्या.

१. घसिट न निघणे (एक स्वर लांबवत दुसऱ्या स्वरावर जाणे).

२. त्या काळी equitempered हार्मोनियम प्रचलित असल्यामुळे शास्त्रीय संगीतात लागणारे कमी अधिक उंचीचे स्वर (अति कोमल/ किंवा अति तीव्र) स्वर काढता न येणे.

३. मिंड काढता न येणे इत्यादी एक ना अनेक कारणांमुळे बेसूर वाद्य म्हणत माझ्यावर बंदी आणल्या गेली.

तंतू वाद्य जसे सारंगी, ,व्हायोलीन ह्या वाद्यातून हवे तसे स्वर काढता येतात म्हणूनच मग मला दूर सारून ह्या तंतू वाद्यांना गायकांनी जवळ केले. रामभाऊ चिमोटे(कर्नाटक), पु. ल. देशपांडे(पुणे) गोविंदराव टेम्भे , मनोहरराव चिमोटे (नागपुर) ह्यांनी खूप पाठपुरावा करत अखेर माझ्यावरची बंदी उठवली. मला परत एकदा भारतीय संगीतात स्थान मिळवून दिलं. काळानुरूप माझ्यात केलेले बदल, माझ्यात असणाऱ्या तथाकथित त्रुटी दूर करत आज मला अनेक रूपाने महान गायक , वादकांनी घरोघरी पोहोचवलं. " चल तबला पेटी घे रे" हे वाक्य आता अगदी सहज उच्चारले जाते.

चर्च मधील प्रार्थनेत वाजवल्या जाण्याच्या ऑर्गन पासून रीड ऑर्गन (पायपेटी) ,पायपेटी ते हातपेटी आणि कुठल्याही स्वरात गाता/वाजवता यावं यासाठी स्केल चेंजर पर्यंत झालेला माझ्यातला बदल मी आनंदाने स्वीकारला. काळ्या नि पांढऱ्या पट्ट्यांची सुरेल जादू ओळखून अनेक दिग्गज कलाकारांनी मला त्यांच्या मैफिलीत मान दिला आणि मला घरोघरी पोहचवत आपलेसे केले. माझा हा सुरेल प्रवास असाच सुरू राहिल. ' जीते रहो गाते रहो ' अस म्हणत मी प्रत्येकच कलाकाराला कायम साथ देत राहील.

भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी ...

निर्मिती देवलसी
ndeolasi01@gmail.com

कोणत्याही समाज व संस्कृतीत त्या त्या दशकाचे एक गाणे असते; एक चित्रपट व एक नाटकही असते. ती गाणी व ते नाटक-सिनेमे पुढे काळाच्या ओघात मागे पडतात, काही अदृश्यही होतात; पण काळाच्या प्रवाहाविरुद्ध पोहत ज्या कलाकृती जिवंत राहतात, त्याच श्रेष्ठ ठरतात.

कोणत्याही समाज व संस्कृतीत त्या त्या दशकाचे एक गाणे असते; एक चित्रपट व एक नाटकही असते. ती गाणी व ते नाटक-सिनेमे पुढे काळाच्या ओघात मागे पडतात, काही अदृश्यही होतात; पण काळाच्या प्रवाहाविरुद्ध पोहत ज्या कलाकृती जिवंत राहतात, त्याच श्रेष्ठ ठरतात. १९६०च्या दशकात कविवर्य ग. दि. माडगूळकर व सुधीर फडके यांनी शब्दबद्ध व सूरबद्ध केलेली भावगीते मराठी मनात रुजू व ओठांवर घोळू लागली होती, त्याच काळात यशवंत देव, मंगेश पाडगावकर व अरुण दाते या त्रिकुटानेही मराठी भावविश्वात आपले साम्राज्य स्थापन करायला सुरुवात केली. या भावमंदिरावर कळस चढवला याच त्रिकुटाने साकारलेल्या 'भातुकलीच्या खेळामधले राजा आणिक राणी..!' या विराणीने. ही अजरामर कलाकृती निर्माण झाली त्या घटनेला आज तब्बल ५० वर्षे पूर्ण होत आहेत. मराठी मनावरचे या 'भातुकली'चे गारुड काही अद्याप उतरलेले नाही. त्यानंतर या पठडीतील अनेक गीते आली व गेली. दोन पिढ्या मोठ्या झाल्या. हिंदी व आता इंग्रजी गाण्यांचीही गोडी मराठी माणसांना लागली; पण पाडगावकर, देव व दाते यांनी मांडलेला हा विलक्षण भातुकलीचा खेळ मात्र तसाच चालू आहे व आणखी काही दशके तरी ही भातुकली कुणी मोडणार नाही वा सोडणारही नाही.

जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वीचा काळ. सुप्रसिद्ध कवी आणि दर्जेदार कविता करणारे मंगेश पाडगावकर यांनी एक गीत लिहिलं आणि सुप्रसिद्ध संगीतकार यशवंत देव यांच्याकडे सुपूर्द केलं. पाडगावकर म्हणाले, “या गीताला चाल बांधा. हे गीत अरुण दाते गाणार आहे.” काही दिवसांनी यशवंत देव यांनी मंगेश पाडगावकर आणि अरुण दाते यांना “चाल तयार आहे, ऐकायला या” असा निरोप दिला. मंगेश पाडगावकर आणि अरुण दाते यशवंत देव यांच्या घरी पोहोचले. देवांनी या गीताला दिलेली चाल ऐकल्यावर पाडगावकर आणि दाते यांच्या चेहऱ्यावर वेगळेच भाव उमटले. पाडगावकर त्यांना म्हणाले की, “तुमचं संगीत क्षेत्रातलं नाव खूप आहे, पण तरीही मला असं वाटतं की, हे गाणं म्हणजे एक विराणी आहे. थोडंसं दुःखद गीत आहे. मग या गाण्याला अशा प्रकारचा रिदम कशाला?” अरुण दाते यांचंही हेच म्हणणं पडलं. ते म्हणाले, “देवसाहेब, आपण कमाल गाणे करता, पण ही चाल ऐकल्यावर पाढे म्हटल्यासारखे वाटत आहे असं मला वाटतं.”

यशवंत देव हसतच त्यांना म्हणाले, “माझा अनुभव आणि वय तुम्हा दोघांपेक्षा जास्त आहे. माझी खात्री आहे, हे गाणं भावसंगीतातलं एक अप्रतिम गाणं ठरेल. आपल्या तिघांच्याही आयुष्यातला एक मैलाचा दगड ठरेल आणि खरोखरच एचएमव्ही कंपनीसाठी हे गाणं रेकॉर्ड झालं आणि या गाण्याने इतिहास रचला.

गेली पन्नास वर्षे कोणत्याही दर्जेदार गाण्यांच्या कार्यक्रमात या गाण्याची फर्माईश होते. असं हे गाणं आहे, 'भातुकलीच्या खेळामधले राजा आणिक राणी, अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी'. आज या गाण्याला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत तरी या गाण्याची अवीट गोडी कमी झालेली नाही. अरुण दाते यांच्या आयुष्यात हे भावगीत आयुष्याची शिदोरी बनून गेलं. दात्यांनी २७५० शोज् केले. प्रत्येक कार्यक्रमात या गाण्याची फर्माईश आणि वन्स मोअर मिळतो.

अरुण दाते आपल्या आठवणीत सांगत असत की, हे गाणं सुपरहिट झाल्यावर आम्हाला कार्यक्रमांना बोलावलं जायचं. अशाच एका रसिकाने त्याच्या मुलाच्या लग्नाला बोलावलं असताना आम्ही दरवाजातून प्रवेश करत असताना पाहून बँडवाल्यांनी 'भातुकलीच्या खेळामधले राजा आणिक राणी' हे गाणं बँडवर वाजवायला सुरुवात केली. आम्ही यजमानांना म्हणालो की, "हे गाणं का वाजवलं आज? या दोघांचं आजच लग्न होत आहे." ते म्हणाले, तुम्हाला त्यांनी ओळखलं म्हणून तुमचं गाजलेलं गाणं वाजवून त्यांनी तुमचं स्वागत केलं.

मराठी भाव-विश्वातला मखमली आवाजाचा गायक म्हणजे अरुण दाते . संगीताचा 'शुक्रतारा' लोक त्यांना म्हणायची . या काळातच ना प्रेमसुद्धा आढपशीर आणि एकदम संयद controlled असायचं . म्हणजे प्रत्येक काळाला अनुरूप असे कवी,गायक आणि कलाकार मिळत असतात . अशा काळासाठी आपल्याला अरुण दाते मिळाले असे म्हणता येईल. त्यांची गायकी थेट मनात डोकवायची . रामू भैय्या दाते यांचे सुपुत्र अरुण दाते यांनी मराठी भावसंगीतात स्वतःचं असं स्थान प्रस्थापित केलं . म्हणजे star kid असून सुद्धा स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण केली . मराठी रसिकांमध्ये भावगीताला कोणी ग्लॅमर मिळवून दिलं असेल तर ते म्हणजे अर्थात अरुण दाते यांनी.भावसंगीतामध्ये शब्दांना जास्त महत्त्व असतं.

शब्द दर्जेदार असतील तर ते गाणं गायलाही मजा येते असं त्यांचं मत होतं. ते कायमच शब्दांना महत्त्व देत असत. कविता आवडली तरच ते गाणं गायला पसंती देत असत. चित्रपट गीत गाणारे गायक खूप लोकप्रिय होतात, परंतु बिगर चित्रपट गीत गाऊन प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचलेल्या अरुण दाते यांनी संगीत क्षेत्रात भावगीताचा मार्ग समृद्ध केला आहे. याच गाण्याची आठवण म्हणजे 1978 साली नानासाहेब गोरे इंग्लंडचे कमिशनर असताना त्यांनी अरुण दाते यांचा कार्यक्रम लंडन येथे आयोजित केला होता. या कार्यक्रमाला बीबीसी वृत्तसंस्थेचे काही लोक आले होते. त्यांनाही गाणी आवडली आणि त्यांनी 'भातुकलीच्या खेळामधले...' आणि 'या जन्मावर...' ही दोन गाणी रेकॉर्ड करून वृत्तवाहिनीवर त्याचं वृत्त केलं होतं. त्यांनी त्यावर त्यांना विचारलं की, "आपल्याला मराठी समजत नसूनही आपल्याला ही गाणी कशी आवडली?" त्यावेळी ते म्हणाले होते की, फक्त दोन वादक आणि एक

गायक गातोय...सलग अडीच तास आणि लोकही मंत्रमुग्ध ऐकून त्याचा आस्वाद घेत आहेत असं दृश्य आम्ही कधीच पाहिलं नाही. त्यामुळे आम्ही या गाण्यावर स्टोरी केली. मराठी नसूनही आवडून जाणारं हे गाणं आज पन्नास वर्षांचं झालं आहे.

काही स्वर... काही सूर मनाच्या गाभाऱ्यात ठाशीव उमटलेले असतात. त्यांच्या पाऊलखुणा... कधीही न पुसणाऱ्या न विसरणाऱ्या असतात . अरुण दाते मंगेश पाडगावकर यशवंत देव या त्रयींचा परीसस्पर्श झालेली 'भातुकलीच्या खेळामधली राजा आणि राणी' आज 50 वर्षांची झाली आणि म्हणूनच त्यांच्या या कारकीर्दीसाठी त्यांना मनाचा मुजरा ....!!!

आध्यात्मिक

अष्टलक्ष्मी स्तोत्रम्

सर्वेश फडणवीस

fadnavis.sarvesh@gmail.com

दिवाळी अगदीं जवळ आली आहे. दिवाळीची आवरा-सावर, फराळाची तयारी,सगळं कसं रीतसर लागतं. त्यात पाच दिवस अगदी आनंद आणि उत्साहाने भारलेले असतात. लक्ष्मीपूजन हा त्यातल्या त्यात मुख्य दिवस असं म्हणतात. लक्ष्मीच्या विविध रूपातून भारताच्या सर्वदूर भागात ती पूजल्या जाते. तिचा उत्साहाने केलेला उत्सव संपूर्ण जगाला कौतुकाने बघण्यास भाग पाडते. अशाच लक्ष्मीच्या अष्टलक्ष्मी स्तोत्रम् याविषयी आज काही चिंतन मांडण्याचा प्रयत्न करतोय..

अष्टलक्ष्मी स्तोत्रम् स्तोत्राने कानाभोवताली गुंजारव करत कधी मनाला रुंजी घातली कळलेच नाही.स्तोत्र फलदायी व्हायला ते आधी मनात रुजायला हवे. स्तुती करायला रचलेले काव्य म्हणजे स्तोत्र. त्या इष्ट देवतेच्या परिपूर्ण गुणांचे वर्णन म्हणजे स्तोत्र. अशाच अष्टलक्ष्मी स्तोत्राबद्दल ऐकतांना अर्थ जाणून घेण्याची इच्छा झाली आणि त्यातून एका एका श्लोकाचे चिंतन सुरू झाले आणि या माध्यमातून आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करतोय. अष्टलक्ष्मी अर्थात आदि लक्ष्मी,धन लक्ष्मी,विद्या लक्ष्मी,धान्य लक्ष्मी,धैर्य लक्ष्मी,संतान लक्ष्मी,विजय लक्ष्मी,राज लक्ष्मी या आहेत. या सर्व प्रसन्न व्हाव्या यासाठी या स्तोत्राचे पठण अधिक लाभदायक आहे.

आदिलक्ष्मी

सुमनसवन्दित सुन्दरी माधवी चन्द्र सहोदरी हेममये ।

मुनिगणमण्डित मोक्षप्रदायिनी मन्जुळभाषिणी वेदनुते ।

पञ्कजवासिनी देवपूजित सद्गुणवर्षिणी शान्तियुते ।

जयजय हे मदुसूदन कामिनी आदिलक्ष्मी सदा पालय ते ॥ १ ॥

आपल्या मूळ स्त्रोताचे ज्ञान होणे, हीच 'आदि लक्ष्मी' होय. मग नारायण आपल्या नजीक असतात. ज्याला आपल्या स्त्रोताचे ज्ञान होते तो सर्व भयापासून,भीतीपासून मुक्त होतो आणि संतोष,आनंद प्राप्त करतो. हीच आदि लक्ष्मी होय. आदि लक्ष्मी निव्वळ ज्ञानी व्यक्तींजवळ असते आणि ज्याच्याजवळ आदि लक्ष्मी असते समजा कि त्याला ज्ञान प्राप्त झालेय.

धान्यलक्ष्मी

अयि कलिकल्मषनाशिनी कामिनी वैदिकरूपिणी वेदमये ।

क्षीरसमुद्भव मंगलरूपिणी मन्त्रनिवासिनी मन्त्रनुते ।

मन्गलदायिनी अम्बुजवासिनी देवगणाश्रित पादयुते ।

जयजय हे मधुसूदन कामिनी धान्यलक्ष्मी सदा पालय ते ॥ २ ॥

धन लक्ष्मी जवळ असली तरी धान्य लक्ष्मी 'आहे' असे म्हणू शकत नाही. धन आहे परंतु काही खाऊ शकत नाही. भाकरी, भात, साखर, मीठ खाऊ शकत नाही. याचाच अर्थ धन लक्ष्मी आहे पण धान्य लक्ष्मीचा अभाव आहे. ग्रामीण भागात मुबलक धान्य असते. तेथील लोक दोन चार दिवस कोणालाही खायला-प्यायला घालायला हयगय करत नाहीत.कारण धन नसले तरी धान्य आहे. तेथील लोक छानपैकी खातात. शहरी लोकांच्या तुलनेत तेथील लोकांच्या आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण देखील जास्त असते. त्यांची पचन क्षमता देखील चांगली असते. धान्याचा वापर आणि सन्मान करणे म्हणजेच धान्य लक्ष्मी.

जगात सर्वांना भोजन गरजेचे आहे. अन्न खराब करू नका, वाया घालवू नका. बहुतेकवेळा जेवढे अन्न बनते तेवढेच वाया जात असते, फेकून दिले जाते. इतरांना देत पण नाहीत. असे कदापि करू नका. अन्नाचा सन्मान करणे हीच धान्य लक्ष्मी होय.

धैर्यलक्ष्मी

जयवरवर्णिनी वैष्णवी भार्गवी मन्त्रस्वरूपिणि मन्त्रमये।

सुरगणपूजित शीघ्रफलप्रद ज्ञानविकासिनी शास्त्रनुते।

भवभयहारिणि पापविमोचनी साधुजनाश्रित पादयुते।

जयजय हे मदुसूदन कामिनी धैर्यलक्ष्मी सदा पालय ते॥ ३॥

घरी सर्व काही आहे-धन आहे, धान्य आहे, सारी संपन्नता आहे पण आपण भित्रे आहोत. श्रीमंत कुटुंबातील मुले बहुतेकवेळा भित्री असतात. हिम्मत म्हणजे धैर्य एक संपत्ती आहे. नोकरीतील लोक नेहमी आपल्या वरिष्ठांना घाबरून असतात. व्यापारी निरीक्षकांना घाबरून असतात. आम्ही नेहमी अधिकाऱ्यांना विचारतो कि तुम्हाला कसा सहाय्यक आवडेल - तुमच्या समोर नेहमी घाबरलेला कि धैर्याने जो तुमच्याशी संपर्क करेल? जो सतत तुमच्या समोर घाबरलेला असेल तो नेहमी खोटे बोलत राहील, खोट्या गोष्टी, सांगत राहील. अशा व्यक्तीसोबत तुम्ही काम करू शकणार नाही. तुम्ही असा सहाय्यक पसंत कराल जो धैर्याने काम करेल आणि इमानदारीने तुमच्याशी बोलेल. हे आपल्या आंतमध्ये अशी शक्ती आहे, दिव्य शक्ती आहे जी सतत आपल्या सोबत असते. हि धैर्य लक्ष्मी होय. धैर्य लक्ष्मी असली तरच जीवनात प्रगती होते. ज्या प्रमाणात धैर्य लक्ष्मी असेल त्या प्रमाणातच प्रगती होईल. व्यापार असो किंवा नोकरी, धैर्य लक्ष्मीची आवश्यकता असतेच.

गजलक्ष्मी

जयजय दुर्गतिनाशिनी कामिनी सर्वफलप्रदा शास्त्रमये।

रथगज तुरगपदादि समावृत परिजनमण्डित लोकनुते।

हरिहर ब्रह्म सुपूजित सेवित तापनिवारिणी पादयुते।

जयजय हे मधुसूदन कामिनी गजलक्ष्मी सदा पालय ते॥ ४॥

राज लक्ष्मी म्हणा किंवा भाग्य लक्ष्मी म्हणा दोन्ही एकच आहेत - सत्ता. एखादी व्यक्ती मंत्रिपद प्राप्त करून काहीही सांगायला, बोलायला लागला तरी त्याचे कोणीही ऐकत नाही. त्याची सत्ता कोणीही मान्य करत नाही. बऱ्याच कार्यालयात देखील असे दिसते. मालकाचे कोणीही ऐकत नाही पण क्लार्कचे ऐकतात. त्याचा हुकुम चालतो. एका ट्रेड युनियनच्या प्रमुखाजवळ जितकी राज अर्थात गजांत लक्ष्मी असते तेवढी शहरातील मिल मालकाकडे नसेल. शासन करण्याची क्षमता म्हणजे राज लक्ष्मी अर्थात गजांत लक्ष्मी आहे.

सन्तानलक्ष्मी

अयि खगवाहिनी मोहिनी चक्रिणी रागविवर्धिनी ज्ञानमये।

गुणगणवारिधी लोकहितैषिणी स्वरसप्त भूषित गाननुते।

सकल सुरासुर देवमुनीश्वर मानववन्दित पादयुते।

जयजय हे मधुसूदन कामिनी सन्तानलक्ष्मी सदा पालय ते॥ ५॥

अशी मुले जे प्रेम देणारे असतील, प्रेमाचे नाते टिकवणारी असतील तर ती संतान लक्ष्मी होय. ज्या मुलांमुळे ताण तणाव येत नाही किंवा ताण कमी होतो ती संतान लक्ष्मी होय. ज्या मुलांमुळे सुख, समृद्धी, शांती मिळेल ती संतान लक्ष्मी होय. आणि ज्या मुलांमुळे भांडण, तणाव, त्रास, दुःख, पिडा होईल ती संतान लक्ष्मी नव्हे.

विजयलक्ष्मी

जय कमलासनी सद्गतिदायिनी ज्ञानविकासिनी गानमये।

अनुदिनमर्चित कुंकुमधूसर भूषित वासित वाद्यनुते।

कनकधरास्तुति वैभव वन्दित शन्कर देशिक मान्य पदे।

जयजय हे मधुसूदन कामिनी विजयलक्ष्मी सदा पालय ते॥ ६॥

काही व्यक्तींच्या कडे सर्व साधन सुविधा असतात तरीदेखील ते जे काही करतील त्यात त्यांना यश मिळत नाही. जे काम हातात घेतील ते काम बिघडले म्हणून समजा, काम होणारच नाही. म्हणजे विजय लक्ष्मीची कमी आहे. बाजारातून काहीतरी आणायला गेले तर ते मिळणार नाही, रिक्षात बसतील तर रिक्षा बिघडेल, टॅक्सीने बाजारात पोहोचले तर दुकाने बंद झाली असतील. तुम्हाला असे वाटेल कि मी स्वतः जाऊन काम केले असते तर बरे झाले असते. अगदी छोटे काम देखील करू शकणार नाहीत. येथे विजय लक्ष्मी कमी असते. परिस्थिती तरी विपरीत असेल किंवा काही कारणे तरी सांगतील. कोणत्याही कामात सफलता न मिळणे म्हणजे विजय लक्ष्मीची कमतरता असं म्हणता येईल.

विद्यालक्ष्मी

प्रणत सुरेश्वरी भारती भार्गवी शोकविनाशिनी रत्नमये ।

मणिमयभूषित कर्णविभूषण शान्तिसमावृत हास्यमुखे ।

नवनिधिदायिनी कलिमलहारिणी कामित फलप्रद हस्तयुते ।

जयजय हे मधुसूदन कामिनी विद्यालक्ष्मी सदा पालय ते ॥ ७ ॥

देवी लक्ष्मी आणि सरस्वतीचे चित्र पाहिले कि लक्षात येईल कि लक्ष्मी पाण्याच्या वर कमळामध्ये स्थित असते. पाणी अस्थिर असते म्हणून लक्ष्मी देखील पाण्याप्रमाणे चंचल आहे. मात्र विद्या लक्ष्मी सरस्वती पाषाणावर स्थिर आहे. विद्या, ज्ञान येते तेंव्हा जीवनात स्थिरता येते. आपल्या हातून विद्येचा देखील दुरुपयोग होऊ शकतो. शिकणे हा एकमेव उद्देश्य असेल तर ती विद्या लक्ष्मी होऊ शकत नाही. शिकणे आणि शिकल्यावर त्या शिक्षणाचा वापर कराल तेंव्हा ती विद्या लक्ष्मी होईल.

धनलक्ष्मी

धिमिधिमि धिन्धिमि धिन्धिमि धिन्धिमि दुन्दुभि नाद सुपूर्णमये ।

घुमघुम घुंघुम घुंघुम घुंघुम शन्खनिनाद सुवाद्यनुते ।

वेदपुराणेतिहास सुपूजित वैदिककमार्ग प्रदर्शयुते ।

जयजय हे मधुसूदन कामिनी धनलक्ष्मी सदा पालय ते ॥ ८ ॥

धन लक्ष्मी सर्वांना माहिती आहेच, धनाच्या इच्छेपोटी आणि अभावामुळे माणूस अधर्म करतो. हिंसा, चोरी, फसवणूक यासारखी चुकीची कामे करतो. परंतु डोळे उघडून पहात नाहीत कि आपल्याजवळ काय आहे. जोर जबरदस्तीने धन लक्ष्मी येत नाही, आली तरी सुख, आनंद देत नाही तर निव्वळ दुःखच देते. काही व्यक्ती धन म्हणजेच लक्ष्मी मानतात आणि तिला प्राप्त करणे हेच लक्ष्य बनवतात. मरेपर्यंत पैसे गोळा करतात, बँकेत ठेवतात आणि मरून जातात. ज्यांनी धन हेच लक्ष्य

बनवले आहे ते दुःखीच होतात. काही व्यक्ती धनाला दोष देतात. पैसे नाहीत तेच ठीक आहे, पैसा चांगला नाही, पैशामुळे हे घडते-ते घडते, हा सर्व गैरसमज आहे. धनाचा सन्मान करा, सद्धुपयोग करा, मग धनलक्ष्मी स्थिर होईल. लक्ष्मीची पूजा करा. लक्ष्मी चंचल असते, म्हणजे ती सतत चालत राहते. चालत राहिली तरच तिचे मुल्य आहे नां. बंद राहिली तर तिचे काहीही मुल्य नाही. म्हणून धनाचा सन्मान आणि सद्धुपयोग करा.

खरंतर हे आठ प्रकारची लक्ष्मी एक दुसऱ्याशी संलग्नित आहेत. प्रत्येक व्यक्तीकडे हे आठही धन कमी अधिक प्रमाणात असतात. आपण त्यांचा किती सन्मान करतो,वापर करतो ते आपल्यावर अवलंबून आहे. या आठ लक्ष्मींचे नसणे याला अष्ट दारिद्र्य म्हणतात. लक्ष्मी असो किंवा नसो - नारायण नक्की प्राप्त होतील. कारण नारायण दोन्हीत आहेत. लक्ष्मी नारायण आणि दरिद्री नारायण. दरिद्री नारायणाला भोजन दिले जाते तर लक्ष्मी नारायणाची पूजा केली जाते. साऱ्या जीवनाचा प्रवाह हा दरिद्र नारायणाकडून लक्ष्मी नारायणाकडे, दुःखाकडून समृद्धीकडे आणि जीवनातील रुक्षपणाकडून अमृताकडे जात असतो आणि त्यामुळेच या अष्टलक्ष्मीची नियमित उपासना करणे इष्ट ठरेल असे वाटते. येणारी दिवाळी सुख,शांती,समृद्धी आणि भरभराटीची जावो हीच अष्टलक्ष्मीचरणी प्रार्थना आहे.

शुभ दीपावली..

नामयाची दासी

संजीवनी मराठे
sanjeevanee02marathe@gmail.com

आपल्या सर्वांना स्वतःची अशी ओळख आहे. आपल्या प्रत्येकाला स्वतःचं असं आपलं नाव आहे, ज्या कोणत्या आपल्या वस्तू आहेत किंवा ज्याच्यावर आपण आपला हक्क सांगतो उदाहरणार्थ सुरुवातीला अगदी वह्या-पुस्तके भांडीं पासून तर अगदी जमीन-जुमला घर-दार बंगला यांच्यापर्यंत,अगदी यांच्यावर पण आपण आपलं नाव लिहून घेतो. कोणी आपली ओळख विचारल्यावर आपण चटकन आपलं नाव सांगतो. अश्या आपल्या नावाला आपल्या कर्तुत्वाची जोड लागली तर किती हुरूप येतो आपल्याला. आपल्याला आपल्या नावाचा अभिमान वाटतो. पण इथे संत जनाबाईंना पहा, स्वतःची एवढी सिद्ध भक्ती, रसाळ वाणी ,साक्षात पांडुरंगाचे एक सोडून अनेकदा दर्शन घेऊन भरून पावूनही त्या स्वतःची ओळख नामयाची दासी जनी म्हणूनच करून देतात.

आयुष्यभर त्या पांडुरंगाचे गुणगान करताना, त्याची आळवणी करताना सुद्धा त्या स्वतःचा उल्लेख करण्यापूर्वी नामदेवांचे स्मरण करायला त्यांच्या बद्दलची कृतज्ञता आधी व्यक्त करायला त्या कधीच विसरल्या नाही. निस्वार्थ सेवा व प्रेम याचा पायंडा सामान्य जनमानसात संत जनाबाईंनी घालून दिला. अखंड नामदेवांची सेवा करण्यातच त्या मग्न असत. त्यांना हवं नको ते त्या बघत. काय केल्याने त्यांचे कष्ट कमी होतील, याच्याच विचारात त्या राहत.बरं वरून सांगायचं तर पांडुरंगाच्या मंदिरात खरंतर त्यांना प्रवेश नव्हता. नामदेवांचे व पांडुरंगाचे संवाद ,भजन ,आळवणी, आरती इत्यादी तर त्या नुसत्या दुरून बघत ,ऐकत. पण गाभाऱ्यात मात्र त्यांना प्रवेश तो कधी मिळालाच नाही. त्यांनी नामदेवा मध्येच त्यांच्या पांडुरंगाला पाहिले ,आणि उठता-बसता दळिता- कांडिता मुखाने हरी नाम जपत त्यांनी त्या चक्रपाणी ला गाभाऱ्यातील विटेवरून थेट दळण कांडण करायला लावले.असा हा पांडुरंग ज्यांच्या मदतीला वेळोवेळी धावून आला अशी नामयाची दासी जनी म्हणजेच संत जनाबाईंचे भजन आपल्याला आपल्या कर्तव्यपूर्तीत अध्यात्म आचरण करायला शिकवतात.

दळीता कांडिता तुज गाईन अनंता |

न विसंबे क्षणभरी तुझे नाम गा मुरारी||

नित हाची कारभार मुखी हरी निरंतर |

माय बाप बंधू बहिणी ,तू बा सखा चक्रपाणी ||

लक्ष लागले चरणासी ,म्हणे नामयाची दासी |

व्यक्तिचित्रण

सूरमयी यज्ञ

गौतमी करमरकर
gautamikarmarkar@gmail.com

एखाद्या वाद्यातून जर तुम्हाला मराठी भावगीताचे बोल जसेच्या तसे, हो जसेच्या तसेच, म्हणजे अगदी काव्यातल्या जोडाक्षरांसकट आणि गायकाच्या/गायिकेच्या आवाजातली मींड, ताना, आलाप या बारकाव्यांसकट ऐकू आले तर तुम्हाला काय वाटेल?

तुम्ही अचंबित व्हाल, माझंही अगदी असंच झालंय.

यज्ञेश रायकर नावाच्या एका अवलियाचे यूट्यूबवर काही व्हिडिओज मध्यंतरी बघितले. आज मी ते व्हिडिओ पुन्हा बघितले आणि मग मला राहवेना म्हंटलं आता मात्र या कलाकाराची ओळख सर्वांना करुन द्यायलाच हवी.

कलाकार म्हणजे देवमाणूस. आणि अशा एखाद्या देवकुळात जेव्हा जन्म मिळतो ते पुर्वसंचित,पुण्यकमाईच असली पाहिजे.

जयपुर घराण्यातील सुप्रसिद्ध व्हायोलिन वादक स्वरप्राज्ञ पं.मिलिंद रायकर यांचे चिरंजीव यज्ञेश रायकर हे अत्यंत भाग्यवान कलाकार. मूळचे गोवेकर आणि गोव्याची भूमी ही संगीत आणि उत्साहाने परिपूर्ण आहे. या मातीचा गुणच माणसांना उल्हासीत करतो. गोव्यातील संगीत हे भारतीय, कोकणी आणि इंग्रजी संगीताचे मिश्रण.

अलीकडच्या काळात आपण पाहतोय,रसिकांना तंतुवाद्याची भूरळ पडली आहे. आजकाल धावपळ, रुटीन वर्क यातून चांगल्या प्रकारचं संगीत प्रामुख्याने भारतीय शास्त्रीय संगीत ऐकून शांतता अनुभवणे याकडे कल असतो. वाद्यसंगीतात व्हायोलिनच्या मैफिलींचा आस्वाद घेण्यासाठी आताशा दर्दी रसिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येते.

व्हायोलिन हे वाद्य मुळचे भारतीय नाही पण भारतात विशेषत: हिंदी चित्रपटात, दाक्षिणात्य चित्रपटात आणि अलीकडच्या काळात मराठी चित्रपट संगीतात ते इतके मिसळून गेले आहे की, आता व्हायोलिन शिवाय क्वचितच गाणी बनतात. ह्याच व्हायोलिन चा ध्यास वयाच्या दुस-या वर्षापासून घेतलेल्या यज्ञेश यांनी ६०० प्रेक्षकांच्या समोर आपले पहिले सादरीकरण,वयाच्या अवघ्या ४ थ्या वर्षी केले. तेव्हापासून गुंजत असलेला हा व्हायोलिन सूर

उत्तरोत्तर अधिकच प्रभावी होत गेला.

युवा व्हायोलिन वादक यज्ञेश रायकर हे ख्यातनाम व्हायोलिन वादक स्वरप्राज्ञ पं.मिलिंद रायकर यांचे सुपुत्र आणि शिष्य असून संगीत क्षेत्रात आश्वासक,उदयोन्मुख व्हायोलिन वादक म्हणून सुपरिचित आहेत. त्यांना गानसरस्वती विदुषी किशोरी अमोणकर यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे. पं. अरूण कशाळकर व डॉ.एल सुब्रमण्यम यांचे शिष्यत्व लाभलेल्या यज्ञेश यांनी अनेक कार्यक्रमांमधून रसिकांची दाद मिळवली आहे. ख्यातनाम गायक हरिहरन व साक्षात आशा भोसले यांच्या सोबत यज्ञेश यांनी गाणे व व्हायोलिन वादन दोन्हीचे सादरीकरण केले आहे.

स्वतंत्रपणे, साथतसंगतीसाठी वा वाद्यवृंदनासाठी गजाने वाजविण्याचे युरोपीय तंतू वाद्य. षड्ज-पंचम भावाने लावलेल्या चार तारांचे प्रचलित स्वरूपाचे व्हायोलिन हे इटलीवरून आलेल आहे. व्हायोलिन कुटुंबातील व्हायोलिन हे सर्वांत छोट वाद्य (शेंडेफळ),मग व्हायोला,त्यानंतर चेलो आणि डबल बेस,असं हे कुटुंब. भारतात सगळ्यात पहिले हे वाद्य पोर्तुगल दक्षिण भारतात १८००-१९०० च्या दरम्यान आले. या वाद्याला पडदा नसल्यामुळे आणि या वाद्याची क्षमता अशी आहे की शब्द अन् शब्द जसेच्या तसे या वाद्यातून उमटतात, अर्थातच हे वादकाचं कसब आहे, हीच क्षमता ओळखून तिथल्या शास्त्रीय गायकांनी, संगीतकारांनी याचा उपयोग प्रामुख्याने साथ-संगत करण्यासाठी केला. भारतीयांनी सुरुवातीला हे साथीचे वाद्य या नात्याने स्वीकारले कालांतराने गायकी अंगाने वादन करण्यास सुरुवात झाली आणि नंतर एकल वादनास सुरुवात झाली.

सहवादन, जुगलबंदी, साथ-संगती साठी, गायकी अंगाने, हे वाद्य वाजवले जात असले तरी या वाद्याची एक स्वतंत्र ओळख निर्माण करून देण्यामध्ये पं. गजानन बुवा जोशी, पं. डी. के. दातार,पं. मिलिंद रायकर (द लिजंड्स) यांचा खूप मोठा वाटा आहे. या वाद्याची स्वतंत्र ओळख अबाधित रहावी,ही सुवर्णपरंपरा कायम राखण्यास यज्ञेश रायकर नेहमीच प्रयत्नशील असतात, हे त्यांच्या सादरीकरणातून, बोलण्यातून दिसून येते.

स्वतंत्रपणे,साथतसंगतीसाठी वा वाद्यवृंदनासाठी गजाने वाजविण्याचे युरोपीय तंतू वाद्य. षड्ज-पंचम भावाने लावलेल्या चार तारांचे प्रचलित स्वरूपाचे व्हायोलिन हे इटलीवरून आलेल आहे. व्हायोलिन कुटुंबातील व्हायोलिन हे सर्वांत छोट वाद्य (शेंडेफळ),मग व्हायोला,त्यानंतर चेलो आणि डबल बेस,असं हे कुटुंब. भारतात सगळ्यात पहिले हे वाद्य पोर्तुगल दक्षिण भारतात १८००-१९०० च्या दरम्यान आले. या वाद्याला पडदा नसल्यामुळे आणि या वाद्याची क्षमता अशी आहे की शब्द अन् शब्द जसेच्या तसे या वाद्यातून उमटतात, अर्थातच हे वादकाचं कसब आहे, हीच क्षमता ओळखून तिथल्या शास्त्रीय गायकांनी, संगीतकारांनी याचा उपयोग प्रामुख्याने साथ-संगत करण्यासाठी केला. भारतीयांनी सुरुवातीला हे साथीचे वाद्य या नात्याने

स्वीकारले कालांतराने गायकी अंगाने वादन करण्यास सुरुवात झाली आणि नंतर एकल वादनास सुरुवात झाली.

सहवादन, जुगलबंदी, साथ-संगती साठी, गायकी अंगाने, हे वाद्य वाजवले जात असले तरी या वाद्याची एक स्वतंत्र ओळख निर्माण करून देण्यामध्ये पं. गजानन बुवा जोशी, पं. डी. के. दातार,पं. मिलिंद रायकर (द लिजंड्स) यांचा खूप मोठा वाटा आहे. या वाद्याची स्वतंत्र ओळख अबाधित रहावी,ही सुवर्णपरंपरा कायम राखण्यास यज्ञेश रायकर नेहमीच प्रयत्नशील असतात, हे त्यांच्या सादरीकरणातून, बोलण्यातून दिसून येते.

यज्ञेश यांनी सुरुवातीला तबल्याचे प्रशिक्षण घेतले, यासोबतच गिटार, पियानो ही वाद्ये देखील वाजवण्याचे कौशल्य त्यांच्याकडे आहे. व्हायोलिन ला पूरक म्हणून सध्या ते शास्त्रीय संगीताचे धडे पं. अरुण कशाळकर यांच्याकडे घेत आहेत. पं.एल सुब्रमण्यम यांच्याकडे कर्नाटक शैलीतील व्हायोलिन वादनाचे शिक्षण घेत आहेत.

संगीत की ना कोई जुबान' असे म्हटले जाते ते वाद्य संगीताच्या बाबतीत अधिक योग्य ठरते. शब्दांशिवाय आणि जसेच्या तसे शब्द त्यातले भाव हृदयापर्यंत पोहोचवण्याची ताकद या वाद्यामध्ये आहे. व्हायोलिन च्या क्षेत्रात आपली छाप उमटवणारे यज्ञेश रायकर हे नाव प्रसिद्ध युवा व्हायोलिन वादक म्हणून सुपरिचित आहे परंतु हे नाव प्रसिद्ध होण्यामागे यज्ञेश यांना लाभलेले गुरुंचे मार्गदर्शन, शिक्षण, संयम, सातत्य तसेच यज्ञेश यांनी केलेले अथक परिश्रम, एकाग्रतेने केलेला रियाज ,संगीतामधली अष्ट तत्व,संगीतातील सप्त स्वर म्हणजेच सा-साधना,रे- रियाज,ग- गांभीर्य, म-मधुरता, प-पवित्रता, ध-धैर्य, नि-निरंतरता या सगळ्याची जोड त्याला आहे असं मला वाटत.

मी आधी म्हटलं त्याप्रमाणे यूट्युब वर मी त्यांचे अनेक व्हिडिओ पाहिले, त्यापैकी ललत पंचम वाजवताना कसलेली शास्त्रशुद्ध पारंपारिक बैठक भावली. मिश्र खमाज ठुमरी वाजवतानातर यज्ञेशजी मनात गातच होते असे त्यांच्या रागांपलीकडल्या मुक्त संचारात जाणवते. खूपच आनंददायी मैफल वाटली. बंदिश हा रागाचा आरसा आहे, मियाँ की मल्हार या रागातील यज्ञेश यांनी रचलेली बंदिश-गत ऐकून कान तृप्त झाले. अत्यंत खुमारीने ते बंदिशी मांडतात. उत्कट,संवेदनशील, रसपूर्ण, नादमधुर, लोभस, सुश्राव्य, संयमित, हुकूमी,भावपूर्ण, लयदार, प्रवाही ही विशेषण अपुरी पडतील.

यज्ञेश यांच व्हायोलिन वादन ऐकताना मला एक जाणवत की व्हायोलिनला त्याच एक स्वतंत्र अस्तित्व आहे. फक्त अस्तित्वच नव्हे तर हे वाद्य आणि वादक शब्दांचा हात हातात घेऊन जातात. खूप आर्त, गहिऱ्या भावनाही पोहोचवू शकतं, तसंच ते अतिशय मृदू, कोमल भावही सहज दाखवत.यज्ञेशजींच व्हायोलिन वादन मी जेव्हा जेव्हा ऐकते तेव्हा तेव्हा हे व्हायोलिन गाणार आहे असा उल्लेख करावासा वाटतो. स्वरांची आरास सुंदर पद्धतीने आपल्या वादनातून ते मांडतात. मैफल रत्नांकित करण म्हणजे काय हे

त्यांच व्हायोलिन वादन ऐकून लक्षात येईल.

काही वादक 'बो' चा पूर्णतः उपयोग करत नाहीत त्यामुळे तुटक स्वर ऐकायला येतात पण यज्ञेशजींच वादन लक्षपूर्वक ऐकल्यानंतर 'बो' चा संपूर्णतः केलेला उपयोग कळून येतो. रागांची शुद्धता, लयकारीवरील वादकाची पकड, तालांगाचे उत्तम संचालन, व्हायोलिनच्या 'बो' वरील नियंत्रण या सर्व वैशिष्ट्यांमुळे यज्ञेश श्रवणसुखाचा अनुभव आपल्याला देतात. व्हायोलिनवर लिलया फिरणारी जादूई बोटं, पुलंनी गोविंदराव टेंबे ह्यांच्या हार्मोनियम वादनाबद्दल जे लिहिलं आहे (जोडाक्षरंही स्पष्ट ऐकू येणे) ते यज्ञेश यांनाही लागू होत.

शब्देविण संवादू दुजेविण अनुवादू. ते फक्त वादक नाहीत तर त्यांना सूर पेरता येतो मनात. वादनाचे अद्भुत सामर्थ्य, त्यातील माधुर्य येण्याकरता साध्य,साधना आणि मग येते ती सिद्धी जी यज्ञेशजींच्याकडे आहे.

शास्त्रीय संगीत हे शास्त्र आहे की कला आहे असा प्रश्न नेहमी विचारला जातो परंतु मला यज्ञेश यांच्या सादरीकरणातून जाणवतं की ही शास्त्र वापरण्याची कला आहे.

विविध कला महोत्सवांनी सजलेल्या पुण्यामध्ये ६६ व्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाच आयोजन करण्यात आलं होत. १४ डिसेंबर २०१८ रोजी जयपूर घराण्याचे प्रसिद्ध व्हायोलिन वादक पं.मिलिंद रायकर व श्री. यज्ञेश रायकर या पिता-पुत्र द्वयीचा व्हायोलिन वादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता आणि तो मला प्रत्यक्ष अनुभवता देखील आला हे माझ मी भाग्यच समजते. राग भूप ने त्यांनी आपल्या वादनास सुरूवात केली आणि राग हमीर मधली एक रचनाही सादर केली. आणि सकारात्मकता रंग भरू लागली. या रागांच्या सादरीकरणातून सुश्राव्य संगीत ऐकण्याची पर्वणी पुणेकरांना मिळाली. काही रचना आपल्याला पुन्हा पुन्हा ऐकाव्याशा वाटतात त्यातील बाजे मुरलिया बाजे या भजनाने त्यांनी आपल्या कार्यक्रमाचा समारोप केला. एकीकडे तानपुऱ्याच गुंजन सुरू आहे तर दुसरीकडे अत्तराचा मंद सुगंध दरवळावा इतक सूरसुगंधी वातावरण त्यांनी निर्माण केले. मिलिंद रायकर आणि यज्ञेश रायकर या पिता-पुत्रांचे वादन कौशल्य एकाच व्यासपीठावर या निमित्ताने रसिकांना अनुभवता आले. त्यांच्या या अद्वितीय सहवादनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. किशोरीताईंची शिकवण,राग खुलवत नेण्याची ताईंची लकब या दोघांच्याही वादनामध्ये स्पष्ट दिसते. स्वरांवर आणि तालावर असलेले प्रभुत्व दाद देण्यासारखे होते.रागाच्या विविध छटा, त्यातली सौंदर्यस्थळे जसे की मिंड,ताना,खटके,गमक,स्वर, मुरक्या यातून व्हायोलीनच्या उत्कट सुरावटींच्या अविष्काराचा आनंद त्यांनी श्रोत्यांना बहाल केला. 'व्हायोलिनचे अनोखे रंग अनुभवता आले.' विश्वनाथ शिरोडकर यांची तबल्याची सयंत साथ व माऊली टाकळकर यांची उत्तम अशी टाळेची साथ याने कार्यक्रमाला बहार आणली. मिलिंद रायकर हे देवाच्या मनात असेल तर पुन्हा एकदा सादरीकरणासाठी येऊ असं ते म्हणाले होते ही आमच्या सर्वांची इच्छा लवकरच पूर्ण होऊ देत.

श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद तर दिलाच,वन्स मोअर चा आग्रही सर्वांनी धरला होता हे शास्त्रीय संगीताच्या बाबतीत फार तुरळक प्रमाणात दिसते परंतु यांच वादनच इतक सुरेल होतं की रसिकांनाही राहवलं नाही. ख-या अर्थाने ही मैफल 'सवाई' झाली. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कला कशी प्रवाही होते याचं हे उत्तम उदाहरण. यासगळ्यातून यज्ञेशजींनी कलेची निरंतर केलेली साधना पुन्हा एकदा अधोरेखित होते.

एकल वादना व्यतिरिक्त सहगायन-वादनाच्या एका अनोख्या कार्यक्रमामध्ये यज्ञेश यांचा देखील सहभाग होता. दोन कलाकार भिन्न घराण्यांचे सांगीतिक संस्कार शिकलेले परंतु तरीही एकत्र आल्यावर काय कमाल घडू शकते याचा अनुभव त्या कार्यक्रमामधून मिळाला. ही प्रयोगशीलता यज्ञेश यांच्यामध्ये आहे. जयपूर-अत्रौली, आग्रा या घराण्यांची त्यांची तालीम आहे. आणि ज्यांच्या बरोबर ते सहवादन करणार होते त्यांची तालीम ग्वाल्हेर घराण्याची होती. तरीदेखील दोन्हीचा समतोल समन्वय साधत त्या दोघांनीही मैफल रूचिर केली.

संगीत रत्नाकरा'त शार्ङ्गदेवाने वाद्यांच्या अनेक प्रयोजनांत 'गायकाचे गुण उजळवणे व दोष झाकणे' हे एक प्रयोजन नमूद केले आहे - संगीतात साथसंगत किती महत्त्वाची आहे, हे अजून वेगळे काय सांगायला हवे!

साथ' व 'संगत' या शब्दांचा भाषिक अर्थ एकच असला तरी सांगीतिक अर्थ निराळा मानला जातो. साथ म्हणजे प्रस्तुतीकाराचे केवळ अनुसरण करणे, तर संगत म्हणजे त्याच्या सांगीतिकतेशी एकरूप होऊन केलेला संवाद!

मैफलीत संगतकार हा अजून एक महत्त्वाची भूमिका निभावत असतो - तो प्रस्तुतीकार आणि श्रोते यांच्यातला एक दुवा असतो. आविष्कारात जे चांगले असते ते अधिक सुभगतेने तो श्रोत्यांना दाखवतो आणि श्रोत्यांची दाद प्रस्तुतीकारापर्यंत पोचवतो. यज्ञेश यांनी केलेले व्हायोलिनचे सहवादन तर दुधात साखर विरघळावी तशी गायकाच्या स्वरात विरघळून जाणारी होती.

सूरांशी केलेली मैत्री आणि मैत्रीतला जपलेला सूर यांच उत्तम समीकरण यज्ञेशजींच्या वादनात आहे.

यज्ञेश यांना एका मुलाखतीत बदलत्या काळानुसार व्हायोलिनमध्ये येणा-या नव्या कल्पना, स्थित्यंतराबाबत प्रश्न विचारला गेला असता त्यांनी फार सुंदर उत्तर दिलं संगीत वाद्यातून येणारा सूर किती ' सच्चा' आहे यावरच कलावंताची तयारी व परिपक्वता पारखली जाते. अतिशय आश्वासक, आत्मविश्वास पूर्ण आणि वैचारिक स्पष्टता असलेलं हे व्यक्तिमत्व किती प्रतिभावंत आहे याची कल्पना तुम्हाला आलीच असेल.

या मनस्वी कलावंताला 2012 मध्ये लॅक्मे अवॉर्ड, 2015 ला उत्तुंग पुरस्कार, 2016 मध्ये पं. डी.व्ही पलुस्कर पुरस्कार, आणि 2018 मानाचा भारतरत्न डॉ.एम.एस.सुब्बुलक्ष्मी फेलोशिप अवॉर्ड

उपराष्ट्रपती आणि राज्यपालांच्या हस्ते मिळाला.

याशिवाय त्यांना सादरीकरणाची संधी अनेक प्रतिष्ठित लोकांसमोर,कार्यक्रमांमध्ये देखील मिळाली आहे. माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या समोर दिल्ली येथे, महाराष्ट्राचे राज्यपाल , सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव पुणे (2018),पं. जितेंद्र अभिषेकी महोत्सव, यूएस येथील डल्लासचे मेयर यांच्यासमोर, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर, अमेरिकेतील वर्ल्ड सीएटल म्युझिक (रीदम) फेस्टिवल अशा अनेक ठिकाणी सादरीकरण करून जाणकार संगीतप्रेमींची दाद मिळवली आहे. गानयोगी पं.डी.व्ही पलुस्कर यांच्या चरित्रपटातील छोट्या पलुस्कर यांची भूमिका देखील त्यांनी साकारली आहे. गोव्यातील अनेक संगीत नाटकांमध्ये त्यांनी भूमिका केलेल्या आहेत.

यज्ञेश यांना संगीत निर्माण करण्यासाठी निसर्गाकडून प्रेरणा मिळते असं ते नमूद करतात. प्रयत्न, प्रेरणा, प्रत्यक्ष अनुभव, प्रज्ञा, प्रतिभा आणि मग प्रसिद्धी या सगळ्या मधून त्यांची सांगीतिक कारकीर्द घडलेली आहे.आत्मविश्वास, वैचारिक स्पष्टता, साधना यांच्या जोरावर सगळ्यांना एकत्र बांधणारी, निखळ, सच्ची,समरसतेची स्वरानुभूती त्यांच्या अनेक मैफिलींमधून आपल्याला अनुभवायला मिळते. व्हायोलिनचा जेव्हा विचार केला जाईल तेव्हा आपलेच नाव डोळ्यासमोर यावे म्हणजेच व्हायोलीन = यज्ञेश रायकर हे समीकरण लोकांच्या डोळ्यासमोर यावे अशी यज्ञेश यांची इच्छा आहे ती पूर्ण व्हावी या सदिच्छा.

संगीताचा हा ठेवा सुदृढ = सदृढ + दृढ करून, त्याचा समृद्ध वारसा जपणाऱ्या, अतिशय दर्जेदार व्हायोलिन वादन करणाऱ्या आणि शास्त्रीय संगीताच्या नभांगणात ता-यांसम चमकणाऱ्या या कलावंताला या 'सूरमयी यज्ञाचा' ध्यास असाच अखंड राहो ह्या मनापासून शुभेच्छा.

टीप-तंतुवाद्यात बंदिश म्हणजेच गत असे म्हटले जाते.

सोई परम पद पावेगा....!

पं. भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त

सौ. सायली देशपांडे
sayalipeshwe6872@gmail.com

"अभिजात संगीताचा झरा, मूळचाच खरा. माणसाला स्वरांची,रागांची चटक लागली की ती अभिजात संगीतच पुरवू शकते." हे उद्गार आहेत पु.ल.देशपांडे यांचे. हे उद्गार आज आठवण्याचं कारण सुद्धा विशेषच आहे. कारण विषय आहे तो स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दीवर्षाचा. आपल्या भारताला अनेक अमुल्य रत्न लाभलेली आहेत. त्यातलं भारतरत्न म्हणजे पंडितजी. राग शास्त्र नियमांचं बंधन पाळून, प्रभावशाली, प्रगल्भ, रंजक, अधिकारपूर्ण, मुक्तपणे कला पेश करण्यातच कलावंतांचं कसब असतं. जे मोठे कलावंत असतात ते सदैव आपल्या कलासागरातच मग्न असतात.स्वरांनी ओथंबलेले असतात. नादपुत्र,स्वरभास्कर,स्वरसम्राट,गानयोगी.



महामहोपाध्याय,पंडित, पद्मभूषण, भारतरत्न या उपाधी आणि त्याही पलीकडे असलेले पंडितजी. कला ही मुळातच उच्च असते पण तिला अधिकच उंचीवर नेणारा एक अवलिया असतो त्याला कलावंत म्हणतात असं मला कायमच वाटतं. आमच्या पिढीला पंडितजीना ऐकता येतंय याचा खूप आनंद आणि अभिमान दोन्हीही वाटतो. काही व्यक्तींना शब्दबद्ध करण्यापेक्षा फक्त त्यांच्या स्वरानुभूतीचा आनंद घेणं यातच खरी कृतार्थता असते आणि ही अनुभूती कायमच पंडितजींना ऐकतांना येते.

धारवाड शहराला, तिथल्या मातीला, तिथे वाहणाऱ्या वाऱ्याला एक सांगीतिक सुवास आहे असं म्हणलं तर वावगं ठरणार नाही. धारवाड च्या मातीने असे अनेक संगीतरत्न आपल्याला दिले.

डॉ.गंगुबाई हनगल, मल्लिकार्जुन मन्सूर,बसवराज, पुट्टूराज गवई आणि याच दिगज्जांच्या शृंखलेतील एक नाव म्हणजे पंडित भीमसेन जोशी. संगीत परंपरेत रूढ असलेल्या तीनही घराण्यांचे जन्मस्थान म्हणजे धारवाड शहर. मग ते आद्य घराणे ग्वाल्हेर असो, जयपूर असो किंवा किराणा घराणे असो. मला अजूनही आठवतंय शाळेत आठव्या वर्गात शिकत असतांना इंग्रजीच्या पुस्तकात एक धडा होता त्या धड्याचं नाव होतं "THE VERSATILE SINGER PT.BHIMSEN JOSHI" या शीर्षकातील " VERSATILE"हा शब्द मला आजही तितकाच आकर्षित करतो जितकं मला आठवीत असतांना त्या शब्दाबद्दल असलेलं कुतूहल आणि आकर्षण वाटलं होतं.

संगीताबद्दल असलेली धडपड त्याबद्दल असलेलं समर्पण म्हणजे नेमकं काय तर पंडितजींची संगीत साधना. बाल्यावस्थेतच सूर तालाची धडपड,गाण्यासाठी खटपट आणि प्रचंड उत्साह त्याच बरोबर लग्नाची वरात किंवा वाद्यांचा आवाज ऐकून आपोआप त्यांची पावलं त्या आवाजाच्या दिशेनी जायला लागायची. ही सगळी लक्षणं ओळखून त्यांच्या वडिलांनी त्यांना गाण्याचं शिक्षण देण्याचं ठरवलं.मुळातच सुरेल,पल्लेदार, धारदार आवाज, अनुकरण शक्ती दांडगी त्यामुळे पदं, चीजा, अगदी ते ताकदीने गायचे.गुरूंच्या शोधार्थ पलायन करून ते जालंदर ला पोहोचले. तिथे पं विनायकबुवा पटवर्धन यांच्याशी भेट झाल्यानंतर गुरू शोधार्थ चाललेली धडपड बघून विनायकबुवा यांनी पंडितजींना “हुबळीलाच परत जा” असं सांगितलं.१९३७ मध्ये हुबळी स्टेशनवर भीमसेनजींच्या वडिलांची आणि सवाई गंधर्वांची भेट झाली.आणि भीमसेनजी यांना सवाई गंधर्वांच्या स्वाधीन केले.त्यांना एक उत्तम गुरू मिळाले आणि त्यांच्या पलायनाचे सार्थक झाले.

गुरुकुल पद्धतीने शिक्षण सुरू झालं आणि हे सोनं अगदी तावून सुलाखून जास्तीच चमकू लागलं.गुरूंची योग्य तालीम आणि सच्च्या सुरांची चमक ही गुरूंनी दिलेल्या ज्ञानाला पोषक ठरली निष्ठा आणि समर्पण हा भाव कायम ठेवून त्यांनी किराणा घराण्याची गायकी आत्मसात केली.अब्दुल करीम खां,सवाई गंधर्व, आणि स्वतः भीमसेन अशी घरंदाज पिढी त्यांनी गाजवली.जिद्द,चिकाटी आणि गुरू आज्ञा प्रमाण मानत त्यांनी गायन विद्या संपादित केली.आपल्या गायनात गायकी नायकी यांचा समन्वय साधून स्व किमयेनी त्यांनी स्वतःची एक वेगळी शैली निर्माण केली.किराणा घराण्याची सगळी अंग त्यांच्या गायनात स्पष्ट दिसतात.ख्याल,दादरा,ठुमरी,तराणा, त्रिवट याचबरोबर अनेक गीतप्रकारात त्यांचा अधिकार दिसतो. षड्ज स्थिर करण्याची,आवाज लावायची त्यांची वेगळीच खासियत आहे.तीनही सप्तकात मुक्त विहार, ताल लयीवर प्रभुत्व, शब्दप्रधान,स्वरप्रधान गायकी अशा कितीतरी विशेषतः त्यांच्या गायनाच्या सांगता येतील.त्यांची असलेली गुरूंवर अपार निष्ठा आणि मेहनत याचं फळ म्हणूनच आज हे सवाई गंधर्व यांचं देणं आपल्याला ऐकता येतंय..

माझे माहेर पंढरी ,अभंगवाणी सुरू झाली तरी त्यात असणारा भाव थेट ऐकणाऱ्याच्या हृदयाला जाऊन भिडतो.आणि म्हणूनच हे " रत्न" "भारताला" लाभलं याचा सार्थ अभिमान वाटतो.अजूनही दूरदर्शनवर "मिले सूर मेरा तुम्हारा" लागलं तरी ते स्वर्गीय अनुभूती देणारे स्वर कानावर पडले की कान आणि मन दोन्ही तृप्त होतात.अशाच समर्थ गायनशैलीतून त्यांनी अनेक शिष्यांना घडवलं.गुरुंप्रति समर्पण म्हणून सवाईगंधर्व महोत्सव सुरू केला जो आजतागायत अविरतपणे सुरू आहे.इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांप्रमाणे पंडितजीं स्वरविलासात सप्तसुर कसे लागतात कसे विलग होतात कसे एकमेकांत मिसळून जातात हे सांगणं कठीण असलं तरी स्वरांवरील प्रभुत्व आस आणि डौल प्रत्येकवेळी सुखावून

जातो..म्हणूनच म्हणावसं वाटतं की-

"गाणारा गळा एकच पण प्रत्येकवेळी दिव्यत्वाची प्रचिती देणारा, कधी दाद द्यायला टाळ्यांची मदत घेणारा तर कधी फक्त डोळ्यातल्या भावनांनी अश्रूंना दाद समजणारा. असं नेहमीच होतं भीमण्णा! तुमचा षड्ज घेणारा तर कधी फक्त डोळ्यातल्या भावनांनी अश्रूंना दाद समजणारा. असं नेहमीच होतं भीमण्णा! तुमचा षड्ज लागला तरी मनाला आत्मिक समाधान मिळतं. तुमचा ख्याल,अभंग,भजन काहीही ऐकलं ना तरी मन मात्र ब्रह्मानंद प्राप्तीची प्रचिती देतं. जिथे आस असते ती स्वरांची,नादब्रह्माची आणि ग्वाही असते तृप्ततेची! कितीही शब्दांचा आधार घेऊन लिहिलं तरी मात्र तुमचं गाणं शब्दातीत आहे आणि म्हणूनच आम्ही भाग्यवान आहोत की आम्हाला तो सूर ऐकता आला अनुभवता आला.तुमच्या अमृतरुपी दिव्य स्वरांची उधळण केलीत आमच्या मनावर अधिराज्य गाजवलंय जे आजतागायत कायम आहे आणि यापुढेही असेल.आम्ही स्वर्गातला देव कधी पृथ्वीवर बघितला नाही पण मात्र तुमच्या गायनानी स्वर्गीय अनुभूती देणारं सांगीतिक देवत्व काय असतं हे नक्कीच दाखवून दिलं ते कायमचं! म्हणून म्हणावसं वाटतं की "जो भजे हरी को सदा सोई परम पद पावेगा..!

प्रवास

बाईसाहेबांचा प्रवास

अनुराग वैद्य
maharashtrachishodhyatra@gmail.com

'सर रिचर्ड बर्टन' ही व्यक्ती जवळपास सर्वांना परिचित आहे ते म्हणजे एका महत्वाच्या कारणामुळे ते म्हणजे 'अरेबियन नाईट्स' या १६ खंडांच्या पुस्तकांचे इंग्रजी भाषांतर यांनी केले यासाठी म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु 'सर रिचर्ड बर्टन' हे उत्तम गुप्तहेर देखील होते. या प्रसिद्ध 'सर रिचर्ड बर्टन' यांची पत्नी 'इसाबेल बर्टन' ही इ.स. १८७९ मध्ये 'मुंबई' आणि परिसर बघायला आली होती. या भेटीमध्ये या 'इसाबेल बर्टन' हिने 'मुंबई' आणि 'पुणे' परिसराचे भेटीचे फार उत्तम वर्णन केलेले आपल्याला बघायला मिळते.

'मुंबई' मधून प्रवास करत या 'मुंबई' भेटी दरम्यान 'इसाबेल बर्टन' हिने 'मुंबई' शहरामध्ये आल्यावर त्याकाळातील 'मुंबई' शहरातील प्रसिद्ध हॉटेल 'वेस्टन्स एस्प्लेनड' मुक्काम केला होता. त्याकाळात मुंबई मधील अत्यंत प्रसिद्ध असे हे हॉटेल होते. नंतर तिने मुंबई मध्ये फेरफटका मारला तेव्हा तेथील लोकांचे राहणीमान याचे देखील वर्णन केलेले आहे. तसेच 'इसाबेल बर्टन' हिने 'एलिफंटा' म्हणजेच 'घारापुरी' लेण्यांना भेट देऊन तेथील हत्तीचे देखील वर्णन करून छायाचित्र देखील काढले आहे.

'मुंबई' मध्ये फिरल्यानंतर दिनांक २१ फेब्रुवारी १८७९ रोजी तत्कालीन जी.आय.पी. रेल्वेच्या ट्रेनने 'इसाबेल बर्टन' ही 'माथेरान' येथे जाण्यास निघाली तेव्हा तिला वाटेमध्ये भायखळा, चिंचपोकळी(चिंचुगल्ली), परळ, दादर, सायन, कुर्ला, भांडुप, ठाणे, दिवा, ही स्टेशन लागली असे 'इसाबेल बर्टन' आपल्या प्रवास वर्णनामध्ये वर्णन करते. ती या प्रवास वर्णनामध्ये असेही नमूद करते की 'परळ' येथून आम्ही 'मुंबई' येथील अनेक टेकड्या बघितल्या. तसेच 'माहिम' या गावाला जंगलाने वेढलेले दृश्य देखील बघितले. 'ठाणे' शहराबाबत ती लिहिते की "ठाणे हे मोठे खेडे होते परंतु अत्यंत गलिच्छ" तसेच 'ठाणे' येथे आम्हाला निळ्या-काळ्या रंगाचे काही पक्षी बघायला मिळाले.

'इसाबेल बर्टन' हिने 'एलिफंटा' म्हणजेच 'घारापुरी' लेण्यांना भेट दिली आणि छायाचित्र काढली.

तसेच काही पांढरे शुभ्र पक्षी देखील शेतांच्या मध्ये दिसले.

'इसाबेल बर्टन' आपल्या प्रवास वर्णनामध्ये 'कल्याण' बाबत 'कल्याण' हे जंक्शन असल्याचे देखील नमूद करते. असा प्रवास करत 'इसाबेल बर्टन' ही 'नेरळ' येथे पोहोचते. मुंबई ते नेरळ हे अंतर ३३ मैल असल्याचे ती आपल्या प्रवास वर्णनामध्ये लिहून ठेवले आहे. 'नेरळ' बद्दल 'इसाबेल बर्टन' हिने लिहिले आहे की 'नेरळ' हे प्रख्यात 'नाना फडणीस' यांचे जन्मगाव आहे. या 'नेरळ' गावामधून आम्ही वेडेवाकडे रस्ते ओलांडत आम्ही मोठ्या कष्टाने 'माथेरान' येथे पोहोचलो. 'माथेरान' येथील निसर्गाचे दृश्य फारच अप्रतिम होते तसेच 'माथेरान' येथील

हवा ही देखील फारच चांगली आहे असे 'इसाबेल बर्टन' आपल्या प्रवास वर्णनात लिहिते. तसेच 'इसाबेल बर्टन' 'माथेरान' बद्दल लिहून ठेवते की 'माथेरान' याठिकाणी यायचे दोन हंगाम आहेत.

एक म्हणजे उन्हाळ्यात आणि दुसरे म्हणजे पावसाळ्यानंतर हिरव्यागार वनश्री मध्ये. तसेच 'माथेरान' इथे वाघ, सिंह यांसारखे मोठे प्राणी नाहीत परंतु इतर वन्य श्वापदे आहेत.

'माथेरान' येथील बाजारपेठे पासून जवळच एक व्यायामशाळा, रोमन कॅथेलीक आणि प्रॉटेस्टंट चर्च आहेत. तसेच माथेरान सारख्या उंच डोंगराच्या जागेवर पोस्ट आणि टेलिग्राफ यासारख्या सुविधा देखील उपलब्ध आहेत. 'माथेरान' येथे ७० बंगले आहेत. तसेच 'माथेरान' येथे 'आलेक्झांड्रा' या नावाचे हॉटेल स्वस्त आहे. असे वर्णन 'माथेरान' बद्दल 'इसाबेल बर्टन' करते. दिनांक २२ फेब्रुवारी १८७९ रोजी आम्ही भल्या पहाटे 'माथेरान' येथून निघून थोडे थकलेल्या अवस्थेमध्ये 'नेरळ' स्थानकावर पोहोचलो नंतर



इसाबेल बर्टन हीने माथेरान येथून काढलेले छायाचित्र

आमचा प्रवास 'लोणावळा' येथे जाण्यासाठी सुरू झाला. सकाळी १० वाजता आमची ट्रेन 'नेरळ' स्थानकामध्ये आली आणि आमचा प्रवास सुरु झाला असे 'इसाबेल बर्टन' हिने लिहिलेले आहे.

.पुढे 'इसाबेल बर्टन' लिहिते की 'नेरळ 'येथून निघून आम्ही जवळपास 'बोर घाटामधून' तीन तासांचा प्रवास करत 'लोणावळा' येथे पोहोचलो. लोणावळ्याचा उल्लेख 'इसाबेल बर्टन' ही 'लानौळी' असा करते. 'लोणावळा' स्थानक यायच्या आधी 'खंडाळा' गाव आम्हाला लागले या गावामधील हवा ही स्वच्छ आणि आल्हाददायक आहे असे 'इसाबेल बर्टन' म्हणते. तसेच 'इसाबेल बर्टन' असे देखील म्हणते की या भागामध्ये दोन 'किल्ले' देखील आहेत. 'इसाबेल बर्टन' ही लोणावळा इथे पोहोचल्यावर ती एका चांगल्या हॉटेल मध्ये उतरली. या हॉटेलमध्ये असणारा आचारी हा उत्तम स्वयंपाक बनवतो. दुसऱ्या दिवशी सकाळी 'इसाबेल बर्टन' ही 'कार्ला' येथील लेणीला देखील भेट देते. 'कार्ला' लेणीला पोहोचल्यावर ती असेही म्हणते की भारतातील एका सुंदर बौद्ध लेणीला आम्ही भेट दिली आणि तिथे एका गुहेमध्ये 'गौतम बुद्ध' यांचा पुतळा देखील होता. तसेच येथूनच जवळून इंद्रायणी नदी देखील वाहते असे देखील 'इसाबेल बर्टन' हिने आपल्या प्रवासात लिहून ठेवले आहे.

'कार्ले' येथील लेणी बघून झाल्यानंतर साधारणपणे आम्ही सकाळी ११ च्या सुमारास हॉटेलमध्ये जात असताना आम्हाला काही 'मराठी खेडी' बघायला मिळाली तसेच 'हिंदू' वंशातील लोक फार सुसंस्कृत आहेत. येथील खेड्यातील

झोपड्या या शकारलेल्या आहेत. तसेच आम्ही जात असताना एका शेतकऱ्याने मोठ्या अगत्याने घरी बोलवून मला बसायला स्टूल दिला आणि तेथून निघताना मी त्या शेतकऱ्याला १ रुपया दिला असे वर्णन 'इसाबेल बर्टन' करते.

पुढे आम्ही हॉटेलमधून ब्रेकफास्ट करून

इसाबेल बर्टन हीने टिपलेले मुंबई येथील बाजाराचे चित्र.

रेल्वे प्रवासासाठी लोणावळा स्थानकावर गेलो तेव्हा तिथे एका 'स्टेशन मास्टरने' एक 'पाणमांजर' मारून तिला टबमध्ये ठेवले होते. इथून पुढे २ तास अंतरावर 'पुणे' होते. पुण्याचा उल्लेख 'इसाबेल बर्टन' ही 'पुनाह' असा करते.

साधारपणे 'इसाबेल बर्टन' ही आपल्या सहकाऱ्यांच्या सह संध्याकाळी ६.३० वाजता पुण्यामध्ये पोहोचली. रेल्वने पुण्यामध्ये पोहोचल्यानंतर पुण्याबाबत 'इसाबेल बर्टन' लिहिते की "पुणे शहर म्हणजे पेशव्यांचा बालेकिल्ला होता." तसेच पुण्यात आल्यावर 'इसाबेल बर्टन' हिने पुण्यातील 'नेपियर हॉटेल' येथे मुक्काम केला. हे एका 'पारशी' माणसाचे हॉटेल होते. त्याने या हॉटेलमध्ये खूप स्वछता ठेवली होती. तसेच हॉटेलमध्ये असलेले फर्निचर देखील खूप सुंदर होते. येथील 'पारशी' जमात खूप आतिथ्यशील आहे आणि बुद्धीमान आहे तसेच त्यांना इंग्रजांबद्दल ममता आहे. या 'पारशी' लोकांची राहणी ही इंडोयुरोपियन आहे.

'इसाबेल बर्टन' असेही म्हणते की रेल्वे येण्यापूर्वी ११० मैल अंतरावर असलेल्या पुण्याच्या प्रवासासाठी २४ तास लागत असत तेव्हा यासाठी ६ पौंड द्यावे लागत असे. पुढे 'इसाबेल बर्टन' ही पुण्यामध्ये देखील फिरली तेव्हा तिने पेशव्यांच्या शनिवार वाडा येथे देखील भेट दिली त्याबद्दल ती

इसाबेल बर्टन हिचे छायाचित्र.

लिहिते की "पेशव्यांच्या या राजवाड्याच्या तळघरात ग्रंथालय आणि वरच्या बाजूस देशी लॉ कोर्ट आहे. तसेच येथे दिवाणखान्यातील पेशव्यांचा दरबार हॉल देखील पाहिला. दुसरा बाजीराव या वाड्यामध्ये राहत होता. दुसरा बाजीराव याच्या सैन्याचा इंग्रजांनी पराभव करून त्याला कैद करण्यापूर्वी त्याने पळ काढला परंतु जॉन माल्कम याला तो शरण गेला.

यासाठी इंग्रजांनी त्याला वर्षाचे ८०००० रुपये पेन्शन म्हणून दिले. तसेच पेशव्यांचा या महालामध्ये विष्णू, शंकर आणि विठोबा अशी तीन देवळे देखील होती." असे 'इसाबेल बर्टन' आपल्या या वर्णनामध्ये नमूद करते. याच्यानंतर 'इसाबेल बर्टन' हीचा जवळपास मुक्काम एक आठवडा पुण्यात होता तेव्हा तिने पुण्यात काही इतर ठिकाणे देखील पाहिली आणि त्यानंतर तिने 'हैद्राबाद' येथे निजामाच्या भेटीला जाण्याचे निश्चित केले. एकंदरीतच 'इसाबेल बर्टन' हिच्या वर्णनावरून तत्कालीन मुंबई आणि पुण्याची स्थिती समजण्यास नक्कीच मदत होते आणि 'मुंबई-पुणे' प्रवास याचे एक सुंदर वर्णन देखील वाचायला मिळते. 'इसाबेल बर्टन' हिची 'शनिवार वाड्याला' भेट देणे आणि वर्णन लिहिणे ही गोष्ट देखील नक्कीच महत्वाची ठरते.

संदर्भग्रंथ:-

१) The Romance of Isabel, Lady Burton, by Isabel Lady Burton (1831-1896) Volume II.

एक तरल प्रवासानुभव

-डॉ.समिधा चव्हाण
samidhachavan10@gmail.com

(शरदिनी डहाणूकर, "मनस्मणीचे मणी", श्रीविद्या प्रकाशन, पुणे,१९८८.)

प्रवासवर्णन हा प्रतिभावान मनाचा आविष्कार असतो .संवेदनशीलता ,तादात्म्य व तरलता या गुणांमुळे प्रवासवर्णनात काव्यात्मता व लालित्य अवतरते . प्रवास लेखकाची प्रदेशाबद्दल ची भावगर्भ जाणीवच प्रवासवर्णनला उत्कट व ललित बनवत असते. लेखकाच्या सर्जनशील व्यक्तिमत्त्वामुळे प्रवासातील निसर्ग व मानव सृष्टी यांचे एक सेंद्रिय रसायन निर्माण होते. निसर्गातील संवेदनांची व मानवी भावनांची अनुभूती वाचकांच्या ठिकाणी संक्रमित करण्याचे श्रेय लेखकाच्या शब्दशक्तीला किंवा लेखनशैलीला द्यावे लागेल. प्रवासात त्याची जीवनदृष्टी सदैव सजग असते म्हणूनच मानवी स्वभावाच्या विविध तऱ्हा, विविध पैलू तो प्रवासवर्णनात साकारत असतो . काही काळ ह्या व्यक्ती लेखकाच्या संपर्कात आलेल्या असतात पण कलावंताच्या जादू भरल्या हाताने या व्यक्ती वाचकांच्या चिरस्मरणात असतात , ह्याचे कारण लेखक कलावंताची दृष्टी होय.

१९४०हे वर्ष प्रवासवर्णनपर वाङ्मयाच्या दृष्टीने महत्त्वाचे वर्ष ठरते .या वाटचालीवरील पहिला 'दीपस्तंभ' म्हणून प्राध्यापक अनंत काणेकर यांचे नाव नि: शंकपणे घ्यावे लागते . याचे कारण प्रवासवर्णन या वांङ्मय प्रकाराची एक कलात्मक वांङ्मय प्रकार म्हणून काणेकरांनी व्यक्त केलेली जाणीव इतरांच्या मानाने खास वेगळी आहे . काणेकरांच्या आधी श्री क्षत्री , पंडिता रमाबाई , चिटणवीस , मराठे, केळकर , टिकेकर,भाटे, हे लेखक प्रवासवृत्तांतून व्यक्त होतात; तर काणेकर यांचे वेगळेपण यात आहे की ते कलात्मक भूमिकेतून प्रवासविषयक लेखन करतात .काकासाहेब कालेलकर यांची भ्रमंती अश्वमेध यज्ञातील घोड्याप्रमाणे आहे. ग.भि.जोशी हे प्रवासवर्णनाच्या आशयातील सूक्ष्मता टिपतात ; तर गंगाधर गाडगीळ साक्षात प्रवासानुभव त्याच्या आकारासहित रसिकांसमोर ठेवतात .पु ल देशपांडे विनोदाच्या अंगाने प्रवासवर्णनला वेगळेपण आणतात तर प्रभाकर पाध्ये शुद्ध कलात्मक सौंदर्याच्या जाणिवेने प्रवासवर्णनाच्या रूपाला कळसापर्यंत नेऊन पोहोचवतात. त्यांची प्रवासी वृत्ती ,प्रवासलय पकडणारी शब्दकळा, प्रत्येक प्रदेशाचे चैतन्यशील चित्र रेखाटणारी शैली खासच लक्षणीय आहे. ग.भि.जोशी, रमेश मंत्री, विश्राम बेडेकर .ना.ग. गोरे, विनय सहस्त्रबुद्धे ,उषा कोल्हटकर, मीना प्रभू, डॉक्टर सप्तर्षी इत्यादी प्रवासवर्णनकार बदलत्या काळाचे व शहराचे सौंदर्य आपल्या खास शैलीतून मांडताना दिसतात.

काही मोजक्या स्त्रीलेखिकांनी प्रवास वर्णन पर वांङ्मयात भर टाकली आहे .मेधा काळे, उषा देशपांडे ,सुधा गोखले, उषा गडकरी इत्यादी लेखिका केवळ माहितीपर व क्वचित आत्म-संवाद साधताना दिसतात .तर काही लेखिका या प्रकाराकडे आत्मनिष्ठेच्या व आत्मचिंतनाच्या पातळीवरून बघताना दिसतात .त्यातील लालित्य, सुसंस्कृतपणा ,अनुभवाचा प्रगल्भपणा इत्यादी गुणांमुळे काही लेखिकांची प्रवासवर्णने वेगळ्या बाजाची ठरतात अशा लेखिकांपैकी एक महत्त्वाचे नाव आहे डॉ. शरदिनी डहाणूकर यांचे.

डॉक्टर शरदिनी डहाणूकर यांचे 'मनस्मरणीचे मणी ' हे प्रवास वर्णन१९८८ साली प्रसिद्ध झाले . एका वेगळ्या बाजाचे प्रवासवर्णन म्हणून या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल.

अमेरिका ,जर्मनी , स्वित्झर्लंड , सनफ्रान्सिस्को जवळ जवळ जगप्रवास करणारी ही लेखिका. या प्रवासाचं वर्णन करताना त्या तपशिलाच्या जवळही जात नाही . या शहराशी असलेली भावनिक गुंतवणूक ती व्यक्त करते .त्या स्थळाचा आत्मा शोधण्याचा प्रयत्न करते; म्हणूनच हे प्रवासवर्णन वस्तुनिष्ठ न होता आत्मनिष्ठ होताना दिसते.

जगभर प्रवास करत असताना आठवणींच्या हिंदोळ्यावर तिचे मन ही हिंदकळत असते . "आठवणींच्या या इंद्रधनुचे रंग ठिबकत असतात माझ्या मनस्मरणीच्या मण्यातून .मणी कुठून कुठून जमवलेले. मनाच्या पेटीत असेच जपलेले. सुटे सुटे..... एका सूत्रात न ओवलेले. पण तरीही सप्तरंग फाकणारे .त्या रंगाची प्रभा अधिकच गहिरी होत जाते अशा परदेशप्रवासात" अशाप्रकारे लेखिका आपल्या प्रवासवर्णनाचा हेतू स्पष्ट करतात. विमा कंपन्यांची नावं , कधी स्थळांची सोबत, तर कधी विविध स्वभावाची माणसं या सगळ्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न त्या करतात . काचेच्या मण्यांचे विविध रंग मोहक वाटतात . त्या रंगात लहानपण हरवून जाते अगदी तसेच देशादेशातील बदलाची स्पंदने त्या अनुभवतात. त्यांना दिसलेले इंद्रधनू इतरांनाही दाखवण्यासाठी प्रवासवर्णनाचा हा प्रपंच त्या मांडतात .

जीवनावर प्रेम करणारी ही लेखिका. प्रवासाची अत्यंत आवड .एकटीने प्रवास करण्याची मौजच वेगळी असते त्या म्हणतात. पत्नीपद व मातृपद सांभाळताना स्वत्व नष्ट होते की काय? मग अशा प्रवासातून स्वतःचा शोध. कधी जिवलग सखी म्हणून, तर कधी आई म्हणून, तर कधी मुलगी .साऱ्याच नात्याच्या ठिकाणी परमनप्रवेश . म्हणून त्या म्हणतात , "माझ्यासाठी प्रत्येक प्रवास पर्वणी असतो, आनंदाची नित्यनूतन दालनं उघडणारा असतो."

विमानाचा प्रवास हा "प्रवासाच्या आनंदवनभुवनाचे प्रवेशद्वार म्हणजे विमानतळ" असे त्या म्हणतात. अमेरिकेतल्या विमानतळावर चे दृश्य बघितल्यानंतर त्यांना जाणवतो तो बिनधास्तपणा, तरुण पिढीतला थोडा आत्मविश्वास आणि बरीचशी बेमुर्वतखोरी . विमानातल्या अल्प वास्तव्याने देखील बरंच काही शिकता येतं हे जाणवल्यावाचून राहात नाही. परदेशप्रवासातील निसर्गवर्णन तर अगदी बहारदार आहे ."रखरखीत उन्हाळ्यात बहरलेलं रंगवैभव, तर पावसाळ्यात पाचवा महिना लागलेल्या सृष्टीचं डोहाळजेवण ,गारेगार हवा, हिरव्यागार दऱ्याआणि दुडदुडते झरे ! प्रदूषणाने गांजलेल्या छातीत ती श्रावणस्पर्श लाभलेली हवा एकदा भरून घ्यावी ; मग ते रस्त्यावरचे खड्डे , घाटातली वाहनांची कोंडी, सारं विसरावं!" मुंबईच्या वातावरणात जगणाऱ्या ह्या लेखिकेला इथे श्वास भरून घ्यावासा वाटतो.

अनेक ठिकाणी लेखिका भारत व पाश्चात्त्य देश यांच्यात तुलना करते .पाश्चात्य देश फिरतांना प्रत्येक भारतीय ही तुलना करतोच करतो ! युरोपातील ट्रेन्स ,सार्वजनिक जागा आणि वाहने ,स्टेशन इत्यादी मधील स्वच्छता तर भुरळ पाडणारी. लेखिका अंतर्मुख होऊन अनेक अनुभवाचं वर्णन करते. त्या वर्णनाला काव्यात्मकतेची झालर आहे. समुद्रप्रवास तर

लेखिकेचा "जान हिरावून " घेणारा. समुद्रातून प्रवास करत असतानाचे वर्णन लेखिकेच्या मनाची भावगहिरी अवस्था वर्णन करतात. पाश्चात्त्य देशातील आधुनिकतेचं वर्णनही लेखिका अत्यंत खुमास- दारपणे करतात.

अमेरिकेतील शॉपिंग म्हणजे महाभारतातील मयसभा. मॉल मधल्या जागा ही अप्रतिम .फास्ट फूड, चायनीज ,इटालियन भोजन इत्यादी सर्वच एका सेंटर्समध्ये मिळण्याची सोय. अमेरिकनांचे खाण्याचे पदार्थ व त्यांची खाद्यसंस्कृती यावरही लेखिका भाष्य करते. पौर्वात्य व पाश्चिमात्य , युरोपियन , ग्रीक इत्यादी पद्धतीच्या जेवणातील बारकावे ,आनंद व्यक्त करण्याच्या त्यांच्या अफलातून पद्धतीचे ही वर्णन येते .आईस्क्रीम तर सर्वव्यापी व सर्व प्रिय. जगाच्या पाठीवर फिरत असताना एखादं साम्य लेखिकेला घरची आठवण करून देते. त्या म्हणतात , "कुठल्या रुपाने मायभूमीशी रेशीमबंध बांधलेले राहतात कळत नाही, आपल्या मातीत पाळंमुळं अशी घट्ट रुजलेली असतात की 'जडतनू 'कुठे फिरत असली तरी ओळखीच्या दृश्यांना , सुरांना , शब्दांना, गंधांना कशालाही पकडून त्या पारंब्या आपल्याच मातीत परत जायला बघतात. आणि म्हणूनच प्रवासात सर्वच पदार्थांचा चवीने आस्वाद घेतात . तो आनंद इतरांबरोबर साजराही करतात. आनंदाच्या डोहात स्वतः तर डुंबतात पण इतरांनाही सोबतीला घेतात.

मराठी कुटुंब, पण अमेरिकेत स्थायिक झालेल्या या कुटुंबाची अगतिक अवस्था, मराठी संस्कृती जपण्याचा आटापिटा, या सगळ्यामुळे जीवनातील गुंता वाढतो. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घेणं एवढचं शिल्लक राहतं. भारतीय व पाश्चात्त्य देशातील रीतीरिवाज यांमध्ये तफावत असेल पण शेवटी निष्कर्ष एकच." कुणास ठाऊक यांचे अन् आपले रितीरिवाज , एकाच संस्कृतीच्या इथे तिथे रुजलेल्या बिया आहेत की काय? असे लेखिकेला वाटते.

ज्या संस्कृतीत आजची पिढी घडत आहे तिची शिकवण आहे पैसा .पैसा म्हणजे माया. पैशाने सगळी सुख येथे विकत घेता येतात. पैसा संपला कि माया ही संपली, हे दाहक सत्य पाश्चात्त्यांनी पचवलेलं आहे आणि म्हणून साऱ्याचा उपभोग घेण्याची वृत्ती अमेरिकन प्रजेत दिसते. म्हातारपणात नशिबाला दोष न देता आनंदाने जीवन जगतात. अमेरिकन लोक भूतकाळाचं ओझं न वाहता मस्त जगत असतात.

शिकागो बद्दल त्या म्हणतात, "शहरांनाही स्वतःचं व्यक्तिमत्त्व असतं. आपलं आयुष्य आपल्या परीने जगत असतात ती. जरा हात मिळवणी केली की दाखवतात स्वतःचं रंग रूप चेहरा !" शहराचं वर्णन करत असताना अत्यंत मार्मिकपणे त्यावर भाष्य करतात, तपशिलाच्या जवळही जात नाही . 'मुंबई ' मध्यमवयीन स्त्री सारखी अस्ताव्यस्त सुटलेली, राणीच 'लंडन' वास्तुशिल्पानं नटलेलं पण वृत्तीने कारकुनी . ' रोम ' स्थापत्य शिल्पानं नटलेलं, 'पॅरिस 'उच्चभ्रू स्त्रीसारखं, 'सिंगापूर' नवश्रीमंत बापाच्या पोरासारखं , वैभवशाली 'स्टॉकहोम'. असा प्रत्येक शहराचा टापटिपीचा चेहरा. या शहराचं व्यक्तिमत्व लेखिका संयमी पण प्रगल्भ शब्दात मांडतात. आस्वादतात.

पर्यटनाचं तर सध्या व्यापारात रूपांतर झालेले आहे. ओंगळपणा , बीभत्सपणा, अश्लीलता इत्यादींमुळे सुंदर परिसराला ग्रहण लागलं याची खंत लेखिकेला आहे. तपशील, वर्णन, इतिहास, भूगोल, माहितीपत्रके ,इ.च्या साहाय्याने स्थळांची सांगितलेली माहिती लेखिकेला नकोशी वाटते .तर "आपआपल्या भावचक्षूंनी ते विश्व सजवायचं असतं, स्वप्निल करायचं असतं,अवशेषातून कविता वाचायची असते , प्रत्येकाची जाण वेगळी,उमज वेगळी, स्वप्न वेगळं म्हणून त्यातून खुलणारा अर्थही वेगळा." इतिहासातून हिंडतांना, त्यात रमताना, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारलेल्या वातावरणाला वास्तवाची डूब नकोच. स्वतःशी आत्मसंवाद करत , त्या स्थळाशी एकरूप होत, त्या वास्तूंना व वस्तूंना बोलकं करतच पुढे जावं, जुन्या स्मृतींच्या मूक यातना जागवत केलेल्या वर्णनाची लज्जत वाढते.

'मनस्मणींचे मणी' या प्रवासवर्णनात कुठेही वस्तुनिष्ठता, सरधोपटपणा ,तपशील वा इतिहास नाही . तर "आपुलाची वाद आपणासी" असा निखळ आत्मसंवाद आहे .अमेरिकन संस्कृतीतील डॉलरचे बळी, अमेरिकन कुटुंबाची कुचंबणा , स्वातंत्र्य व स्वैराचार यांची गल्लत, लग्नसंस्था नाकरणाऱ्या पाश्चात्त्य तरुणी , मुलांमधला अवास्तव विश्वास इत्यादींबद्दल सामाजिक चिंतन तर येतेच पण भारतीय मनाची अवस्था ही लेखिका चित्रित करते .चिंतनासाठी लेखिकेला एकटीने प्रवास करायला आवडतो. या पुस्तकात लालित्य आहे , काव्यात्मकता आहे, अनुभवाच्या प्रगल्भतेतून आलेलं आत्मचिंतन आहे. जीवनावरच्या प्रेमापोटी आलेलं जीवनभाष्यं आहे .स्थळाचं व्यक्तिमत्वं वैशिष्ट्यांसह साकारलेलं आहे .एका तरल मनाचा तो प्रवासानुभव आहे. वाचकांनी तो तितक्याच तरलतेने आत्मसात केला तर 'ब्रम्हानंदी टाळी' लागल्याचा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही!

अशी ही 'भटकंती'

सौ. दिशा टिकेकर
tikekardisha@gmail.com

गुलाबी थंडी सुरू झाली की नेहमी आम्हाला कुठेतरी मस्त फिरायला जायचे वेध लागतात. आमचा तसा मोठा मित्र परिवार आणि सगळयांनाच फिरण्याची जाम आवड. ह्या वेळेस आम्ही कोकणला जायचे ठरवीले. सगळ्यांचे कुलदैवत हे कोकणातच असल्याने सगळेच तयार झाले. फिरणे ही होते आणि देवदर्शन ही.

जायचे कसे याचे प्लॅनिंग सुरू झाले. रेल्वे, बस यांच्या भानगडीत न पडता आपल्या कारनेच जायचे असे ठरले. आम्ही सगळे नागपूरचे रहिवासी. आणि आता नागपूर ते कोकण हा प्रवास कारने. एका रोमांचक प्रवासाचाच अनुभव येणार होता. आम्ही आठ मोठे व चार लहान (प्रत्येकाचे एकच मूल असल्याने ते जरा सोईचे झाले) असा बारा जणांचा प्रवास दोन कारनी करण्याचे ठरले. आवश्यक ती सगळी सामग्री यांची यादी केली. कसे व कुठेल्या मार्गानी जायचे हे सर्व ठरवून जाण्याचा दिवस आम्ही निश्चित केला. लांबचा प्रवास असल्याने आम्ही लवकरच निघण्याचे ठरवीले. मात्र निघता निघता 10.00 वाजलेच सगळयांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता. 'गणपती बाप्पा मोरया' आणि 'गजानन महाराज की जय' अशी गर्जना करत आमच्या प्रवासाचा श्रीगणेशा आम्ही केला.

आमचा एक मित्र अकोला येथे त्याच्या सासुरवाडीला गेला होता. तेव्हा आम्ही आपल्या प्रवासाचा पहिला स्टॉप अकोला येथे घेण्याचे ठरवले. सुमारे 3.00 वाजता आम्ही अकोला गाठले. तेथे काकूच्या हातचा मस्त फराळ केला आणि तासाभरातच पुढच्या प्रवासाला निघालो. खऱ्या अर्थाने आता मिशन कोकण हा प्रवास सुरू झाला.

जवळ-जवळ रात्री 11.00 वाजता आम्ही औरंगाबाद येथे पोहचलो. औरंगाबाद पासून काहीच अंतरावर देवगड नावाचे एक सुंदर ठिकाण आहे. तेथे दत्ताचे भले मोठे असे प्रसिध्द मंदिर आहे. तिथल्या भक्तनिवासात आम्ही रात्रीची विश्रांती घेतली.

सकाळी तिथला निसर्ग बघून आम्ही थक्कच झालो. तिथला तो परिसर मन प्रसन्न आणि उत्साही करणारा होता. काही ठिकाणी तर शेणांनी सारवलेले अंगण ही होते. आम्ही मनोभावे दत्ताचे दर्शन घेतले आणि "आमचा पुढचा प्रवास सुखरूप होऊ दे" असे मागणे त्याच्याकडे केले. आणि नंतर पेटपूजा आटपून पुढच्या प्रवासाला निघालो.

गप्पा- गोष्टी, गाण्याच्या, शहरांच्या आणि चित्रपटाच्या नावाच्या भेंड्या खेळत आमचा प्रवास अगदी छान सुरू होता. उंच उंच पर्वत रांगा, संथपणे वाहणारी नदी तर कधी बहरलेली शेतं अधून मधून आमच्या सोबत होतीच की.रात्रीचा मुक्काम भोर या गावात करण्याचे ठरले. आमच्या एका मित्राचे पूर्वी आजोळ होते त्यामुळे त्या गावात पोहचताच त्याचे चलबिचल झालेले मन आम्हा सगळ्यांना दिसत होते.

पण आता त्या गावात राहण्याची व्यवस्थित सोय नसल्याने आम्हाला आमचा प्रवास सुरूच ठेवावा लागला.

खिडकीच्या काचा उघडून आवडती गाणी गुणगुणत बेफाम वारा छातीवर झेलत शरीर गारठवणारा आणि मनाला उभारी देणारा प्रवास कधी संपूच नये असे वाटायचे आणि पाहता पाहता येऊन पोहचलो ते वरंधा घाटात. सर्वत्र काळोख, खोलच् खोल दरी. भयानक अशी शांतता, चहूबाजूंनी डोंगर आणि झाडे-झुडपे. आवाज फक्त कुत्र्यांचा ओरडण्याचा. महाड कधी येणार याच विचारात सगळे होते.

रात्री 2.00 वाजता आम्ही महाड येथे पोहचलो राहण्यासाठी हॉटेल शोधले आणि तिथे मुक्काम ठोकला. सततच्या प्रवासामुळे सगळे खूप थकले होते. झोपायला जाणार तेवढ्यातच आमच्या एका मैत्रिणीची मुलगी ही "आई, मला कोबीची भाजी आणि पोळी पाहिजे" असे म्हणत मोठ्ठा सुरच काढला. कसे - बसे तिला राजगीराचा लाडू देउन शांत केले. आणि झोपवीले आणि आम्ही देखील क्षणातच स्वप्नांच्या नगरात गेलो.

आता आमचा महाड पासून पुढचा प्रवास सुरू झाला. आता सगळेच फार कंटाळले. कधी तो अथांग सागर दृष्टीस पडेल असे झाले होते. पाहता पाहता मैलांचे दगड मागे पडत होते. आणि आम्ही थेट येऊन पोहचलो ते दापोली येथे. कोकणात पोहचल्याचा आनंद सगळ्याच्याच चेहरयावर् दिसत होता. तिथे न थांबता आम्ही दाभोळ हे ठिकाण गाठले.
वाह! आता तर डोळ्यासमोर अथांग निळा सागर त्याच्या उसळणाऱ्या लाटा आणि त्यावर दिसणारा पांढरा फेस. किती लोभनिय दृष्य होते ते.



प्रवासाचा सगळा थकवा विसरून मन, भोवतालचे सुख, आनंद टिपू लागला.

दाभोळ ते धोपावे आमची फेरी होती. म्हणजेच तो अथांग सागर त्यात एक भल्ली मोठी बोट आणि त्या बोटीत आम्ही आणि आमच्या दोन कार. पण असे कसे. हे कसे शक्य आहे. ह्या विचारात आम्ही होतो. पण प्रत्यक्ष डोळयांनी बघीतल्यावर वाह! वाह! हे उच्चार नक्कीच निघाले. किती कमालच आहे न त्या बोटीतून जातांना मन असे आनंदीत झाले होते. आणि हळूच येणारी वाऱ्याची झूळूक आहाहा! शब्दच

भक्त निवास येथे दुर्गादेवीचे खुप सुंदर असे मंदिर आहे. मोठ्ठा पाण्याचा कुंड आणि सभोवताल उंचच उंच नारळाची आणि काही आंब्याची झाडे. तिथेच रात्रीचे जेवण आटपून आम्ही सगळ्यांनी काही वेळ गप्पांचा आनंद घेतला. मुले तर खेळण्यात मग्नच झाली होती.दुसऱ्या दिवशी सकाळ पासून आमचा मुक्काम पूर्णपणे सागर किनारीच होता. बोटींग, वाळूचे किल्ले बनविणे, घोडा गाडीत बसणे अशा कितीतरी गोष्टींमध्ये मन रमले होते. आणि सगळ्यात शेवटी पॅराग्लायडिंग. बाप रे! नको नको म्हणत मी गेले पॅराग्लायडिंग करायला. खाली अथांग निळा सागर वर भव्य ते आकाश आणि किनाऱ्यावर असणारी नारळाची झाडे असे लोभनीय दृष्य होते. फार मज्जा आली. धास्तावलेले मन थोड्या वेळातच शांत झाले.
दिवसभर केलेल्या रोमांचक गोष्टीमुळे रात्री लगेच सगळे झोपी गेले.

आमच्या मित्र परिवारातील दोन जणांचे गुहागर हे कुलदेवतेचे ठिकाण असल्याने त्यांनी अभिषेक व पूजाअर्चा केली. नंतर जेवण आटपून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. आता आमचे कुलदैवत असलेले पाली (श्री पल्लिनाथ मंदिर) या ठिकाणी जाण्यास निघालो.
संध्याकाळी ७:०० च्या जवळपास आम्ही पाली येथे पोहचलो. तेथे भक्तनिवास येथे आमची राहण्याची व्यवस्था केली होती. तिथल्या गुरूजींनी पूजेची, नैवेद्य आणि आमच्या जेवणाची अगदी छान सोय केली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही यथासांग श्री पल्लीनाथ यांची पूजा व अभिषेक केला. नैवेदय दाखवीला. व जेवण आटपून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. असे म्हणतात की, कुलदैवतेच्या दर्शनानंतर कुलदेवीचे दर्शन घ्यावे म्हणून आम्ही थेट कोल्हापूर गाठायचे ठरवीले.
संध्याकाळ पर्यंत कोल्हापूर येथे पोहोचलो. जेव्हा मंदिरात गेलो तेव्हा आरतीच चालू होती. मनोभावे आरती केली. नंतर देवीची ओटी भरली. शांतपणे दर्शन घेतले आणि निघालो. सगळे काही व्यवस्थीत पार पडल्यामुळे मनात वेगळीच प्रसन्नता होती.

कोल्हापूरहून काहीच अंतरावर इचलकरंजी ह्या गावात आमच्या एका जून्या मित्राचे घर आहे. रात्री तिथे मुक्काम केला व सकाळी मस्त पाहूणचार घेऊन परतीच्या प्रवासाला लागलो. दिवसभर प्रवास करून रात्री परत देवगड येथे थांबलो व सकाळी दत्तगुरु यांचे दर्शन घेऊन नागपूरच्या मार्गाला लागलो.

मेहीको मेहीको

सौ. रेणुका कुकडे
deshpande.rnk@gmail.com



निर्जन , एकट रस्ता.. तिन्ही सांजेची वेळ.. अनोळखी देश.. अनोळखी माणसं.. अगम्य भाषा.. वाट सापडेना.. आमची पायपीट चाललीये पण मनात मात्र भीती.. इथल्या गुन्हेगारीची टक्केवारी, ड्रग्स चा व्यापार, गँग वॉर्स, शूट आऊट सगळे सगळे विचार मनाला भंडावून सोडत होते.. त्या सायंकाळची कातरता वाढवत होते.एवढ्यात तिथे एक माणूस आला.. शेअरिंग टॅक्सी नी हॉटेलपर्यंत सोडून देतो म्हणाला.. दुसरा कोणताही पर्याय दिसेना म्हणून जीव मुठीत धरून त्या टॅक्सीत बसलो.. डोळे हातातल्या गुगल माप वर खिळलेले.. अंधारातून मार्ग काढत, त्या आड वाटेवरून टॅक्सी मुख्य रस्त्याला लागली आणि जीव भांड्यात पडला. मेक्सिको मधल्या पहिल्याच रात्री सुरक्षिततेची हमी मिळाली आणि Mexicans नी माझा विश्वास जिंकून घेतला.

मेक्सिको या देशाचे मूळचे नाव मेहीको. या देशातल्या युकातान प्रांतात भ्रमंती करण्याची संधी मला गेल्या वर्षी मिळाली. त्यातल्या चीचेन इत्झा या नगराचे शब्दचित्र आज मी तुमच्यापुढे रेखाटते आहे. आज जरी ही केवळ अवशेष नगरी असली, तरी कोण एके काळी हे शहर मेक्सिकोच्या माया संस्कृतीचा शिरोमणी होते. ह्या पुरातन, पण प्रगल्भ संस्कृतीच्या भरभराटीचा कळस या शहराने बघितला आहे. नजीकच्या सेनोटे (प्रचंड मोठी नैसर्गिक विहीर)चा जीवनाधार मिळाला, आणि मायांनी या अती उष्ण प्रदेशातही चीचेन इत्झा च्या रूपात नंदनवन फुलवले. धर्मस्थळ म्हणून त्याची ख्याती होतीच, शिवाय राजे, सरदार यांचे निवासस्थान, मोठी बाजारपेठ यांमुळे फार गजबजलेलं शहर होतं चीचेन इत्झा. आजच्या भाषेत मेट्रो सिटीच म्हणा ना! आज त्या गत वैभवाचे काही साक्षीदार तेवढे उरलेत. त्यांपैकी एक म्हणजे एल कास्तीलो हा पिरॅमिड.



एल कास्तीलो पिरॅमिड

९८ फूट उंचीचा हा भक्कम पिरॅमिड. पिरॅमिड म्हणताच डोळ्यांपुढे येणाऱ्या इजिप्तच्या पिरॅमिड सारखा अतिभव्य, परका नव्हे, तर लहानखुरा, जवळचा वाटणारा. सुमारे १५००वर्षे वयोमान असलेल्या ह्या एल कास्तीलो ला जगातल्या ७ आश्चर्यांपैकी एक होण्याचा बहुमान मिळालेला आहे . पण हा किताब मिळण्याचे कारण केवळ त्याची प्राचीनता नव्हे. 'कुकुलकान' ह्या माया संस्कृतीच्या देवतेचे मंदिर म्हणून हा पिरॅमिड बांधल्या गेला. धार्मिकतेसोबतच या मंदिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यामागचे स्थापत्यविज्ञान!

आपलं कोणार्कचं सूर्यमंदिर जसं दगडातील सुबक, कोरीव कॅलेंडर, तसाच हा पिरॅमिड सुद्धा

रेखीव आणि विस्मयकारी काळगणक! पिरॅमिडच्या चारही बाजूंना प्रत्येकी ९१ आणि कळसाला १ अश्या एकूण ३६५ पायऱ्या आहेत. त्या वर्षाचे दिवस दर्शवितात. पिरॅमिडच्या चारही भागांवर प्रत्येकी ५२ फरश्या बसवलेल्या आहेत. दर ५२ वर्षांनी मायांची नवी कालगणना सुरू होत असे. शुक्राच्या परिभ्रमणावर आधारलेलं मायांचं कॅलेंडर फारच कमालीचं होतं. सहा हजार वर्षांच्या कालगणनेत त्यात केवळ २४ तासांचा फरक पडत असे! या पिरॅमिडचे चार कोपरे चार दिशांना अचूक रोखले आहेत. त्यात अंशाचा देखील फरक नाही.

पिरॅमिडच्या या विशिष्ट मांडणीमुळे इथे एक नवलाईची गोष्ट बघायला मिळते. वर्षातून दोनदा, 20 मार्च आणि 22 सप्टेंबर रोजी (दिवस आणि रात्र सम, म्हणजेच 12 तासांचे असणाऱ्या दिवशी) ऊन सावलीचा सुंदर खेळ होऊन, जणू काही सोनेरी नागीण सळसळत खाली उतरते आहे, असा भास होतो. खगोशास्त्र आणि स्थापत्यशास्त्राचा किती सुरेख संगम हा! माया लोकांच्या जीवनात या चमत्काराचे फार महत्त्व होते. नागीण पहिल्यांदा खाली आल्यावर शेतात पेरणी आणि दुसऱ्यांदा आली की, कापणी, असा त्यांचा ठोकताळा असे.

पिरॅमिडची आणखी एक गंमत म्हणजे, त्याच्या पायथ्याशी टाळी वाजविल्यावर 'कुत्साल' ह्या पक्ष्याचा प्रतिध्वनी ऐकू येतो. माया संस्कृतीत हा पक्षी अतिशय पवित्र मानल्या जात असे.

नवल करत जरा पुढे चालावं, तर नजरेस पडते ते अतिविशाल बॉल कोर्ट! इंग्रजी 'आय' अक्षराच्या आकाराचे हे कोर्ट ५४५ फूट लांब आणि २२५ फूट रुंद आहे. एवढ्या भव्य कोर्टाची रचना आणि बांधणी अशी की, एका टोकाला चाललेली कुजबुज सुद्धा दुसऱ्या टोकाला स्पष्ट ऐकू येते. खरं तर, सुमारे १०००वर्षे जुनं हे बॉल कोर्ट, पण आजही खेळता येईल, अश्या सुस्थितीत आहे. 3 ते ४ किलो वजनाचा चेंडू ८ मीटर उंचीवर असलेल्या दगडी वर्तुळांतून टाकण्याचा हा खेळ २ गटांमध्ये खेळला जाई. मात्र, चेंडूला हाताने अथवा पायाने स्पर्श न करता, तो कंबर, खांदे, गुडघे, ढोपर यांनीच टोलवायला हवा, असा या खेळाचा नियम असल्याचं अभ्यासक सांगतात. या खेळाला मोठं धार्मिक महत्व होतं. सामन्यानंतर जिंकणाऱ्या गटाच्या प्रमुखाचा इथे बळी देण्यात येत असे. 'देवाला केलेलं परमोच्च समर्पण', या भावनेने खेळाडूही त्यासाठी तयार होत. बॉलकोर्टच्या भिंतींवर कोरलेले नरबळींचे देखावे बघूनच उरात धडकी भरते. अर्थात, ही संगती आता उपलब्ध असलेल्या अवशेषांवरून, लिपींवरून प्रयत्नपूर्वक लावलेली! खरं तर, अशी किती गुपिते काळाच्या ओघात लुप्त झालीत, ते त्या मायांनाच ठाऊक!

इथला भुतकाळ, इथे नांदलेल्या संस्कृती या साऱ्यांचा वेध घेताना मन वेडावते, हे मात्र खरे. काळाचे गाढे अभ्यासक माया, मग या कालधारेविरुद्ध पोहणे त्यांना जमले असेल का? अनादी, अनंत कालचक्रातले काही क्षण मागे फिरून मी त्यांच्या सोबत घालवू शकेन का? बघितलेली ही छोटीशी झलक मनाची ओढ वाढवते.

या देशाची लाजवाब खाद्यसंस्कृती, डोळ्याचं पारणं फेडणारं निसर्ग सौंदर्य, थक्क करणारी जैव विविधता, गोल चेहऱ्याची अन् टपोऱ्या डोळ्यांची हसतमुख माणसं, हे सारं वेचताना ' किती घेशील दो कराने ' अशी आपली अवस्था होते.

आस्तेक, ओलमेक, माया, तोल्टेक अश्या अनेक संस्कृती इथे उदयाला आल्या, बहरल्या आणि लोप पावल्या. स्पॅनिश आक्रमणानंतर इथले ग्रंथ जाळले गेले, देवांची विटंबना झाली, बळजबरीने धर्मांतर करण्यात आले. पूर्वीच्या साऱ्या खुणा पुसून काढण्यात आल्या. 300 वर्षे स्पॅनिशांच्या गुलामगिरीत राहून आता आपली भाषा, अस्मिता हरवून बसलेत हे लोकं. आज स्पॅनिश हीच मेक्सिकोची राजभाषा झाली आहे आणि आळवणी चालली आहे, ती देखील येशुचीच!

एका समृद्ध देशाची अशी वाताहात झालेली बघून हळहळ वाटते. मनात विचार येतो, आपणही शतकानुशतके पारतंत्र्याचं जोखड वाहिलंच, पण आपली अस्मिता टिकून राहिली. आधीचे मुघल राज्यकर्ते, नंतरचे ब्रिटिश यांचा आपल्यावर प्रभाव पडणे अटळच होते, मात्र कुणीही आपलं भारतीयत्व मुळापासून उपटू शकलं नाही.

कुछ तो बात है हममें, हस्ती मिटती नही हमारी।

तुलूम येथील सागरी अवशेष

पडकी वेधशाळा

स्वच्छ नितळ समुद्रकिनारा

इक बालाम येथील अवशेष

सामाजिक

तीचं स्वातंत्र्य , समाज आणि आम्ही

स्नेहा जोशी
joshisneha.1919@gmail.com

सध्या महिलांवरील अत्याचारांच्या घटना देशभरात गाजतायेत. गेल्या काही दिवसांत किंवा वर्षात अत्याचारांचं प्रमाण वाढल्याचंही दिसुन येतंय. अनेक बदल कायद्यानं करणं अपेक्षित असताना, कुठल्याही कडक शिक्षेविणा आरोपी आजही समाजात उजळ माथ्याने फिरताना दिसतायेत. चुक नेमकी कुणाची, या किचकट प्रश्नाकडे सध्यातरी मी वळत नाही पण एक मात्र खरंय,या गोष्टींना जितक्या समाजातील विकृत नजरा जबाबदार आहेत, तितक्याचं स्त्री स्वातंत्र्याच्या गप्पा मारणार्या तथाकथित पुरोगामी विचारांच्या महिलाही जबाबदार आहेत आणि तितकंचं कुठलीही कठोर कायदे व शिक्षांची अंमलबजावणी न करणारे न्यायालयही जबाबदार आहेचं !!

सध्याच्या काळात भेडसावणारी अजुन एक जटिल समस्या म्हणजे "लव्ह जिहाद" ! अर्थात मुलींना, स्त्रियांना खोट्या प्रेमाच्या जाळ्यात ओढुन त्यांचं धर्मांतरण करुन घ्यायचं. हा उद्योग सध्या सर्वात मोठ्या प्रमाणावर होतो आहे. साधारण वर्षभरापुर्वी मला ओळखीच्या सामाजिक कार्यकर्त्याचा फोन आला, लव्ह जिहादचं प्रकरण आहे, मुलगी १८ वर्षांची आहे आणि पुर्ण संमोहित केलेली आहे, तिचं समुपदेशन करायचंय! मी ऑफिसमधुन तडक त्या कार्यकर्त्याच्या कार्यालयात पोहोचले.मुलगी आणि तिचे आई वडिल आले होते, चेहरे धास्तावलेले दोघांचेही अर्थात त्यांना पुर्वकल्पना नव्हतीचं. त्यांना आश्वस्त करुन सुमारे पाच तासांच्या मॅराथोन समुपदेशानंतर मुलगी जागेवर यायला लागली.ढसाढसा रडुन मोकळी झाली, तेव्हा कुठं आईबापाने सुटकेचा निश्वास टाकला!! पुरोगामी,सेक्युलरांच्या गोड कार्यक्रमांना मानणार्या लोकांना कदाचित हे खोटं वाटेल, पण सध्या हिचं मोठी अडचण आपल्यासमोर ठाकली आहे.जातीपातीत विखरण्यापेक्षाही आपल्या धर्माचा अट्टहास धरा, धर्मासाठी एक होणार्या लोकांचा बिमोड करणं सोप्पं नसतं, हे किमान इतर धर्मीय लोकांकडे पाहुन तरी आपल्या तथाकथित पुढारलेल्या लोकांचे डोळे उघडावेत ही अपेक्षा !!

स्त्री स्वातंत्र्याच्या गप्पा मारणार्या आमच्या समाजात जे चालतं, ते मुळात ते द्वयार्थी होत असतं म्हणजे कसं ना, समजा एखाद्या स्त्रीने आखुड कपड्यातला फोटो सामाजिक माध्यमावर टाकला तर त्यावर येणार्या प्रतिक्रिया, ज्या सामान्यतः जास्त पुरुषांकडुन येतात,त्यात स्त्रीला त्यात वावगं काही वाटत नाही गॉर्जियस, स्टनिंग, सेक्सी या प्रतिक्रिया मानसिक सुखावह असतात त्याचं नजरा जेव्हा तुम्ही रस्त्याने अशाप्रकारे चालता, तेव्हा कुणी न्याहाळलं तर त्या दोषी ठरतात मग विनयभंग होतो!! पण विनयाने आपण वागतचं नाही आहोत, तर तो भंग करण्याचा प्रश्न येतोचं

कुठे ? व्यक्तिस्वातंत्र्य जरी घटनेने दिलं असलं तरी आपली लाज ज्याची त्यालाचं राखायची असते. व्यक्तिस्वातंत्र्य जरी घटनेने दिलं असलं तरी आपली लाज ज्याची त्यालाचं राखायची असते, इतकं बेसिक ज्ञान जरी आपल्याला समजलं, तरी कित्येक अघटित प्रसंग सहजपणे टाळता येतील_!स्त्रीमुक्तीच्या लढ्यात जेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याचा अंतर्भाव झाला, तिथंचं सगळं पाणी मुरलं!!पुरुषप्रधान संस्कृतीच्या नावाने बोटं मोडली कि झालं, आम्ही स्वायत्तेच्या नावाखाली भोंगळं कारभार करायला पुन्हा मोकळे_!!!आपली किंमत आपण ठरवायची असते ना की समाजाने किंवा एखाद्या पुरुषाने!!!

स्त्रीचं स्वातंत्र्य स्त्रीला पुर्वापार परंपरेपासुन बहाल केलं गेलंय, तीला ते मागण्याची गरज तेव्हाही नव्हती आणि आताही नाहीये!!! या तथाकथित फेमिनिस्टांनी स्त्रीला फक्त उघडं पाडायचं काम केलंय, बाकी काही नाही!! बंधने झुगारून स्वातंत्र्य मिळतं म्हणुन सामाजिक परंपरांच्या भिंती ओलांडायच्या आणि स्वतःला आधुनिक म्हणवुन घ्यायचं, अशी जर व्याख्या स्त्रीमुक्तीची असेल तर बाजार चालवणार्या फेमिनिस्ट आणि त्यांच्या अनुयायांची ही घोड चुक आहे!!!

वैचारिक स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य,आचार-विचार-पेहरावाचं इतकंचं काय स्पष्ट बोलण्याचं, मत मांडायचं स्वातंत्र्य आपल्याला दिलं गेलंय, त्याचा सुयोग्य वापर होणं, जास्त महत्वाचंय!! स्त्री व्यक्तिस्वातंत्र्य जर अशाप्रकारे मिरवलं जाणार असेल तर येणार्या काळात स्त्री सुरक्षित राहिल याची शाश्वती नाहीचं! त्यामुळेचं राज्यात काय, भलेही देशात बलात्कार्यांच्या शिक्षेसाठी मोठाले शक्तिशाली कायदे येऊदेत, जोवर सो कॉल्ड "स्वतंत्रवृत्ती"च्या स्त्रिया सहजतेने उपलब्ध होत राहतील, तोवर कुठलीही घटना, कायदा, न्यायालय यांच्या कटघर्यात कुणीचं "पुरुष" कधीही दोषी ठरणार नाहीये हे त्रिकालाबाधित सत्य आहे!!!

भयग्रस्त मानसिक आरोग्य

प्राजक्ता बर्वे
prbarve799@gmail.com

अगदी इतक्यात घडलेल्या दोन घटनांनी मला हे लिहायला प्रेरित केलं.

घटना क्रमांक एक म्हणजे सोशल मिडीयावर वाढत चाललेला depression, anxiety, OCD यांसारख्या शब्दांचा वापर आणि दुसरी म्हणजे मानसोपचारतज्ज्ञांना लागत असलेल्या चाचण्यांच्या courses ची, therapies ची वाढती मागणी.

आता मला सांगा, तुमच्या सोबत असं कधी झालंय का की तुम्हाला प्रचंड ताप आलाय आणि तुम्ही डॉक्टरांकडे न जाता अख्ख्या जगाला सांगत सुटलाय की मला टायफॉईड, मलेरिया किंवा डेंगू झालाय?? म्हणजे साधारणपणे असं वागणारी व्यक्ती ही आपल्याला गॉन केस किंवा मूर्ख वाटेल... बरोबर ना?? पण मजेची बाब म्हणजे हे असं रोज घडतय... अगदी रोज... याच जगात... फक्त शारीरिक नाही तर मानसिक आजारांविषयी. सोशल मीडियावर cool दिसण्यासाठी किंवा काही शब्दांविषयी असलेल्या अर्धवट माहिति अभावी लोकं सर्रासपणे depression, anxiety, OCD इत्यादी शब्द त्यांची gravity, depth न समजता अगदी सहज वापरतात. म्हणजे एखाद्याला स्वच्छतेची नुसती आवड असेल तरीसुद्धा त्या व्यक्तीला OCD चं लेबल चिकटवायच,परीक्षेच्या आधी असलेल्या चिंतेला, "अरे देवा मला खरोखर खूप भीती वाटतेय, मला anxiety disorder तर नसेल ना?" असं म्हणायचं किंवा ब्रेकअप झाल्यावर #depressed हे आपली पिढी अगदी सहज वापरते. याचा अर्थ हा नाही की या सर्व घटनांमुळे हे सगळे आजार होऊच शकत नाही, फक्त ते तज्ञांना ठरवू द्या इतकंच माझं म्हणणं आहे. तज्ञ किंवा एक्स्पर्ट हे त्या आजारांविषयी अधिक उत्तम जाणतात आणि त्यांनी सांगितल्यावर एक प्रकारचं authentication येतं जे अत्यंत महत्त्वाचं असतं.

कसं आहे ना, कोणत्याही authentication शिवाय जेव्हा लोक हे सगळे शब्द वापरतात तेव्हा या सगळ्या शब्दांचं महत्त्व कमी होतं आणि जे खरंच या आजारांनी ग्रस्त आहेत, ते, हे सगळं नॉर्मलच आहे असं समजून कधी तज्ञांना भेटतच नाही आणि त्यांची उगाच फरफट होते.

पुढची महत्त्वाची घटना म्हणजे सर्टिफिकेशन कोर्सेस मध्ये झालेली वाढ. हल्ली अशा अनेक संस्था आहेत ज्या अनेक चाचण्या अनेक थेरेपी या कोर्सेस च्या माध्यमातून शिकवतात आणि मुख्य म्हणजे ते असंही सांगतात की तुम्ही हा कोर्स किंवा ही थेरेपी पूर्ण शिकलात की तुम्ही एक्सपर्ट किंवा तज्ञ होता आणि यापेक्षा भयंकर बाब म्हणजे असे कोर्सेस करून लोक प्रॅक्टिस सुद्धा करतात. एखाद्या गोष्टीत आपण तीन-चार दिवस घालवले म्हणजे आपण तज्ञ झालो असं अनेक फ्रेशर्सना वाटतं ही खरोखरच भयंकर गोष्ट आहे.

या तीन-चार वर्षात मानसिक आरोग्याबद्दल दखल घेण्यात येतेय ही खूप चांगली गोष्ट आहे पण वर सांगितलेल्या दोन घटनांमध्ये होणाऱ्या वाढी बद्दल अनेक तज्ञ चिंता व्यक्त करतायत.

दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी, ज्यांना मदत हवी आहे अशांनी, लक्षात ठेवायला हव्या त्या म्हणजे- एक सर्वप्रथम शहानिशा न करता आपल्याला एखादा आजार झालाय असं डिक्लेअर करू नका आणि दुसरं शहानिशा करण्यासाठी तज्ञांकडेच जा. वर सांगितल्याप्रमाणे अनेक लोक 4-5 दिवसांच्या कोर्सेस च्या भरवश्यावर सुद्धा आम्ही मानसोपचार तज्ञ आहोत असं सांगतात, त्यामुळे आपली तज्ञाची निवड ही नीट निरखून पारखूनच करा.

या दोन गोष्टी वगळता आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्याला मानसिक आजार आहे किंवा असण्याची शक्यता आहे याबद्दल न्यूनगंड बाळगू नका. हे जरी कितीही खरं असलं की भारतीय समाज अजूनही मानसिक आजारांच्या बाबतीत तितका ओपन माईंडेड नाहीये तरी सुद्धा हळूहळू काळ बदलतोय... अशा रुग्णांचा सुद्धा स्वीकार होतोय... आणि मानसिक आजार कधी बरा होणारच नाही हे सुद्धा खरं नाहीये... त्यामुळे गरज असेल तर एक पाऊल आपल्यासाठी, स्वतःच्या मनासाठी नक्की उचला.

विशेष मुलांकडे पाहण्याची समाजाची मानसिकता बदलण्याची

सौ. वर्षा किडे कुलकर्णी
varshakulkarni73@yahoo.com

मतिमंदत्व ,गतिमंदत्व, मेंदुचा पक्षाघात ,स्वमग्नता, इतर कारणांमुळे अपंगत्व आलेल्या दिव्यांगांचा आपल्या जीवनात मनापासनू स्वीकार करणे पालकांसाठी समाजासाठीही अत्यंत गरजेचं असतं. आपले मूल हे सामान्य नसून विशेष मुल आहे हे लक्षात आल्यावर पालक मानसिकदृष्ट्या खचनू जातात.हे स्वाभाविक ही असतं. आपले मुल जसे आहे तसे स्विकारून त्याचे योग्य पालनपोषण करत त्याच्या शिक्षणासाठी, सर्वांगीण विकासासाठी झटणे अत्यंत जिकरीचे काम असते. पालकांसाठी ते एक आव्हान , परीक्षाच असते. विशेष मुल जन्माला येणं यात ना त्या पाल्याचा दोष असतो ना पालकांचा. तरीही या विशेष मुलांकडे पाहण्याचा भारतीय पालकांचा समाजाचा दृष्टीकोन वेगळा होता. जो अत्यंत चुकीचा होता. नशीब,भोग ,पूर्वसंचिताचे फळ,कर्माचे फळ वगैरे मानून पालक पाल्याला व स्वतःलाही दोष देत असत. हा दृष्टीकोन सर्वप्रथम अमेरिकन लोकांनी बदलला. ते अपंग,दिव्यांग व्यक्तीला हँडीकॅप्ड न म्हणता 'फिजिकली चॅलेंज्ड कीड' म्हणायला लागले, मतिमंद न म्हणता 'स्पेशल कीड' म्हणायला लागले. नशिबाला दोष न देता देवाच्या मर्जीने आपल्या पोटी हे विशेष मुल जन्माला आलेय असा सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन या गोष्टीकडे पाहायला शिकले. सोनोग्राफीत मुल ॲबनॉर्मल आहे हे माहित झाल्यावरही गर्भपात न करता ते मतिमंद दिव्यांग मुलांना जन्म देऊ लागले. देवाची इच्छा व देव पालक ,आपण फक्त त्या विशेष मुलांचे 'बेबीसिटर्स ',देखभाल करणारे' केअर टेकर' असतो अशी अमेरिकन लोकांची भावना असते. असाच उदात्त सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन आज अनेक संस्था विशेष मुलांसाठी कार्यकरत आहेत . विशेष म्हणजे अशा मुलांच्या पालकांनी पुढाकार घेऊन समाजातील इतर दिव्यांगांसाठी संस्था निर्माण केल्या आहेत . त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटत आहे. शिक्षणासोबतच खेळ, विविध कलांमध्येही मुले पारंगत होत आहेत. विविध छोटे छोटे व्यसाय करून आपल्या पायावर उभे राहनू आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत. कालमानानुसार पालकांच्या समाजाच्या विशेष मुलांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात सकारात्मक परिवर्तन व्हायला लागले आहे.

असे असले तरी पालकांना आपल्यानंतर या विशेष मुलांचे काय होणार ही मोठ्ठी चिंता पोखरत असते. कारण त्यांच्या हयातीत ते पालक म्हणनू आपले कर्तव्य जबाबदारी एक परीक्षा सचोटीने पार पाडावी तशी पार पडत असतात. पण तरीही आपल्यानंतर मुलाचे काय होणार ही चिंता सतावत असते. अशी चिंता वाटणे रास्तही आहे. ही बाब लक्षात घेऊन पालकांच्या मृत्युनंतर त्यांच्या पाल्यांच्या निवासाची सोय करण्यासाठी वसतिगृह बांधण्याचे ठरवले आहे. हे उचललेले महत्त्वाचे पाऊल निश्चितच अभिनंदनीय आहे. हे पाऊल उचलणे गरजेचेच होते. माझी मावसबहीण, चुलतभाऊ शेजारी राहणारा मुलगा अशा तीन विशेष मुलांचं जीवन मी जवळून अनुभवलंय. त्यांच्या पालकांना होणारा त्रास ,विशेष मुलांच्या संगोपनात

येणाऱ्या समस्या, आ वासनू उभे राहणारे प्रश्न यांची मला तीव्रतेने जाणीव आहे. त्यांच्या अनुभवावर मी 'कसोटी' ही कथा पण लिहिली आहे. माझी मावस बहीण तर तिच्या १९ व्या वर्षी नैसर्गिकरित्या गेली पण सुंदर आवाज संगीताची उत्तम जाण असलेल्या भावाचे काका काकूंपश्चात प्रचंड हाल झाले. भाऊ भावजयनेत्याला वेडा ठरवून त्याची रवानगी जबरदस्ती ने मेंटल हॉस्पिटलला केली, तो वेडा नसतानाही. तेथील वेड्यांनीच त्याचा जीव घेतला. तेव्हा ना स्पेशल स्कूल्स नव्हत्या ना वसतिगृह. अशया समस्या पाल्यांच्या बाबतीत निर्माण होऊ नये म्हणून विशेष मुलांच्या निवासासाठी, देखभालीसाठी वसतिगृह बांधण्याचे पाऊल योग्यच म्हणता येईल.

विशेष मुलांसाठी झटणे हे फक्त त्यांच्या पालकांचे काही ठराविक संस्थांचेच काम नसून समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपण समाजाचे काही देणं लागतो हे सामाजिक भान जपत समाजऋण फेडण्याचा काही अंशी तरी प्रयत्न करायला हवा . मला सांगायला आनंद होतोय की मी माझ्या लेखनातनू अन्य सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन तसा अल्पसा प्रयत्न करते समाजऋण फेडण्याचा. वरदान, अरुणोदय, श्रद्धानंदापेठ अनाथालय, स्विकार अन्य अनेक संस्थांशी माझा संबंध आलाय . विशेष म्हणजे २००७ साली भारतातील पहिली 'ऍनिमल असिस्टेड थेरपिस्ट' मीनल कवीश्वर हिची मी मुलाखत घेतली होती जी एका वृत्तपत्राने पूर्ण पानभर छापली होती. मतिमंद, स्वमग्न, अंध, बेडरिडन कॅन्सरग्रस्त रुग्ण इतर दिव्यांगांच्या उपचारासाठी पाळीव प्राणी पक्ष्यांचा ती उपयोग करते, तिचा हा प्रयोग अत्यंत यशस्वी झालाय. तिच्या या थेरेपीने उत्तम सकारात्मक रिझल्ट्स दिले आहेत म्हणनच्ू आज ती भारतातील नव्हेतर जगातील अग्रगण्य थेरपिस्ट म्हणनू प्रख्यात झालीये.

आज विशेष मुलांसाठी ,दिव्यांगांसाठी विशेष शाळा अनेक संस्था कार्यरत आहेत. नवनवीन उपचार पद्धती,तंत्रांचा संसाधनांचा अवलंब होत आहे. विविध उपक्रम राबवले जात आहेत. कार्यशाळा घेतल्या जात आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण दिल्या जात आहे. शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकास साधत आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी स्वयंरोजगाराचे ज्ञान देऊन त्यांना जी न जगण्याचे बळ ऊर्जा देत आहेत. त्यांचं पुनर्वसन करत आहेत. खेळांच्या विविध स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत . ही विशेष मुलंही शिक्षण, खेळासोबत गायन, वादन, नृत्य, चित्रकल अन्य कलांमध्ये निपुण होत आहेत. मुलंही रसिकतेने आस्वाद घेत आहेत. सामान्य मुलांप्रमाणे आम्हीही जगू शकतो हा आत्मविश्वास पालकांनी, शिक्षकांनी, संस्थांनी त्यांच्यात निर्माण केलाय ही अभिनंदनीय बाब आहे.

या बाबतीतला माझा एक अनुभ सांगते की मी जें व्हा गाण्याच्या कार्यक्रमाच्या रिपोर्टीगला जाते तेव्हा एक विशेष मुलगा प्रत्येक कार्यक्रमात दरवेळी पहिल्याच रांगेत बसलेला असतो. गाण्यांचा तो तन्मयतेने श्रवणानंद लुटत असतो. गाण्यांवर बेधुंद नाचतो,थिरकतो. एवढेच नव्हेतर सूत्रसंचालक जी काही माहिती गाणे, गीतकार ,संगीतकार, चित्रपट ,कलाकारानंबाबत सांगत असतात ती माहिती हा टिपून घेत असतो वहीत. मला त्याचे व त्याच्या पालकांचे खरंच कौतुक वाटते ते यासाठी की ते न चुकता त्याला प्रत्येक कार्यक्रमाला घेऊन येतात. सामान्य मुलांप्रमाणेच या विशेष मुलांची आवड ओळखून ,तिला प्रोत्साहन देऊन ती वाढ जपायला, जोपासायला हवे ते सहकार्य पालकांनी

करणे महत्त्वाचे असते. समाजाचीही या पालकांना या विशेष मुलांना महत्त्वाची साथ हवी . त्यांचा मोठ्या मानाने स्विकार करायला हवा कारण ते ही समाजाचाच एक अविभाज्य घटक आहेत. त्यासाठी पालक समाजाचा विशेष मुलांकाडे पाहण्याची मानसिकता दृष्टीकोन बदलायला हवा हेच मी आवर्जून म्हणेल. त्यासाठी समाज मनाच्या जागृतीची अद्यापही थोडी गरज आहे असे. मला वाटते. विशेषतः त्या पालकांवर समाजावर ज्यांच्या वर पाप पुण्य,नशीब,दैव,नियती, पूर्वसंचित या संकल्पनांचा प्रचंड पगडा आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात हा पगडा जास्त आहे म्हणून तिथे याबाबत काम करणे गरजेचे आहे. विशेष शाळा संस्थांची ग्रामीण भागात जास्त आवश्यकता आहे.

आरोग्य

आरोग्यदायिनी–अरोमा थेरपी

सौ. अमिता कानडे
amita.aromatherapy@gmail.com

दिवाळी अभ्यंग स्नानासाठी उटणे वापरतो हे सुगंधी द्रव्यानी परिपूर्ण असत. यात वाळा, चंदन, गौलाकाचरी नागरमोथा असतो. वाळा व चंदन सुगंधी असतात व शितलता देतात. नागरमोथामुळे रक्ताभिसरण वाढते. अंबे हळदीत जंतू विरोधी तत्त्वे असतात. त्यामुळे त्वचा स्वच्छ सुगंधी होते व मन प्रसन्न, आनंदीत राहते. दिवाळीची सुरूवात अशा प्रसन्न आनंदी मनाने होते. अशा प्रकारे उटणे, उटि लेप लावण्याची प्राचीन भारतीय परंपरा आहे. सुगंधी द्रव्यामुळे दीर्घ श्वसन होते. त्यामुळे शरिरात प्राणवायुचा अधिक पुरवठा होतो. रक्ताभिसरण चांगले होते. थकवा नाहीसा होतो व मन प्रसन्न शांत होते.

सुगंधी द्रव्ये ही नैसर्गिक असावी. याउलट अनैसर्गिक असल्यास जसे अत्तर, सेंट्स , डिओरेंट यामध्ये पेट्रोलियम प्रोडक्ट असल्यास श्वासाचे त्रास , दमा एलर्जी तर कधी कॅन्सरसारख्या त्रासांना सामोरे जावे लागते व पर्यावरणास घातक असतात. कृत्रिम सुगंधी तेलाच्या निर्मितीला हजारो रुपये खर्च येत असेल तर नैसर्गिक (अरोमा ऑईल) च्या निर्मितीसाठी लाखो रुपयात खर्च येतो. कारण की,

Essential oils Extract करणाच्या पद्धती:-

Distillation - बाष्पीभवन यंत्राच्या मदतीने

Expression - दाबून तेल काढले जाते.

Solvents - यात row material and solvent एकत्र गरम करुन त्यावर प्रक्रिया केली जाते. सेंट, अत्तर वापरुन जे नुकसान होते. तेथे (अरोमा ऑईल्स) परिपूर्ण नैसर्गिक तेलांच्या काही थेंबानी शारिरीक, मानसिक त्रासापासून मुक्तता होते.

प्राचीन काळी ऋषीमुनी यज्ञामध्ये चंदन कापूर गुगूळ, अगर, तगर धूप, लोबान अशा सुगंधी द्रव्यानी हवन करत असत. त्यापासून शारिरीक, मानसिक आजारापासून मुक्तता मिळत असे. त्याचबरोबर पर्यावरणाचे संतुलन राखले जायचे. जे आजही गरजेचे आहे. सुगंधांनी मेंदूमध्ये निर्माण होणाऱ्या लहरीचे नियमन होते, शरिरातील ग्रंथीचे काम सुरळीत होते व माणसाचे आरोग्य सुधारते. रोगांपासून मुक्ती मिळते.

अशा प्रकारे सुगंधाचा व वनस्पतीच्या ठिकाणी असलेल्या गुणांचा रोगनिवारणासाठी उपयोग ज्या थेरपीत केला जातो, तिला अरोमा थेरपी असे म्हणतात.

श्वासोश्वास या शब्दात श्वास व उच्छ्वास हे दोन शब्द आहेत.आपण नाकाने हवा शरिरात घेतो तो "श्वास " व शरिर बाहेर टाकतो "उच्छ्वास ". वातावरण शुद्ध व सुगंधीत असेल तर आपण आपोआप दीर्घ श्वसन करतो. हवा अशुद्ध किंवा दुर्गंधित असेल तर नाक बंद करतो, आपल्याला हा संकेत मिळतो की ही हवा अपयाकारक आहे. त्यामुळे यात नाक, मेंदू यांची संवेदनाशिलता कारण ठरते. आपले नाक १० हजारपेक्षा जास्त वास लक्षात ठेवू शकतात व रोज ५०० घनफूट हवा स्वच्छ करते. वासांनी आपल्या शरिरात होणारे रोजचे परिणाम आपल्या सर्वांना ज्ञात आहे. जसे जीर, आलं,

बडीशोप यांच्या वासाने लाळ सुटते व अन्न पचनास मदत होते. तर काही वासांनी भूक लागते. काही वासांनी मन शांत होते, झोप लागते.

अरोमा थेरपीत २०० हून अधिक इसेंशन ऑईल आहेत. त्यातील ३० व ४० ऑईल आपण घरगुती उपचारासाठी वापरतो. कारण त्यात सूज व वेदना कमी करणारी विषांचा निचरा करणारी, रक्ताभिसरण वाढवणारी, बीपी वाढवणारी व कमी करणारी , पाचक, निद्राकारी, उत्साह वाढवणारी, कफ बाहेर काढणारी असे अनेक गुणधर्म असणारी मनातील भीती, चिंता, राग कमी करणारी आहेत. त्यासाठी काही थोडकी उदाहरणे Aniseed - पचनासाठी, कफ सर्दी बाहेर टाकणारी, चंदन - मानसिक शांतीसाठी, लव्हेंडर - शारिरीक मानसिक ताण व दुःख कमी करण्यासाठी, रोझ ऑईल - प्रेम व आनंदाची कमतरता दूर करते, जास्मीन - उत्साहासाठी आणि जॅरनियम, निलगिरी, थाईम, जोजोबा अशी बरीच मोठी यादी आहेत. प्रत्येक तेलांच्या ठिकाणी गुणधर्माचे भंडार आहे व ते वेगवेगळे आहेत. या इंसेनशल ऑईलचे बेसिक तेलामध्ये काही थेंब घालून फॉर्म्युला बनवला जातो. तो एक स्वतंत्र्य विषय आहे. कारण त्यात तेलांचे गुणधर्म व रोगांची सांगड घालून परिणाम साधायचा असतो. व तो काही तासांत प्रभावीपणे दिसतो.

या थेरपीचे उपचार घरच्या घरी करू शकतो. ते सुरक्षित व पुरक ट्रीटमेंट म्हणून

१. आंघोळीच्या पाण्यात तेलाचे थेंब घालून स्नान करणे.

२. ओल्या नॅकपिनवर तेलाचे थेंब टाकून त्या नॅकपिनच्या दुसऱ्या बाजूने अंगावर किंवा सूज दुखवा असलेल्या भागावर हळूवार घासणे.

३. काही वेळा मसाज हा उपचार घेता येतो.

४. रुमाल व टिशू पेपरवर थेंब टाकून त्याचे दीर्घ श्वसन करुन परिणाम साधता येतो.

५. रूम स्प्रे व व्हेपोरायझरचा वापर करुन वायुमंडळ व वास्तू सुगंधित करू शकतो.

ही थेरपी कोणत्या क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करू शकते ते पाहुया.

१. केसांच्या तक्रारी

२. त्वचेच्या तक्रारी

३.मानसिक त्रास जसे चिडचिडेपणा, आत्मविश्वास अभाव, चिंता काळजी, तणाव, भय, निरुत्साह, आळशीपणा, मानसिक थकवा, निद्रानाश

४. तसेच वयाच्या पन्नाशीनंतर येणाऱ्या समस्या झोप न येणे, अपचन, ग्रॅस व पायात क्रॅम्प , व्हेरीकोज मेन्स, रोग प्रतिकारक शक्ती

५. स्त्रियांसाठी पाळी संबंधी तक्रारी, त्वचा, केस, डोकेदुखी, कंबरदुखी, मेनोपॉझ, मूळव्याध इ.

६. झाडे व बाग , पाळीव प्राणी या संबंधीच्या रेमिडेज् सुद्धा उपलब्ध आहेत.

७. घरातील स्वच्छता फ्रीज, कपाट, कपडे, बेडरूम, बाथरूम सुगंधीत व जंतूपासून सुरक्षित

ठेवू शकतो. वायुमंडळ निरामय ठेवू शकतो.

८. लहान बाळांच्या समस्यांसाठी जसे नॅपी रॅश, जंत, अनिद्रा इ. मसाजसाठी ऑईल.

९. प्रवासात होणाऱ्या त्रासापासून जसे की हवा बदल, थकवा, जेटलॅग यात उपयुक्त ठरते.

या अरोमा थेरपीचा लाभ सर्वांनी घ्यावा.

We provide Remedial Treatment, Essential Oil Formula and we also conduct Online Workshop on Aroma therapy.

For further Enquires Contact:

Mrs. Amita Kanade: 9869561670

amita.aromatherapy@gmail.com

तिच्यासाठी “होमियोपॅथी”

डॉ. गौरी दामले
gaureedamale@gmail.com

“ती” कदाचित घरातील सगळ्यात महत्वाची व्यक्ती, सकाळी उठल्यापासून कित्येक गोष्टी या तिच्यावरच अवलंबून असतात. मुलांना शाळेत जाण्याकरता उठवण्यापासून ते रात्री परत उद्याचे शाळेचे वेळापत्रक भरे पर्यंत “तीची” मदत ही लागतेच. पण बऱ्याचदा असं लक्षात येतं की तीच्याच आरोग्याकडे दुर्लक्ष होतं. पुर्वीच्या काळा एवढ जरी दुर्लक्ष तीच्या आरोग्याप्रती होत नसलं तरी घरात तीच आरोग्य सगळ्यात शेवटच्याच क्रमांकावर असतं.

आज मी तुमच्याशी तीच्या आरोग्या बद्दलच बोलणार आहे. विशेषत: होमियोपॅथी सारख्या सौम्य, सोप्या आणि कोणत्याही दुष्परिणाम न होणाऱ्या पॅथीच्या मदतीने आपण तीच्या आरोग्याची काळजी कशी घेऊ शकतो हे जाणून घेणे फ़ारच महत्वाचे ठरू शकते.

आपण जेंव्हा तीच्या समस्या किंवा त्रास या बद्दल बोलतो तेंव्हा ऋतुप्राप्ती पासून ऋतुसमाप्ती पर्यंतचा सगळ्याच समस्या आपण लक्षात घ्याययला हव्या. कोणत्याही मुलीची मासिक पाळी सुरू झाल्यानंतर काही महिन्यांपर्यंत कदाचित त्या सगळ्याशी जुळवून घेणे तिला कठीण जाते. त्यावेळेला होणारा त्रास हा प्रत्येकीकरता वेगळा असतो. सामान्य पणे ओटी पोटात दुखणे, पायात गोळे किंवा वेदना तसेच फ़ार कमी किंवा जास्ती प्रमाणात रक्तस्त्राव होणे (Dysmenorrhea)अशा प्रकारच्या तक्रारी घेऊन मुली किंवा महिला येतात. या सगळ्या गोष्टी बऱ्याचदा hormonal imbalance मुळे होण्याची शक्यता असते. काही मुलींमध्ये वैवाहिक जीवन सुरू झाल्यानंतर हे त्रास कमी किंवा नाहीसे देखील होतात. आणि म्हणूनच मला इथे सगळ्यांना सांगावेसे वाटते की अगदी सुरवातीलाच होमियोपॅथी सारख्या सौम्य आणि घेण्यास सोप्या असलेल्या उपचार पद्धतीचा अवलंब जर आपण केला तर कोणत्याही दुष्परिणामांविना आपल्याला नक्कीच फ़ायदा मिळू शकतो.

महिलांमध्ये सामान्यपणे दिसून येणारी आणखीन एक समस्या म्हणजे मासिक पाळीच्या काही दिवस आधी किंवा नंतर पांढऱ्या पाण्याचा त्रास (White Discharge). या त्रासामुळे तर थकवा आणि गळल्या सारखे देखील होते. अशा वेळेला देखील होमोयोपॅथीक उपचारांसह आहाराचे नियोजन योग्य पद्धतीने केल्यास व त्याला व्यायामाची जोड दिल्यास आपल्या समस्या नाहीशा होऊ शकतात.

आजकाल PCOD आणि PCOS सारखे शब्द देखील वारंवार ऐकायला किंवा वाचायला मिळतात. या समस्या पुर्वी नव्हत्याच असे नाही, पण निदानाच्या प्रक्रिया बदलल्या, वैद्यकिय शास्त्र देखील तेवढे पुढे गेले ज्यामुळे लवकर आणि वेळेत गोष्टी लक्षात आल्या तर त्यावर औषधोपचार करणे सोपे झाले आहे. PCOD आणि PCOS अशा समस्या आहेत जिथे शारीरिक स्तरावरच नव्हे तर मानसिक स्तरावर देखील, चिडचिड, ताण, नैराश्यासारखी लक्षणे जाणवू शकतात. आणि या आधी सांगितल्या प्रमाणे इथे सुद्धा होमियोपॅथी आपल्याला नक्कीच उपयुक्त ठरू शकते.

ऋतुसमाप्ती सारख्या महत्वाच्या बाबीचा विचार आपण केला नाही, तर हा लेख कदाचित पूर्णच होणार नाही. ऋतुसमाप्ती (Menopause) हा देखील महिलांच्या आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा असतो. मी तर असं म्हणेन की हा काळ तसा फ़ारच नाजूक असतो, सगळ्यात महत्वाचे म्हणजे प्रत्येक स्त्रीला याचा वेगवेगळा त्रास जाणवू शकतो, या काळा मध्ये मानसिक त्रास, चिड चिड आणि चिंता या सारख्या गोष्टी सामान्यपणे जाणवू शकतात. इथे सुद्धा होमियोपॅथी नक्कीच आपल्या मदतीला येऊ शकते, मला असे आवर्जून सांगायला आवडेल की अशा समस्यांमध्ये आपण होमियोपॅथीची निवड केल्यास, आपला त्रास तर नक्कीच बरा होईल पण इतर पॅथींमुळे होणारे दुष्परिणाम (वजन वाढणे, त्वचा आणि केस गळण्याच्या समस्या) देखील आपल्याला जाणविणार नाही.

तर मग आपली नेमकी समस्या जाणून ,योग्य त्या होमियोपॅथीक चिकित्सकाचा सल्ला घ्या आणि अगदी सहज सोप्या, कोणत्याही दुष्परिणामांविना असलेल्या औषधांची निवड करत, आपले आरोग्य आपल्या हातात ठेवा.

मुलाखत

संवाद - अनुवाद

सौ. रेखा - चवरे जैन
rekhachaware@gmail.com

मुलाखत - अनुवादक उमा कुलकर्णी

भैरप्पा, अनंतमूर्ती, गिरीश कर्नाड, शिवराम कारंथ , पूर्णचंद्र तेजस्वी या आणि इतर कन्नड लेखकांच्या साहित्याचे मराठीत अनुवाद केले आहेत.

मुलाखतकार - रेखा चवरे

लेखिका म्हणून प्रसिध्द आहेत.

हे रत्न भारताचे - लता मंगेशकर, मोगरा फुलला (संपादित), हृदयगंधर्व (संपादित), स्वरसाधना (संपादित) ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

एका पुस्तक प्रदर्शनात संवाद - अनुवाद हे जाडजूड पुस्तक बघितलं. त्यावर नाव बघितलं. उमा कुलकर्णी हे नाव दिसल्याबरोबर ते घेतलं. यापूर्वी केतकर वाहिनी हे उमाताई यांनी लिहिलेलं पुस्तक वाचलं होतं. त्यांची काही अनुवादित पुस्तके ही वाचली होती. त्यामुळे सहाजिकच या पुस्तकाबद्दल उत्सुकता निर्माण झाली.

उमाताई यांनी त्यांच्या या आत्मकथनातून उलगडलेला वैविध्यपूर्ण जीवनपट वाचून मी भारावून गेले. त्यातून उमाताईंचा अनुवादाचा उन्नत प्रवास कळत गेला. कन्नड भाषा वाचता येत नसताना त्या भाषेतील अनुवाद त्यांनी केले ही मला त्यांच्यातली विशेष अशी गोष्ट जाणवली. सहजपणे अनुवाद करत पुढे जाणाऱ्या उमाताईंना भेटण्याची, त्यांच्याशी बोलण्याची मलाओढ लागली.

अनुवाद हा विषय नेहमीच माझ्या उत्सुकतेचा विषय राहिला आहे अनुवाद करताना अनुवादक काय विचार करत असतील याची जिज्ञासा मला सदैव असते म्हणून मी अनुवादा संबंधी लेखांचं वाचन करत माझी उत्सुकता शमविण्याचा प्रयत्न करते. संवाद - अनुवाद वाचल्यानंतर तर उमाताईंशी बोलावं असं मला तीव्रतेनं वाटलं. त्यादृष्टीने खटपट करून मी त्यांचा नंबर मिळवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. प्रयत्नाला यश आलं आणि मी त्यांच्याशी संवाद साधू शकले. माझी फारशी चौकशी न करता त्यांनी मुलाखतीस होकार दिला.

प्र. तुम्हाला भाषेची आवड आहे तर अनुवादात रमण्याची आणखी काही कारणं कोणती ?

उ. मला भाषेची आवड आहेच पण साहित्याची आवड त्यापेक्षा जास्त आहे. कथा - कादंबऱ्या ज्याला आपण ललित साहित्य म्हणू तसं मला खूप आवडतं. बालपणापासून मला वाचनाची आवड होती. ती आवड जास्त महत्त्वाची आहे. अनुवादात रमण्यासाठी साहित्याची आवड हे कारण अग्रक्रमाने येते.

दुसऱ्या क्रमांकावर भाषेची आवड आहे असं म्हणता येईल.

प्र. साहित्याशी आणि कन्नड भाषेची नाळ जुळण्यासाठी तुमचं बालपणीचं वातावरण कसं पोषक ठरलं ?

उ. माझं बालपण बेळगावमध्ये गेलं. बेळगाव म्हणजे कर्नाटकाचा उत्तरेकडचा आणि महाराष्ट्राच्या दक्षिणेकडचा भाग. या दोन्ही राज्यांच्या जवळजवळच्या सीमारेषांच्या हा भाग आहे. तेथे कन्नड आणि मराठी या दोन्ही भाषा सारख्या प्रमाणात बोलल्या जात होत्या. भाषिक तेढ नव्हती. बहुतांशी सर्वांना या दोन्ही भाषा सहजासहजी येत होत्या. तेथे भाजी विकायला येणाऱ्या मराठा भाजीवाल्या येत. त्यांनादेखील कानडी येई. दुकानदारांना वगैरेही कन्नड येणं हे स्वाभाविकच होतं. या शिवाय बरेच नातेवाईक कानडी होते. माझ्या आईचं आजोळ कानडीच होतं. माझ्या वडिलांकडे मात्र मराठी वातावरण होतं. माझ्या वडिलांचं शिक्षण मराठीतून झालं होतं पण ही सगळी मंडळी कन्नड छान बोलत. घरी येणारे पाहुणेही कानडी असतं. त्यामुळे कानावर कानडी भाषा पडणं नैसर्गिक आणि स्वाभाविक होतं. माझं शिक्षण मात्र मराठीत झालं. पदवी परीक्षेपर्यंत माझा मराठी विषय होता. माझं लग्न कानडी घरात झालं. त्यामुळे लग्नानंतरही कानडी भाषेच्या संपर्कात राहिले.

प्र. साहित्याची आवड आणि अनुवाद करणं हा योग कसा जुळून आला ?

उ. साहित्याची मला बऱ्यापैकी आवड होती. बी. ए. ला मराठी विषय प्रमुख असल्यामुळे सहाजिकच मराठी साहित्याचं वाचन व्हायचं. आमचे शिक्षक आणि प्राध्यापक खूप चांगले होते. साहित्यिक अनंत मनोहर आम्हाला शिकवित. आमचे अनेक शिक्षक पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त अनेक संदर्भ रोचक पद्धतीने ते देत. साहित्यामधील नवीन काय, चांगलं काय याच्याही चर्चा सतत वर्गात चालत. चक्र नावाची वेगळी आणि चांगली कादंबरी मराठी साहित्यात आहे ही माहिती आम्हाला त्याच वेळी होती. 'मंत्रावेगळा' कादंबरीही तेव्हा नुकतीच आली होती आणि ती ही वेगळ्या प्रकारची होती हे लक्षात आलं होतं. 'दुसऱ्या' बाजीरावांबद्दल जे समज - गैरसमज प्रचलित आहेत त्यापेक्षा पूर्णपणे वेगळं चित्रण या कादंबरीत आहे. आमच्या प्राध्यापक - शिक्षकांनी अशा प्रकारे मराठी साहित्याचं ज्ञान दिल्यामुळे आणि माझं वाचनही असल्यामुळे ती माझी आवड वाढत गेली. विवाहानंतरही ती आवड वाढत गेली. माझा लग्न बी.ए. च्या शेवटच्या वर्षाला असताना झालं. लग्न आधी आणि परीक्षा नंतर झाली. लग्नानंतर पुण्याला आले. पुण्यातही मी लायब्ररी लावलेली होती आणि वाचन चालूच राहिलं. माझे पती विरुपाक्ष कुलकर्णी अभियंता होते. दारुगोळा फॅक्टरीत ते कामाला होते. त्यांनाही साहित्याची आवड होती. मी जे काही दिवसभर वाचायचे ते मी त्यांना सांगायचे. आमच्या चर्चा व्हायच्या. १९७८ च्या सुमारास शिवराम कारंत यांना कानडी भाषेसाठी ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. कन्नड भाषेला मिळालेला हा तिसरा बहुमान होता. या आधीचे दोन्ही ज्ञानपीठ पुरस्कार काव्य प्रकाराला होते. के. वी. पी.पुतप्पा यांच्या रामायणदर्शनम् आणि द.रा.बेंद्रे यांच्या नाकुतंति या काव्यसंग्रहाला आणि आता शिवराम कारंत

यांच्या कादंबरीला हे पुरस्कार मिळाले. कादंबरी या साहित्य प्रकाराचं मला खूप आकर्षण म्हणून मला या पुरस्काराबद्दल विशेष आत्मीयता वाटली. शिवाय साहित्याचं आकर्षण असल्यामुळे त्याबद्दलची मोठी बातमी मला लगेच कळली. दुसरं कारण असं झालं मराठी फक्त वि. स. खांडेकर यांच्या 'ययाती' ह्या कादंबरीला ज्ञानपीठ मिळाला होता. तेवढा एकमेव पुरस्कार मराठीला होता. मराठीतलं बराचसं दर्जेदार साहित्य मी वाचलं होतं. आणि हे साहित्य चांगलं आहे हे मला वाचून माहिती होतं. साहित्याची तेवढी जाण मला त्याहीवेळी होती. साहित्याची आवड असल्यामुळे ज्ञानपीठ पुरस्कार विजेती कादंबरी काय आहे हे जाणून घेण्याची मोठी इच्छा मनात निर्माण झाली.

अगदी बरोबर ! ज्याला साहित्यातील एवढा मोठा पुरस्कार मिळाला ते तुम्हाला जाणून घ्यावसं वाटलं.

विरुपाक्ष यांनी ती कन्नड कादंबरी मिळविली. त्यावेळी पुण्यामध्ये कन्नड पुस्तके मिळण्याचा प्रश्न होता. पुस्तके सहज उपलब्ध होत नव्हती. आता ऑनलाइन मागवता येतं. पण तेव्हा विरुपाक्षनी खटपट करून ती कादंबरी मागवली आणि ती त्यांनी स्वतः वाचली. ते वाचत असताना या कादंबरीत काय आहे हे मी त्यांना कुतुहलाने विचारत असायचे. उत्कंठा वाढवणारी ती कादंबरी होती. त्यामुळे ती कादंबरी समजून घेण्याची मला ओढ लागली. मला कन्नड चांगलं बोलता येतं पण मला कन्नड लिहिता - वाचता येत नाही. ती कादंबरी मला कशी समजणार ? मग मग फॅक्टरीतून आल्यानंतर विरुपाक्ष मला कादंबरीचा काही भाग वाचून दाखवत. पण वाचलेलं मी विसरेन म्हणून मी पहिल्या दिवशी पासूनच ते मराठीतून लिहिण्यास सुरवात केली. त्यावेळी अनुवाद करणं हा उद्देश नव्हता. पण विरुपाक्ष जसे वाचायचे तसं एकेक - एकेक वाक्य मी माझ्या पद्धतीने मराठीत लिहून घ्यायचे. कादंबरी समजण्यासाठी माझ्याकडून हे होत गेलं. अशाप्रकारे एका कादंबरीचा अनुवाद माझ्या नकळतच सहजपणे माझ्या हातून झाला. त्या कादंबरीचा मीना वांगीकर यांनी केलेला मराठी अनुवाद त्यापूर्वीच प्रकाशित झाला होता. मला कोणताही अनुभव नसल्यामुळे लेखकाची अनुमती किंवा प्रकाशक याबद्दल मी अनभिज्ञ होते. त्यामुळे माझा हा अनुवाद प्रकाशित झाला नाही तरीदेखील हे काम पडून राहिलं किंवा माझी मेहनत वाया गेली असं वगैरे मला काही वाटलं नाही. कादंबरीच्या अनुवादाचं मोठं काम मी करू शकते हा आत्मविश्वास त्यातून मला आला. मला माझं भान आलं. आपल्याच ताकतीचा आपल्याला अंदाज नसतो तो मला आला. त्यानंतर 'तनमनाच्या भोवऱ्यात' ही शिवराम कारंथ यांची कादंबरी मला आवडली त्यावेळी मात्र लेखकाची अनुमती घेण्याचे हे जे सोपस्कार असतात ते मी केले आणि या कादंबरीचा हा अनुवाद प्रकाशित झाला. ते माझं पहिलं प्रकाशित अनुवादित पुस्तक 1982 साली आलं. अशी ती सुरुवात झाली.

छान ! योगायोगाने घडलं पण खूप मोठ्या कामाची सुरुवात झाली.

प्र. आपण भैरप्पा, गिरीश कार्नाड, शिवराम कारंत यांसारख्या अनेक महान लेखकांच्या कन्नड कलाकृतींचा अनुवाद केला. भैरप्पांनी तुमच्यावर विश्वास दाखवला आणि अनेकदा तुमच नाव अनुवादासाठी सुचविलं. तर याचं कारण काय असावं ?

उ. भैरप्पांना तर मराठी येत नव्हतं. अजूनही येत नाही पण त्यांना माझ्याबद्दल विश्वास वाटला हे मात्र खरं आहे. फार पूर्वी पासून ते आमच्या घरी येत. पुण्याला आले की आमच्याच घरी उतरतात. मग आमच्या खूप गप्पा होतात. त्यांच्या कलाकृती विषयी आणि इतरही अनेक विषयांवर मी त्यांच्याशी चर्चा करते. कलाकृतीच्या आकलनामध्ये संभ्रम निर्माण झाला तर किंवा काही अडचण वाटली तर त्या मुद्द्यावर त्यांच्याशी बोलते. कलाकृतीमध्ये अशा काही जागा असतात की लेखकाला असंच म्हणायचं आहे की वेगळं काही मांडायचं आहे असा संभ्रम असतो. या जागा निसटत्या असतात. त्यावेळी त्यांच्याशी बोलून 'हेच तुम्हाला म्हणायचं होतं का' हे मी त्यांच्याकडून काढून घेते. त्यातून असं झालं असेल की त्यांच्या कादंबरीचं आकलन मला जास्त होत गेलं. असा त्यांना माझ्याविषयी विश्वास वाटला असेल ! कदाचित सुरुवातीच्या काळात त्यांच्या कादंबऱ्या मराठी वाचकांपर्यंत फार पोहचल्या नव्हत्या किंवा मराठीत गाजलेल्या नव्हत्या. नंतर मात्र त्यांच्या कादंबऱ्या मराठीत येत गेल्या आणि लोकप्रिय होत गेल्या. भैरप्पा फार फिरत असतात. आता ते ९० वर्षाचे आहेत तरीदेखील त्यांची भ्रमंती चालूच असते आणि गावोगावचा मराठी वाचक त्यांना भेटायला येतो. त्यावरून त्यांना विश्वास वाटला असणार की त्यांचं साहित्य वाचकांना आवडत आहे. महाराष्ट्रात त्यांच्या कादंबऱ्यांवर चर्चासत्र झालीत, कार्यक्रम झालेत, त्याही वेळेला लोक त्यांच्या कादंबऱ्यांवर बोलले.त्यावेळेला त्यांच्या लक्षात आलं की त्यांना म्हणायचं आहे ते अनुवादातून पोहोचत आहे. प्रत्यक्षात या विषयावर त्यांच्याशी बोलणं नाही. पण नंतरच्या काळात असं झालं की त्यांचं साहित्य वाचलं जात असल्यामुळे अनेक अनुवादक त्यांना भेटले आणि त्यांनी अनुवादाची परवानगी मागितली. हे मला भैरप्पांनी नाही सांगितलं तर अनुवादकांनी सांगितलं की ,'आम्ही भैरप्पांना भेटायला गेलो, अनुवादाची अनुमती मागितली पण भैरप्पा म्हणत की उमा कुलकर्णी करत आहेत तर त्यांना करू देत ना.' म्हणजे तसा त्यांनी विश्वास दाखवला आणि इतरांना अनुमती दिली नाही.गिरीश कार्नाड यांना मराठी येत होतं. त्यामुळे त्यांच्या साहित्याचे अनुवाद त्यांनी तपासले. कलाकृती अनुवाद करून झाली की मी त्यांना पाठवायचे. ते वाचून काही सूचना करायचे. त्यांच्यात आणि माझ्यात एवढा मोकळेपणा होता की मुद्दे पटले नाहीत तर मी त्यांच्याशी वाद घालू शकत असे. वाद हा खूप धाडसी शब्द झाला...... पण माझी बाजू मांडू शकत असे.

प्र. मग ? पटायचं का त्यांना ? मान्य करायचे ते ?

उ. हो. काही गोष्टी त्यांना पटत. ते म्हणायचे की 'ठीक आहे' काही मुद्दे ते मान्य करत. त्यांना मराठी समजून घेण्यापुरतं येत होतं. 'खेळता - खेळता आयुष्य' या नावाचं त्यांचं आत्मकथन आहे. कन्नड मध्ये

त्यांनी त्याला 'आत्मकथा' हे नाव दिलं. पण मी आत्मकथन हा शब्द वापरला ते म्हणाले 'आत्मकथा हा शब्द का नाही घेतलास ?' मी म्हणाले 'आत्मकथा म्हटल्यानंतर त्यात कितीतरी कथा येऊ शकतात. ते अनेक वचन आहे का ? त्यापेक्षा हे तुमचं स्वतःविषयीचं कथन आहे म्हणून याला आत्मकथन हा शब्द योग्य आहे ना !' त्यावर ते म्हणाले 'ठीक आहे'. त्यांनी तो शब्द ठेवू दिला. नाटकांच्या बाबतीत असं झालं नाही. त्या वांग्मय प्रकारात त्यांचं प्रभुत्व होतं. त्यामुळे ते सांगतील तेच मी ऐकलं. त्यांच्या ज्या काही सूचना होत्या त्या मी पूर्ण समजून घेतल्या. ते असं का म्हणतात हे मी जाणून घेतलं. गिरीश कार्नाड यांच्या माझ्या मध्ये चर्चा - संवाद खूप चालायचे.

शिवराम कारंत यांच्या पत्नीला मराठी येत होतं. त्या मुंबईत वाढलेल्या. शिवराम कारंत त्यांच्या 'तन -मनाच्या भोवऱ्यात' हा पहिला अनुवाद मी केला. त्यावेळी आम्ही शिवराम कारंत यांना परवानगी विचारली. त्यावेळी त्यांनी आम्हाला सांगितलं की दोन प्रकरणं तुम्ही अनुवाद करून पाठवा. मराठी येणाऱ्या मित्रांना दाखवतो आणि त्यांना तो पसंत पडला तर मी तुम्हाला परवानगी देतो. त्यावेळी कोण उमा कुलकर्णी आहेत हे त्यांना माहिती असण्याचं कारणच नव्हतं !

असं बोलणं झाल्यानंतर मी दोन प्रकरणं अनुवादित करून त्यांना पाठवली. त्यांच्या पत्नीने तो अनुवाद वाचला. शिवराम कारंतांना काय म्हणायचं आहे हे माझ्या अनुवादातून त्यांना पोहोचलं असणार ! त्यामुळे ही अनुमती मला मिळाली. माझ्या पहिल्या अनुवादित कादंबरीची सुरुवातच इथून झाली. इथे मला आणखी एक गोष्ट सांगायला पाहिजे की शिवराम कारंत आणि त्यांच्या पत्नी या दोघांनी मिळून 'पण लक्षात कोण घेतो' या मराठीतील हरी नारायण आपटे यांच्या श्रेष्ठ कादंबरीचा अनुवाद कन्नड मध्ये केला आहे. शिवराम कारंत यांचा कर्नाटकामध्ये खूप दबदबा होता. त्यांनी मला परवानगी दिली असं झाल्यानंतर कर्नाटकातल्या फार जणांनी चिकित्सा केली नाही. आणि माझ्या अनुवाद त्यांना आवडत गेल्यामुळे ते पुढील अनुवादाला ते अनुमती देत राहिले आणि मी ते करत गेले.

छान प्रवास आहे तुमचा ! ऐकण्यासारखा !

प्र. अनुवाद करताना कशा प्रकारचं स्वातंत्र्य घ्यायचं हे तुम्ही ठरवून टाकलं आहे की कलाकृती बघून ते ठरविता ?

उ. कलाकृती बघून ते ठरवावं लागतं.शेवटी अनुवाद ही कला आहे. अनुवादाला मी शास्त्र मानत नाही, कला मानते. यामध्ये एक ठोकताळा घेऊन चालत नाही. प्रत्येक कलाकृतीचं बलस्थान वेगवेगळं असतं. ती कलाकृती कशाने पेलली गेली आहे हे बघावं लागतं. काही ठिकाणी वैचारिकता महत्त्वाची असते, काही ठिकाणी भावना तर काही ठिकाणी शब्दांना महत्त्व असतं. काही ठिकाणी प्रादेशिकता हा महत्त्वाचा घटक असतो. म्हणजे प्रत्येक कलाकृती तुम्हाला कोडं टाकत असते. अशा वेळी कोणत्याही कलाकृतीच्या बलस्थानाला धक्का लागायला नको असा विचार मनात ठेवून मी अनुवाद करते कारण लेखकाने कलाकृतीतून त्यांचे विचार मांडले असतात. त्यांना त्यातून काहीतरी सांगायचं असतं. लेखकाला जे सांगायचं असतं त्याला धक्का बसता कामा नये, हा माझा महत्वाचा विचार ठरतो. मग त्यासाठी काय आवश्यक आहे याचा निर्णय कलाकृतीच घेते.

खूप सुंदर उत्तर आहे तुमचं !

प्र. खरं तर माझा पुढचा प्रश्न हाच आहे की अनुवाद करताना मूळ कलाकृतीला धक्का लागू नये म्हणून तुम्ही कशी सावधगिरी बाळगता ?

शिवराम कारंत असतील किंवा भैरप्पा असतील, मूळ लेखकाचं अन्य बाकीही साहित्य वाचकांनी वाचलं आहे असं गृहित धरलं तर त्यांचे विचार वाचकांपर्यंत पोहोचले असतातच. त्यामुळे त्यांनी एखादं विधान केलं तर ते समजून घेण्यासाठी वाचकांना विशेष परिश्रम घ्यावे लागत नाही. जेव्हा मराठी किंवा अन्य भाषेत तो लेखक जातो तेव्हा त्याने सर्व काही लिहिलेलं वाचकांना माहीतच असेल असं नाही. अशा वेळी काही गोष्टी मला विस्तृत करून सांगायला लागतात.

लेखकांनी ते सहज लिहिलं असेल तरी . लेखकाचं आणि कलाकृतीचं वाचकांना आकलन होण्यासाठी एखादं वाक्य ठासून आणि स्पष्ट करून सांगणं गरजेचं आहे असं मला जेव्हा वाटतं तेव्हा मला ते करावं लागतं. मराठीमध्ये ,'स्वातंत्र्यवीर'असा शब्द लिहिला तर सावरकर लिहावं लागत नाही. वाचकांना ते पोहोचतच. 'लोकमान्य' शब्द लिहिला टिळक आहे हे सांगावं लागत नाही. हे फक्त मराठी पुरतं ! भारतभरात पोहोचवायचं असेल तर मात्र त्यांची पूर्ण नावं लिहावी लागतात. परकीय भाषांमध्ये ही माहिती द्यायची असेल तर खाली तळटीपांमधून विस्तृत माहिती द्यावी लागते. काही वेळा मूळ कलाकृतीचा आशय निसटता जरी आला असेल तरी मी माझ्याकडून तो जोर देऊन सांगते. हे एक मी माझ्याकडून करीत असते.

प्र. मूळ कलाकृतीतील काही वर्णनामध्ये पसरटपणा वाटला तर अनुवादामध्ये मध्ये कमी करून कमी शब्दांत वर्णन करण्याचं स्वातंत्र्य तुम्ही घेता का ?

उ. हो. तसं स्वातंत्र्य मी घेते. पसरटपणा कमी करण्याचा प्रयत्न करते. दुसरं एक असं की लेखकाने कलाकृती वेगवेगळ्या काळामध्ये निर्माण केली असते. आता अगदी मोठं नाव घ्यायचं म्हटलं तर शिवराम कारंत यांची समजा चाळीस सालातील कादंबरी मी अनुवाद करायला घेतली तर शिवराम कारंत हे वेगळ्या कालखंडाचे लेखक आहेत त्यामुळे त्यांची वर्णन करण्याची पद्धत वेगळी असेल !

आजच्या वाचकाला वाचनातही वेगाने पुढे जायला हवं असतं.!

अगदी बरोबर ! कादंबरी जरी ४० सालातील असली तरी माझा वाचक आजचा आहे. एखाद्या गोष्टीचं दीड पान वर्णन तो वाचणार नाही. कारंत तसं करत नाहीतच. पण समजा असं करणारा एखादा लेखक असेल तर असा अनुवाद वाचक वाचणार नाहीत आणि एखादं चांगलं पुस्तक वाचण्याचं राहून जाईल. वाचकांची अशी काळजी मला वाटते. त्यामुळे त्यात जे काही पसरट असेल ते थोडं आटोपशीर करते. काही वेळेला काही भाषेचं पण वैशिष्ट्य असतं की कन्नड मध्ये जे व्यक्त करण्यासाठी दोन वाक्य लागत असतील तर आपल्याकडे एका वाक्यात व्यक्त होऊ शकेल, असंही होऊ शकतं. माझ्या लिहिण्याच्या ओघात असं होत असेल तर मी ते नक्की करते. 'माझं नाव भैरप्पा' हे भैरप्पांचं आत्मचरित्र आहे. त्यामध्ये एक प्रकरण प्रवासवर्णनाचं येतं. परदेशातील प्रवासाबद्दल यामध्ये खूप लिहिलेलं आहे. एकेकाळी माधुकरी मागून शिक्षण घेणारा हा मुलगा ! अमेरिकेतल्या वाचकांनी यांच्या लेखनावर खूप प्रेम करत इतकं सांभाळलं की एक पैसाही खर्च त्यांना करू दिला नाही. त्यांच्या तिथल्या राहण्याचा खर्चही तिथल्या लोकांनी केला. आत्मचरित्र ही त्यांचे ऋण व्यक्त करण्याची जागा म्हणून त्यात त्यांची तेथील श्रमंती आणि इतरही गोष्टी विस्तृतपणे येणं स्वाभाविकच ! पण मराठी वाचकाला या सगळ्या तपशीलामध्ये रस वाटण्याचं काही कारण नाही. यासंदर्भात मी त्यांच्याशी बोलले म्हणून त्यांनी अगदी मोकळेपणाने सांगितलं की मराठी वाचक तुम्हाला माहित आहे त्यासाठी वाटतील ते बदल तुम्ही त्यात करू शकता.!

मला काही किरकोळ बदल करावेसे वाटले तरी मी लेखकांशी बोलते, त्यांची अनुमती घेते. आणि लेखकांना पटलं तर मराठी अनुवादात तरी मी हे करते.

कलाकृती एकदा तुमच्या ताब्यात देऊन दिली की मूळ लेखक निश्चिंत असतात असंच ना ? त्यामुळे नेहमीच तुम्हाला जे वाटतं ते करा असा सगळ्या लेखकांचा दृष्टिकोन राहात असेल. !

नाही... नाही ....प्रत्येकच वेळेला नाही ! काही वेळेला लेखक म्हणतात की 'बदल करू नका'. या बाबतीत एक उदाहरण सांगते. 'वंशवृक्ष' कादंबरी मराठीमध्ये बऱ्यापैकी वाचली गेली आहे. त्या कादंबरीची सुरुवात अशी आहे की१९२३ साली कपिला नदीला पूर आला होता आणि पुढील तपशील .... मेहंदळे नावाचे एक मराठी साहित्यिक होते. त्यांनी या कादंबरीची आणि वर्णनाची पूर्ण चिकित्सा केली आणि ते एक दिवस येऊन मला म्हणाले की 'पुस्तकातील सगळ्या कालक्रमणाचा मी हिशोब केला आणि यामध्ये दुसऱ्या महायुद्धाचं जे वर्णन आहे ते यात बसत नाही. ते चुकीचं वाटतं.'

त्यांचं म्हणणं मी समजवून घेतलं आणि त्या दृष्टीने बघितलं तर ते सगळं पटण्यासारखं होतं. मग मी भैरप्पांना विचारलं 'सुरुवातीची काही वाक्य आपण पुस्तकातून काढू शकलो तर ते निर्दोष होईल.' तेवढ्याच सूक्ष्मतेने पुस्तकाची चिकित्सा झाली म्हणून भैरप्पांना मेहेंदळे यांचं कौतुक वाटलं. पण ते म्हणाले 'हा तपशील यातून वगळू नका. भैरप्पा सगळं काही निर्दोष लिहीत नाही. त्यांच्याकडून चुका होतात हे लोकांना कळू देत. भैरप्पांनी दोषाची दुरुस्ती केली असं नको व्हायला ! त्यामुळे हे राहू देत.' त्यांचं असं स्पष्ट म्हणणं असल्यामुळे पुढे मी बोलू शकले नाही आणि तो तपशील तसाच ठेवला. येथे शेवटी मी त्यांची अनुवादक होते. मी त्यांचा शब्द अंतिम मानला पाहिजे.

प्र. अनुवादाची सुरुवात तुमच्यापासून झाली. नंतर विरुपाक्षसरांनी कन्नड मधून मराठी अनुवाद केलेत. दोघांचंही अनुवादक असंणं एकमेकांना कसं पूरक ठरलं ?

उ. आम्ही दोघंही काय लेखन करत आहे हे एकमेकांना माहीत असतं. दोघांपैकी ज्यांचं काम मोठं असेल किंवा ज्याला वेळेची मर्यादा असेल ते काम पुढे जाऊ द्यायचं आणि घरातल्या कामाचं दडपण न आणता त्याला जास्तीत जास्त वेळ द्यायचा असं आम्ही ठरविलं आहे.१९९० पासून विरुपाक्षनी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतली. तेव्हापासून सकाळचा नाश्ता तेच तयार करतात. पण जेव्हा त्यांचं महत्त्वाचं काम चालू असतं तेव्हा नाश्त्याचं काम मी माझ्याकडे घेते. घर म्हटल्यावर बाकी ही बरीच कामं असतात. बँकेचं काम, किरकोळ खरेदी एरवी ते करतात पण त्यांच्या कामाच्या वेळेला मी ते करते. लेखनात काही वेळेला त्यांची तंद्री लागलेली असते. त्यावेळी ती मोडू न देता सगळं मी सांभाळते. ज्या वेळेला माझी तंद्री लागलेली असते त्यावेळेला कुकर वगैरे लावण्याचंही काम ते सहजपणे करून घेतात. कामाची अशी विभागणी आम्ही करून घेतली आहे. त्यामुळे दोघांच्याही महत्त्वाच्या लेखनाला दडपण न येता वेळ मिळतो. मी अजूनही कन्नड वाचत नाही. माझ्यासाठी कादंबरी वाचणं हे काम विरुपाक्ष करतात. ते वाचतात तेव्हा मी ते अनुवादासाठी ध्वनिमुद्रित करून ठेवते. मग ते माझ्या वेळेनुसार ऐकून त्याचा अनुवाद करते. अनुवाद करण्यासाठी आमची हीच पद्धत आहे. ते अनुवाद करतात तेव्हा प्रत्येक तपशीलासाठी त्यांना काही अडचण होत नाही पण संतवचन, पद्य, काव्य असेच संदर्भ येतात तेव्हा ते मला विचारतात अशी एकमेकांच्या लेखनात आम्ही मदत करतो.

काही वेळेला कन्नड शब्द मला अडतात. त्यांनाही त्याबद्दल अडचण असली तर इंग्लिश - कन्नड कोश किंवा इंग्लिश डिक्शनरी बघणं असं उलटपालट काम तेच करतात. आणि मला त्या त्या शब्दाचा अर्थ सांगतात. एखाद्या मराठी शब्दाच्या बाबतीत त्यांना काही अडलं तर ते मला विचारतात. असं बहुतेक घरातल्या घरातच आमचा प्रश्न बहुतेक वेळा संपतो.

संपला नाही तर मग लेखकाला फोन करून आम्ही विचारतो.

प्र. आपण कन्नड मराठी कोष वापरत असाल ना ?

उ. हो कन्नड - मराठी, मराठी - कन्नड हे दोन्ही कोश माझ्याकडे आहेत. पण असं आहे की विरूपाक्ष यांनी वैचारिक लेख, समीक्षात्मक लेख आणि फारच क्वचित ललित लेखन अनुवादित केलं म्हणून त्यांना त्या कोशांचा उपयोग होतो आणि मी बहुतेक वेळा ललित साहित्य अनुवादित केलं. त्यामधील शब्दांचा कोशामध्ये अर्थ मिळत नाही. समजा एखाद्या फुलाचं किंवा फळाचं नाव असलं तर ते अनेकदा प्रादेशिक असतं. इतर लोकांना ते माहीत नसतं. असं नाव कोशामध्ये पाहिलं तरी 'एक प्रकारचं फळ' किंवा 'एक प्रकारचं फूल' असाच त्यामध्ये संदर्भ असतो. अशी माहिती मला उपयोगात येत नाही. बोली भाषेत त्याला काय म्हणतात हे कळणं ही त्यावेळी माझी गरज असते. मग ते समजून घेण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधावे लागतात. त्या फळा किंवा फुलांची विशेष माहिती कधी लेखकांना विचारून तर कधी किंवा परिचित अशा वेगवेगळ्या व्यक्तींशी चर्चा करून काढून घ्यावी लागते. अलीकडे जयश्री शानभाग नावाची एक कोकणी मैत्रीण मला मिळाली आहे. तिच्याशी मी चर्चा करते. कोकणी लोकांना कन्नड आणि मराठी या दोन्ही भाषा येतात असं माझ्या निदर्शनाला आलं आहे आणि बोली भाषेतील शब्दही त्यांना नीट माहीत असतात. मग मी अशा लोकांना विचारते. म्हणजेच प्रयत्न करून हा शोध घ्यावा लागतो. मला अशी लोक भेटली हे माझं सुदैवच ! पण ललित साहित्य अनुवादित काढण्यासाठी अशा शोधाची गरज असतेच असते. एक कोश आहे त्यात सगळे शब्द आहेत आणि त्याने माझी सगळी गरज मिटली आहे, अशा प्रकारचा कोश उपलब्ध नाही. आपल्याकडे असं काम कोशावर अजून झालं नाही. म्हणून निर्दोष शब्दरचना होण्यासाठी हातपाय हलवून, विविध स्रोत उपलब्ध करून ते काम करून घ्यावं लागतं.

अगदी बरोबर मेहनतीला पर्याय नाही ! परिश्रम घेऊनच प्रत्येक गोष्ट करावी लागते.

पण हे काम कोणी माझ्यावर सोपवलेलं नाही. मी माझ्या मर्जीने ते करत असते. माझ्या कामाच्या संदर्भातला अजून एक महत्वाचा मुद्दा असा आहे की प्रकाशकाने अनुवाद करायला दिला आणि मी तो केला असं होत नाही. आम्ही त्यासाठी कादंबऱ्या बघतो, निवडतो. ती आमची आमची निवड असते. आवडलेलीच कादंबरी मी अनुवादासाठी घेते. आम्ही आमचा आमचा अनुवाद पूर्ण करतो आणि मग आम्ही तो प्रकाशकांना देतो. माझ्या इच्छेने, माझ्या सोयीने केलेल्या कामात मला खूप आनंद असतो.

कन्नड भाषा अवगत नाही म्हणून अनुवाद करण्याच्या कामाला काही मर्यादा येता का ....हा माझा पुढचा प्रश्न आहे. काहीसं उत्तर मागच्या उत्तरात आहेच.........

कामाला मर्यादा येतात यात काही प्रश्नच नाही. कामात मी विरूपाक्ष यांची मदत कशी घेते, अडचणींवर मात कशी करते हे मी सांगितलं. माझ्या वाचनात अनेक लेख, विविध प्रकारचं साहित्य येतं. पण मी सगळंच साहित्य अनुवादित करू शकत नाही. कारण मी विरूपाक्षांवर अवलंबून आहे

आणि त्यांची पण कामं सुरू असतात. त्यामुळे मला आवडलेल्या सगळ्याच साहित्याला मी हात लावू शकत नाही. मी वाचत असते तर कदाचित मी जास्त प्रमाणात अनुवाद करू शकले असते. पण असं असल्यामुळे याचा फायदा ही झाला आहे. त्यामुळे खूप भरमसाठ अनुवाद माझ्याकडून झाले नाही. जे अनुवाद झाले ते दर्जेदार कादंबऱ्यांचे झाले. गुणात्मक दृष्ट्या अनुवाद झाले, संख्यात्मक दृष्ट्या नाही असं मी म्हणू शकेन. आत्ताच करोना काळामध्ये नुकतंच एक पुस्तक कन्नडमध्ये आलं. पुस्तकाचं नाव आहे ,'नम्म भैरप्पा' म्हणजेच 'आमचे भैरप्पा'. या पुस्तकातील लेख लिहिणारे सर्वसामान्य वाचक आहेत, समीक्षक नाहीत. वाचकांच्या व्यक्तिगत आयुष्यात भैरप्पांच्या कादंबऱ्यांचा झालेला प्रभाव, भैरप्पांच्या पुस्तकांच्या वाचनामुळे त्यांच्या बदललेल्या जीवनात संकटसमयी मिळालेला धीर या पद्धतीचे वाचकांनी लिहिलेले एकशे चार लेख यात समाविष्ट आहेत. मला कन्नड भाषा अवगत असती तर यातील काही निवडक लेख मी मराठीत नक्कीच अनुवादित केले असते. ललित साहित्य किंवा आत्मनिष्ठ साहित्य समाजात क्रांती करत नसलं तरी संवेदनशील मनावर प्रभाव नक्कीच टाकतं. त्यामुळे असं लेखन अनुवादित करायला मला नक्कीच आवडलं असतं. या पुस्तकात लेख असणाऱ्यांपैकी रस्त्याच्या कडेला टपरीवर कपडे विकणारा मनुष्य आहे. एक अणूशास्त्रज्ञ देखील आहे. तोही भैरप्पांबद्दल, त्यांच्या कलाकृतीबद्दल लिहितो. हे सगळं आगळं आणि इंटरेस्टिंग आहे.असं साहित्य पाहिलं की मला हळहळ वाटते.परिश्रम घेऊन आपण हे करायला पाहिजे असंही वाटतं. पण आता कन्नड भाषा शिकून हे सगळं काम करणं अवघड आहे. भाषा शिकून मी सहाशे - सातशे पानांच्या एवढ्या प्रचंड कादंबऱ्यांचा अनुवाद करू शकणार नाही कारण भाषा शिकण्यातच खूप वेळ जाईल. त्यापेक्षा माझं काम ज्या पद्धतीने सुरू आहे त्याच पद्धतीने पुढे न्यावं हेच माझ्या दृष्टीने योग्य वाटतं. यामुळे कधी कधी कामाला मर्यादा जरूर येतात आणि अनुवाद करण्याच्या काही आनंदाला मी मुकते.

प्र. अनुवादात तुम्ही उमा कुलकर्णी कशा प्रकारे असता ?

उ. अनुवादात मी सदैव उमा कुलकर्णीच असते. मी कुठेही भैरप्पा होत नाही. किंवा शिवराम कारंत किंवा गिरीश कार्नाड किंवा अनंतमूर्ती होत नाही तर मी अनुवादिका उमा कुलकर्णी असते. समजा कोणाचं लेखन पटलं नाही, मतभिन्नता वाटली तर ते खोडून काढून मी उमा कुलकर्णीचे मत त्यात घुसण्याचा प्रयत्न करत नाही. लेखकांनी हे असं लिहायला नको होतं असं वाटलं, तरी त्यात बदल करत नाही. अनुवादकाच्या भूमिकेत राहून मी माझं काम करते आणि लेखकांचं पुस्तक शीर्षका पासून तर शेवटच्या पानापर्यंत वाचकांपर्यंत पोहोचवण्याचं कर्तव्य करते. अनुवादात त्याच भूमिकेत मी असते. पण मला स्वतंत्र काही लिहायचं असेल किंवा बोलायचं असेल तर मी वेगळ्या प्रकारची स्वतंत्र आणि लेखिका उमा कुलकर्णी असते.

कामाबद्दलची ही दृष्टी खूपच छान ! अगदी आदर्श ठेवण्यासारखी !

प्र. आपल्यातील सुरुवातीचा अनुवादक कसा होता ? आताचा कसा आहे ? या अनुवादकामध्ये कसे बदल घडत गेले ?

उ. सुरुवातीला जेव्हा मी शिवराम कारंतसारख्या मोठ्या लेखकांच्या कादंबऱ्या अनुवादित केल्या तेव्हा माझ्यावर खूप दडपण असे. शिवराम कारंत हे फार मोठं नाव आहे.अख्खा कर्नाटक या नावाचा आदर करतो.एवढ्या मोठ्या माणसाने माझ्यासारख्या नवोदित अनुवादिकेच्या हाती ज्या विश्वासाने हे काम दिलं तिथं माझ्याकडून अजिबात लहानशी देखील चूक होता कामा नये हे माझ्यावर दडपण होतं. त्या दडपणाखाली मी तो अनुवाद केला. शिवाय अनुवादाचं काम मोठं होतं. त्यामुळे आपण काहीतरी पराक्रम करतो आहे किंवा खूप मोठी जबाबदारी पार पाडतो आहे अशा प्रकारचे भाव माझ्या मनात होते. संकोचामुळेही लेखकांशी चर्चा करणं,अनुवादातील अडचणींबद्दल लेखकांशी संवाद साधणं असं काहीच घडलं नाही. मी त्यांच्याशी बोललेच नाही. मी कदाचित बोलले असते तर त्यांनी माझ्या शंकांचं निरसन केलं असतं. त्यावेळी त्यांच्या नातीच्या वयाची मी होते. त्यामुळे नातवंडांशी बोलावं तसं ते माझ्याशी बोलले असते.

नंतर मी भैरप्पांच्या कादंबऱ्या करायला घेतल्या. सर्वात प्रथम 'वंशवृक्ष' अनुवादित मी केली त्यावेळी मला अनुवादातला आनंद कळला. दोन-तीन कादंबऱ्यांचं काम हातून झाल्यामुळे अनुभव होता आणिआत्मविश्वास आला होता. त्यामुळे एक प्रकारचा मोकळेपणा आला. भैरप्पांच्या कादंबऱ्यांमध्ये मी बौध्दिक आणि भावनिक दृष्ट्या गुंतून जायचे. त्यामुळे माझी प्रतिक्रिया पण पटकन येत असे. तुम्हाला हेच म्हणायचे आहे का ? माझे हे शब्द बरोबर आहेत का? अशा प्रकारचे कादंबरीशी संबंधित प्रश्न मी त्यांना विचारून चर्चा शकत असे. याही पुढे जाऊन एखादा मुद्दा असा कसा मांडला असाही वाद घालून मी माझे समाधान करून घेत असे.

भैरप्पांच्या कादंबऱ्यांनी मला काय दिलं..... असा प्रश्न जर कोणी मला विचारला तर मी असं सांगेन की अनुवादक म्हणून नाव तर दिलंच पण अनुवादक म्हणून योग्य ते भान दिलं. कोणतेही दडपण न घेता अनुवादाचा आनंद घेत मी अनुवाद करत गेले. मग पुढील सर्व कलाकृतींच्या अनुवादाचं काम अशाच पद्धतीने झालं. गिरीश कार्नाड हे मोठं आणि ग्लॅमर असलेलं नाव आहे. कार्नाडांचं काम हातात येईपर्यंत शिवराम कारंथ,भैरप्पा या महान लेखकांचे अनुवाद माझ्या हातून झाले होते आणि मत व्यक्त करण्याएवढं धाडस आणि आत्मविश्वास माझ्याकडे आला होता.

प्र. जेव्हा तुम्ही अनुवाद करत नसता तेव्हाही तुमच्यातला अनुवादक जागृत असतो का ?

उ. जेव्हा मी काहीतरी अनुवादित साहित्य वाचत असते तेव्हा माझ्यातला अनुवादक जागृत असतो. वाचत असताना मग माझ्यातला अनुवादक प्रतिक्रिया देत राहतो. या प्रतिक्रिया चूक किंवा बरोबर अशा स्वरूपातल्या नसतात तर या जागी मी असते तर काय केलं असतं किंवा मी काय लिहिलं असतं

अशा पद्धतीच्या या प्रतिक्रिया असतात. त्या आपसूक येतात. काही वेळा टीव्हीवर पुरस्कार प्राप्त सिनेमे येतात आणि त्याला सबटायटल्स दुसऱ्या भाषेत असतात. कन्नड सिनेमे असले की मला त्यातल्या चुका दिसत राहतात. नजरेत खुपत राहतात. एखादी वाक्यरचना बघून काही वेळेला असं वाटतं की ही रचना बरोबर नाही ....अशी असायला हवी होती. या व्यतिरिक्त अन्य वेळेला मात्र माझ्यातील अनुवादक अजिबात जागा नसतो. कन्नड संदर्भ येतात तिथे तिथे मात्र तो जागृत होतो.

प्र. म्हणजे घरातल्या नियमित जीवनात किंवा आपले रोजचे व्यवहार करत असताना तुम्ही अनुवादकाच्या भूमिकेत आहात असं तुम्हाला जाणवतं का ?

बरेचदा कामं सुरू असतात. काही काही कामं आव्हानात्मक असतात आणि ते कसे करायचे याबद्दल दिशा निश्चित झाली नसते. मग ती दिशा निश्चित होईपर्यंत आणि निर्णय घेईपर्यंत हातात कामाबद्दलचे विचार डोक्यात असतात. भैरप्पा यांची एक कादंबरी अनुवादित करण्याचं काम सध्या चालू आहे. त्यातला निवेदक एक वेगळी भाषा बोलत आहे. सर्व साधारणपणे निवेदक हा प्रमाण भाषा बोलत असतो. पण निवेदकाची भाषा वेगळी असल्याने ती लेखनात कशी घ्यावी याचा विचार करावा लागतो. याच्या वेगवेगळ्या शक्यता लक्षात घेऊन निर्णय करावा लागतो आणि निर्णय झाल्यावर देखील लेखनात उतरेपर्यंत असे विचार करावे लागतात. अशावेळी लेखन करत नसताना देखील असे विचार मनात असतात. काहीवेळा कादंबरीची रचना वेगळी असते आणि त्याचं एक विशिष्ट चांगल्यापैकी बलस्थान असतं. ते मला स्वतःला आवडलेलं असतं आणि अनुवाद करताना त्याला महत्त्व देऊन ते सांगायचं असतं. अनुवादाचं काम चालू असतानाही याबद्दलची क्रिया डोक्यात चालूच असते. मग दोन-तीन प्रयोग करून बघितल्यानंतर त्यातलं काहीतरी एक बरोबर वाटतं. मग अनुवादाचा काही भाग झाला असेल तर मागे जाऊन परत सुधारणा कराव्या लागतात पण पुढचा अनुवाद मात्र ठरवलेल्या पद्धतीप्रमाणे होतो.

प्र. तुम्ही अनुवाद केलेल्या कलाकृतींमध्ये जे तत्वज्ञान सांगितलं आहे त्याचा परिणाम तुमच्या जीवनावर काही अंशी तरी होतो का ?

उ. हो. हो. बराच होतो ना ! हे सगळं मी फार गांभीर्याने घेते.

प्र. गुंतून जाता त्यामध्ये ?

उ. हो. मी फारच गुंतलेली असते आणि सुदैवाने मी निवडलेल्या कलाकृती गंभीरच आहेत. त्या कलाकृतींमधून लेखकाने गंभीरपणे तत्त्वज्ञान मांडले असते. तिथे फक्त शब्द नसतात तर भावना, विचार, चिंतन, मनन हे सगळं असतं त्यामुळे मी ती कलाकृती आत्मीयतेने समजून घेते. अनुवादकासाठी तर हे फार आवश्यक आहे. काहीवेळा ती कलाकृती आहे तशी मी स्वीकारते. लेखकाने यात सगळं छान मांडलं आहे आणि आपण ते स्वीकारावं अशीच माझी भावना असते. पण काही

कलाकृती मनात तरंग उठवितात. अनुवाद करताना मी कलाकृतीत माझ्या मनातली खळबळ उतरवू शकत नाही. कारण मी तेथे अनुवादक असते पण त्या कलाकृती बद्दल माझ्या मनात प्रतिक्रिया आलेली असते. कलाकृतीचा आकलन झाल्यामुळे माझ्या विचार प्रक्रियेत तरंग उठलेले असतात त्याचा थोडाफार परिणाम मनावर होतो कारण प्रभावी आणि दर्जेदार साहित्य मी फार गंभीरपणे घेते. खरंतर प्रभावी साहित्याबाबत असं म्हणायला पाहिजे की लेखकाला संपूर्ण समजून घेईपर्यंत आपली प्रतिक्रिया यायला नको. तसा माझाही प्रयत्न असतोच. पण त्यावर चिंतन - मनन करताना काही प्रश्न अनुत्तरीत राहतात तर काही प्रश्न माझ्या मनात घोळत राहतात मग मी माझ्या पद्धतीने निरसन करते, अडचण सोडवते. असा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम कलाकृतीतील तत्वज्ञान करतंच करतं.

प्र. मग तुमच्या मनात आलेल्या प्रश्नांबद्दल तुम्ही इतर लेखकांची किंवा कलाकृतीच्या लेखकाशी चर्चा करून ते प्रश्न सोडविण्याकडे तुमचा कल नसतो का ?

उ. बऱ्याच वेळेला आमच्या दोघांमध्येच म्हणजे विरुपाक्ष आणि मी आमच्यातच त्याची चर्चा होते. ते वाचत असतात त्यामुळे ते कलाकृतीच्या जवळच असतात. त्यामुळे आम्ही दोघं चर्चा करतो. मी काय सांगते हे त्यांना पोहोचतं. मग त्यांना काय वाटतं हे ते सांगतात.अशी आमच्यातच देवाण-घेवाण होते. लेखकांशी चर्चा करावी असं मला वाटत नाही कारण लेखकाने त्यांचं मत तर मांडलेलं असतं.

एखाद्या मुद्द्याबाबत लेखकालाच तुम्हाला असं का वाटतं....... त्याची कारणं..... आपण लेखकालाच विचारू शकतो ना ....कुतुहल म्हणून .... उत्तर मागायचं म्हणून नव्हे........

कारण प्रश्न अनुत्तरित राहिले की अस्वस्थ वाटत राहतं........ त्याचं निरासन केलं की बरं वाटतं.

हो. अस्वस्थ वाटतं. बरोबर आहे पण ही कुठं पर्यंतची प्रक्रिया आहे......... लेखक आपल्याला समजेपर्यंत............ लेखक आपल्याला समजला आणि तो हे का मांडतो आहे हे आकलन झालं की त्या कलाकृतीपुरता तो प्रश्न मिटतो. पण आपण एक जिवंत माणूस असतो म्हणून आपल्याला कलाकृतीबद्दल ही आपापले प्रश्न पडत असतात. मग काही वेळा या लेखकांनी लिहिलेलं पटत असतं आणि काही वेळा असं वाटतं की या लेखनामध्ये आणखीही दोन -. तीन बाजू आहेत त्या लेखकाने मांडल्या नाहीत. पण ते माझ्या आकलना पुरतं असतं.

प्र. योग्य शीर्षकांची निवड तुम्ही मूळ कलाकृतीच्या शीर्षकांवरूनच करत असता का ?

उ. नेहमी असं नाही करता येत ! बहुतेक वेळा हे करावं अशी माझी इच्छा असते. शक्यतोवर मी ते करते. लेखक शीर्षकापासून तर शेवटच्या शब्दापर्यंत एक व्यूह निर्माण करत असतो आणि त्याद्वारे त्याला जे म्हणायचं आहे ते तो वाचकांपर्यंत पोहोचवू पहात असतो. त्यामुळे त्याच्यात आपण गफलत केली तर त्याचा आशय नेमकेपणाने पोहोचवण्यात व्यत्यय येऊ शकतो. याचं उदाहरण द्यायचं झालं तर शिवराम

कारंतांची मूकज्जिय कनसुगळू ह्या कादंबरीचं देता येईल या नावाचा मराठी अर्थ 'आजीची स्वप्नं' आहे. ही ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कादंबरी आहे. मराठीत या कादंबरीचं शीर्षक आहे 'मूकज्जी'. कादंबरीतील एका वृद्ध स्त्री पात्राचं हे नाव आहे. या कांदबरीवर त्यावेळी समीक्षक प्रभाकर पाध्ये यांनी एक दीर्घ लेख लिहिला. त्यात त्यांनी म्हटलं की शीर्षकावरून पूर्ण कादंबरीच्या विषयाचं आकलन होत नाही. फक्त काही तपशील समजतो. यामुळे ते शीर्षक अपूर्ण वाटतं पण कादंबरीच्या शीर्षकात स्वप्नं हा शब्द असता तर मूकज्जी आजीच्या स्वप्नांमध्ये देव ही संकल्पना क्रमाने विकसित झाली आहे असं कारंतांनी कादंबरीत व्यवस्थित सांगितलं आहे. यातील 'स्वप्न' हा शब्द शीर्षकापासूनच महत्त्वाचा होता. तो काढल्यामुळे मराठी वाचकाला विषयाचं यथार्थ भान आलं नाही आणि कादंबरी विस्कळीत वाटली. शीर्षकामुळे असं होऊ शकतं असं माझ्याच बाबतीतलं एक उदाहरण आहे. भैरप्पा यांची एक कादंबरी आहे 'दाटू' हे त्याचं कन्नड नाव. मराठीत त्याचा शब्दशः अर्थ-ओलांड असा होतो. ओलांड असं नाव आपण कादंबरीला देऊ शकत नाही. मग चर्चा करत असताना मला अचानक 'जा ओलांडुनी' हे नाव सुचलं. आता इतक्या वर्षांनंतर मी मागे वळून बघते तेव्हा असं जाणवतं की 'जा ओलांडुनी' या शीर्षकामध्ये जी काव्यमयता आहे, ती कादंबरीत यत्किंचितही नाही. मग आत्ता समजतं की मी जे शीर्षक दिलं ते वाचकांची दिशाभूल करणारं आहे. मला असं वाटतं की शक्यतोवर शीर्षकाचा अनुवाद करण्याची गरज नसते तेथे मी ते शीर्षक तसंच ठेवते. पर्व, वंशवृक्ष अशा पद्धतीची नावं मी बदलण्याचा प्रश्न येत नाही. 'कवलु' असं एका कादंबरीचं नाव होतं. म्हणजे फाटा - जिथे दोन रस्ते फुटतात, वेगळे होता तो फाटा. फाटा हा शब्द शीर्षकासाठी मला योग्य वाटला नाही म्हणून मी त्याला 'तडा' हे नाव दिलं. कुटुंब व्यवस्थेला तडा जाणार असा त्याचा आशय होता. असं कधी कधी शीर्षक बदलावं लागतं नाही तर त्यातून योग्य अर्थ निघत नाही. शक्य असेल तिथे बदलू नये असाच माझा प्रयत्न असतो. याचं आणखी एक उदाहरण म्हणजे गिरीश कार्नाडांच्या 'तलेदंड' या नाटकाचं. एखादी वाईट गोष्ट घडली की म्हटलं जातं 'माझं मस्तक गळून पडू दे' म्हणजे मला तलेदंड होऊ दे अशा अर्थी तलेदंड शब्द वापरला जातो. शीर्षक तेच ठेवावं की बदलावं असा मी विचार केला. पण अशा समानार्थी मला काहीच सुचलं नाही शिवाय मला जाणवलं की कार्नाडांचं हे नाटक मराठीतही त्याच नावाने ओळखलं गेलं तर योग्यच आहे शिवाय ऐतिहासिक मतितार्थ सांगणारा हा शब्द आहे, म्हणून तेच शीर्षक मी जाणीवपूर्वक ठेवलं. शक्यतो शीर्षक बदलता आला नाही तर मला फार आनंद होतो. जिथे बदलावं लागतं तिथे ते मी जपून बदलते. खूप लॉजिक वापरावं लागतं. पूर्ण कलाकृती सामावेल असं ते निवडावं लागतं.

प्र. एका कलाकृतीसाठी दोन - तीन शीर्षकं सुचली की कोणतं योग्य राहील यासाठी मनाचं द्वंद्व होतं का ?

उ. नाही. साधारणपणे असं होत नाही. कलाकृतीच्या गाभ्यात शिरलो असलो तर अनुवाद पूर्ण होता होता एखादा शब्द ठळकपणे सातत्याने येत राहतो आणि त्याला अनुसरून शीर्षक येत जातं. त्यावेळी पूर्ण

मराठीत कलाकृती ही आपल्या हातात असते. त्यामुळे शीर्षक देण्यासाठी द्वंद्व होत नाही. कलाकृतीच शीर्षक ठरविते असं म्हटलं तरी चालेल.

प्र. कोणत्या कलाकृतींसाठी विशिष्ट परिसराचं अवलोकन करण्याची किंवा चालीरीती आणि परंपरा जाणून घेण्याची गरज भासली का ? जी उत्सुकता, उत्कंठा घेऊन तुम्ही तिथे गेल्या त्या उत्सुकतेचं शमन झालं का ?

उ. बऱ्याच कलाकृतींच्या बाबतीत मला अशा अवलोकनाचा फायदा झाला आहे. दुसरं एक सांगू का ? जिथे नागरी संवेदना असतात ते जग आपण बघितलेलं असतं. त्यामुळे तसं काही काम करताना प्रत्यक्ष बघायला पाहिजे असं नाही. एका ठिकाणी चामुंडी हिल्स वर्णन आलं. ते काही प्रत्यक्ष बघायला जाण्याची गरज मला वाटली नाही.त्यासारखे बाकी ठिकाणं आपण बघितलेले असतात. त्यामुळे ते वर्णन वाचतांना चामुंडी हिल्स आपल्या डोळ्यासमोर येतं आणि वर्णनाच्या आजूबाजूचा भाग म्हणजे - तशा उंचीवरून दिसणारं जग आपण कल्पनेने अनुभवू शकतो. ते बघितलं नाही तर चालू शकतं. पण कादंबरी पुढे जाताना लेखकाला अशा वर्णनातून, तिथल्या चालीरीतींमधून, तिथल्या निसर्गातून काही महत्त्वाचं सांगायचं असेल तर मात्र ते माहिती असणं मला आवश्यक वाटतं. कुडीय नावाची शिवराम कारंत यांची एक कादंबरी वनवासी भागातल्या लोकांवर आधारित आहे. त्यामुळे त्या कादंबरीत जंगलाची वर्णनं हा अतिशय महत्वाचा भाग असतो. त्यांचं सगळं आयुष्यच त्यावर अवलंबून असतं.अशा कादंबरीत आलेलं कि ssss र्र ssss जंगल प्रत्यक्षात बघणं शक्य नसतं. एकतर तसं घनदाट जंगल राहिलेलंही नाही. असेल तरी इतक्या आतपर्यंत आपण जाऊन बघू शकत नाही. म्हणजे वनवासी माणूस जसा बघेल त्या पद्धतीचं जंगल आपण बघू शकत नाही. प्रत्यक्ष बघितलं नाही तरी आपल्याला ती संकल्पना समजून घ्यावी लागेल ना !म्हणजे 'त्या जंगलातून सूर्याची किरणंसुद्धा जमिनीवर पडत नव्हती' असं जेव्हा तो लेखक म्हणतो तेव्हा तिथे जो अंधार आहे तो अंधार आणि रात्रीचा अंधार यातला फरक आपल्याला समजायला हवा. किंवा जिथे सूर्यकिरणं पोहोचत नाहीत अशा अंधाऱ्या गुहेतील अंधार आणि दाट झाडी असल्यानंतर तिथे असणारा अंधार अशा दोन अंधारात मधील फरक कळला तर कलाकृतीचं आकलन सोपं जातं. बरेच वेळा अशा संकल्पना आपल्याला माहीत असतात आणि आपण त्या वापरतो देखील ! मग ती माहिती अशावेळी आपल्या उपयोगी पडते. पूर्णचंद्र तेजस्वी यांची 'चिदंबर रहस्य' नावाची एक कादंबरी होती. या कादंबरीसाठी त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.यामध्ये वेलदोड्याचं पीक हा महत्त्वाचा भाग ठरतो. पण मी आयुष्यात वेलदोड्याचं पीक बघितलेलं नव्हतं आणि कोणाला विचारलं तर लोक सांगायचे की त्याचे घोस लागलेले असतात,...... त्याचा वेल असतो,त्याच्यावर झुडूप असतात..... वगैरे असं काय पाहिजे ते सांगायचे !. पण प्रत्यक्षात वेलदोड्याच्या झाड केळीच्या किंवा कर्दळीच्या जातीचं आहे असं वर्णन कादंबरीत आहे. पण त्या झाडाला वेलदोडे कुठे लागतात याबद्दल मला कुतूहल होतं. श्रमंती करून

ते झाड मी पाहिलं. वेलदोडे खोडाजवळ जमिनीवर कंदासारखे लागले होते. वेलदोड्याचं झाड म्हणजे काय ते वाचकांना माहीत असेलच हे पुस्तकात गृहीत धरलं असतं. पण मी ते झाड बघितलं नसेल तर वर्णन करताना मी कमी पडणारच ना ! माझ्या डोळ्यासमोर जे नाही ते वास्तव मी कसं मांडू शकणार ? मग त्यासाठी थोडी धावपळ करून, थोडे कष्ट घेऊन ते बघितलं ना, तर संकल्पना स्पष्ट होतात आणि मी ते बिनधास्तपणे लिहू शकते. अशा लिहिण्यामध्ये कोणताही संभ्रम राहत नाही आणि लिहिण्याचा आनंद अवर्णनीय असतो. आता विकसित तंत्रज्ञानामुळे गुगल वरून माहिती बघता येते. चित्रही दिसतात पण मी जेव्हा करत होते तेव्हा गुगल, इंटरनेट वगैरे काहीही नव्हतं. मग जे काही बघायचं ते आम्ही फिरून बघत असू. कर्नाटकातील एका प्रवासात वेलदोड्याचं झाड पाहिल्यानंतर परब्रह्म भेटल्यासारखा आनंद मला झाला.

प्र. मूळ कलाकृतीतील खास शब्द तसेच ठेवून दऱ्या-खोऱ्यातील परिसर आणि वातावरणातील चित्रणात जिवंतपणा आणण्यात किंवा तेथील चालीरीती परंपरा आणि संस्कृती दाखविण्यात काही अडचणी आल्या का ?

उ. असं क्वचितच झालं असेल. अन्यथा अशा अडचणी बहुतेक वेळा आल्या नाहीत. महाराष्ट्र आणि कर्नाटक हे दोन्ही राज्य भारतातील आहेत आणि ते शेजार - शेजारचे राज्य आहेत. संपूर्ण कर्नाटक मला परिचित आहे असं मी म्हणणार नाही पण मला उत्तर कर्नाटकाची थोडीफार माहिती आहे. ते अगदी अपरिचित नाही. त्यामुळे संस्कृती, परंपरा आणि नैसर्गिक वातावरण दाखविण्यात काही अडचण वाटली नाही. परकीय भाषेतील कादंबरीचा अनुवाद करताना अशी अडचण वाटू शकेल. तशा कादंबरीतील संस्कृती समजून घेताना आणि मांडतांना प्रश्न येऊ शकतात. त्यासाठी तळटीप द्यावी लागते. पण ग्रामीण भागातील घरांचं वर्णन असेल आणि मला शहरांमधली घर माहिती असतील आणि खेड्यांमधील माहिती नसतील तरी शहर आणि खेड्यांमधील घरांचा वेगळेपणा मी माझ्या दृष्टीकोनातून मी दाखविला की काम होतं. तुलनेने अशा अडचणी कमी येतात. आणि शब्दांच्या बाबतीत सगळ्या भारतीय भाषांमधील मला एक अडचण दिसते. संस्कृत भाषेतील काही शब्द जसेच्या तसे सगळ्या भाषांनी उचलले आहेत पण अर्थ संस्कृतमधील न ठेवता प्रादेशिक भाषांमध्ये दिले जातात त्यामुळे शब्द जरी तोच असला तरी प्रत्येक भाषेत अर्थ वेगवेगळे घेतले जातात. त्यामुळे कधीकधी गोंधळ होतो या बाबतीत एक उदाहरण नेहमी सांगते की एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर जी सभा होते त्याला कन्नडभाषेत संतापसभा म्हणतात. एखाद्या व्यक्तीला शोक झाला की त्याला 'संताप' झाला असं म्हणतात. पण मराठीत शोक विषयक संदर्भातला संताप हा शब्द वापरला तर अनर्थ होऊ शकेल. हा तत्सम शब्द असला तरीही आपण या अर्थाने वापरू शकत नाही मराठीत संताप या शब्दाचा अर्थ राग असा होतो. त्यामुळे अशा शब्दांपासून थोडासं जपून राहावं लागतं. संस्कृत आहे म्हणून तसंच वापरला तर चालणार नाही.

ते झाड मी पाहिलं. वेलदोडे खोडाजवळ जमिनीवर कंदासारखे लागले होते. वेलदोड्याचं झाड म्हणजे काय ते वाचकांना माहीत असेलच हे पुस्तकात गृहीत धरलं असतं. पण मी ते झाड बघितलं नसेल तर वर्णन करताना मी कमी पडणारच ना ! माझ्या डोळ्यासमोर जे नाही ते वास्तव मी कसं मांडू शकणार ? मग त्यासाठी थोडी धावपळ करून, थोडे कष्ट घेऊन ते बघितलं ना, तर संकल्पना स्पष्ट होतात आणि मी ते बिनधास्तपणे लिहू शकते. अशा लिहिण्यामध्ये कोणताही संभ्रम राहत नाही आणि लिहिण्याचा आनंद अवर्णनीय असतो. आता विकसित तंत्रज्ञानामुळे गुगल वरून माहिती बघता येते. चित्रही दिसतात पण मी जेव्हा करत होते तेव्हा गुगल, इंटरनेट वगैरे काहीही नव्हतं. मग जे काही बघायचं ते आम्ही फिरून बघत असू. कर्नाटकातील एका प्रवासात वेलदोड्याचं झाड पाहिल्यानंतर परब्रह्म भेटल्यासारखा आनंद मला झाला.

प्र. मूळ कलाकृतीतील खास शब्द तसेच ठेवून दऱ्या-खोऱ्यातील परिसर आणि वातावरणातील चित्रणात जिवंतपणा आणण्यात किंवा तेथील चालीरीती परंपरा आणि संस्कृती दाखविण्यात काही अडचणी आल्या का ?

उ. असं क्वचितच झालं असेल. अन्यथा अशा अडचणी बहुतेक वेळा आल्या नाहीत. महाराष्ट्र आणि कर्नाटक हे दोन्ही राज्य भारतातील आहेत आणि ते शेजार - शेजारचे राज्य आहेत. संपूर्ण कर्नाटक मला परिचित आहे असं मी म्हणणार नाही पण मला उत्तर कर्नाटकाची थोडीफार माहिती आहे. ते अगदी अपरिचित नाही. त्यामुळे संस्कृती, परंपरा आणि नैसर्गिक वातावरण दाखविण्यात काही अडचण वाटली नाही. परकीय भाषेतील कादंबरीचा अनुवाद करताना अशी अडचण वाटू शकेल. तशा कादंबरीतील संस्कृती समजून घेताना आणि मांडतांना प्रश्न येऊ शकतात. त्यासाठी तळटीप द्यावी लागते. पण ग्रामीण भागातील घरांचं वर्णन असेल आणि मला शहरांमधली घर माहिती असतील आणि खेड्यांमधील माहिती नसतील तरी शहर आणि खेड्यांमधील घरांचा वेगळेपणा मी माझ्या दृष्टीकोनातून मी दाखविला की काम होतं. तुलनेने अशा अडचणी कमी येतात. आणि शब्दांच्या बाबतीत सगळ्या भारतीय भाषांमधील मला एक अडचण दिसते. संस्कृत भाषेतील काही शब्द जसेच्या तसे सगळ्या भाषांनी उचलले आहेत पण अर्थ संस्कृतमधील न ठेवता प्रादेशिक भाषांमध्ये दिले जातात त्यामुळे शब्द जरी तोच असला तरी प्रत्येक भाषेत अर्थ वेगवेगळे घेतले जातात. त्यामुळे कधीकधी गोंधळ होतो या बाबतीत एक उदाहरण नेहमी सांगते की एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर जी सभा होते त्याला कन्नडभाषेत संतापसभा म्हणतात. एखाद्या व्यक्तीला शोक झाला की त्याला 'संताप' झाला असं म्हणतात. पण मराठीत शोक विषयक संदर्भातला संताप हा शब्द वापरला तर अनर्थ होऊ शकेल. हा तत्सम शब्द असला तरीही आपण या अर्थाने वापरू शकत नाही मराठीत संताप या शब्दाचा अर्थ राग असा होतो. त्यामुळे अशा शब्दांपासून थोडासं जपून राहावं लागतं. संस्कृत आहे म्हणून तसंच वापरला तर चालणार नाही.

प्र. अनुवादित कलाकृतीची भाषा कोणाची असते मूळ लेखकाची की तुमची ?

उ. माझी असते. मूळ लेखकाची भाषा कलाकृतीचा शेवटाला संपते ना ! ती पोचत नाही त्यामुळे तर त्याचं भाषांतर करावं लागतं ! त्यामुळे भाषेत ते अंतर पडतं. मी अनुवाद करते म्हणजे भाषेमध्ये कलाकृतीचा आत्मा आणण्याचा प्रयत्न करते. तरी देखील मूळ भाषा सोडावी लागते पण कलाकृतीशी बांधून राहावं लागतं. माझंच पुस्तक मला लिहायचं असेल तर मला माझी भाषा वापरली तर चालते. मी मराठीतून वेगवेगळ्या विषयांवर बरेच लेख लिहिले आहेत. तिथे माझी भाषा चालते. पण अनुवादित कलाकृतींमध्ये केवळ माझी भाषा नसते. मूळ कलाकृती माझ्याकडून एक विशिष्ट भाषा बनवून घेते आणि त्या भाषेत मी लिहित जाते म्हणून मीच अनुवादित केलेल्या भैरप्पा, शिवराम कारंत गिरीश कार्नाड, तेजस्वीन पूर्णचंद्र, अनंतमूर्ती या सगळ्यांच्या कलाकृतींमध्ये एकीकडे मी असले तरी मी शंभर टक्के नसते आणि या दोन्ही गोष्टी तेवढ्याच खऱ्या आहेत. तेजस्वी जी एक नर्मविनोदी शैली आहे ती शैली आपोआप माझ्या भाषेला येते भैरप्पा यांची घनगंभीर पद्धत आहे. माझ्या भाषेला ते रूप घ्यावं लागतं. म्हटलं तर ती भाषा माझी असते आणि म्हटलं तर ती शंभर टक्के माझी नसते.

खूप छान उत्तर आहे. यातून एक वेगळी दृष्टी मिळते.आदर्श अनुवादक कसा असावा हे दाखवणारं हे उत्तर आहे.

प्र. लेखकाचं चारित्र माहित असलं आणि लेखकाशी परिचय असला तर कलाकृतीचं आकलन होणं सुलभ होतं का ?

उ. काही प्रमाणात होतं. तरीपण लेखकाच्या वैयक्तिक गोष्टी माहीत असण्याची गरज नसते. म्हणजे लेखकाचा विवाह, अपत्य, जगण्याची शैली, आर्थिक परिस्थिती हा तपशील माहीत असावा असं नाही. पण लेखकाची विचारधारा माहित असणं जरुरी असतं. कोणत्या पद्धतीची वाक्यरचना हा लेखक करणं शक्य नाही हे माहिती असायला पाहिजे. याचं एक उत्तम उदाहरण मूकज्जी या कादंबरीचं देता येईल. यातील मूकज्जी हे स्त्रीपात्र शिवराम कारंत यांचं प्रतीक असावं. तिचा भाचा मृत्युमुखी पडतो आणि तिच्या नातवाचं ती समाधान करत असते. ते करताना मूकज्जीचं शेवटचं वाक्य कारंत यांनी लिहिलं आहे की 'जा आणि जाळून ये.' तिथे मी मूकज्जी काय म्हणू पाहते आहे हे शिवराम कारंत यांच्यासारखा लेखक समजून घेतला नाही तर मी अनुवादात 'क्रिया कर्म करून ये' असं म्हणू शकते. पण कादंबरीतील वृद्ध स्त्री कादंबरीच्या सुरुवातीपासून काय म्हणते आहे हे लक्षात घेऊन 'झाडावरचं पान गळून पडतं तसं माणूस मरून पडला आहे, त्याला जाळून ये' असं लिहिलं तरच ते योग्य होणार आहे. त्याऐवजी 'जाळून ये' या शब्दात कसं लिहू असा भाबडेपणाने विचार केला आणि 'क्रियाकर्म करून ये' असलं काहीतरी लिहिलं तर ती माझी चूक होईल. इथे मला ती व्यक्ती माहित असणं, तो विचार माहित असणं गरजेचं वाटतं.

प्र. अनुवाद करताना कलाकृतीशी समरस होऊन हृद्य प्रसंगात भावविवश होण घडतं का ?

उ. हो. हो. तसं होतं. कारण आपण कलाकृतीमध्ये खूप गुंतून गेलेले असतो. सुरुवातीला असं माझं खूप होत असे. जेव्हा मी 'वंशवृक्ष' अनुवादित केली तेव्हा अगदी अक्षरशः डोळे पुसत पुसत मी त्यातील काही प्रसंग लिहिलं. ते इतकं पकड घेतलं सगळं असे की त्यात मी भावविभोर होऊन स्तब्ध होत असे. त्यामुळे एक प्रसंग झाला की लेखन आपोआप थांबत असे आणि शांत झाल्यानंतर मग मी परत लेखनाला सुरुवात करत असे. पण हे कलाकृतीवर देखील अवलंबून असतं. कलाकृतीची ताकद आपल्याला हे करायला लावते. आपण इमोशनल झाल्यावर लेखनातही ते येतं. माझ्या असं लक्षात आलं की जिथे जिथे तसे इमोशनल होऊन अनुवाद केले आहेत ते वाचकांना तसेच पोहोचले आहेत.

वाचकांना अशा भावना पोहोचणं ही फार मोठी गोष्ट आहे आणि तुमच्या अनुवादात येते. सलाम तुमच्या लेखनाला आणि अनुवादाला !

कन्नड लेखकांशी तर तुमचा स्नेह राहिलेला आहे पण पुलं. सुनीताबाई, अनिल अवचट यासारख्या मराठी लेखकांशीही तुमचा स्नेहबंध राहिलेला आहे यांच्या काही आठवणी.........

सगळ्यांच्या आठवणी तर भरपूर आहेत. अनिल अवचट हे आमचे खूप चांगले स्नेही आहेत. आठवड्यातून किमान दोनदा तरी आम्ही भेटतोच.१९९२ सालापासून आमची आणि त्यांची मैत्री आहे. सुरवातीच्या काळात मी, विरूपाक्ष आणि अवचट असे आम्ही तिघे फिरायला जात होतो. खूप गप्पा, खूप चर्चा नंतर कधी कधी त्यांच्या किंवा आमच्या घरी जाऊन खाणं-पिणं होत असते असे आमचे आणि त्यांचे संबंध आहेत. आता करोना - काळात आम्ही बाहेर पडत नाही म्हणून दर रविवारी ते आम्हाला भाजी आणून देतात. एकही रविवार चुकत नाही. शनिवारी त्यांचा फोन येतो आणि ते यादी मागून घेतात. ते गंमतीने म्हणतात, 'मंत्रिमंडळाची यादी झाली का ?' अशा पद्धतीने त्यांची मला विचारणा हे ठरलेलंच आहे. मग मला काय पाहिजे त्याची यादी मी तयार ठेवते. रविवारी ते गाडी आणि ड्रायव्हर घेऊन येतात. माझ्या कडून यादी घेतात. त्यांचं आणि माझं सामान घेऊन येतात, माझं माझ्याकडे देतात. त्यांचा संजय ड्रायव्हरही आता आमच्या ओळखीचा झाला आहे. तो आमच्या मुलासमान आहे. आमची जेव्हापासून ओळख झाली तेव्हापासून त्यांचं काहीही लेखन झालं तरी ते आम्हा दोघांना वाचून दाखवतात. तशा वाचनाचा आमच्या घरी एक सोहळा असतो. साधारणपणे ती वेळ सकाळची असते. साडे आठ - नऊला लेखाचं वाचन होतं आमचे दोन मित्रही - बापट पतीपत्नी या वाचनात सहभागी असतात. नाश्त्याला आम्ही काहीतरी गरमगरम छान पदार्थ करतो. बरेचदा नाश्ता विरूपाक्ष बनवतात. एखादे वेळेलाच मी करते. गरम गरम दोसे किंवा साबुदाण्याची खिचडी अवचटांना खूप आवडते. त्यांची तशी फरमाईश पण असते. ,'उद्या काय करताय ? खूप दिवसात खिचडी नाही खाल्ली ! उद्या करा ना !'असं वगैरे हक्काने सांगतात. त्यांनी वाचायचं,सगळ्यांनी मिळून खायचं आणि चांगलं

झालं असेल तर अशी पावती देखील द्यायची. त्यांच्या वाचनातून बऱ्याच गोष्टींची माहिती आम्हाला होत असते. असं वाचन चालू असताना त्यांच्याबद्दलच्या अनेक गोष्टी, प्रसंग आम्हाला आठवतात. लेखात ते टाकण्याविषयी आम्ही त्यांना सुचवतो , एखादा लेख जमला नाही असं वाटलं तर 'हा लेख बाजूला काढून ठेवा अजून तो पिकला नाहीये 'असंही आम्ही त्यांना सांगू शकतो,असे आमचे त्यांच्याशी संबंध आहेत.

कमल देसाई नावाच्या एक खूप चांगल्या लेखिका होत्या. त्यांचे 'काळा सूर्य', 'हॅट घालणारी बाई ' आजही प्रसिद्ध आहेत. कितीतरी मुलींना मार्गदर्शक अशी ती पुस्तकं आहेत. त्या आमच्याकडे राहायला येत. त्यांची आणि विरूपाक्षांची गहन तत्त्वज्ञानाविषयी चर्चा चालत असे आणि माझ्याशी मात्र घरगुती गोष्टींबद्दल संवाद होत. त्यांना लोणचं खूप आवडायचे त्यामुळे त्या येणार असल्या की मी लोणचं तयार ठेवत असे. त्यांच्याबरोबरची एक गमतीदार आठवण सांगते. त्या आमच्याकडे राहायला असतानाची ही आठवण त्या सकाळी उठून स्वयंपाक घरात आल्या तेव्हा विरूपाक्ष चहा करत होते. दुधाची पिशवी फोडून त्यांनी चहा पुरता दूध एका भांड्यात घेतलं आणि गरम ठेवलं आणि बाकी पिशवी ओट्याला टेकून उभी ठेवली. त्या विरूपाक्षांना बिरूदा म्हणत. त्या म्हणाल्या 'बिरूदा, बिरूदा ती पिशवी पडेल, दूध सांडेल.' हे त्यांना म्हणाले ,'नाही कमलताई, नाही सांडणार. ती पिशवी स्थिर राहावी म्हणून पृथ्वी स्वतःभोवती फिरते आहे, पृथ्वी सूर्याभोवती फिरते आहे आणि सर्व सूर्यमंडल आणखी कुठल्या तरी ग्रहाभोवती फिरते आहे. हे असं का ....तर माझी दुधाची पिशवी लवंडू नये म्हणून ! त्यामुळे तुम्ही काही काळजी करू नका कमलताई, चहा घ्या' विरूपाक्षने असे म्हटल्याबरोबर एकदम हास्यकल्लोळ उडाला.अशा गमतीजमती, असे संवाद खूप होत असत. आयुष्याच्या शेवटच्या काळामध्ये काही वर्षात त्या त्यांच्या भाच्याकडे सांगलीला गेल्या. तिथे त्यांचा मृत्यू झाला. पण त्यापूर्वीपर्यंत त्यांच्याशी माझा संवाद असे.

भैरप्पांबरोबर गावाला जाण्याचा योग खूप वेळा आला. पुण्याला आले तर ते घरीच उतरतात .१९८४-८५ सालापासून तर जानेवारी २०२० मध्ये त्यांच्या दोन पुस्तकाच्या प्रकाशनासाठी ते पुण्यामध्ये आले होते,त्या प्रत्येक वेळी ते आमच्या घरीच उतरले होते. असे संबंध असल्यामुळे त्यांच्याबद्दलच्या आठवणी तर फार आहेत. किती म्हणून सांगणार ?त्यातली फक्त एक इथे सांगते. नाशिकला एक कार्यक्रम होता. मी त्यांची मुलाखत घेतली होती. तेथून आम्ही तिघे परतत होतो. कार्यक्रम संपवून घरी पोहोचेपर्यंत आम्हाला दुपारचे दोन वाजले. मग घरी जाऊन काही बनवून खाण्यापेक्षा आम्ही एका हॉटेलमध्ये गेलो. खाणं झाल्यानंतर सहाजिकच विरूपाक्ष बिल देण्यासाठी उठले तर भैरप्पा ठामपणे म्हणाले की 'नाही विरूपाक्ष! बिल तुम्ही देऊ नका.मी देणार !' मी भैरप्पांना चेष्टेने हसत हसत म्हणाले 'अहो, तुमच्यामुळे आम्ही नाशिकला चार दिवस पाहुणचार घेऊन आलो, तर आता हे एक बिल देऊ द्या ना यांना' त्यावर

भैरप्पा जे काही बोलले त्यामुळे आम्ही चकीत झालो. 'अहो, तुमच्याशिवाय महाराष्ट्रात मला कोणी ओळखलं असतं का ?' असं ते मिश्कीलपणाने म्हणाले खरं ! पण त्यातून त्यांचा मोठेपणाच दिसून आला.

सुधा मूर्ती तर आमच्या कॉलनीत राहायच्या आणि आमच्या घरी देखील यायच्या. तेव्हा त्यांनी टेल्को मधील नोकरी सोडली होती आणि 'इन्फोसिस' एवढं मोठं होऊन त्या बंगलोरला राहायला गेल्या नव्हत्या. त्यांच्याबरोबरच्या खूप छान छान आठवणी आहेत.

तेजस्वी निसर्गात रमणारे लेखक ! वीस एकर शेती घेऊन वेलदोड्यांची शेती वगैरे केलेला हा माणूस! त्यांच्याकडे आम्ही गेलो होतो आणि त्यांच्या पत्नीने मला एक छानसं वेगळं दुर्मीळ रोपटं मला भेट म्हणून दिलं. पण मी ते घेण्यास नकार दिला. पण त्यांनी पुन्हा पुन्हा आग्रह केला. शेवटी मी त्यांना सांगितलं की 'फ्लॅटमध्ये राहणारी आम्ही माणसं ! आमच्याकडे शेत जमीन कुठे आहे ? हे झाड मी कुठे लावू मी ?' असं मी सहज बोलून गेले........ मात्र माझं हे बोलणं तेजस्वी यांना खूप लागलं. ते आपल्या पत्नीला म्हणाले 'सरस्वती, या काय म्हणाल्या बघितलंस ? झाड लावायला जमीन माझ्याकडे नाही असं त्या बोलल्या........' अस्वस्थ होत बोलत होते. माझ्याकडे शेत नाही ही कल्पनाच त्यांना असह्य होत होती. फ्लॅट मध्ये राहणाऱ्या लोकांनी हे सहज स्वीकारलं आहे की त्यांच्याकडे जमीन नाही. त्यात एवढी मोठी गोष्ट कोणती? यातून कोणाला झाडांची खूप हौस आणि त्यासाठी वेळ असेल तर कुंड्यांमध्ये झाडे लावतात की !

पुण्यासारख्या शहरांमध्ये वेगवेगळे व्याप असतात आणि शेती करण्यासाठी वेळही नसतो शेती हा मुख्य धंदा पुण्यात नाहीच ! पण त्या गोष्टीचं त्यांना आश्चर्य वाटलं.

प्र. हे लोकं वास्तवापासून दूर आहेत का मग ?

उ. नाही ! अगदीच नाही ! उलटे आपण वास्तवापासून दूर आहोत.आपण मातीपासून तुटलेलो आहोत.

मी तुम्हाला गिरीश कार्नाड यांचा अनुभव सांगते. त्यांच्याशी एकदा अशाच गप्पा चालल्या होत्या. मी त्यांना म्हटलं ,'महाराष्ट्रामध्ये नागरी संवेदना व्यक्त करणारं साहित्य जितकं सकसपणे दिसतं, तितकं कर्नाटकामध्ये दिसत नाही, तर असं का ?' त्यावर कार्नाड म्हणाले 'तुमचं निरीक्षण बरोबर आहे. पण कर्नाटकात इतकी महानगरं नाहीत. कर्नाटकात बंगलोर सोडता दुसरं शहर नाही.' खरंतर तसं आता होतंय आणि ते एक मोठं गावच आहे ! ते महानगर नाही.दिल्ली, मुंबई,कलकत्ता हे महानगरं आहेत.त्यांना आपली वेगळी संस्कृती आहे . आपण किती सहजपणे स्वीकारलं आहे की आपल्याकडे माती नाही ? ही संवेदना आपण स्वीकारली आहे ना ? त्यामुळे तेजस्वीनची जी प्रतिक्रिया होती ती प्रामाणिक होती असं मला वाटतं. या लोकांना माती नसणं हे माहीतच नाही. मला वाटते आपली प्रतिक्रिया नागरी संवेदनेशी जोडली आहे आणि त्यांची प्रतिक्रिया ही मातीशी ! हा दोन संवेदनांमधील

फरक आहे.

प्र. तुमचा आणि सुनीताबाईंचा स्नेह होता ना ?

उ. आमचं आणि त्यांचं बऱ्यापैकी जाणं- येणं होतं. स्नेह हा शब्द वापरावा की नाही माहीत नाही,पण त्यांच्या दृष्टीने आम्ही खूप ज्युनियर होतो.आम्हाला त्यांच्याविषयी खूप भक्ती होती, अगत्य होतं.आम्ही काही कार्यक्रमांच्या निमित्ताने एकत्र आलो. आमचं त्यांच्या घरी जाणं - येणं आहे. ते ही आमच्या घरी येत होते. एक म्हणजे आमचं घर खालच्या मजल्यावर होतं. पु.लं.ना ज्या वेळेसपासून पायाचा त्रास चालू झाला तेव्हापासून ते जिने चढत नसत. त्यामुळे कार्यक्रम ठरविण्याच्या बैठकीच्या दृष्टीने आमचं घर सोयीचं होतं. 'आहे मनोहर तरी' चा कन्नड अनुवाद विरुपाक्ष यांनी केला. याशिवाय पु. ल. देशपांडे व्यक्ती आणि वाङ्मय या नावाने निवडक पु. ल. कन्नडमध्ये अनुवादित केले. कन्नड मधल्या एका प्रतिष्ठित साप्ताहिकासाठी आम्हाला त्यांची मुलाखत घेण्याची संधी मिळाली. मल्लिकार्जुन मन्सूर हे पु.लंचे जवळचे स्नेही होते. त्यांनी त्यांचं आत्मचरित्र कन्नड मध्ये लिहिलं आहे. पु.लं.च्या आग्रहानुसार या आत्मचरित्राचा मराठी अनुवाद मी केला.अशा काहीतरी उपक्रमांमुळे त्यांच्या बरोबर संवाद साधण्याची संधी मिळत गेली, जाणं-येणं होत गेलं. आमच्याकडे भैरप्पा आले होते. त्यांना भेटायला म्हणून ते दोघं आले. अशा महत्वाच्या कारणांमुळेच आमच्या भेटीगाठी होत होत्या. सहज उठून गप्पा मारणारे आम्ही त्यांचे स्नेही नव्हतो. पण त्यांनाही आमच्याबद्दल काही वाटत असावं त्यांच्याकडे कन्नड कालनिर्णय येई. मग ते आमच्या उपयोगाचं म्हणून आम्हाला ते आम्हाला देऊन देत.त्यांच्याकडे शेतातून कोणी काही आणून दिलं, प्रेमाने खाद्यपदार्थ आणून दिले तर त्या आनंदात ते आम्हालाही सहभागी करून घेत. आम्हाला ते पदार्थ चाखवित.

शिवराम कारंत, भैरप्पा या महान लेखकांचं माणूस म्हणूनही तुम्हाला दर्शन झालं. माणसातला लेखक आणि लेखकातला माणूस असं वेगळं दर्शन घडू शकते का ?

लेखनातून पात्रांचे स्वभावविशेष लेखक दाखवित असतात. त्यातून त्यांना काहीतरी मांडायचं असतं. त्या पद्धतीने त्यांचे ती पात्र वागत असतात. काही वेळा उलट ही होत असते. ती पात्र आप -आपल्या गुणवैशिष्ट्यांनुसार लेखकाला एखाद्या निर्णयाप्रत पोहोचवित असतात. शिवराम कारंत यांच्या बद्दल मला असं वाटतं की त्यांची पात्रं जगत जगत पुढे चालली आणि हळूहळू कुठलातरी एक निर्णयाला पोहोचत आहेत. तो जगण्याचाच एक भाग आहे. भैरप्पांच्या बाबतीत असं होतं की त्यांना काहीतरी मांडायचं असतं. त्यासाठी ते श्रमंती करतात. वेगवेगळ्या ठिकाणी स्वतः जाऊन येतात. आवश्यकता असेल तर त्या त्या विषयांची पुस्तक मिळवून अभ्यास करतात. त्या विषयांच्या तज्ज्ञांशी चर्चा करतात. अशी माहिती मिळवून त्यांची कादंबरी पुढे जाते. पण ती पुढे जातानाही भैरप्पांच्या पद्धतीने ती पुढे जाते. कितीतरी वेळा त्यांचं म्हणणं असं असतं की त्यांनी साहित्यकृतीसाठी केलेला अभ्यास बाजूला राहतो

आणि कादंबरी वेगळ्याच अंगाने पुढे जाते. शिवराम कारंत आणि भैरप्पा या दोघांच्याही बाबतीत व्यक्ती म्हणून त्यांचे जे गुणविशेष आहेत ते मला महत्त्वाचे वाटले. त्यांच्यासोबत आमचा टप्प्याटप्प्याने का होईना पण दीर्घ सहवास आला. त्यात असं लक्षात आलं की ही माणसं माणसं म्हणूनही खूप वेगळी आहेत. या दोघांचंही एक वैशिष्ट्य होतं की ते समोरच्याला बोलतं करीत. भैरप्पा असे होते की त्यांना त्यांच्या पूर्वी लिहिलेल्या साहित्यावर चर्चा करण्याचा कंटाळा येई. कारण काही कादंबऱ्या होऊन पंचेचाळीस पन्नासच्या वर वर्षे झाल्याने त्यावर काय चर्चा करायच्या असे त्यांना वाटत असे. या उलट त्यांना वर्तमान काळ,या काळात जगणे, त्याबद्दलच्या चर्चा आवडत. त्यामुळे त्यांना आजच्या काळातल्या माणसांचशी भेटायला आणि त्यांच्याशी संवाद साधायला आवडत असे. मग विविध ठिकाणी जाऊन वेगवेगळी माहिती करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असे. पुण्याला आल्यानंतर एक दिवस त्यांनी फिल्म इन्स्टिट्यूट मध्ये तुमची ओळख आहे का ? ती बघता येईल का? अशी विचारणा केली. तिथल्या कोणाशी माझी ओळख नव्हती. परंतु ओळख काढता येईल असे सांगून त्यांना फिल्म इन्स्टिट्यूट दाखवण्याची तयारी दर्शविली आणि त्याप्रमाणे प्रयत्न केले. तेथील नंबर मिळवले आणि ते बघायला गेलो. तिथे गेल्यानंतर तेथील यंत्रणेबद्दल चौकस बुद्धीने प्रश्न विचारून ती यंत्रणा त्यांनी समजावून घेतली. पुस्तकात लिहिण्यासाठी ही माहिती हवी होती असे नाही. ही माहिती अजून त्यांच्या पुस्तकात आलेली नाही पण प्रत्येक गोष्टीबद्दल त्यांना उत्सुकता असते. समजा एखादा अणुशास्त्रज्ञ त्यांना भेटला तर त्याच्याबरोबर बोलतात, एखाद्या महत्वाच्या संशोधनाबद्दल ते समजावून घेतात, पुस्तकांची माहिती घेतात आणि पुस्तकं वाचतात.असं त्यांचं कुतूहल चौफेर धावत असते.

भैरप्पा पहाटे साडेतीन - चारच्या सुमारास उठून फिरायला जातात. घरची किल्लीची जागा त्यांना माहित आहे. स्वतः दार उघडून फिरायला जातात. आम्हाला उठवत नाहीत. मग फिरून साडेसात पर्यंत परत येतात. फिरताना कोणीही त्यांना त्यांच्या बरोबर नको असतं तर त्यांना एकांत हवा असतो. एकीकडे ही माणसं समाजात जगत असतात आणि एकीकडे एकांतातही रहात असतात. त्यांची कादंबरी एकांतात जन्म घेऊन वाढत असते आणि ते समाजात रहात असल्यामुळे कादंबरीचं पोषण होतं.

शिवराम कारंत यांचं जगणं फार वेगळं होतं. त्यांच्या आसपास विविध क्षेत्रातली, विविध दर्जाची माणसं असत. वेगवेगळ्या ठिकाणी भटकंती केल्यामुळे आणि खूप माणसांच्या भेटी होत गेल्यामुळे त्यांचं अनुभवविश्व समृद्ध होतं. अशा समृद्ध अनुभव विश्वात त्यांना लेखनाचे विषय मिळत. मग त्याचं लेखन झाल्यानंतर नव्याने जगण्यास मोकळं होत ते पुढे जात.

प्र. लेखकांच्या बाबतीतली तुमची निरीक्षणं आहे खूप छान आहेत.!

उ. विविध लेखकांचं लेखक म्हणून तर दर्शन तुम्हाला घडलं पण माणूस म्हणूनही अनुभवलं.

प्र. तुम्ही अनुभवलेल्या लेखकांमधील लोभस दर्शन कोणाचं ? लेखकाचं की त्यांच्यातल्या माणसांचं ?

उ. लेखकांचं लेखन आम्हाला पटलं, आवडलं म्हणूनच ते आमच्या आणि आम्ही त्यांच्या जवळ आलो. जवळजवळ बारा-पंधरा लेखकांचं तरी साहित्य मी अनुवादित केलंय. पण निकटचा संबंध मात्र काहीच लेखकांशी आला. शिवराम कारंथ, भैरप्पा आणि अलिकडे वैदही ही मंडळी पुण्यात आली तर आमच्याकडे उतरतात. आम्ही त्यांच्या गावाला गेलो की त्यांच्याकडे उतरतो. त्याच्यात आणि आमच्यात एक प्रकारचा जिव्हाळा तयार झाला आहे. ती सगळी व्यक्तिमत्व वेगवेगळी ! पण प्रत्येकामध्ये एक प्रकारचा लोभस भाग असतो. या सगळ्यांच्या माणूसपणाच्या खूप आठवणी माझ्याजवळ आहेत. छोट्या छोट्या गोष्टी मधून ह्या व्यक्ती किती महान आहेत हे दिसून येते. १९९६ सालची ही गोष्ट आहे. त्यावेळी शिवराम कारंत ९५ वर्षांचे होते.आळंदीच्या साहित्य संमेलनासाठी ते आले होते तेव्हा माझ्या घरी उतरले होते. त्यानंतर आठवडाभरातच थिएटर एकॅडमीचा चार दिवसांचा एक कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी कारंत पुन्हा येणार होते. कोणाचे कपडे किंवा सामान राहिलं तर त्यांच्या येण्याचा योग लवकर येतो असे म्हणतात ! साहित्य संमेलन संपल्यानंतर ते जाण्यासाठी निघाले तेव्हा हसत हसत म्हणाले 'मी माझं धोतर आणि पंचा इथे ठेवून जातो.' हा योग लवकर आणू या असं त्यांना म्हणायचं होतं. मग आम्हाला पण छान वाटलं आणि त्यांचं सामान ठेवण्याची आमच्या घरी जागा होती. तिथे आम्ही ते ठेवून दिलं. प्रत्यक्षात मात्र असं झालं की येथून गेल्यानंतर ते आजारी पडले. त्यांना पुण्याचा प्रवास झेपण्यासारखा नव्हता. त्यांचं शालिग्राम गाव ते मंगलोर हा एका तासाचा गाडीचा प्रवास, तेथून मुंबईला विमानाने जाणं, मुंबईहून आणखी एका विमानाने पुण्याला येणंअसा दीर्घ प्रवास आजारपणानंतर त्यांना शक्य नव्हता. त्यांचं येणं रहित झालं. भेट होईल असं त्यांनी सांगितलं आणि भेट झाली नाही म्हणून आम्हाला खूप वाईट वाटलं. पुढे दहा ऑक्टोबरला त्यांचा वाढदिवस होता. ही संधी साधून आम्ही त्यांच्या भेटीसाठी त्यांच्या गावी गेलो. कारंत हे एक ऋषीतुल्य व्यक्तिमत्व ! ते एकटेच राहत असल्यामुळे जेवणाचा डबा मागवित. पण आम्ही त्यांच्याकडे जेवलंच पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. वास्तविक आम्ही हॉटेलमध्ये उतरलो होतो. तिथे जेवू शकत होतो. परंतु त्यांच्या सोबत त्यांच्या घरी आम्ही जेवलं पाहिजे हा त्यांचा आग्रह आम्हाला मानावा लागला. त्यांच्यातल्या त्या माणुसकीच्या दर्शनाने आम्ही स्तिमित झालो. एवढे मोठे लेखक ! पण आमच्याबद्दल दाखवलेली आस्था त्यांनी अशी व्यक्त केली. येथे मला त्यांच्या भावना महत्त्वाच्या वाटल्या. एवढ्या वयातही त्यांची संवेदनशीलता जागृत होती ....हे त्यांच्या बाबतीतलं एक विशेष होतं.

भैरप्पांच्या संदर्भात ही एक विशेष आठवण अशी की अक्षरधाराने भैरप्पांची एक मुलाखत आयोजित केली होती. मुलाखत मी घेणार होते.ते आमच्याकडे उतरले होते. कार्यक्रमानंतर तेथे नाष्ट्याची व्यवस्था होती. परंतु त्यांनी मला आधीच सांगितलं होतं की "मला नाश्तातील पदार्थ सहन होत नाहीत. मी ते खाणार नाही. तुम्ही माझ्यासाठी दही-भात काढून ठेवाल.' कार्यक्रमातून परत आल्यानंतर माझी

काही गैरसोय होऊ नये म्हणून त्यांनी केलेली ही छोटीशी सूचना मला महत्त्वाची वाटली. त्यांच्यातील संवेदनशीलतेनचं हे दर्शन मला भावलं. भैरप्पा आल्यानंतर त्यांचे एक परिचित त्यांना भेटण्यासाठी घरी येणार होते. आम्ही त्यांची वाट बघत होतो. तेवढ्यात विरूपाक्ष, माझा आणि लॅंड - लाईन असे असेल नसेल ते सगळे फोन एकदम वाजू लागले. त्यावरून काही वाईट बातमी नसेल ना असा विचार मनात आला. तसंच झालं होतं ! माझ्या भावाच्या मृत्यूची दुःखद बातमी देणारे ते फोन होते. विरूपाक्ष एका फोनवर आणि मी दुसऱ्या फोनवर बोलत होतो. फोनवर बोलत बोलत मी आतल्या खोलीत गेले. एव्हाना भैरप्पांच्या लक्षात आलं होतं हे काहीतरी विघटित घडलं आहे. त्यांनी विरूपक्षकडे चौकशी केली. विरूपाक्षांनी त्यांना ही बातमी सांगितली. त्यांनी मला खोलीच्या बाहेर बोलावलं आणि म्हणाले,' जे घडलं ते वाईट घडलं. तुम्ही इथली काळजी करू नका. जे कोणी माझे पाहुणे येणार असतील त्यांना मी बघतो. तुम्हाला परगावी जायचं असेल तर तुम्ही जाऊन या.' त्यांच्या अशा बोलण्याने मला धीर आला मला परगावी जायचे नव्हते तर पुण्यातच दुसऱ्या भागात जायचं होतं. मी काही बोलण्यापूर्वी ते पुन्हा म्हणाले 'तुम्ही काळजी करू नका. तुमचं काय असेल ते चालू देत'. मी त्यांना म्हटलं , ' प्रश्न तो नाही तर वेगळा आहे जो भाऊ गेला त्या भावाचा माझ्या आई-वडिलांनापासूनच संबंध तुटला आहे. त्या भावाने कोणाशीच संबंध ठेवले नाहीत. आमचे आई-वडील देखील गेले तेव्हा त्याचं वागणं आठवता मला जावं असं वाटत नाही. पण तरीही तो रक्ताचा भाऊ होता हे काही खोटं नाही ! मला काय करू कळत नाही '

तेव्हा भैरप्पांनी शांतपणे ते ऐकून घेतलं आणि काही क्षणांनी ते म्हणाले, 'तुम्ही आत्ता ज्या मानसिकतेतून जात आहात तशाच मानसिकतेतून मी स्वतः गेलो आहे . माझं माझ्या वडिलांचे सोबतच नातं असंच होतं. माझ्या वडिलांच्या निधनानंतर माझ्या पण मनात हेच विचार दाटले होते. मला सांगावसं वाटतं की तुम्ही दोघं एकाच आई-वडीलांच्या पोटी जन्मलेत, त्यामुळे असं वाटणं साहजिक आहे. पण आता तुम्ही डोक्यावरून पाणी घ्या आणि डोकं शांत झालं की मग विचार करा आणि योग्य तो निर्णय घ्या. आता या क्षणी तुम्ही एवढं करा तुम्हाला बरं वाटेल.' त्यांच्या या सांगण्यात जिव्हाळा आणि आपलेपणा होता. म्हणून मला थोडा धीर आला. त्यांनी सांगितले तसे मी केलं आणि खरोखर मला बरं वाटलं आणि मला हायसं वाटलं . दुसऱ्याच दिवशी असलेल्या मुलाखतीबद्दल आम्हाला बोलायचं होतं. अक्षरधाराची ती मुलाखत काही छोटी नव्हती, तीही महत्त्वाचीच होती. मी शांत झाल्यानंतर आम्ही त्या मुलाखतीबद्दल बोललो. माणूस म्हणून यांचा हा अनुभव सदैव लक्षात राहील असाच आहे. कधी कधी आपण घेतलेला निर्णय आपल्याला छळत राहतो पण त्यांच्या या सल्ल्यामुळे त्या क्षणी खूप आधार मिळाला होता मला !. आणि माझ्या दृष्टीने तो प्रश्न तिथेच सुटला . त्याचा मानसिक त्रास मला नंतर कधीच झाला नाही .

प्र. एखादी कलाकृती तुम्हाला अनुवादित करायची आहे पण लेखकाची अनुमती मिळाली नाही असं कधी झालंय का ?

उ. हो. झालं ना ! प्रथम मी शिवराम कारंत यांचे 'डोंगराएवढा' अनुवादित केली. नंतर त्यांच्या दोन कादंबऱ्या मला समोर दिसत होत्या. 'चोमा महार' नावाने ती अनुवादित झाली. हा अनुवाद मी नाही दुसऱ्या कोणी केला आहे. 'मृत्यूनंतर' ही आणखी एक होती. ,'चोमा महार' माझ्याकडून झाली नाही, त्याचं मला इतकं काही वाटलं नाही. पण 'मृत्यूनंतर' कादंबरी करण्याची माझी तीव्र इच्छा होती, कारण शिवराम कारंत यांचं मृत्यूबद्दलचं चिंतन त्यात आलेलं आहे. माझ्या हातातील काम संपवून त्यांची अनुमती घेईपर्यंत त्यांनी ती दुसऱ्या कोणाला अनुवादासाठी देऊन टाकली होती. त्यामुळे खूप इच्छा असूनही ते काम माझ्या हातून झालं नाही. पण अशा राहून गेलेल्या कामाची चुटपुट वाटतेच ना ! माझ्या प्रगल्भतेचा विकास होण्यासाठी ती कादंबरी माझ्या हातून जायला पाहिजे होती असं मला अजूनही वाटतं. नंतरच्या काळात मात्र माझं काम वाढत गेलं. माझं नावही लोकांपर्यंत पोहोचेलं. त्यानंतर मला कोणी नाही म्हणण्याचा प्रश्न आला नाही. उलट लोक माझ्याकडे आले. माझ्यासाठी कित्तेक जण थांबले. माझ्या वेळेच्या सोयीनुसार काही वेळेला थांबावं लागलं पण अनुवादाचं काम माझ्यासाठी राहिलं. ते दुसऱ्या कुणाला दिलं गेलं नाही. आत्मस्तुती म्हणून नाही मी वस्तुस्थिती सांगतेय.

त्रिवेणी नावाच्या एक लेखिका होत्या. १९६० साली त्यांचं निधन झालं.'मांजरीचे डोळे' नावाची त्यांची कादंबरी होती. माझ्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर लेखिका राहिल्या नव्हत्या म्हणून मी त्यांच्या पतींना यांना पत्र लिहून अनुवादाची अनुमती मागितली. त्यांच्याकडून होकार आला त्यामुळे मी अनुवाद केला. अनुवादाची कच्ची प्रत तयार झाल्यानंतर त्यांच्या पतिराजांचा मला फोन आला. त्यांनी सांगितलं की 'तुम्ही ती कादंबरी अनुवादित करू नका. लेखिकेने त्यांच्या हयातीतच या कादंबरीच्या अनुवादाची परवानगी दुसऱ्या कोणाला दिली आहे.'

प्र. ते त्यांना माहीत नव्हतं असंच ना ?

उ. हो. ते त्यांना माहीत नव्हतं. पण दुसऱ्या कुणाला तरी अनुमती आधीच देऊन दिल्यामुळे माझी ती कादंबरी पडून राहिली. नंतर मीरा. शिराळी यांनी केलेला या कादंबरीचा अनुवाद खूप टप्प्यानंतर प्रकाशित झाला.

पण असं होत नाही का .... समजा, एखाद्या कलाकृतीचा अनुवाद एका प्रकाशकाने प्रकाशित केला आणि त्याच कलाकृतीचा दुसरा अनुवाद दुसऱ्याने प्रकाशित केला................

होऊ शकतं आणि दर्जेदार कादंबऱ्यांच्या बाबतीत हे होऊ शकतं, होत असतं. शेक्सपिअर, रवींद्रनाथ टागोर यांसारख्या लेखकांच्या कलाकृतींचे अनुवाद पुन्हा पुन्हा होत असतात. परंतु हे अनुवाद

वाचणारा मराठी वाचक किती आहे हे लक्षात घ्यायला पाहिजे. त्यामुळे एक अनुवाद उपलब्ध असताना दुसरा अनुवाद छापताना प्रकाशक विचार करतात. त्यांना तो करावा लागतो. काही काळानंतर उपलब्ध अनुवादाच्या प्रति संपल्यानंतर दुसऱ्या अनुवादाचा विचार होऊ शकतो पण तोपर्यंत अनुवादकाचा यातील रस चालला जातो ना ! मीना वांगीकर यांनी केलेला अनुवाद प्रकाशित होऊन चाळीस वर्ष झाले. १९८० साली तो प्रकाशित झाला होता. आता माझा अनुवाद प्रकाशित होऊ शकतो. मीना वांगीकर आता नाहीत. पण त्यांचा तो अनुवाद उपलब्ध आहे. असं असताना माझा अनुवाद प्रकाशित होणं मला नैतिक दृष्ट्या बरोबर वाटत नाही. वांगीकर असताना देखील योग्य वाटलं नाही आणि आता त्या नसताना तर आणखीच योग्य वाटत नाही. ज्यांनी माझे अनुवाद वाचले आहेत त्या वाचकांचा मला आग्रह असतो की तुमचा अनुवाद आम्हाला वाचायचा आहे .प्रकाशकही माझ्यापर्यंत आलेत. पण मला अजून तरी असं वाटत आहे की अद्याप ती वेळ आली नाही. अजून दहा तरी वर्षे जाऊदेत त्या अनुवादाला ! पन्नास वर्षे पूर्ण होतात. तोपर्यंत मी जगले - वाचले आणि त्या अनुवादाला मागणी राहिली तर त्या वेळेला मी त्याचा विचार करेन.

लेखिका म्हणून खऱ्या अर्थाने तुम्ही साहित्याचा सन्मान असे उदात्त विचार समोर ठेवून करत आहात .

प्र. माझा पुढचा प्रश्न अशाच प्रकारचा आहे की कलाकृतीचे अनुवाद वेगवेगळ्या अनुवादकांनी केले तर ते वेगवेगळे येतात. यामध्ये आशय तोच राहात असेल तर अनुवादकाच्या शैलीमुळे ते वेगळे होतात का ?

उ. केवळ शैलीमुळे नाही तर अनुवादकाच्या आकलनामुळे ते वेगळे - वेगळे होतात. एकाच कलाकृतीबद्दल प्रत्येक व्यक्तीचं आकलन वेगळं असू शकतं. एकाच कलाकृतीचं वेगवेगळ्या काळी वेगवेगळं आकलन होऊ शकतं आणि वेगवेगळ्या पिढीनुसारही हे आकलन वेगवेगळं असतं. एकच कलाकृती चाळीस वर्षांच्या व्यक्तीला वेगळ्या कारणाने आवडू शकते आणि वीस वर्षाच्या व्यक्तीला वेगळ्या कारणाने आवडू शकते आणि ज्याला ज्या कारणाने आवडली असेल त्या कारणाला महत्त्व देत तो आपला अनुवाद पुढे नेतो. दर्जेदार साहित्याच्या.बाबत तर हे होतच असतं. अशा साहित्यांचे वेगवेगळे अनुवाद होऊ शकतात. आणि ते दर्जेदार ही असू शकतात. मी अनुवाद केला आहे तर तो सर्वश्रेष्ठ असं मी म्हणू शकत नाही. वेगवेगळ्या काळात दुसरे चांगले अनुवादक पुढे येऊ शकतात आणि वेगळ्या चांगल्या पद्धतीने अनुवाद करू शकतात. याबाबतीतला एक उदाहरण सांगते गिरीश कार्नाड यांचे ययाती नावाचं नाटक आहे. त्या नाटकाचा पूर्वी मराठी अनुवाद झाला आहे. त्या अनुवादाने कर्नाड समाधानी नव्हते म्हणून त्यांनी ते नाटक पुन्हा अनुवादासाठी माझ्याकडे विश्वासाने दिलं. मी केलेला अनुवाद त्यांना पसंत पडला आणि आता सध्या माझा अनुवाद वाचकांसाठी उपलब्ध आहे.

अनुवाद करताना सुरवातीच्या काळात तुम्ही प्रकाशक डोळ्यापुढे ठेवले होते का ?

नाही. प्रकाशक वगैरे डोळ्यापुढे ठेवले नव्हते. मी पहिला अनुवाद केला तो माझ्यासाठीच केला. त्या

अनुवादामागे दुसरा काहीही उद्देश नव्हता. फक्त ती कादंबरी मला समजून घ्यायची होती, म्हणून तो अनुवाद माझ्याकडून झाला. मग अनेकांनी हा अनुवाद प्रकाशित करण्यास सुचविलं म्हणून त्यानंतर प्रकाशक वगैरे या गोष्टी आम्ही बघायला लागलो. तरीही प्रकाशक नजरेसमोर ठेवून मी काम करत नाही. या अनुवादाला कोणीही प्रकाशक मिळणार नाही, असा धोका पत्करूनच मी ते करते.

आनंदासाठी हे काम करायचं, असंच ना ?

आनंदासाठी करणं हे तर बरोबरच आहे. पण कवितेचे अनुवाद तुम्ही स्वान्तसुखाय करू शकता. मोठ्या मोठमोठ्या कादंबऱ्यांचे अनुवाद कोणासाठी तरी करावे लागतात. अशावेळी मी प्रकाशक नाही पण वाचकवर्ग डोळ्यांपुढे ठेवते. म्हणजे मला जशी एखादी कादंबरी आवडते तशी मी आणखी चार जणांना पर्यंत पोचवू शकते, मला जसा आनंद मिळाला तसा मी चार जणांना देऊ शकते असा हेतू माझ्या मनात असे. मग अनुवाद झाल्यावर प्रकाशकाला भेटणं वगैरे हे काम होई. पुढे मला प्रकाशकांच्या संदर्भातला प्रश्न राहिलाच नाही. प्रकाशकांकडून अनुवादासाठी मला मागणी येऊ लागली आणि मी वेगवेगळ्या प्रकाशकांना माझे अनुवाद दिलेत. मेहता, मौज, राजहंस, कॉन्टिनेन्टल, साकेत प्रकाशन अशा वेगवेगळ्या प्रकाशकांनी माझे अनुवाद प्रकाशित केले आहेत. नागपूरच्या विजय प्रकाशनाने सुद्धा माझा अनुवाद प्रकाशित केला आहे.

प्रकाशकांचा आपल्याला एक अंदाज येत असतो. कोण प्रकाशक कोणत्या प्रकारचे पुस्तक काढतात हेही ठरलेलं असतं. कादंबऱ्या काढणारे प्रकाशक वेगळे आहेत. ते कथासंग्रह प्रकाशित करत नाही. पण मी काही कथासंग्रह देखील अनुवादित केले आहेत. मग कथासंग्रह प्रकाशित करणारे प्रकाशक ते अनुवाद मला मागून घेतात. मी नाटकं देखील अनुवादित केलीत. मग नाटकं प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकांकडे मला ती द्यावी लागतात. या पद्धतीने वेगवेगळे प्रकाशक वेगवेगळी पुस्तके प्रकाशित करतात. अनुवाद केला आणि तो प्रकाशित झाला नाही असं आत्तापर्यंत तरी झालं नाही. आधीच्या दोन कादंबऱ्या मीच बाजूला ठेवल्या. कोणत्याही प्रकाशकांना संकटात टाकण्याचा माझा स्वभाव नाही. जे प्रकाशक जे साहित्य छापतील तेच मी त्यांच्याकडे देते.

प्र. नागपूरच्या विजय प्रकाशनाचा, औरंगाबादच्या साकेत प्रकाशनाचा आता उल्लेख झाला... अनुवादासाठी ते नागपूरहून, औरंगाबादहून तुमच्या पर्यंत पोहोचले ?

उ. हो. त्यांना माझ्याकडून साहित्य कृती हवी होती. ज्यावेळी त्यांचं बोलणं झालं त्यावेळी जे अनुवाद तयार होते ते मी त्यांना दिले. माझे कथासंग्रह तयार होते,ते त्यांना दिले आणि म्हटलं 'पुस्तक काढेपर्यंत मला तुमचा आणि तुम्हाला माझा अंदाज येईल. मग त्यानंतर आपण पुढच्या कामाच्या वेळेला विचार करू.' मग त्यांनी त्या पद्धतीने माझी पुस्तकं काढली. विजय प्रकाशनाचे सचिन उपाध्याय माझ्याकडे येऊन पुस्तक घेऊन गेले. मग मी नागपूरला एका कार्यक्रमासाठी गेले होते तर त्यांच्या दुकानात जाऊन

आले.

प्र. साहित्य अकादमी नॅशनल बुक ट्रस्ट अनुवादासाठी तुम्हाला पुस्तकं पाठविते. यात तुमच्या आवडी निवडी चा भाग किती असतो ?

उ. सुदैवाने सगळी चांगली पुस्तकं मला अनुवादासाठी आली. साहित्य अकादमीनी मला पाठवलेल्या पुस्तकांमध्ये 'जा ओलांडुनी' हे भैरप्पांचं एक पुस्तक होतं. अनुवाद करण्यासाठी ते मी पूर्वीच हाती घेतल्यामुळे भैरप्पांनी ते नाव त्यांना सुचवलं. मग तर मी नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता ! दुसरा मी एक कथासंग्रह केला तो लेखिका वैदेही यांचा होता. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ती कलाकृती होती. लेखिका वैदेही यांचा एक कथासंग्रह मी आधीच अनुवादित केला त्यामुळे हा देखील अनुवाद माझ्याकडे आला. नॅशनल बुक ट्रस्ट कडून मला एक दुर्मीळ संधी मिळाली. त्यांच्याकडून आलेलं पुस्तक म्हणजे १९१५ साली कन्नड मधील मानली गेलेली पहिली सामाजिक कादंबरी माडीद्दुण्णो महाराया म्हणजे करावे तसे भरावे. साधारणपणे मी असं पुस्तक अनुवादित केलं असतं तर कोणत्या प्रकाशकाने स्वीकारलं असतं की नाही हा प्रश्नच होता ! पण नॅशनल बुक ट्रस्टने दिल्यामुळे माझ्या हातून ते दुर्मीळ काम आपोआप झालं त्यामुळे कर्नाटकातील साहित्य प्रवाहाच्या १०२ ते १०३ वर्षांतील विविध टप्प्यांवर वेगवेगळ्या कलाकृतींचे अनुवाद मी केलेले आहेत. म्हणजे कन्नड मधील पहिल्या सामाजिक कादंबरीपासून आत्ताच्या करकरीत १९१८ साली प्रसिद्ध झालेल्या साहित्यकृती अनुवादित करत या क्षेत्रात माझा मुक्तविहार झाला आहे. ही माझ्यासाठी फार मोठी उपलब्धी आहे. अनंतमूर्ती यांची 'भारतीपूर' नावाची एक अतिशय सुंदर कादंबरी आहे. सुदैवाने ही कादंबरी अनुवादासाठी माझ्याकडे आली. या साहित्यकृतीचा विचार करण्यात आला होता इतकी ती दर्जेदार कादंबरी आहे अनंत मूर्तींची ही सर्वात चांगली कलाकृती आहे. हेही काम नॅशनल बुक ट्रस्ट मुळे मला मिळालं. या दोन संस्थांच्या कामामुळे मला फार समाधान मिळालं.

प्र. कन्नड कवितांचा अनुवाद तुम्ही केला आहे ?

उ. हो. मी कवितांचे अनुवाद देखील केले, पण त्याला एक निमित्त घडलं. १९९० साली पुणे 'सकाळ' तर्फे 'सुट्टीचे पान' या नावाने मुलांसाठी एक सदर चालविलं गेलं. त्यासाठी सकाळ मध्ये काम करणाऱ्या लेखिका नंदिनी आत्मसिद्ध यांनी मला विचारणा केली. मुलांसाठी हे सादर असलं तरी यामध्ये बाल कविताच असाव्यात असा आग्रह नव्हता, तर मुलांची अभिरुची वाढविण्याच्या दृष्टीने दर्जेदार कविता मुलांसाठी उपलब्ध व्हाव्यात अशी ती संकल्पना होती. त्यावेळी मला आवडलेल्या ४५ ते ५० कवितांचा अनुवाद मी केला. या अनुवादित कवितांचा संग्रह मात्र झाला नाही. कवितेचा अनुवाद करताना मला कवितेचा आकलन पूर्णपणे झालं आहे का ? ही कविता मला पूर्णपणे कळली आहे का ? अशी शंका कवितेचा अनुवाद करताना सतत मनात असते. म्हणून अनुवाद करताना यात काहीतरी राहिलं असं

प्र. पुस्तकांवर चर्चासत्र आयोजित केले जातात. मग या चर्चासत्रांमधून वाचकवर्ग वाढतो का ? पुस्तकांचा खप वाढतो का ? की चोखंदळ वाचक पुस्तकांची चांगल्या पुस्तकांच्या शोधात असतोच ?

उ. सच्चा वाचक चांगल्या साहित्याच्या शोधात असतोच. पुस्तकांवर चर्चा घडतात ना त्या बहुतेक वेळा विद्यापीठीय स्वरूपाच्या असतात. वाचनालयात जाऊन पुस्तक मागणारा किंवा दुकानात जाऊन पुस्तक विकत घेणारा वाचक वर्ग सहसा तिथे नसतो. वाचनालयातून पुस्तकं आणणाऱ्या वाचकाला दररोज काहीतरी नवीन हवं असतं. त्याला तिथे काहीतरी नवीन मिळालं किंवा एखाद्या लेखकाची एखादी कलाकृती आवडली तर तो परत परत त्या लेखकाच्या अन्य कलाकृतींची मागणी करतो आणि त्यातून ते वाचन वाढतं असं मला वाटतं. एखादं पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचवायचं असेल तर वृत्तपत्रीय परीक्षणांचाही उपयोग होतो. अशी परीक्षणं वाचून वाचकाला पुस्तकांचा अंदाज येतो आणि वाचक पुस्तकांपर्यंत पोहोचतो.

प्र. घरातल्या एकूण स्थितीबद्दल किंवा वातावरण निर्मितीबद्दल तुम्ही सांगितलं घरातल्या जबाबदाऱ्या विरुपाक्ष सर घेतात. सकाळचा नाश्ता नेहमीच तयार करतात आणि तुम्हाला अनुवादाचं अधिक काम असेल तेव्हा तुमची डेडलाईन असेल तर बाकी ही अन्य काम करून तुम्हाला ते लेखनासाठी वेळ देतात पण अनुवादाच्या कामामध्ये तुमच्या मूडचा भाग किती असतो ?

उ. अनुवादाच्या कामांमध्ये मूड वर अवलंबून राहणं शक्य नसतं. काम करण्याची चिकाटी मात्र हवी असते. ते काम करण्यासाठी मला वेळ मिळाला पाहिजे आणि वेळ मिळाला तर तासन्तास बूड टेकून काम करण्याची तयारी पाहिजे. त्यानंतर मग पुढचा भाग मूडचा असतो. मूड चांगला असला तर कामांमध्ये फरक पडतो. परंतु पाचशे पानी सहाशे पानी आठशे पानी अशा मोठ्या कादंबऱ्यांचा अनुवाद करण्यासाठी काही महिने ते काही वर्ष असा मोठा कालावधी लागतो. सगळ्याच वेळी तुमचा मूड चांगलाच असेलच असं नसतं. पण एकदा काम हातात घेतलं की मूडकडे लक्ष न देता बैठक मारून काम करावंच लागतं पण जेव्हा साहित्याचं शेवटचं वाचन आपण करतो तेव्हा मात्र मूडची थोडी गरज भासते. ते वाचण्यासाठी तंद्री लागावी लागते एका तंद्री मध्ये कलाकृती वाचली तर त्याचं आकलन संपूर्णपणे होतं. कलाकृती नीट कळते. सिनेमा बघताना सुद्धा आपण तो तुकड्या-तुकड्याने बघितला तर फारसा अपील होत नाही, तसं तिथे पण होते. पण शेवटचा हात फिरवितो तेव्हा पण सुरुवातीला चिकाटीने बैठक मारून बसणं आवश्यकअसतं. तेच नेटाने करावं लागतं.

प्र. साहित्याचं पुनर्लेखन करावं लागतं का ?

उ. हो.अनेकदा ! आता तर मी संगणकावर लेखन करते पण पूर्वी तर काही संहितेचं मी दोनदा - तीनदा पुनर्लेखन केलेलं आहे. कधीकधी एखादा मुद्दा लेखनात जमला नाही असं जाणवतं तेव्हा समाधान होईपर्यंत ते करावं लागतं म्हणून काही भागांचं तर चार-पाच वेळा देखील पुनर्लेखन मी केलं आहे.

आता संगणकामुळे चांगली सोय झाली आहे आता तेवढा तेवढा भाग बदलला की चालतं. पूर्वी कागदावरचं बदललं की तो संपूर्ण कागदच पुन्हा लिहावा लागायचा.

प्र. तुम्ही संगणक किती वर्षांपासून वापरता ?

उ. २००७ सालापासून.

प्र. तुमचा पीएच.डी.चा विषय भारतीय मंदिरं आणि शिल्पशास्त्रातील द्रवीड शैलीतील उत्क्रांती, विकास आणि शैलीची वैशिष्ट्ये हा आहे. तर या विषयाचा अभ्यास करताना तुमच्या देव- देवतांबद्दलच्या श्रद्धांमध्ये काही बदल झाले आहेत का ?

उ. देव - देवतांबद्दलच्या माझ्या श्रद्धांमध्ये अजिबात बदल झालेले नाही

कारण तुमची श्रद्धा नव्हती..........

बरोबर माझी श्रद्धा नव्हतीच !

प्र. मग तुम्ही हा विषय निवडला तो कसा काय ?

उ. कला आणि चित्रकला या विषयात मी एम ए. केलं आहे. त्यामधून शिल्पशास्त्राच्या दृष्टीने देवालयं हा एक विषय असतो. त्या दृष्टीने भारतातील देवळांचे तीन प्रकार मानले जातात द्रविड, नागर आणि वासर.त्यातल्या द्राविड शैली विषयी माझा अभ्यास आहे. प्रबंधासाठी केलेल्या माझ्या अभ्यासामुळे मी करकरीत राहिले नाही. एकदम देवाला रिटायर करा वगैरे अशी माझी भावना झाली नाही. देवाबद्दलच्या माझ्या श्रद्धा काहीही असल्या तरी या निमित्ताने मी मोठा समाज बघत राहिले. देवळात श्रद्धा घेऊन जाणाऱ्या माणसांचा जो प्रचंड मोठा समाज भारतात आहे तोच समाज मी निरखला आणि माझी श्रद्धा नसली तरी आपण मोडीत काढावा असा तो विषय नाही असा मला एकंदरीत वाटू लागलं.माझी श्रद्धा नसली तरी इतरांच्या श्रद्धेला धक्का पोहोचवण्याचा मला अधिकार नाही हे भान मला आलं. ते झाल्यानंतर मी वेगवेगळे साहित्य अनुवादित करत गेल्यामुळे असेल किंवा वेगवेगळी माणसं बघत गेल्यामुळे असेल, माझी अशी श्रद्धा निर्माण झाली की श्रद्धा किंवा अंधश्रद्धा ही फार वैयक्तिक बाब आहे. या गोष्टीवर सार्वजनिक रित्या काही भाष्य करण्याचा किंवा ताशेरे ओढण्याचा कुणालाच अधिकार नाही कारण ती प्रत्येकाचीच एक एक भावनिक गरज असते आणि माणूस आपापल्या पद्धतीने ती गरज मिटवू बघत असतो. त्या अंधश्रद्धेचा समाजाला जर त्रास होत असेल तर त्याला विरोध करणे योग्य होईल पण ज्या श्रद्धेचा समाजाला किंवा दुसऱ्या कोणालाही काही त्रास होत नसेल तर त्या श्रद्धेला विरोध करणे किंवा त्याबद्दल तक्रार करणे योग्य नाही. स्त्रिया श्रद्धाळू असतात असं माझ्या निदर्शनास आलं आहे. त्या आपापल्या पद्धतीने आपापल्या अडचणींवर मार्ग काढण्याचा

प्रयत्न करतात तर आपण त्यांना तो अधिकार देऊ यांना अशी माझी भावना असते, तिला काहीतरी सांगून तो अधिकार तिच्या कडून हिरावून घेण्याचा मला हक्क नाही असं माझं स्पष्ट मत आहे. एखादी स्त्री शांती मिळविण्यासाठी एखांदा मार्गाचं अवलंब करीत असेल तिला ढवळून काढू नये असं मी मानायला लागले. ही मतं मला पीएच.डी.च्या अभ्यासाने दिली. त्यानिमित्ताने मी जी देवळं- देवळं फिरत राहिले आणि त्याबरोबर मला जो समाज दिसत राहिला त्यामुळे माझ्यात झालेला हा बदल आहे.

श्रद्धाळू माणसं बघून हा वेडगळ किंवा मागासलेला समाज आहे असा विचार न करता तुम्ही व्यक्ती त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याला खूप महत्त्व दिलंत.! ,

अनेक देवांमध्ये खेड्यापाड्यातल्या मुलं त्यांच्या आई-वडिलांना जपून घेऊन आलेले दिसायचे. त्यांच्या इच्छा पूर्ण होऊ देत असा त्यामागे भाव असे. पण साधारणपणे शहरात राहणाऱ्या व्यक्ती असा विचार करतात की देवळामध्ये दर्शन घेण्यासाठी इतक्या दूरवर जाऊन खर्च करण्यापेक्षा तेवढ्याच पैशात दवाखान्यात नेऊन त्यांच्यावर उपचार केले तर त्याचा कदाचित फायदा होईल !. पण देवळात येणाऱ्या वयोवृद्ध व्यक्तींना यामुळे धन्य धन्य वाटत असते आणि तो आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असतो. आणि दवाखान्यात जाऊन नक्कीच फायदा होईल का किंवा यांचा जीव वाचेल का असा प्रश्न शेवटी भाविकांच्या मनात उरतोच ! त्यापेक्षा वयोवृद्धांच्या भावनेला महत्त्व देऊन त्यांची इच्छा पूर्ण करण्यात भाविक आनंद मानतात.

प्र. सध्या काय चालू आहे आगामी काय करण्याचा विचार आहे ?

उ. सध्या मी काश्मीर या विषयावरचं एक पुस्तक प्रकाशकांकडे दिलं आहे.३७० कलम रद्द झाल्यामुळे देशात आणि काश्मीर मध्ये जे काही घडलं, यासंदर्भातील ते पुस्तक आहे. सहना विजयकुमार या त्याच्या लेखिका आहेत.त्या अभियंता आहेत. आय.टी मध्ये काम करतात. लेखिका काश्मीर मध्ये राहून आलेल्या आहेत आणि तिथल्या मुसलमानांशी, तेथून बाहेर पडलेले, परागंदा झालेल्या हिंदू ,ब्राह्मण लोकांशी त्यांनी संवाद साधला. त्यामध्ये त्यांनी पुराणापासूनचा आढावा घेतला. इतिहास, पुराण आणि आजची परिस्थिती इथपर्यंत त्यांनी लिहिलेलं आहे. या कादंबरीला भैरप्पांनी प्रस्तावना दिली आहे. त्यामुळे ते काम माझ्याकडे आलं. आणि आता माझ्या हातात भैरप्पांनी लिहिलेली 'ग्रहभंग' नावाची कादंबरी अनुवादासाठी आहे. नॅशनल बुक ट्रस्टने या कादंबरीचे सर्व भाषांमध्ये अनुवाद आणले. १९८०साली या कादंबरीचा मराठी अनुवाद केला होता. पण इतके वर्ष त्याची दुसरी आवृत्ती निघाली नाही.

परंतु भैरप्पा महाराष्ट्रात चांगल्यापैकी वाचले जातात त्यामुळे पुस्तकाची दुसरी आवृत्ती यावी अशी त्यांची इच्छा आहे म्हणून त्यांनी नॅशनल बुक ट्रस्ट कडून अधिकार काढून स्वतःकडे घेतले आणि

त्यांनीच ती कादंबरी मला अनुवाद करण्यासाठी दिली.

उमाताईंचे अनेक पैलू उलगडत मुलाखत पुढे जात होती.त्यांचं अनुवादासंबंधीचं चिंतन त्यांच्या वक्तव्यातून येत होत. ते ऐकताना अनुवादासंबंधीच्या अनेक संकल्पना स्पष्ट होत गेल्या आणि खूप नवीन माहिती मला मिळाली.

उमाताई भरभरून बोलत होत्या. त्यांच्याजवळ सांगण्यासारखं खूप काही आहे हे जाणवलं. अनेक साहित्यकृतींमधल्या नानाविध गोष्टी त्यांना उदाहरणादाखल आठवत होत्या. त्यांच्याकडून ती स्मरणं ऐकताना खूप काही ऐकण्याचं समाधान मला मिळालं.

आमची भेट संपूच नये असं मला वाटत होतं. अतृप्तीची हुरहुर मनात बाळगत मला घरी परतावं लागलं.

लवकरच

सौ. अर्चना चंद्रशेखर साने आणि
सौ. यशश्री गिरीश पुणेकर लिखित
मराठी संगीत रंगभूमीचा मागोवा घेणारे पुस्तक प्रकाशित होत आहे.

**सौभद्र,स्वयंवर, मानापमान...... भरजरी नाटकांची वैभवशाली परंपरा......
नाटक आणि नाट्य पदांची मराठी रसिकांना कायम भुरळ पडली आहे.
१८४३ पासून सुरू झालेल्या या
नाट्यरसगंगेत अनेक कलावंतांनी आपल्या उत्कृष्ट कलेचं अर्घ्य दिलं आहे...
१८८० साली अण्णासाहेब किर्लोस्करांनी या कलेला शांकुतल नाटकाद्वारे शास्त्रशुध्द पद्धतीने संगीत नाटकांचं सादरीकरण करून नवीन रूप दिलं. कलेच्या नभांगणात उच्च स्थानी असलेल्या या थोर नाट्य परंपरेला १४० वर्षांहूनही अधिक काळ लोटला तरी त्याची गोडी कमी होत नाही..
संगीत रंगभूमीचं जतन करून ती पुढच्या पिढीकडे सोपवणं ही केवळ कलाकारांचीच नाही तर रसिक म्हणून आपली सुद्धा जबाबदारी आणि कर्तव्य आहे...**

आणि याच उद्देशाने पुणे आकाशवाणीवर २०१८ साली **"मर्मबंधातली ठेव"** या मालिकेतून संगीत रंगभूमीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न आम्ही केला होता. त्याचंच लिखित आणि विस्तारित रूप म्हणजे हे पुस्तक...

★ स्वरनाट्य रसगंगा ★

मूळ किंमत 380/-
सवलत किंमत 200/-
पोस्टेज खर्च वेगळा.

संपर्क: चंद्रशेखर साने
9823145940

समारोप

“ती” चं पान. जे फक्त तिचं असेल तिच्या हक्काचं असेल. तिच्या भावनेला शब्दबद्ध करण्याचं एक माध्यम. या माझ्या संकल्पनेला सगळ्यांनी आनंदाने होकार दिला आणि कुठल्याही चांगल्या हेतूने सुरुवात केलेलं कार्य हे सिद्धीस जातं याचं प्रमाण म्हणजे हे आगळंवेगळं मासिक असंच मी म्हणील..यात ज्यांनी ज्यांनी लेख लिहिले कविता लिहिल्या या सगळ्या सख्यांचं वाचन आणि लेखन संस्कृतीवर असलेलं प्रेम असंच राहावं अशी इच्छा व्यक्त करते. आपण हा छोटासा प्रयत्न गोड मानुन घ्याल या अपेक्षेसह माझ्या लेखणीला विराम देते.

धन्यवाद ...!

आपलं प्रेम असंच असू द्या.पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह...!

आणि हो, तुमच्या पैकी कुणाला या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर तुम्ही नक्की सहभागी व्हा. आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत. या वाक्यावर क्लिक करून आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. संपूर्ण नियमावली ही या फॉर्म वर उपलब्ध आहे.

आमचे आधीचे प्रकाशित अंक (अंक वाचण्यासाठी खालील नावावर क्लिक/टॅप करा):

मार्च २०२१

एप्रिल २०२१

मे २०२१

जुन २०२१

जुलै २०२१

ऑगस्ट २०२१

सप्टेंबर २०२१

ऑक्टोबर २०२१

आपला अभिप्राय आम्हाला tichapaan@gmail.com वर नक्की कळवा. आम्ही आपल्या अभिप्रायाच्या प्रतिक्षेत आहोत.

© अक्षय देशपांडे